रविवार ८ फेब्रुवारी २०२६

अकोला
पाने : ८ + ४
वर्ष : १९
अंक : ३३४
स्वागत मूल्य ३ रुपये
www.ajinkyabharat.com

बातम्यांचा गतिमान पाठलाग

# अजिंक्य भारत





## थोडक्यात

### सात वर्षांपर्यंत शिक्षेच्या गुन्ह्यांत थेट अटक नको

**नवी दिल्ली :** सात वर्षांपर्यंत शिक्षेची तरतूद असलेल्या गुन्ह्यांमध्ये आरोपींना थेट अटक करता येणार नाही, असे ठाम मत सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी व्यक्त केले. भारतीय नागरिक सुरक्षा संहितेमधील (बीएनएसएस) कलम ३५(३) अंतर्गत नोटीस देणे पोलिसांसाठी अनिवार्य असल्याचे स्पष्ट करत न्यायालयाने अटक ही नेहमीची प्रक्रिया ठरू शकत नाही, असेही नमूद केले. न्यायमूर्ती एम. एम. सुंदरेश आणि न्यायमूर्ती एन. कोटिश्वर सिंग यांच्या खंडपीठाने सांगितले की, सात वर्षांपेक्षा कमी शिक्षेच्या गुन्ह्यांत पोलिसांनी प्रथम कलम ३५(३) अंतर्गत नोटीस बजावणे आवश्यक आहे. ही प्रक्रिया न पाळता थेट अटक केल्यास ती कायदेशीर ठरणार नाही, असा स्पष्ट इशाराही न्यायालयाने तपास यंत्रणांना दिला.

### सिद्धू दाम्पत्याची राहुल गांधींवर जहरी टीका



**चंदीगड :** एकीकडे माजी क्रिकेटपटू आणि पंजाब काँग्रेसचे माजी अध्यक्ष नवज्योतसिंग सिद्धू सध्या टीव्हीवरील कॉमेडी शोमध्ये हास्यविनोदात मग्न आहेत. तर दुसरीकडे त्यांच्या पत्नी डॉ. नवज्योत कौर सिद्धू यांची काँग्रेसने पक्षातून अधिकृतपणे हकालपट्टी केली आहे. गेल्या काही दिवसांपासून पक्षनेतृत्व आणि सिद्धू दाम्पत्यामध्ये सुरू असलेल्या वादाचा हा परिपाक मानला जात आहे. काँग्रेसमधून बाहेर पडताना डॉ. नवज्योत कौर यांनी राहुल गांधींवर अत्यंत बोचऱ्या शब्दांत टीका केली आहे. भाजपने राहुल गांधींच्या प्रतिमेला छेद देण्यासाठी वापरलेला ''पप्पू'' हा शब्द वापरत त्यांनी राहुल गांधींना लक्ष्य केले. काही आठवड्यांपूर्वीच सिद्धू दाम्पत्याने राहुल आणि प्रियंका गांधी यांचा उल्लेख आपले 'मार्गदर्शक' असा केला होता.

# राज्यात ६० हून अधिक ठिकाणी ईव्हीएममध्ये बिघाड; मतदारांना फटका!

## ७ हजार ४३८ उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद




**मुंबई, दि. ७** वृत्तसंस्था

राज्यातील १२ जिल्ह्यांमध्ये जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी आज मतदान प्रक्रिया पार पडली. लोकशाहीच्या या उत्सवात नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला असला, तरी अनेक ठिकाणी निवडणूक यंत्रणेच्या ढिसाळ नियोजनाचा फटका मतदारांना बसला. राज्यभरात ६० हून अधिक मतदान केंद्रांवर ईव्हीएम मशीनमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याच्या तक्रारी समोर आल्याने निवडणूक प्रशासनाच्या सज्जतेवर आता गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

**निवडणूक प्रक्रियेत सर्वाधिक अडथळे :** रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण तालुक्यात पाहायला मिळाले. तालुक्यातील सुमारे ४० ते ४५ केंद्रांवर मतदान यंत्रे अचानक बंद पडल्याने मतदारांचा खोळंबा झाला. खेर्डी जिल्हा परिषद (पान २ वर)

### सोमवारी होणार निकाल जाहीर

राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गत १२५ पंचायत समित्यांसाठी शनिवारी मतदान पार पडले. जिल्हा परिषदेच्या ७३१ तर पंचायत समित्यांच्या १ हजार ४६२ जागांसाठी ही निवडणूक झाली. या निवडणुकीत एकूण ७ हजार ४३८ उमेदवार रिंगणात असून, सोमवारी निकाल जाहीर होणार आहे. राज्य निवडणूक आयोगाने ५० टक्के आरक्षणाच्या मर्यादेत असलेल्या रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव आणि लातूर या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांसाठी निवडणूक जाहीर केली होती. सुरुवातीला ही निवडणूक ५ फेब्रुवारीला होणार होती; परंतु उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर तीन दिवसांचा दुखवटा जाहीर झाला आणि मतदानाची तारीख बदलण्यात आली. त्यानुसार, शनिवारी ७ फेब्रुवारी रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान प्रक्रिया पार पडली. सोमवारी, ९ फेब्रुवारी रोजी निकाल जाहीर होणार आहे.

# रस्त्याच्या कडेला उतरलेल्या १५ प्रवाशांना धडक, ६ जणांचा मृत्यू

## यमुना एक्सप्रेसवेवर भीषण रस्ता अपघात

**मथुरा, दि. ७** वृत्तसंस्था



यमुना एक्सप्रेसवेवर एक मोठा अपघात झाला. मथुराजवळ एका कंटेनरने १५ प्रवाशांना धडक दिली, त्यात सहा जणांचा मृत्यू झाला आणि नऊ जण जखमी झाले. प्रवासी स्वतःला आराम करण्यासाठी खाली उतरले होते असे वृत्त आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी या अपघाताची दखल घेतली आहे आणि अधिकाऱ्यांना मदतकार्य जलद करण्याचे निर्देश दिले आहेत.

वृत्तानुसार, शनिवारी पहाटे ३:३० च्या सुमारास नोएडाहून आग्रा येथे एक बस जात होती. प्रवाशांना आराम करण्यासाठी सुरीर कोतवाली परिसरातील माइलस्टोन ८८ येथे चालकाने बस थांबवली. प्रवासी खाली उतरताच मागून येणाऱ्या एका भरधाव कंटेनरने त्यांना धडक दिली, ज्यामध्ये सहा प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला. मथुरा जिल्ह्यातील सुरीर कोतवाली परिसरात झालेल्या एका भीषण अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला, तर नऊ जण गंभीर जखमी झाले. माहिती मिळताच पोलिसांनी जखमींना रुग्णालयात दाखल केले आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवले. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. मृतांमध्ये औरैया येथील सोनू, बस्ती येथील देवेश, कन्नौज येथील असलम आणि दिल्ली येथील संतोष यांचा समावेश आहे. दोन प्रवाशांची ओळख पटवण्यात येत आहे. मुख्यमंत्री योगी यांनी अपघाताची तात्काळ दखल घेतली आहे. त्यांनी तीव्र शोक व्यक्त केला आहे. त्यांनी अधिकाऱ्यांना तातडीने घटनास्थळी पोहोचून मदत आणि बचाव कार्य जलद करण्याचे निर्देश दिले आहेत.

**चालकाचा निष्काळजीपणा? :** प्राथमिक तपासात असे दिसून आले आहे की चालकाने बस असुरक्षित ठिकाणी थांबवली, ज्यामुळे हा मोठा अपघात झाला. नियमांनुसार, एक्सप्रेसवेवरील नियुक्त केलेल्या ''ग्रीन झोन'' मध्येच वाहने थांबवता येतात.

# एकनाथ खडसेंना कोर्टाचा दणका!

## पत्नी विरोधात अजामीनपात्र वॉरंट जारी

**मुंबई, दि. ७** वृत्तसंस्था



भोसरी जमीन व्यवहार प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते एकनाथ खडसे यांना मोठा न्यायालयीन धक्का बसला आहे. खडसे यांच्या पत्नी मंदाकिनी खडसे यांच्याविरोधात मुंबई सत्र न्यायालयातील विशेष एमपीएमएलए न्यायालयाने अजामीनपात्र वॉरंट जारी केले आहे. तसेच, एकनाथ खडसे यांच्याविरोधातही कोर्टाने कठोर भूमिका घेतली आहे.

शुक्रवारी या प्रकरणात आरोप निश्चिती होणार होती, मात्र एकनाथ खडसे आणि मंदाकिनी खडसे दोघेही न्यायालयात हजर राहिले नाहीत. याच कारणामुळे विशेष न्यायालयाने थेट नॉन-बेलेबल वॉरंट जारी केल्याची माहिती समोर आली आहे. एकनाथ खडसे हे महसूलमंत्री असताना, पुण्यातील भोसरी औद्योगिक वसाहतीमधील भूखंड नियमांचे उल्लंघन करून त्यांच्या पत्नी मंदाकिनी खडसे आणि जावई गिरीश चौधरी यांनी खरेदी केल्याचा आरोप आहे. ही जमीन मूळ बाजारभावापेक्षा अत्यंत कमी दरात खरेदी करण्यात आल्याचा दावा करण्यात आला होता. या प्रकरणामुळेच खडसे यांना मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला होता. या प्रकरणात ३ डिसेंबर २०२५ रोजी मुंबई सत्र न्यायालयातील विशेष न्यायालयाने एकनाथ खडसे आणि त्यांच्या कुटुंबीयांचा दोषमुक्तीचा अर्ज फेटाळला होता. त्यानंतर आरोप निश्चितीचा मार्ग मोकळा झाला.

### हायकोर्टाकडूनही दिलासा नाही

सत्र न्यायालयातील कारवाईला अंतरिम स्थगिती देण्याची मागणी मुंबई उच्च न्यायालयात करण्यात आली होती. मात्र, हायकोर्टाने स्थगिती देण्यास नकार दिल्यामुळे आरोप निश्चितीची प्रक्रिया पुढे गेली.

### पप्पू यादवची प्रकृती बिघडली

**पाटणा :** बिहारच्या राजकारणात शुक्रवारी मध्यरात्री मोठी घडामोड घडली. पूर्णियाचे अपक्ष खासदार पप्पू यादव यांना पोलिसांनी मध्यरात्री १२ वाजता अटक केली. ३१ वर्षे जुन्या प्रकरणात पाटणा पोलिसांनी पप्पू यादव यांना अटक केली. त्यानंतर पप्पू यादव यांची प्रकृती अचानक बिघडल्याने त्यांना पाटण्याच्या आयजीआयएमएस रुग्णालयातून पीएमसीएच याठिकाणी हलवण्यात आले आहे. त्यांच्यावर डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती खालावल्याने त्यांना चांगल्या उपचारांसाठी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार दुसऱ्या रुग्णालयात पाठवण्यात आल्याचे वृत्त आहे. सध्या डॉक्टरांचे एक पथक त्यांच्या प्रकृतीवर लक्ष ठेवून आहे. वृत्तानुसार, पप्पू यादव यांना अलिकडेच (पान २ वर)

# ई-केवायसी : लाडक्या बहिणींना आता दोनच प्रश्नांची द्यावी लागणार उत्तरे!

**मुंबई, दि. ७** वृत्तसंस्था




लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळावा यासाठी सरकारने काही महिन्यांपूर्वी सर्व लाभार्थींच्या पडताळणीसाठी 'ई- केवायसी' प्रक्रिया राबविण्यात आली; मात्र ती सदोष असल्याने तसेच काही किचकट प्रश्नांची चुकीची उत्तरे लिहिल्याने बहुसंख्य महिलांचे गेल्या तीन महिन्यांचे १,५०० रुपयांचे हप्ते बँक खात्यात जमा झाले नाहीत. यानंतर आता महिलांकडून मोठा रोष व्यक्त करण्यात येत होता. यामुळे आता महिला बालविकास विभागाकडून लाभार्थींसाठी पुन्हा एकदा ही ऑनलाईन प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'लाडकी बहीण' योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांना दरमहा १५०० रुपयांची आर्थिक मदत देण्यात येते. या योजनेचा लाभ पारदर्शकपणे योग्य लाभार्थ्यांपर्यंत पोहोचावा, यासाठी ई-केवायसी बंधनकारक करण्यात आली होती. मात्र प्रत्यक्षात या प्रक्रियेमुळे अनेक महिलांना अडचणींचा सामना करावा लागला. मोबाइल नसणे, इंटरनेटचा अभाव, आधारकार्ड बँक खात्याशी लिंक नसणे, ओटीपी न येणे, तसेच ऑनलाइन प्रश्नावलीतील तांत्रिक भाषा समजण्यास अडचणी आल्याने अनेक महिलांची प्रक्रिया अर्धवट राहिली, तर काहींच्या चुकीच्या नोंदी झाल्या. अनेक ठिकाणी सायबर कॅफे किंवा मध्यस्थांच्या मदतीने ई-केवायसी करण्यात आली, मात्र या वेळी काही ठिकाणी चुकीची माहिती भरली गेली किंवा आवश्यक कागदपत्रे अपलोड न झाल्याने लाभार्थींची नावे योजनेतून तात्पुरती वगळली गेल्याचे सध्या उघड होत आहे. अनेक महिलांच्या पतींनी प्राप्तिकर भरला असल्याने त्या योजनेसाठी अपात्र ठरविल्या गेल्या. तर एकाच रेशनकार्डवर दोन लाभार्थी असल्याने यातील एका लाभार्थीचे नाव (पान २ वर)

# अजित पवारांच्या रिक्त झालेल्या जागेसाठी निवडणूक आयोगाची मोठी घोषणा

**मुंबई, दि. ७** वृत्तसंस्था



बारामती विधानसभेवर गेले कित्येक वर्ष सलग निवडून येणारे राज्याच्या राजकारणात विविध पदे भूषविणारे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाले. २८ जानेवारीला घडेलेल्या या घटनेने महाराष्ट्र हळहळला. बारामतीकरांवर अजितदादांच्या अकाली जाण्याने मोठा आघात झाला.

आज अजित पवार यांच्या विमान अपघाताला १० दिवस पूर्ण झाले आहेत. अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. यावरून राजकारण रंगले होते. अनेकांनी ही शपथ नियमाला धरून नसल्याचे बोलले होते. अशातच आता केंद्रीय निवडणूक आयोगाने एक मोठी घोषणा केली आहे. २०१-बारामती विधानसभेच्या पोटनिवडणुकीचे वेळापत्रक निवडणूक आयोगाने जाहीर केले आहे. या पार्श्वभूमीवर भारत निवडणूक आयोगाने लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० मधील कलम २१ अन्वये २०१बारामती विधानसभा मतदारसंघासाठी विशेष संक्षिप्त पुनर्निरीक्षण मतदारयादी कार्यक्रम जाहीर केला आहे. यानुसार अजित पवार यांच्या निधानानंतर ही रिक्त झालेली जागा (पान २ वर)


# भारतावरील २५ टक्के टॅरिफ रद्द करण्याच्या आदेशावर डोनाल्ड ट्रम्प यांची स्वाक्षरी

**वॉशिंग्टन, दि. ७** वृत्तसंस्था



अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शुक्रवारी एका कार्यकारी आदेशावर स्वाक्षरी केली आहे, ज्यामध्ये त्यांनी भारतावर लादलेले २५ टक्के टॅरिफ काढून टाकण्याची घोषणा केली आहे. काही दिवसांपूर्वीच ट्रम्प यांनी भारत आणि अमेरिका यांच्यात व्यापार करार झाल्याची घोषणा केली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही या व्यापार कराराला दुजोरा दिला होता.

ट्रूथ सोशल या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर घोषणा करताना ट्रम्प यांनी दावा केला होता की भारत हा रशियाकडून तेल खरेदी करणे बंद करेल. रशियाकडून तेल खरेदी करण्याच्या मुद्द्यावर भारत आणि अमेरिका यांच्यात गेल्या काही दिवसांपासून वाद सुरू होता. असे असले तरी पंतप्रधान मोदी यांच्याकडून ट्रम्प यांच्या घोषणेनंतर लगेचच करण्यात आलेल्या एक्स पोस्टमध्ये मात्र याचा कोणताही उल्लेख करण्यात आलेला नव्हता. दरम्यान, ट्रम्प यांनी स्वाक्षरी केलेल्या कार्यकारी आदेशात त्यांच्या या दाव्याचा पुनरुच्चार करण्यात आला आहे की, भारताने रशियाकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे तेल आयात करणे थांबवण्यावर सहमती दर्शवली आहे. या आदेशात पुढे असेही नमूद करण्यात आले आहे की, भारताने अमेरिकेकडून ऊर्जा उत्पादने खरेदी करण्याचेही मान्य केले आहे. विशेषतः, भारताने रशियन फेडरेशनकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे तेल आयात करणे थांबवण्याचे वचन दिले आहे, तसेच अमेरिकेकडून युनायटेड स्टेट्स एनर्जी प्रॉडक्ट्स खरेदी करणार असल्याचे स्पष्ट केले आहे, आणि भारताने नुकतेच येत्या १० वर्षांसाठी संरक्षण सहकार्य वाढवण्यासाठी अमेरिकेबरोबरच्या एका फ्रेमवर्कसाठी सहमती दर्शवली आहे, असे या कार्यकारी आदेशात नमूद करण्यात आले आहे. या आदेशामध्ये असेही म्हटले आहे की, वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून माहिती आणि शिफारसी (पान २ वर)



## पाठिंबा | अमेरिकेनेही भारताचाच भाग असल्याचे केले मान्य

# पाकव्याप्त काश्मीरवरून पाकिस्तानला मोठा धक्का!

**वॉशिंग्टन, दि. ७** वृत्तसंस्था

**अमेरिकेने पाकिस्तानला मोठा धक्का दिला आहे. भारतासोबतच्या अमेरिकेच्या व्यापार करारावर पाकिस्तान आधीच नाराज होता. आता, पाकव्याप्त काश्मीर बाबत अमेरिकेने पाकिस्तानला मोठा धक्का दिला आहे. अमेरिकेने एक नकाशा जारी केला आहे ज्यामध्ये भारताच्या नकाशात पाकव्याप्त काश्मीर समाविष्ट आहे.**




भारत आणि अमेरिकेमध्ये व्यापार करार झाला आहे. अमेरिकन व्यापार प्रतिनिधी कार्यालयाने इंस्टाग्रामवर एक पोस्ट पोस्ट केली आहे. ज्यामध्ये म्हटले आहे की अमेरिका-भारत करारामुळे अमेरिकन उत्पादनांसाठी नवीन बाजारपेठांमध्ये प्रवेश मिळेल, ज्यामध्ये झाडांच्या काजू आणि सुक्या धान्यांपासून ते लाल ज्वारी आणि ताजी आणि प्रक्रिया केलेली फळे यांचा समावेश असेल. सर्वात उल्लेखनीय वैशिष्ट्य म्हणजे भारताचा नकाशा असलेली पोस्ट. भारताचा जुना नकाशा, ज्यामध्ये पाकव्याप्त काश्मीर हा भारताचा भाग आहे. पाकिस्तानने नेहमीच पाकव्याप्त काश्मीरला आपला प्रदेश मानले आहे, तर भारताने नेहमीच पाकव्याप्त काश्मीरला भारताचा अविभाज्य भाग मानले आहे. यामुळे मोठा वाद निर्माण झाला आहे. पाकिस्तान या मुद्द्यावर जगभरात मदत मागतो. आता, अमेरिकेनेही पाकिस्तानच्या दुखण्याला स्पर्श केला आहे. अमेरिकेने भारताचा जुना नकाशा स्वीकारला आहे. पाकव्याप्त काश्मीरवरून पाकिस्तानला हा मोठा धक्का मानला जात आहे. नकाशामध्ये जम्मू आणि काश्मीरसह पीओकेचे काही भाग भारताच्या सीमेत दाखवले आहेत.

भारत आणि अमेरिका यांच्यातील अंतरिम व्यापार कराराचा आराखडा जाहीर करण्यात आला आहे. यादरम्यान ट्रम्प प्रशासनातील अमेरिकेच्या व्यापार प्रतिनिधी कार्यालयाने प्रसिद्ध केलेल्या एका नकाशाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. या नकाशामध्ये संपूर्ण जम्मू आणि काश्मीरचा भाग, ज्यामध्ये पाकिस्तान व्याप्त काश्मीर, यासह चीनकडून दावा केला जाणारा अक्साई चीन हा प्रदेश देखील भारताचा भाग असल्याचे दाखवण्यात आले आहे. या नकाशाने सोशल मीडियावर अनेकांचे लक्ष वेधून घेतले आहे. भारताच्या प्रादेशिक सार्वभौमत्वासाठी अमेरिकेच्या कुठल्याही मान्यतेची आवश्यकता नाही.

### अमेरिकेच्या जुन्या धोरणात मोठा बदल

काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे, ही भूमिका भारताने नेहमीच ठामपणे मांडली आहे. असे असले तरी, अमेरिकेच्या जुन्या धोरणात झालेला हा मोठा बदल आहे. भारताचा हा अचूक नकाशा भारत अमेरिका यांच्यातील अंतरिम व्यापार कराराच्या अधिकृत कम्युनिकेशनचा भाग म्हणून शेअर करण्यात आला आहे. या नकाशामध्ये जम्मू आणि काश्मीर, लडाख मधील अक्साई चीन आणि अरूणाचल प्रदेश हे भारताच्या सीमेमध्ये दाखवण्यात आले आहेत.

## पान 1 वरून...

### राज्यात ६० हून अधिक ठिकाणी...

गटातील पाच केंद्रांवर यंत्रे निकामी झाल्याने मतदारांना रांगेतच उभे राहावे लागले. शिरगाव येथे सकाळी दोन यंत्रे तासभर बंद होती, तर सावर्डे कॉलनीमध्ये सकाळी ९ वाजताच यंत्रात बिघाड झाला. कोकण आणि पश्चिम महाराष्ट्र- रायगड जिल्ह्यातील अलिबाग (सहाण केंद्र) येथे मतदान सुरू होण्यापूर्वीच यंत्रात बिघाड झाला. सोलापूरच्या माळशिरस तालुक्यातील यशवंतनगर आणि सातारा जिल्ह्यातील कराडमधील चचेगाव येथेही सुरुवातीच्या काळात मतदान प्रक्रिया विस्कळीत झाली होती. सांगलीतील चिकुर्डे गटातही देवर्डे केंद्रावर काही काळ मतदान थांबले होते. छत्रपती संभाजीनगरमधील वाळूज येथील मतदान केंद्रावर दोन यंत्रे बदलावी लागली. धाराशीव- तुळजापूर तालुक्यातील शिंदफळ गटातील शिरढोण येथे यंत्रातील बिघाडामुळे मतदानाला विलंब झाला.

कोल्हापुरात दोन गटात बाचाबाची : कोल्हापूरच्या राधानगरी तालुक्यात राशिवडे येथील ग्रामपंचायत केंद्रावर वयस्कर मतदारांना मतदानासाठी नेण्यावरुन दोन गटात किरकोळ बाचाबाची झाली. या वेळी दोन्ही गटांच्या जमावाने परिस्थिती तणावपूर्ण केली, मात्र पोलिसांनी हस्तक्षेप करून दोन्ही गटांचे नियंत्रणात आणले.

खेडमध्ये राष्ट्रवादी नेत्यावर हल्ला : पुण्याच्या खेड तालुक्यात मतदानाच्या दिवशी आंबेठाण-पाईट गटात राजकीय वैमनस्यातून हिंसाचार झाला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या अधिकृत उमेदवार सुनिता बुट्टे यांचे पती आणि माजी जिल्हा परिषद सदस्य शरद बुट्टे पाटील यांच्यावर अज्ञातांनी प्राणघातक हल्ला केला. या हल्ल्यात बुट्टे पाटील गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर वासुली फाटा येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

आमदार विलास भुमरेंमुळे नवा वाद : छत्रपती संभाजीनगरमध्ये आमदार विलास भुमरे आपल्या मुलाला घेऊन मतदानकेंद्रात दाखल झाले. मतदानकेंद्रातील अधिकाऱ्यांनी मुलाच्या बोटावर शाई लावली. त्यावर विरोधकांनी तीव्र आक्षेप नोंदवत, कारवाईची मागणी केली. तसेच निवडणूक यंत्रणा सत्ताधाऱ्यांच्या हातातील बाहुले झाल्याच टीकाही करण्यात आली. त्यावर, भुमरे यांनी स्पष्ट केले की, मतदान मी स्वतः केले, मुलाच्या बोटावर फक्त शाई लावली गेली. अलिबागमध्ये मतदान यंत्रात बिघाड अलिबागमधील सहाण येथील मतदान केंद्रावरील ईव्हीएममध्ये बिघाड झाला. मतदान प्रक्रिया सुरू होण्याआधीच हा बिघाड लक्षात आला. तांत्रिक टीमला त्वरित दुरुस्तीसाठी बोलावण्यात आले.

परभणीमध्ये मतदान केंद्रावर वाद : परभणीच्या राणीसावरगावमध्ये काही महंतांना मतदान करण्यापासून रोखल्यामुळे मतदान केंद्रावर वाद निर्माण झाला. महंतांनी थेट अधिकाऱ्यावर भाजपची दलाली करण्याचा आरोप केला. पोलिसांनी मध्यस्थी केली, मात्र वाद सुरु राहिला. अखेर महंतांनी मतदान न करताच मतदान केंद्र सोडले.

करमाळ्यातील केडगावमध्ये सर्वात कमी मतदान : सोलापूरच्या करमाळा तालुक्यातील केडगाव येथे २ हजार ६१ मतदारांपैकी फक्त ३४ मतदारांनी मतदान केले. ग्रामस्थांनी रस्ता नसल्याने मतदानावर बहिष्काराचा इशारा दिला होता.

अकलूजमध्ये लहान मुलाने दाबले बटण: अकलूजच्या मतदान केंद्रावर एका लहान मुलाला ईव्हीएमचे बटण दाबायला दिल्याने वाद निर्माण झाला. खासदार धैर्यशील मोहित पाटलांच्या चुलत भावाने हा प्रकार केल्याने चौफेर टीका झाली. केंद्राध्यक्षांनी यावर आक्षेप घेतला.

### पप्पू यादवची प्रकृती बिघडली...

१९९५ च्या एका जुन्या प्रकरणात अटक करण्यात आली होती. अटकेनंतर त्यांना सुरुवातीला वैद्यकीय तपासणीसाठी आयजीआयएमएस रुग्णालयात आणण्यात आले होते, जिथे त्यांच्यावर उपचार सुरू होते. मात्र, त्यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना पीएमसीएच येथे हलवण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे त्यांच्या समर्थकांमध्ये आणि कुटुंबियांमध्ये चिंता निर्माण झाली आहे आणि ते चांगल्या उपचारांची मागणी करत आहेत. हा खटला १९९५ चा आहे, जेव्हा विनोद बिहारी लाल नावाच्या व्यक्तीने पाटण्याच्या गरदानीबाग पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली होती. तक्रारीत असा आरोप करण्यात आला आहे की पप्पू यादव आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांचे घर फसवणूकीने भाड्याने घेतले आणि नंतर ते खासदार कार्यालय म्हणून वापरले. भाडेपट्टा देताना हे लपवून ठेवण्यात आले होते असा आरोप आहे. अलिकडेच, पाटणा खासदार-आमदार न्यायालयाने या प्रकरणात पप्पू यादव आणि इतर तिघांविरुद्ध जप्तीचा आदेश जारी केला. न्यायालयात त्यांच्या दीर्घकाळ अनुपस्थितीमुळे हा आदेश देण्यात आला. यापूर्वी, न्यायालयाने अटक वॉरंट आणि घोषणापत्र देखील जारी केले होते. आता, अटक आणि बिघडत्या प्रकृतीच्या पार्श्वभूमीवर, पप्पू यादव यांच्यावर उपचार सुरू आहेत.

### ई-केवायसी : लाडक्या बहिणींना...

वगळण्यात आले आहे. केवायसी प्रक्रिया पूर्ण करताना घरात कोणी सरकारी कर्मचारी आहे का ? तसेच आपण इतर कोणत्या शासकीय योजनांचा लाभ घेतात का? या प्रश्नांची बहुसंख्य महिलांनी चुकीची उत्तर दिल्याने अनेक महिलांना हप्ता बंद झाल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली. आता या महिलांसाठी पुन्हा एकदा केवायसी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. आणि दोनच प्रश्नांची त्यांना उत्तरे द्यावी लागणार आहेत.

कोणते आहेत हे दोन प्रश्न?

यावेळी महिलांना त्यांची केवायसी प्रक्रिया पूर्ण करताना आधार क्रमांक टाकून ओटीपी टाकून लॉगिन करावे लागत आहे. यानंतर त्यांना ) माझ्या कुटुंबातील सदस्य नियमित/कायम कर्मचारी म्हणून सरकारी विभाग/उपक्रम/मंडळ/भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत आहे का ? ) माझ्या कुटुंबातील सदस्य नियमित/कायम कर्मचारी म्हणून सरकारी विभाग/उपक्रम/मंडळ/भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमधून सेवानीवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत आहे का? असे प्रश्न यावेळी विचारण्यात येत आहेत. यावेळी महिलांना याची योग्य उत्तरे यावेळी द्यायची आहेत. तसेच उपरोक्त अ.क्र. व मध्ये देण्यात आलेली माहिती खरी असून, खोटी आढळल्यास खोटी माहिती दिल्याप्रकरणी सक्त कारवाईस पात्र राहील अशी सक्त सूचना देखील यावेळी देण्यात आली आहे.

### अजित पवारांच्या रिक्त झालेल्या...

भरली जाणार आहे. मतदारयादी अद्ययावत, अचूक आणि पारदर्शक राहावी यासाठी हा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. त्यानुसार पोटनिवडणुकीसाठी एकत्रित प्रारूप मतदारयादी सोमवार, ९ फेब्रुवारीला प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानंतर ९ फेब्रुवारी ते २५ फेब्रुवारी या कालावधीत मतदारांकडून दावे व हरकती स्वीकारल्या जाणार आहेत. विशेष संक्षिप्त पुनर्निरीक्षण मतदारयादी ही भारतीय निवडणूक आयोग राबवत असलेली प्रक्रिया आहे.

**सलग आठवा विजय :** २०२४ मध्ये बारामती विधानसभेच्या निवडणुकीत काका विरुद्ध पुतण्या एकमेकांविरोधात उभे होते. राष्ट्रवादी काँग्रेसकडून अजित पवार तर शरद पवार यांच्या राष्ट्रवादीकडून युगेंद्र पवार रिंगणात होते. मात्र, अजित पवार यांनीच आपले वर्चस्व कायम राखत तब्बल एकूण १ लाख ८१ हजार १३२ मते मिळवली होती. हा अजित पवारांचा बारामतीतून सलग आठवा विजय ठरला.

### भारतावरील २५ टक्के टॅरिफ रद्द...

मिळाल्यानंतर अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी निश्चित केले की, भारताने कार्यकारी आदेश १४०६६ मध्ये स्पष्ट करण्यात आलेली राष्ट्रीय आणीबाणीची स्थिती हाताळण्यासाठी आणि राष्ट्रीय सुरक्षा, परराष्ट्र धोरण आणि आर्थिक विषयांच्या मुद्द्यावर अमेरिकेशी पुरते जुळवून घेण्यासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. तसेच डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या कार्यकारी आदेशात स्पष्ट केले आहे की, भारतावरील २५ टक्के टॅरिफ हटवण्याचा हा निर्णय शनिवार, ७ फेब्रुवारी २०२६ पासून लागू होईल.

## मंत्री संजय राठोड यांनी घेतला तयारीचा आढावा

# संत सेवालाल महाराज जन्मोत्सव साधेपणाने साजरा करा

अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**वाशिम, दि.७ :** बंजारा समाजाचे आराध्य दैवत श्री संत सेवालाल महाराज यांचा जन्मोत्सव येत्या १५ फेब्रुवारी रोजी पोहरादेवी येथे साजरा होत आहे. या उत्सवासाठी देशभरातून लाखो भाविक पोहरादेवीत दाखल होतात, ही बाब लक्षात घेऊन भाविकांची कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी सर्व संबंधित विभागांनी योग्य नियोजन व परस्पर समन्वय राखून आपली जबाबदारी चोख पार पाडावी, असे स्पष्ट निर्देश राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी दिले. पोहरादेवी येथील नंगारा भवन येथे आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी त्यांनी जिल्हा प्रशासन आणि पोलीस यंत्रणेला सज्ज राहण्याच्या सूचना दिल्या.

दरवर्षी श्री संत सेवालाल महाराज जन्मोत्सव तीन दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्याची परंपरा आहे. मात्र, यंदा राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुःखद निधनामुळे हा महोत्सव साधेपणाने आणि केवळ एकाच दिवसासाठी साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कार्यक्रमाचे स्वरूप साधे असले तरी धार्मिक आणि सामाजिक शिस्त पाळत हे आयोजन केले जाणार आहे. भाविकांच्या श्रद्धेचा विषय असल्याने गर्दी होण्याची शक्यता गृहीत धरून प्रशासनाने पाणीपुरवठा, वीजपुरवठा, स्वच्छता आणि आरोग्य सुविधांचे चोख नियोजन करावे, असेही मंत्री राठोड यांनी यावेळी नमूद केले. बैठकीत भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवावा आणि वाहतूक व्यवस्था सुरळीत राहील यासाठी स्वतंत्र पार्किंग व मार्गांचे नियोजन करावे, अशा सूचना देण्यात आल्या. जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी जन्मोत्सवाच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या आराखड्याची माहिती दिली. सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद आणि वीज वितरण कंपनीने आपापल्या अखत्यारीत येणारी कामे वेळेत पूर्ण करावीत, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. महोत्सवाच्या कालावधीत अतिमहत्त्वाच्या व्यक्तींची उपस्थिती राहण्याची शक्यता असल्याने सुरक्षा यंत्रणेने विशेष सतर्कता बाळगावी, असेही बैठकीत ठरविण्यात आले.

या आढावा बैठकीनंतर मंत्री संजय राठोड यांनी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांसह प्रत्यक्ष कार्यक्रमस्थळाची पाहणी केली. भाविकांना दर्शन घेताना त्रास होऊ नये आणि आपत्कालीन परिस्थितीत यंत्रणा तात्काळ कार्यान्वित व्हावी, याकडे विशेष लक्ष देण्यास त्यांनी सांगितले. या बैठकीला विधान परिषद सदस्य महंत बाबूसिंग महाराज, जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, पोहरादेवी संस्थानचे महंत आणि विश्वस्त उपस्थित होते.

## कोंडोलीतील पुलाचे काम रखडले; पावसात अंत्यविधीसाठी ग्रामस्थांची फरपट

अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**कोंडोली, दि.७ :** येथील अरुणावती नदीवर मंजूर असलेल्या पूलवजा बंधाऱ्याचे काम गेल्या अनेक वर्षांपासून थंडबस्त्यात असल्याने ग्रामस्थांना भीषण समस्यांचा सामना करावा लागत आहे. स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता नदीपात्रातून जात असल्याने, पावसाळ्यात नदीला पूर आल्यास अंत्यसंस्कार कोठे करायचे, असा गंभीर प्रश्न भूमिहीन शेतमजूर आणि नागरिकांसमोर उभा ठाकला आहे.

कोंडोली येथील मुख्य स्मशानभूमी नदीच्या पलीकडे आहे. पावसाळ्यात नदीला पाणी असल्यास पलीकडे जाणे अशक्य होते. ज्यांच्याकडे स्वतःची शेती आहे, ते शेतात अंत्यविधी उरकून घेतात; मात्र भूमिहीन गरिबांची मोठी कुचंबणा होते. यापूर्वी नदीला पूर असल्यामुळे एका मृतावर शेजारच्या गावात अंत्यविधी करण्याची वेळ आली होती, त्यावेळी गावाने संताप व्यक्त केला होता. या समस्येवर तोडगा म्हणून शासनाने येथे पूलवजा बंधारा मंजूर केला आणि कामाला सुरुवातही झाली. मात्र, हे काम अद्यापही पूर्णत्वास न गेल्याने यंदाच्या पावसाळ्यातही अंत्यविधीसाठी कसरत करावी लागणार का? अशी भीती नागरिक व्यक्त करत आहेत.

प्रशासनाच्या दिरंगाईमुळे रखडलेले हे काम तातडीने पूर्ण करावे, जेणेकरून मृतांच्या टाळूवरचे लोणी खाणाऱ्या यंत्रणेला जाग येईल आणि ग्रामस्थांची ही मरणयातना थांबेल, अशी मागणी आता जोर धरत आहे.

## कोंडोलीत घरकुल योजनेत सावळा गोंधळ; अपात्रांना लाभ, गरजू वंचित

### हप्ते उचललेले लाभार्थी गायब, वास्तव्यास दुसरेच कुटुंब

अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**कोंडोली, दि.७ :** केंद्र व राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी घरकुल योजनेत कोंडोली येथे मोठा गैरप्रकार झाल्याचा आरोप होत आहे. गरजू आणि पात्र लाभार्थ्यांना डावलून आर्थिकदृष्ट्या सक्षम असणाऱ्यांना या योजनेचा लाभ देण्यात आल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, ज्यांच्या नावाने घरकुल मंजूर झाले आहे, त्या घरात दुसरेच कुटुंबीय वास्तव्यास असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. शासनाकडून घराचे सर्व हप्ते उचलल्यानंतरही मूळ लाभार्थी त्या घरात राहत नसल्याचे अनेक ठिकाणी दिसून येत आहे. घरकुल वाटपात पारदर्शकता नसल्यामुळे खऱ्या अर्थाने घराची गरज असलेले कुटुंब आजही उघड्यावर आहेत. हा सर्व प्रकार योजनेतील भ्रष्टाचाराकडे अंगुलीनिर्देश करत असून, घरकुल वाटपाची प्रक्रिया संशयाच्या भोऱ्यात सापडली आहे. कोंडोली येथील ज्या घरकुलांचे सर्व हप्ते पूर्ण झाले आहेत, त्या घरांमध्ये सध्या प्रत्यक्ष कोण राहत आहे, याची वरिष्ठ स्तरावरून चौकशी करण्याची मागणी सुज्ञ नागरिकांनी केली आहे. या चौकशीतून घरकुल वाटपातील पारदर्शकता स्पष्ट होईल आणि अपात्रांना लाभ देणाऱ्या दोषींवर कारवाई होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## धावंडा प्रकल्प तत्काळ मार्गी लावा, अन्यथा तीव्र आंदोलन

### माजी आ. अनंतकुमार पाटील यांचा इशारा

अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**मानोरा, दि. ७ :** तालुक्यातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या धावंडा लघु पाटबंधारे प्रकल्पाचे काम तत्काळ सुरू करावे, या मागणीसाठी माजी आमदार अनंतकुमार पाटील यांनी ७ फेब्रुवारी रोजी मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांची भेट घेतली. तीर्थक्षेत्र पोहरादेवी येथील नगारा भवन येथे त्यांनी मंत्र्यांना निवेदन दिले. यावेळी काम सुरू न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा पाटील यांनी दिला आहे. वाशिम जिल्हा अतिमागास असून, मानोरा तालुक्यात आजही कायमस्वरूपी सिंचनाची कोणतीही सुविधा उपलब्ध नाही. येथील शेती पूर्णतः पावसावर अवलंबून असल्याने शेतकरी सतत आर्थिक संकटात सापडत आहे, तरीही प्रशासनाकडून या महत्त्वाच्या प्रकल्पाकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. या संदर्भात २ फेब्रुवारी रोजी मृद व जलसंधारण विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना दिलेल्या पत्राचाही यावेळी संदर्भ देण्यात आला. केवळ आश्वासनांवर न थांबता सरकारने आता प्रत्यक्ष निर्णय घ्यावा, अशी ठाम भूमिका माजी आमदार पाटील यांनी मांडली. धावंडा प्रकल्प हा तीर्थक्षेत्र पोहरादेवीपासून अवघ्या अर्धा किलोमीटर अंतरावर आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यास हजारो हेक्टर शेती सिंचनाखाली येईल. तसेच, पोहरादेवी येथे वर्षाकाठी देशभरातून १० ते १५ लाख भाविक दर्शनासाठी येतात. या प्रकल्पामुळे भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी सोय होईल आणि परिसराचा सर्वांगीण विकास साधता येईल. जनहिताचा विचार करून काम त्वरित सुरू न केल्यास रस्त्यावर उतरून आंदोलन केले जाईल, असा इशारा यावेळी देण्यात आला. याप्रसंगी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष बाबुसिंग नाईक, रतन पवार, विठ्ठल शिंदे, मुकुंद आडे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

## नाते जुळले काळजाशी! मंगलीच्या सुरांनी सजणार जयंतीचा मांडव

### मुख्यमंत्र्यांचा यंदाचा व्हॅलेंटाईन बंजारा बांधवांसोबत

। संजय अलदर ।






**मानोरा, दि. ७ :** जगभरात १४ फेब्रुवारीला प्रेमाचा गुलाबी ऋतू अवतरतो आणि लोक आपल्या प्रिय व्यक्तीला वेळ देतात. मात्र, यंदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपला हा व्हॅलेंटाईन डे चक्क बंजारा बांधवांच्या चरणी अर्पण करण्याचे ठरवले आहे. आपल्या लाडक्या समाजाप्रती असलेले हे हृदयस्पर्शी नाते अधोरेखित करण्यासाठी मुख्यमंत्री १४ फेब्रुवारीला गोर बंजारा समाजाची काशी असलेल्या श्रीक्षेत्र पोहरादेवी येथे संत सेवालाल महाराज यांच्या चरणी नतमस्तक होण्यास येत आहेत.

मुख्यमंत्र्यांचा हा दौरा म्हणजे केवळ एक सरकारी भेट नसून, ते बंजारा संस्कृतीशी असलेले सरकारचे अतुट प्रेम व्यक्त करण्याचे एक माध्यम ठरणार आहे. संत सेवालाल महाराज यांच्या २८७ व्या जयंतीनिमित्त ७ फेब्रुवारी रोजी तीर्थक्षेत्र पोहरादेवी येथील नगारा भवन मध्ये जणू आनंदाचे उधाण आले होते. मृद व जलसंधारण मंत्री नामदार संजय राठोड यांच्या अध्यक्षतेखाली जेव्हा आढावा बैठक पार पडली, तेव्हा वातावरणात एक वेगळाच उत्साह होता. ना. राठोड यांनी अधिकाऱ्यांना सूचना देताना अत्यंत मार्मिक शब्दांत सांगितले की, ''जसे आपण आपल्या कुटुंबातील प्रिय व्यक्तींच्या सुखाची काळजी घेतो, तशीच काळजी प्रशासनाने पोहरादेवीत येणाऱ्या प्रत्येक लेकराची आणि प्रत्येक भाविकाची घेतली पाहिजे.'' हा केवळ प्रशासकीय आदेश नव्हता, तर ते समाजाप्रती असलेले त्यांचे प्रेम होते.

मुख्यमंत्री दुपारी १ वाजता पोहरादेवीच्या पवित्र मातीत पाऊल ठेवतील. जगदंबा देवी आणि संत सेवालाल महाराज यांच्या समाधीचे दर्शन घेताना त्यांच्या चेहऱ्यावरची ती श्रद्धेची भावना जणू व्हॅलेंटाईनच्या त्या प्रेमाच्या संकल्पनेला आध्यात्मिक उंचीवर नेणारी असेल. जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर आणि पोलीस अधीक्षक अनुज तारे यांच्यासह संपूर्ण प्रशासन सध्या या महासोहळ्याच्या प्रेमात पडले असून, प्रत्येकाच्या मनात एकच ध्यास आहे ''आमुचा मुख्यमंत्री येणार, आमुचा सोहळा भव्य होणार!'' थोडक्यात सांगायचे तर, यंदाचा १४ फेब्रुवारी हा केवळ गुलाबाच्या फुलांचा उत्सव नसून, तो बंजारा बांधवांच्या डोळ्यांतील आनंदाश्रूंचा, त्यांच्या गाण्यांचा आणि सरकारशी असलेल्या त्यांच्या अतुट आणि लाडक्या नात्याचा एक महासोहळा ठरणार आहे!

#### मंगलीच्या स्वरांनी साद घालणार बंजारा संस्कृतीला!

» या व्हॅलेंटाईन स्पेशल महोत्सवाचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे तेलंगणा राज्यातील प्रसिद्ध बंजारा गायिका मंगली. ज्याप्रमाणे प्रेमात शब्दांपेक्षा स्वरांना अधिक महत्त्व असते, त्याचप्रमाणे मंगली आपल्या मधुर बंजारा गीतांनी लाखो भाविकांच्या काळजाचा ठाव घेणार आहेत. सकाळी १० वाजल्यापासूनच सांस्कृतिक कार्यक्रमांच्या फुलांचा वर्षाव सुरू होईल, जो रात्री १० पर्यंत अखंडपणे बंजारा संस्कृतीचा सुवास दरवळत ठेवणार आहे. समाजातील हिऱ्यांचा सन्मान करण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते 'सेवा रत्न पुरस्कार' दिला जाणार असून, हा सोहळा समाजाच्या कर्तृत्वाशी बांधलेल्या रेशीमगाठी अधिक घट्ट करणारा ठरेल.

## लंडन येथील डॉ. बी. बी. चांडक यांची स्कायलार्क हॉस्पिटलला सदिच्छा भेट

अकोला, दि. ७ प्रतिनिधी







लंडनमधील सुप्रसिद्ध बालरोग व किडनी तज्ञ डॉ. बी. बी. चांडक यांनी दिनांक ७ फेब्रुवारी २०२० रोजी अकोला येथील सर्व सुपर स्पेशालिटी वैद्यकीय सेवा एका छताखाली उपलब्ध करून देणाऱ्या स्कायलार्क हॉस्पिटल यांना सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी हॉस्पिटलच्या प्रतिनिधींशी संवाद साधून विविध वैद्यकीय विषयांवर सविस्तर माहिती दिली.

डॉ. बी. बी. चांडक हे गेल्या ५० वर्षांहून अधिक काळ लंडनमध्ये बालरोग व बालकिडनी तज्ञ म्हणून वैद्यकीय सेवा देत असून, आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांची ख्याती आहे. त्यांचे अकोला शहराशी जिव्हाळ्याचे नाते असून, ते अकोला येथील सुप्रसिद्ध मुख शैल्य चिकित्सक शल्यचिकित्सक तथा संचालक स्काईलार्क हॉस्पिटल डॉ आर .जी.रांदड़ कुटुंबाचे जावई आहेत. त्यांचे सुपुत्र डॉ. पंकज चांडक यांचा जन्म अकोला येथे झाला असून सध्या ते लंडनमध्ये कार्यरत आहेत. डॉ. पंकज चांडक हे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे किडनी ट्रान्सप्लांट सर्जन असून, विशेषतः बालकिडनी प्रत्यारोपणात ३ प्रिंटिंग व ३ मॉडेलिंग तंत्रज्ञानाचा वापर करून त्यांनी जागतिक स्तरावर नावलौकिक मिळवला आहे. बालकांच्या जटिल किडनी शस्त्रक्रियांमध्ये ३ मॉडेलद्वारे अचूक नियोजन व सुरक्षित शस्त्रक्रिया करणे ही त्यांची महत्त्वाची संशोधनात्मक देणगी आहे.

डॉ. पंकज चांडक यांनी किडनी आजारांवर आधारित अनेक आंतरराष्ट्रीय संशोधन निबंध प्रकाशित केले असून, त्यांच्या ३ तंत्रज्ञानाधारित संशोधनामुळे बालकिडनी प्रत्यारोपणाच्या क्षेत्रात नवे मानदंड निर्माण झाले आहेत. या भेटीदरम्यान डॉ. बी. बी. चांडक आणि डॉ. पंकज चांडक या दोघांनीही अकोला येथे जागतिक दर्जाच्या किडनी व सुपर स्पेशालिटी वैद्यकीय सुविधा स्कायलार्क हॉस्पिटल चा मध्यमातून उपलब्ध करून देण्याची सकारात्मक इच्छा व्यक्त केली.

भविष्यात अकोला शहरात उच्च दर्जाच्या वैद्यकीय सेवा, विशेषतः किडनी व बालरोग क्षेत्रात, उपलब्ध करून देण्यासाठी सहकार्य करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

## पांगरखेडा येथील कैलास शिंदे यांना भौतिकशास्त्रात पीएच.डी.

अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**मालेगाव, दि. ७ :** छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने मालेगाव तालुक्यातील पांगरखेडा येथील कैलास चंद्रकांत शिंदे यांना भौतिकशास्त्र विषयातील पीएच. डी. पदवी प्रदान केली आहे. ग्रामीण भागातील एका शेतकरी कुटुंबातील तरुणाने संशोधक म्हणून मिळवलेल्या या यशाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

डॉ. कैलास शिंदे यांनी आपले संशोधन कार्य अंबेजोगाई येथील योगेश्वरी महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. आर. जे. टोपरे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पूर्ण केले. त्यांनी मुरुम येथील माधवराव पाटील महाविद्यालय व संशोधन केंद्रात राहून आपले अभ्यासपूर्ण संशोधन पूर्णत्वास नेले. आपल्या यशाचे श्रेय देताना डॉ. शिंदे यांनी, मार्गदर्शकांचे सखोल मार्गदर्शन आणि आई-वडिलांच्या पाठबळामुळेच हे शिखर गाठता आले, अशा भावना व्यक्त केल्या.

या उल्लेखनीय यशाबद्दल डॉ. रवी खाडे, डॉ. योगेश साखरे, प्रा. गजानन शिंदे यांच्यासह शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## महत्त्वाचे

### मेहुल चोक्सीला दिलासा नाहीच

**मुंबई :** मुंबईतील विशेष सीबीआय न्यायालयाने मेहुल चोक्सीला मोठा दणका दिला आहे. न्यायालयाने चोक्सीचा दंडाधिकाऱ्यांनी बजावलेल्या समन्सविरोधातील अर्ज फेटाळला आहे.जवळपास ५५ कोटी रुपयांच्या कॅनरा बँकेच्या कर्जाशी संबंधित फसवणूक प्रकरणात दंडाधिकाऱ्यांच्या समन्सविरोधात फरारी आरोपी आणि हिरे व्यापारी मेहुल चोक्सीचा अर्ज विशेष सीबीआय न्यायालयाने फेटाळून लावला. न्यायाधीश जे. पी. दरेकर यांनी, दंडाधिकाऱ्यांच्या आदेशात कोणतीही अयोग्यता, त्रुटी किंवा बेकायदेशीरता आढळली नसल्याचे नमूद करून त्यात हस्तक्षेप करण्यास नकार दिला.

गेल्या वर्षी एप्रिल महिन्यात दंडाधिकारी न्यायालयाने केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) या प्रकरणातील आरोपपत्राची दखल घेतली होती. त्यानंतर चोक्सीसह अन्य आरोपींना समन्स बजावले होते. चोक्सीने दंडाधिकाऱ्यांच्या आदेशाविरुद्ध अपील दाखल केले होते. तसेच, दंडाधिकाऱ्यांनी कोणताही विचार न करता यांत्रिक पद्धतीने आदेश दिला. आरोपपत्राची तपासणी न करताच ते दाखल केले. त्या दिवशीच समन्स काढण्याचा आदेश अत्यंत वेगाने पारित केल्याचा दावाही चोक्सीने अर्जात केला होता. कनिष्ठ न्यायालयाने दिलेल्या आदेश हा न्यायपूर्ण आणि योग्य असल्याचे सीबीआयच्या वतीने स्पष्ट करण्यात आले. तसेच चोक्सीच्या अर्ज फेटाळण्याची मागणी करण्यात आली.

### खड्ड्यात पडून तरुणाचा मृत्यू

**नवी दिल्ली:** दिल्लीत एक धक्कादायक घटना घडली आहे. एका ३० वर्षाच्या तरुणाचा रस्त्यावरील खड्ड्यात पडून मृत्यू झाला आहे. दिल्लीच्या जल बोर्ड विभागाने हा खड्डा खोदला होता अशी माहिती आता समोर येत आहे. त्यामुळे दिल्ली प्रशासनावर निष्काळजीपणाचा आरोप करत अनेकांनी संताप व्यक्त केला आहे.

या प्रकरणात आता दिल्ली पोलिसांनी मोठी कारवाई करत उप कंत्राटदाराला अटक केलं आहे. तसेच उप कंत्राटदार आणि दिल्ली जल मंडळाच्या संबंधित अधिकाऱ्यांच्या विरोधात दिल्ली पोलिसांनी सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला आहे. त्यानंतर उप कंत्राटदार राजेश प्रजापतीला अटक केलं असून पुढील कारवाई सुरू आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, या तरुणाचा अपघात घडला त्या दिवशी रात्री त्याच रस्त्यावरून जाणाऱ्या एका कुटुंबाला कमल नावाचा एक तरुण खड्ड्यात पडताना दिसला. त्यानंतर त्या कुटुंबाने तात्काळ घटनास्थळी असलेल्या सुरक्षा रक्षकांना आणि जवळील तंबूत राहणाऱ्या एका व्यक्तीला या घटनेची माहिती दिली.

# बांगलादेशातील हिंदू भीतीच्या छायेत

## निवडणुकीत हिंदू आणि इतर अल्पसंख्याकांना लक्ष्य का केले जाते?

**नवी दिल्ली: दि.७ वृत्तसंस्था**



१२ फेब्रुवारी २०२६ रोजी बांगलादेशात सार्वत्रिक निवडणुका पार पडणार आहेत. या काळात धार्मिक आणि वांशिक अल्पसंख्याक समुदायांमधील चिंता वाढत चालली आहे. देशातील निवडणुकांचा काळ ऐतिहासिकदृष्ट्या तणावपूर्ण राहिला आहे. आगामी मतदानापूर्वीच्या काही महिन्यांत जातीय हिंसाचारात मोठी वाढ झाली आहे, त्यामुळे अल्पसंख्याक विशेषतः हिंदू स्वतःला अधिक असुरक्षित समजत आहेत.

मानवाधिकार संघटना आणि अल्पसंख्याक हक्क गटांचे असे म्हणणे आहे की, ऑगस्ट २०२४ मध्ये माजी पंतप्रधान शेख हसीना यांना सत्तेवरून हटवल्यानंतर अल्पसंख्याकांसाठीची सुरक्षा व्यवस्था ढासळली आहे. नोबेल पारितोषिक विजेते मुहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखालील अंतरिम सरकारने अल्पसंख्याकांना लक्ष्य केले जात असल्याचा दावा फेटाळला आहे.

अल्पसंख्याक समुदाय भयभीत का आहे?

डिसेंबरमध्ये दीपू चंद्र दास यांच्या हत्येने अल्पसंख्याकांच्या सुरक्षेबाबतच्या चर्चेला नवे वळण दिले. २७ वर्षीय हिंदू कापड कामगार असलेल्या दास यांच्यावर त्यांच्या काही मुस्लीम सहकाऱ्यांनी प्रेषित मुहम्मद यांच्याबद्दल अपमानास्पद टिप्पणी केल्याचा आरोप केला होता. या आरोपांनंतर गाझीपूरमधील त्यांच्या कामाच्या ठिकाणी जमावाने त्यांच्यावर हल्ला केला. त्यांना बेदम मारहाण करून ठार मारण्यात आले, त्यानंतर त्यांचा मृतदेह झाडाला टांगून पेटवून देण्यात आला. या हत्येचा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाला, त्यामुळे देशभरातील हिंदू समुदायांमध्ये भीतीचे वातावरण पसरले.

अंतरिम प्रशासनाने या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश दिले. पोलिसांनी नंतर माहिती दिली की या घटनेप्रकरणी अनेक व्यक्तींना ताब्यात घेण्यात आले आहे. पुढील तपासात दास यांनी अशी कोणतीही टिप्पणी केल्याचा कोणताही पुरावा आढळला नाही. मानवाधिकार संघटनांनी या हत्येचे वर्णन धार्मिक आरोपांमुळे प्रेरित जमावाचा हिंसाचार असे केले. या घटनेनंतरही काही हिंदू व्यक्तींची हत्या करण्यात आल्याचे वृत्त समोर आले.अल्पसंख्याक हक्क गटांचे म्हणणे आहे की, दास यांची हत्या ऑगस्ट २०२४ मध्ये शेख हसीना यांना पदच्युत केल्यानंतर सुरू झालेल्या व्यापक हिंसाचाराचा एक भाग होती. त्यांच्या हकालपट्टीनंतर बांगलादेशात राजकीय पुनर्रचना होत असून सध्या अंतरिम प्रशासन कारभार पाहत आहे. 'बांगलादेश हिंदू बौद्ध ख्रिश्चन एकता परिषद' या अल्पसंख्याक समुदायांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संस्थेच्या मते, ऑगस्ट २०२४ पासून जातीय हिंसाचाराच्या २,००० हून अधिक घटनांची नोंद झाली आहे.

त्यांच्या माहितीनुसार, हसीना यांच्या हकालपट्टीनंतर २०२४ मध्ये २,१८४ घटना घडल्या, तर २०२५ मध्ये आणखी ५२२ घटनांची नोंद झाली. या गटाच्या मते, या घटनांमध्ये ६१ हत्या, महिलांवरील अत्याचाराची २८ प्रकरणे (ज्यामध्ये बलात्कार आणि सामूहिक बलात्काराचा समावेश आहे) आणि ९५ मंदिरे व प्रार्थनास्थळांवरील हल्ले (तोडफोड, लूटमार किंवा जाळपोळ) यांचा समावेश आहे. अल्पसंख्याक नेत्यांनी युनूस सरकारवर या घटनांचे गांभीर्य कमी लेखल्याचा आरोप केला आहे.मात्र, सरकारने मोठ्या प्रमाणावर जातीय हल्ले होत असल्याचा दावा फेटाळून लावला आहे. अधिकृत आकडेवारीनुसार, २०२५ मध्ये अल्पसंख्याक समुदायांच्या सदस्यांशी संबंधित ६४५ घटनांची नोंद झाली, त्यापैकी केवळ ७१ घटना जातीय स्वरूपाच्या होत्या, तर उर्वरित घटना वैयक्तिक वाद, जमिनीचे वाद किंवा इतर बिगर-धार्मिक कारणांशी संबंधित असल्याचे सांगण्यात आले आहे.

## तारिक रहमान यांचे 'ट्रम्प कार्ड'! भारतासोबतच्या संबंधांवर मोठी घोषणा

**नवी दिल्ली: दि.७ वृत्तसंस्था**



१२ फेब्रुवारीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी बीएनपीने आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला, ज्यामध्ये अर्थव्यवस्था, परराष्ट्र धोरण आणि भारतासोबत पाणीवाटपावर लक्ष केंद्रित केले गेले, विशेषतः मध्यमवर्गासाठी. शेजारील बांगलादेशात राजकीय वातावरण तापले आहे. १२ फब्रुवारी रोजी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी आता अवघे काही दिवस उरले आहेत. या पार्श्वभूमीवर, देशातील प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या 'बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी'ने शुक्रवारी (६ फेब्रुवारी) आपला बहुप्रतिक्षित निवडणूक जाहीरनामा प्रसिद्ध केला. पक्षाचे विद्यमान प्रमुख तारिक रहमान यांनी हा जाहीरनामा सादर करताना बांगलादेशच्या भविष्याचा रोडमॅप मांडला. विशेष म्हणजे, या जाहीरनाम्यात त्यांनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या शैलीत "बांगलादेश फर्स्ट" हे धोरण स्वीकारण्याची घोषणा केली आहे, ज्याने आंतरराष्ट्रीय निरीक्षकांचे लक्ष वेधले आहे.

तारिक रहमान यांनी आपल्या भाषणाची सुरुवातच देशाच्या कोलमडलेल्या अर्थव्यवस्थेवर बोट ठेवून केली. ते म्हणाले, "आज बांगलादेशातील मध्यमवर्ग जवळजवळ नाहीसा झाला आहे. महागाई आणि बेरोजगारीने लोकांचे कंबरडे मोडले आहे." जर बीएनपी सत्तेत आली, तर त्यांचे पहिले पाऊल हे मध्यमवर्गासाठी सन्मानजनक नोकऱ्या निर्माण करणे असेल. सध्या बांगलादेशची अर्थव्यवस्था परकीय कर्जावर अवलंबून आहे. रहमान यांनी आश्वासन दिले की, ते या 'कर्ज-आधारित' मॉडेलचे रूपांतर 'गुंतवणूक-केंद्रित' मॉडेलमध्ये करतील. "आम्ही देशातील ठराविक कुलीन वर्गाची मक्तेदारी मोडून काढू आणि सामान्य नागरिकांच्या उत्पादक क्षमतेवर आधारित विकास साधू," असे त्यांनी स्पष्ट केले.

## रशियाची ड्रोनयुद्धात निर्णायक आघाडी; ८७,००० सैनिकांच्या ताफ्याने युरोपची झोप उडवली

**नवी दिल्ली: दि.७ वृत्तसंस्था**



रशिया आणि युरोपमधील तणाव अजूनही कायम आहे. रशियन सैन्य युक्रेनच्या पलीकडे जाऊन इतर देशांमध्ये हल्ले करू शकते अशी भीती युरोपला आहे. म्हणूनच, युरोप रशियन लष्करी हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवून आहे.युक्रेन युद्धाने जगाला आधुनिक युद्धाची एक नवीन व्याख्या शिकवली आहे आणि ती म्हणजे 'ड्रोन'. आता रशियाने या क्षेत्रात अशी झेप घेतली आहे की, संपूर्ण युरोप आणि विशेषतः ब्रिटनचे धाबे दणाणले आहेत. रशियन राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी ८७,००० सैनिकांची एक नवीन आणि स्वतंत्र 'ड्रोन आर्मी' तयार केली आहे. धक्कादायक बाब म्हणजे, ही केवळ एका विभागाची सैन्यसंख्या ब्रिटनच्या संपूर्ण भूदलापेक्षा १७,००० ने जास्त आहे.

अमेरिकेच्या 'इन्स्टिट्यूट फॉर द स्टडी ऑफ वॉर' च्या अहवालानुसार, रशियाने आपल्या या नवीन फोर्समध्ये एक पूर्ण रेजिमेंट, २५ बटालियन आणि तीन डिव्हिजनची निर्मिती केली आहे. मॉस्कोच्या 'रुबिकॉन ड्रोन फोर्स' आणि 'बुर्सा-सरमत अनमॅन्ड सिस्टम्स स्पेशल सेंटर' मध्ये दिवस-रात्र हजारो सैनिकांना अत्याधुनिक ड्रोन चालवण्याचे प्रशिक्षण दिले जात आहे. तज्ज्ञांच्या मते, रशियन ड्रोन युक्रेनमध्ये तोफखान्यापेक्षा जास्त नुकसान करत आहेत. हे केवळ युद्धाचे साधन राहिले नसून, आता ते रशियाचे मुख्य शस्त्र बनले आहे.

एकेकाळी जगावर राज्य करणाऱ्या ब्रिटीश सैन्याची अवस्था सध्या अत्यंत चिंताजनक आहे. अधिकृत आकडेवारीनुसार, ब्रिटीश सैन्यातील प्रशिक्षित सैनिकांची संख्या ७०,३०० पर्यंत खाली आली आहे. १८०३ नंतर, म्हणजेच गेल्या २०० वर्षांतील हा ब्रिटीश सैन्याचा सर्वात लहान आकार आहे.

### सर्वोच्च न्यायालयाची अल्पवयीन मुलीला गर्भपाताची परवानगी

**नवी दिल्ली:** न्यायालये एखाद्या गर्भवतीवर, विशेषतः ती अल्पवयीन असताना बाळाला जन्म देण्यासाठी जबरदस्ती करू शकत नाहीत, असे सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी स्पष्ट केले. एका १७ वर्षीय मुलीला ३०व्या आठवड्यात गर्भपाताची परवानगी देताना सर्वोच्च न्यायलयाने वरीलप्रमाणे टिप्पणी केली. संबंधित मुलीच्या वैद्यकीय सुरक्षिततेची काळजी घेऊन तिचा गर्भपात करावा असे निर्देश न्यायालयाने मुंबईच्या जे. जे. रुग्णालयाला दिले.संबंधित मुलीचे तिच्या शेजाऱ्याशी संबंध होते. त्यातून ती गरोदर राहिली आणि तिने गर्भपाताची परवानगी मागितली असे न्या. बी. व्ही. नागरत्ना आणि न्या. उज्जल भुयान यांच्या खंडपीठाने निकाल देताना नमूद केले. "(अद्याप जन्माला न आलेल्या) अल्पवयीन बाळाला जगण्याचा अधिकार आहे, ही बाब न्यायालयाने विचारात घेतली आहे. पण त्याचवेळी त्याला जन्म देणारी मुलगीच अल्पवयीन आहे आणि तिला संबंधांमुळे उद्भवलेल्या गरोदरपणाला तोंड द्यावे लागत आहे.

## ट्रम्प यांचा मास्टरप्लॅन फसला? कॅनडा-फ्रान्सने उचलले मोठे पाऊल

**नवी दिल्ली: दि.७ वृत्तसंस्था**



अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या ग्रीनलँड विकत घेण्याच्या स्वप्नाला मोठा धक्का बसला आहे. कॅनडा आणि फ्रान्समध्ये ग्रीनलँडमध्ये मोठे पाऊल उचलले आहे. यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कॅनडा आणि फ्रान्सने शुक्रवारी (०६ फब्रुवारी) ग्रीनलँडची राजधानी नुकमध्ये वाणिज्य दूतावास उघडले आहे. दोन्ही देशांचा हा निर्णय ट्रम्प यांच्या धमक्यांना थेट आव्हान मानला जात आहे. तसेच यामुळे ट्रम्प यांचे ग्रीनलँड ताब्यात घेण्याचे स्वप्न भंगणार का असा प्रश्न उपस्थित होत आहे. कॅनडा आणि फ्रान्सने अमेरिकेच्या ग्रीनलँडवर नियंत्रणाविरोधात डेन्मार्कला पाठिंबा देत हा निर्णय घेतला आहे. मीडिया रिपोर्टनुसार, भावनिकदृष्ट्या जवळीक साधून ग्रीनलँड ताब्यात घेण्याचा होता. ट्रम्प यांचा उद्देश ग्रीनलँडवर लष्करी कारवाईचा नसून तेथील अमेरिकेचा प्रभाव वाढवणे आहे. परंतु आता ट्रम्प यांच्या या प्रयत्नांना कॅनडा आणि फ्रान्सने आपले दूतावास नूकमध्ये सुरु करून जोरदार झटका दिला आहे. ट्रम्प यांना अमेरिकेच्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी ग्रीनलँड हवेल आहे. परंतु डेन्मार्क आणि युरोपीय देशांनी याला तीव्र विरोध केला आहे.

दरम्यान यापूर्वी डोनाल्ड ट्रम्प यांनी युरोपीय देशांना टॅरिफची धमकी दिली होती. अमेरिकेच्या ग्रीनलँडवरील नियंत्रणाला विरोध करणाऱ्या देशांवर १०% ते २५% टॅरिफ लादले जाईल असे ट्रम्प यांनी म्हटले होते. परंतु जागतिक आर्थिक मंचात डेन्मार्कच्या प्रतिनिधींशी चर्चा केल्यानंतर ट्रम्प यांनी हा निर्णय मागे घेतला होता. मात्र कॅनडा आणि फ्रान्सच्या या नव्या पावलामुळे ट्रम्प पुन्हा युरोपीय देशांवर टॅरिफ लादण्याची शक्यता आहे.सध्या फ्रान्स हा ग्रीनलँडमध्ये दूतावास उघडणारा पहिल युरोपीय देश ठरला आहे. जून २०२५ मध्ये फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी ग्रीनलँड भेटीदरम्यान हा निर्णय घेतला होता. याला इतर युरोपीय देशांनीही पाठिंबा दिला. परंतु कॅनडा आणि फ्रान्सच्या या पावलामुळे आर्क्टिक प्रदेशात तणाव वाढत चालला आहे. यामुळे पुन्हा एकदा युरोपीय देश आणि अमेरिकेत वाद निर्माण होण्याची शक्यता आहे.

## मलेशियाचे पीएम स्वत: पोहचले विमानतळावर मोदींना घ्यायला



**क्वालालंपूर: दि.७ वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी शनिवारी दोन दिवसांच्या मलेशिया दौऱ्यासाठी आले. क्वालालंपूर विमानतळावर पोहोचल्यानंतर मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांनी त्यांचे स्वागत केले. त्यानंतर ते पंतप्रधान मोदींसोबत त्यांच्या स्वतःच्या गाडीतून गेले. पंतप्रधान मोदींनी इंस्टाग्रामवर लिहिले, "भारत-मलेशिया लोकांमधील संबंधांचे उत्सव साजरा करत आहे! पंतप्रधान अन्वर इब्राहिम आणि मी क्वालालंपूर येथे एका सामुदायिक कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी जात आहोत."

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे क्वालालंपूर विमानतळावर आगमन होताच भव्य स्वागत झाले. मलेशियाचे पंतप्रधान पंतप्रधान मोदींना मिठी मारतात आणि त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करतात. त्यानंतर दोन्ही नेते एकाच गाडीतून कार्यक्रमस्थळी रवाना होतात.

पंतप्रधान मोदी मलेशियात पोहोचताच त्यांची पहिली पोस्ट आली. त्यांनी ट्विटरवर लिहिले, "क्वालालंपूर येथे पोहोचलो. माझे मित्र पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांनी विमानतळावर माझे केलेले उबदार स्वागत पाहून मी खूप प्रभावित झालो आहे. तुमच्याशी बोलण्यास आणि भारत आणि मलेशियामधील मैत्रीचे बंध आणखी मजबूत करण्यास मी उत्सुक आहे."

पंतप्रधानांचे क्वालालंपूर येथे आगमन होताच भव्य स्वागत करण्यात आले. मलेशियाच्या पंतप्रधानांनी स्वतः त्यांचे जोरदार स्वागत केले. मलेशियात पोहोचताच "मोदी, मोदी" च्या घोषणांना सुरुवात झाली. मलेशियाचा हा त्यांचा तिसरा दौरा आहे. मलेशियाला "मिनी इंडिया" म्हणूनही ओळखले जाते कारण येथे सुमारे ३० लाख भारतीय समुदाय राहतो, जो मलेशियाच्या एकूण लोकसंख्येच्या सुमारे ९ टक्के आहे. पंतप्रधान मोदींच्या स्वागतासाठी क्वालालंपूरच्या रस्त्यांवर मोदींचे पोस्टर्स लावण्यात आले आहेत. मलेशिया आणि भारत यांच्यातील मैत्रीचे उबदार दर्शन घडवणारे होर्डिंग्ज सर्वत्र लावण्यात आले आहेत. पंतप्रधान मोदी लवकरच भारतीय समुदायाला संबोधित करतील. हे लक्षात घ्यावे की भारत आणि मलेशिया दोन्ही आसियानचे सदस्य आहेत.

## भारत शांततेच्या काळातही क्षेपणास्त्रे ठेवणार 'रेडी टू फायर'

### अहवालाने पाकला फुटला घाम

**नवी दिल्ली:दि.७ वृत्तसंस्था**



जागतिक स्तरावर शस्त्रास्त्रांवर लक्ष ठेवणाऱ्या 'स्टॉकहोम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्यूट' च्या २०२५ च्या ताज्या अहवालाने जगभरात खळबळ उडवून दिली आहे. या अहवालानुसार, भारताने आपल्या अण्वस्त्र धोरणात एक अत्यंत महत्त्वाचा आणि धोरणात्मक बदल केला आहे. आतापर्यंत शांततेच्या काळात भारत आपली अण्वस्त्रे आणि क्षेपणास्त्रे वेगळी ठेवत असे. मात्र, बदलत्या भू-राजकीय परिस्थितीमुळे भारताने आता ही शस्त्रे एकमेकांना जोडून सज्ज ठेवण्यास सुरुवात केली आहे, जेणेकरून कोणत्याही हल्ल्याला काही सेकंदात प्रत्युत्तर देता येईल.

अहवालात दावा करण्यात आला आहे की, भारत आता आपली क्षेपणास्त्रे विशेष 'कॅनिस्टर'मध्ये साठवत आहे. याचा तांत्रिक अर्थ असा की, क्षेपणास्त्रावर अणुबॉम्ब आधीच बसवलेला असतो आणि ते कोणत्याही क्षणी डागण्यासाठी तयार असते. याला 'रेडी टू फायर' स्थिती म्हणतात. भारताचे 'अग्नी-५' आणि 'अग्नी प्राईम' सारखी प्रगत क्षेपणास्त्रे याच तंत्रज्ञानावर आधारित आहेत. यामुळे भारताची 'सेकंड स्ट्राईक कॅपॅबिलिटी' म्हणजेच शत्रूच्या पहिल्या हल्ल्यानंतरही शत्रूला उद्ध्वस्त करण्याची क्षमता कैक पटीने वाढली आहे.


अहवालानुसार, जानेवारी २०२५ पर्यंत भारताकडे एकूण १८० अण्वस्त्रे आहेत, तर पाकिस्तानकडे १७० अण्वस्त्रे आहेत.

गेल्या एका वर्षात भारताने आपल्या साठ्यात ८ ते १० अण्वस्त्रांची भर घातली आहे. सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे भारताचे लक्ष आता केवळ पाकिस्तानवर मर्यादित राहिलेले नाही. भारताने आता अशी लांब पल्ल्याची क्षेपणास्त्रे विकसित केली आहेत जी चीनच्या उत्तरेकडील टोकापर्यंत मारा करू शकतात. यामध्ये 'मिशन दिव्यास्त्र' अंतर्गत यशस्वी चाचणी केलेल्या तंत्रज्ञानाचा मोठा वाटा आहे.

**तस्करी रॅकेट** | **तटरक्षक दलाची मोठी कारवाई**

## मुंबईच्या समुद्रात संशयास्पद बोटी

**नवी दिल्ली:दि.७ वृत्तसंस्था**



प्रगत डिजिटल देखरेखीच्या आधारे सुरू करण्यात आलेली आणि भारतीय तटरक्षक दलाच्या वाढत्या सागरी उपस्थितीद्वारे अंमलात आणलेली ही कारवाई, सागरी क्षेत्रात एकूण सुरक्षा पुरवणारा देश म्हणून तसेच समुद्रातील आंतरराष्ट्रीय नियमाधारित व्यवस्थेची ठाम अंमलबजावणी करणारा देश म्हणून भारताची भूमिका पुन्हा अधोरेखित केली आहे.

भारतीय तटरक्षक दलाने ५ आणि ६ फेब्रुवारी २०२६ रोजी अत्यंत बारकाईने आखलेल्या समुद्र-हवाई कारवाईद्वारे आंतरराष्ट्रीय तेल तस्करी रॅकेटचा यशस्वीपणे पर्दाफाश केला. या कारवाईत संघर्षग्रस्त प्रदेशांतून उगम पावलेल्या मोठ्या प्रमाणातील तेल आणि तेलाधारित मालाच्या बेकायदेशीर हस्तांतरणात सहभागी असलेल्या गुंतागुंतीचे जाळे नष्ट केले.

मिळालेल्या माहितीनुसार, ५ फब्रुवारी २०२६ रोजी मुंबईच्या पश्चिमेला सुमारे १०० नॉटिकल मैलांवर भारतीय तटरक्षक दलाच्या जहाजांनी तीन संशयित बोटी अडवल्या. बोटींची सखोल तपासणी, त्यावर सापडलेल्या इलेक्ट्रॉनिक माहितीची पडताळणी, कागदपत्रांची छाननी आणि कर्मचाऱ्यांची सविस्तर चौकशी केल्यानंतर तटरक्षक दलाच्या पथकाला संपूर्ण घटनाक्रम समजला. हा गुन्हेगारी प्रकार असल्याची खात्री पटली.

या तस्करी साखळीच्या कार्यपद्धतीनुसार, स्वस्त तेल समुद्री जहाजांद्वारे वाहून नेले जात असे आणि आंतरराष्ट्रीय पाण्यात समुद्राच्या मधोमध ते मोटर टँकरमध्ये हस्तांतरित केले जात असे. प्राथमिक तपासातून असे निष्पन्न झाले की या साखळीत अनेक देशांत कार्यरत असलेले सूत्रधार सहभागी होते. ते समुद्रातील जहाजांदरम्यान मालाची विक्री आणि हस्तांतरण यांचा समन्वय साधत होते.

भारतीय तटरक्षक दलाच्या तंत्रज्ञान-सक्षम देखरेख प्रणालींनी भारतीय विशेष आर्थिक क्षेत्रात संशयास्पद हालचाली करणाऱ्या एका मोटर टँकरचा शोध घेतल्यानंतर ही कारवाई सुरू करण्यात आली. त्यानंतर जहाजांच्या हालचालींच्या डिजिटल तपासणी आणि माहितीच्या नमुन्यांचे विश्लेषण करण्यात आले. त्यातून त्या टँकरकडे येत असलेल्या आणखी दोन जहाजांची ओळख पटली. ही जहाजे तेलाधारित मालाचा बेकायदेशीर जहाज-ते-जहाज हस्तांतरण करत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला, ज्याद्वारे भारतासह किनारी देशांना देय असलेल्या मोठ्या महसुली शुल्कांपासून बचाव केला जात होता.

५ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रत्यक्ष जहाजावर चढून डिजिटल पुराव्यांची पडताळणी केल्यानंतर सर्व तीन जहाजे ताब्यात घेण्यात आली. प्राथमिक निष्कर्षांनुसार, समुद्री कायदा अंमलबजावणी यंत्रणांपासून बचाव करण्यासाठी ही जहाजे वारंवार आपली ओळख बदलत होती. प्रारंभिक तपासातून जहाजांचे मालक परदेशात असल्याचेही संकेत मिळाले आहेत. पुढील तपासासाठी ताब्यात घेतलेली ही जहाजे मुंबईकडे आणली जाण्याची शक्यता असून, त्यानंतर आवश्यक कायदेशीर कारवाईसाठी ती भारतीय सीमाशुल्क विभाग आणि इतर कायदा अंमलबजावणी संस्थांकडे सुपूर्द केली जाणार आहेत.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.✻ **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (✻पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

विचारमंथन
विवेक वानखडे
मो. 9850978933

# संसद आखाडा नाही, पण मुकाट्याने बसण्याची जागाही नाही



संसदेत प्रश्न विचारणे गुन्हा ठरत असेल तर लोकशाही कुठे उरली? भारतीय संसद ही केवळ दगड-मातीची वास्तू नसून, ती १४० कोटी भारतीय नागरिकांच्या सार्वभौम अधिकारांचे प्रतीक आहे. इथे बसणारा प्रत्येक खासदार हा जनतेच्या मतांतून निवडून आलेला प्रतिनिधी असतो. तो सत्ताधारी असो वा विरोधी, त्याचा अधिकार, त्याची प्रतिष्ठा आणि त्याचे घटनात्मक स्थान समान असते. मात्र अलीकडे संसद भवनात घडलेल्या एका घटनेनंतर हा मूलभूत लोकशाही सिद्धांतच जणू पायदळी तुडवला जात असल्याचे चित्र समोर आले आहे.माननीय पंतप्रधानांच्या आसनाजवळ काँग्रेस पक्षाच्या काही महिला खासदारांनी जाऊन एका आक्षेपार्ह वक्तव्याचा जाब विचारण्याचा प्रयत्न केला. हा प्रयत्न संसदीय शिस्तीत, कोणतेही शस्त्र नसताना, कोणताही हिंसक उद्देश नसताना करण्यात आला होता. तरीही सत्ताधारी पक्षाशी संबंधित काही नेते आणि समर्थकांनी याचा अर्थ थेट "पंतप्रधानांवर घातपात करण्याचा प्रयत्न" असा काढला. हा आरोप जितका गंभीर आहे, तितकाच तो लोकशाहीसाठी घातक आहे. खासदार म्हणजे संशयित नाहीत, ते संविधानिक प्रतिनिधी आहेत.भारतीय संविधानाने दिलेल्या मतदानाच्या अधिकारातून जनतेने खासदार निवडून संसदेत पाठवले आहेत. त्या खासदारांमध्ये काँग्रेस, भाजप, डावे, प्रादेशिक पक्ष सगळेच येतात. संसद भवनात पाऊल ठेवणारा प्रत्येक खासदार हा आधी भारताचा नागरिक आणि नंतर राजकीय पक्षाचा प्रतिनिधी असतो. त्यामुळे पंतप्रधानांच्या आसनाजवळ गेलेले खासदार हे कुठले नक्षलवादी, दहशतवादी किंवा घुसखोर नव्हते, तर संविधानिक पदावर असलेले लोकप्रतिनिधी होते, हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे.जर संसदेत प्रश्न विचारणे, निषेध नोंदवणे किंवा आक्षेप घेणे हेच "घातपात" ठरवले जाणार असेल, तर उद्या विरोधी बाकावर बसणेही गुन्हा ठरेल का, असा प्रश्न उपस्थित होतो. संसद ही सत्तेला जाब विचारण्यासाठी असते, सत्तेच्या भीतीने गप्प बसण्यासाठी नव्हे. संसद आखाडा नाही, पण मुकाट्याने बसण्याची जागाही नाही.अशी भावना सर्व सामान्य नागरिक व्यक्त केली आहे संसद भवन हे कुस्तीचे आखाडे नाही, हे खरे आहे. पण ते सत्ताधाऱ्यांसाठी सुरक्षित कवच बनवण्याचे ठिकाणही नाही. गेल्या ७५ वर्षांच्या संसदीय इतिहासात प्रश्नोत्तरांच्या वेळी गदारोळ, घोषणाबाजी, निषेध, कामकाज तहकूब होणे हे सातत्याने घडत आले आहे. सत्ताधारी आणि विरोधी पक्षांमध्ये तीव्र शब्दिक संघर्ष झाले आहेत, टीका-टिप्पणी झाली आहे. मात्र त्यातून कधीही "हिंसक कट" असल्याचा आरोप करण्यात आलेला नाही.आज मात्र परिस्थिती वेगळी आहे. प्रश्न विचारले जातात, तेव्हा त्यांना उत्तर देण्याऐवजी प्रश्न विचारणाऱ्यांवर संशय टाकला जातो. हे लोकशाहीचे लक्षण नाही, तर सत्तेच्या असहिष्णुतेचे द्योतक आहे. लोकसभा अध्यक्षांची भूमिका ही रक्षक की सत्ताधाऱ्यांचे कवच?लोकसभा अध्यक्ष हे संपूर्ण सभागृहाचे असतात, केवळ सत्ताधारी पक्षाचे नव्हेत. त्यांच्याकडून निष्पक्षता, समतोल आणि घटनात्मक बांधिलकी अपेक्षित असते. मात्र या प्रकरणात अध्यक्षांच्या भूमिकेमुळे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत.खासदार वर्षा गायकवाड यांनी अत्यंत स्पष्टपणे सांगितले की, त्यांचा लोकशाही आणि संविधानावर पूर्ण विश्वास आहे. मात्र विरोधी पक्षातील सदस्य बोलू लागले की त्यांचा आवाज दाबला जातो आणि सत्ताधारी पक्षातील खासदार ऐतिहासिक नेत्यांबाबत अश्लील, वायफळ वक्तव्ये करतात तेव्हा अध्यक्षांना आक्षेप वाटत नाही, हा दुजाभाव अध्यक्षपदाच्या प्रतिष्ठेला शोभणारा नाही. खासदार प्रतिभा धानोरकर यांनीही याच मुद्द्यावर बोट ठेवत सांगितले की, जबाबदार खुर्चीवर बसलेल्या व्यक्तीने सर्व सदस्यांना समान न्याय दिला पाहिजे. अध्यक्ष जर केवळ एका बाजूचे ऐकून घेत असतील, तर सभागृहातील समतोलच बिघडतो. नॅरेटिव्ह तयार करून प्रश्न झाकण्याचा प्रयत्न या संपूर्ण घटनेतून एक गोष्ट स्पष्ट होते.

प्रश्नांना उत्तर देण्याऐवजी नवे नॅरेटिव्ह तयार केले जात आहेत. पंतप्रधान संसदेत का येत नाहीत, प्रश्नांची उत्तरे का देत नाहीत, यावर चर्चा होण्याऐवजी "घातपाताचा प्रयत्न" अशी भीती पसरवली जात. हा मार्ग सत्तेसाठी सोयीचा असला, तरी लोकशाहीसाठी अत्यंत धोकादायक आहे.जनतेला मूर्ख बनवून नॅरेटिव्ह किती काळ चालणार? सत्य दाबले जाऊ शकते, लपवले जाऊ शकते, पण नष्ट केले जाऊ शकत नाही. सूर्यप्रकाशाप्रमाणे ते कधीतरी समोर येतेच. विरोधकांना संपविण्याची मानसिकता आणि वाढती अस्वस्थता आज देशात आणि विशेषतः महाराष्ट्रात राजकीय कटकारस्थानांच्या चर्चा वाढत आहेत. काही नेत्यांच्या मृत्यूभोवती फिरणाऱ्या शंकांमुळे जनतेच्या मनात अस्वस्थता आहे. सत्य काय आहे, हे तपासातून समोर येईलच. मात्र विरोधकांना गप्प करण्याची, बदनाम करण्याची, संपविण्याची भाषा लोकशाहीला शोभणारी नाही. लोकशाहीत विरोधक हा शत्रू नसतो, तर तो सत्तेचा आरसा असतो. आरसा दाखवणाऱ्यालाच फोडायचे, ही मानसिकता धोक्याची घंटा आहे. प्रश्नांना घाबरू नका, उत्तर द्या या देशातील कोट्यवधी नागरिकांनी निवडून दिलेले खासदार संसदेत बसले आहेत. ते सत्ताधारी असोत किंवा विरोधी, त्यांना प्रश्न विचारण्याचा, निषेध नोंदवण्याचा अधिकार संविधानाने दिला आहे.

संसदेत प्रश्न विचारणे जर गुन्हा ठरत असेल, तर लोकशाही केवळ नावापुरती उरली आहे, असेच म्हणावे लागेल.सत्ता ही कायमची नसते, पण लोकशाहीची हानी कायमची असू शकते. त्यामुळे प्रश्नांपासून पळ काढण्याची नव्हे, तर प्रश्नांना सामोरे जाण्याची. कारण लोकशाही प्रश्नांनीच मजबूत होते, भीतीने नाही.

यशोगाथा
संजय भा. देशमुख
8888872784

# संघर्ष, संस्कार आणि सातत्याचा दीपस्तंभ : राष्ट्रीय विद्यालय तोंगलाबाद




दर्यापूर तालुक्यात चंद्रभागा नदीच्या तिरावर वसलेले तोंगलाबाद गाव आज शिक्षण, संस्कार आणि सामाजिक जाणीवेचे प्रतीक म्हणून ओळखले जाते. मात्र १९६७ साली या गावाची परिस्थिती अत्यंत बिकट आणि भयावह होती. गावाची लोकसंख्या जेमतेम एक हजार ते बाराशे इतकी होती. आरोग्यसेवेचा पूर्ण अभाव, दवाखाना नाही, प्राथमिक आरोग्य केंद्र नाही, तालुक्याच्या ठिकाणी जाण्यासाठी पक्के रस्ते नव्हते. पावसाळ्यात चंद्रभागा नदीला पूर आला की गाव जणू उर्वरित जगापासून तुटून पडायचे. त्या काळात तालुक्याच्या ठिकाणी जायचे असल्यास शेतकरी घोडा, रिंगी, दमणी किंवा बैलजोडीचा आधार घ्यायचे.

नदी ओलांडून प्रवास करावा लागे. कुणी आजारी पडल्यास चारपाईवर आजारी व्यक्तीला उचलून नदी पार करत नेण्याची वेळ यायची. गरिबी, अज्ञान आणि असहायता यांनी वेढलेले हे गाव संघर्षातूनच आपले जीवन जगत होते. खारपान पाण्याच्या पट्ट्यात करडी, ज्वारी, गहू, तूर, कापूस, मूग, उडीद, मटकी अशी पिके घेतली जात. काही जमीनदारांकडे धान्याचे पेव होते; पण बहुसंख्य जनता रोजच्या जगण्यासाठी झगडत होती. बारा गावानी निवडणुकीत मतदान बहिष्कार घातला होता. या बहिष्काराची दखल भारतच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधींनी घेतली होती.हा क्षण तोंगलाबादच्या घरा घराच्या भिंतीत सुवर्णक्षराने लिहिला गेला.दोन महिन्यात रस्त्याचे काम सुरु झाले होते. तो रस्ता म्हणजे आजचा दर्यापूर ते म्हैसांग मार्गे अकोला. अशा प्रतिकूल परिस्थितीत शिक्षणाचा विचार करणे हेच धाडसाचे होते. गावात जिल्हा परिषद शाळा होती; तीही फक्त चौथीपर्यंत. त्यापुढील शिक्षणासाठी कोणतीही सोय नव्हती.

परिणामी, हुशार आणि इच्छुक मुलांचे भविष्य अंधारात जात होते. याच वास्तवाची जाणीव शंकरराव ऊर्फ भाऊ तुळशीराम खोकले यांना झाली. ''आपल्या गावातील गोरगरीब मुलं शिकली पाहिजेत, मास्तर, डॉक्टर, अभियंते बनली पाहिजेत, मोठ्या हुद्द्यावर गेली पाहिजेत'' हा उदात्त विचार त्यांच्या मनात पक्का झाला. या विचारातून भाऊ खोकले यांनी गावातील पुंडलिक जळमकर, कै. आत्मारामजी जळमकर आणि कै. ओंकारराव जाधव यांच्याशी चर्चा केली. या जाणकार जमीनदारांना शिक्षणाचे महत्त्व उमगले होते. त्यांनी कोणताही विलंब न करता या उपक्रमाला पाठिंबा दिला. मात्र काही संकुचित मानसिकतेच्या लोकांनी ''मुलं शिकली तर शेतीसाठी मजूर कुठून मिळणार?'' असा आक्षेप घेत विरोध केला. तरीही या विरोधाला न जुमानता आत्माराम पाटील यांनी स्वतःच्या घरातील दोन खोल्या शाळेसाठी दिल्या. दोन शिक्षकांची भरती करण्यात आली आणि २९ ऑगस्ट १९६७ रोजी राष्ट्रीय विद्यालयाचा आठवीचा पहिला वर्ग सुरू झाला. त्या दिवशी वर्गात अवघ्या ३० ते ३२ विद्यार्थी होते; पण त्या वर्गातून शिक्षणाच्या नव्या पर्वाची सुरुवात झाली. विशेष म्हणजे चौथी नंतर सरळ आठवा वर्ग सुरु होणे हा पण ऐक ऐतिहासिक क्षण ठरला. श्री. सोनोने आणि श्री. अंबरते गुरुजींनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे धडे देण्यास प्रारंभ केला. पुढे हा शिक्षणाचा सारीपाट अखंड, अविरत आर्थिक संघर्षातूनही सुरूच राहिला. कालांतराने स्व. भाऊ खोकले यांच्यासोबत स्व. निळकंठ टापरे, स्व.विठ्ठलराव जळमकर, स्व. नारायणराव जळमकर, माजी आमदार तुकारामजी बिरकड, प्रा. गुलाबराव कळसकर, बाळासाहेब अर्बट, मधुभाऊ अंबरते, प्रा. गिरीधर बोरखडे अशी तत्कालीन तरुण, समर्पित मंडळी लोककल्याण शिक्षणसंस्थेत एकत्र आली. ''स्वयं शिक्षण स्वयंसेवा'' या संकल्पनेतून राष्ट्रीय विद्यालय तोंगलाबाद ही संस्था आकाराला आली. या प्रवासात ताईबाई जळमकर यांनी शिक्षकांसाठी दररोज दोन वेळचे भोजन स्वतः स्वयंपाक करून पुरवले. ग्रामपंचायतीच्या औपचारिक निवडणुका नसतानाही गाव फुले-शाहू-आंबेडकर विचारसरणीवर चालत होते. स्व. ओंकारराव जाधव **(पान ५ वर)**

शैक्षणिक
जयदीप सोनखासकर
मो. 9890508017

# केंद्रीय अर्थसंकल्पाने शिक्षणाला काय दिले?

देशाचा अर्थसंकल्प नुकताच संसदेत अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांनी सादर केला. अर्थसंकल्प हा सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनाच्या प्रत्येक बाबीशी निगडित असल्यामुळे सहाजिकच त्याकडे संपूर्ण देशवासियांचे लक्ष लागून असते. शिक्षण क्षेत्रातील कार्यकर्ता म्हणून या अर्थसंकल्पाने शिक्षणाला काय दिलं? हा खरा प्रश्न असून तोच शिक्षण विश्व च्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न या ठिकाणी केला आहे.

केंद्रीय अर्थसंकल्प २०२६- २७ मध्ये शिक्षण क्षेत्रासाठी रुपये १ लाख ३९ हजार २८९. ४८ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. ही गुंतवणूक मागील वर्षीच्या तुलनेत समान पातळीवर असून धोरणात्मक गुंतवणुकीवर लक्ष केंद्रित करते. यामध्ये शालेय शिक्षणासाठी रुपये ८३ हजार ५६२ कोटी आणि उच्च शिक्षणासाठी ५५ हजार ७२७ कोटींचा समावेश आहे. ज्यात कौशल्ये, पायाभूत सुविधा आणि समानतेवर भर देण्यात आला आहे. केंद्राच्या प्रमुख उपक्रम अंतर्गत इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी मुंबईला १५००० माध्यमिक शाळा आणि ५०० महाविद्यालयांमध्ये कंटेंट क्रिएटर लॅब स्थापन करण्यासाठी प्रोत्साहित केले जाणार आहे. २०३० पर्यंत दोन बिलियन व्यावसायिकांची आवश्यकता असलेल्या ऑरेंज इकॉनॉमी साठी सर्जनशील कौशल्यांना यातून चालना मिळेल असे भाकीत व्यक्त करण्यात आले आहे. समग्र शिक्षा अभियान अंतर्गत ४१ हजार २५० कोटी आणि पीएम पोषण शक्ती अभियान अंतर्गत १२,५०० कोटी ह्या पूर्वीच्या योजनांची तरतूद केली आहे. मात्र अर्थसंकल्पात याबाबत तपशीलवार अशी माहिती दिलेली नाही. शालेय शिक्षण विभागाचा भाग असणाऱ्या क्रीडा प्रतिभेसाठी खेलो इंडिया मिशन अंतर्गत आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.

अटल टिंकरिंग लॅब चा विस्तार आता युवा सक्षमीकरणासाठी केला जाणार आहे. ॲनिमेशन, व्हीज्युअल इफेक्ट्स, गेमिंग, कॉमिक्स आदी कंटेंट तयार करण्यासाठी लॅबच्या माध्यमातून प्रयत्न केला जाणार आहे. डिझाईन कौशल्यांची कमतरता दूर करण्यासाठी नवीन राष्ट्रीय डिझाईन संस्थेची स्थापना केली जाईल. याद्वारे ग्रामीण आणि वंचित भागांना लक्ष करून तेथील सर्जनशीलता आणि कौशल्याला वाव दिला जाणार आहे. ग्रामीण आणि शहरी दूरी कमी करणे आणि सर्जनशीलता वाढीत लावणे हा यामागील उद्देश आहे. राज्यांच्या मदतीने प्रमुख औद्योगिक कॉरिडॉर जवळ संलग्न पाच विद्यापीठांचा एक टाऊनशिप प्रकल्प तयार केला जाणार आहे. यामध्ये शिक्षण संशोधन आणि कौशल्यांचे एकत्रीकरण केले जाणार आहे. संस्थांमधील प्रत्येक जिल्ह्यात एक मुलींचे वस्तीगृह महिलांचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने निर्माण केले जाईल. खगोल आणि भौतिक शास्त्र शिक्षणाला चालना देण्याच्या दृष्टीने चार





दुर्बिणींच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. ब्रॉडबँड कनेक्टिव्हिटी आणि डिजिटल पायाभूत सुविधा अर्थसंकल्पात ग्रामीण भागातील सर्व सरकारी माध्यमिक शाळा आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी ब्रॉडबँड कनेक्टिव्हिटी अनिवार्य करण्यात आली आहे,ज्यामुळे डिजिटल समानतेला चालना मिळेल. व्यापक डिजिटल मोहिमेचा भाग असलेला हा उपक्रम ऑनलाइन संसाधने, ई- लर्निंग प्लॅटफॉर्म आणि दुरुस्त शिक्षणासाठी प्रवेश सक्षम करतो. भारतीय भाषेतील क्रमिक अभ्यासक्रमातील पुस्तकांप्रमाणेच डिजिटल भाषेत पाठ्यपुस्तके तयार करण्यावर आता भर राहणार आहे. यामुळे हायस्पीड इंटरनेट सह शिक्षकांच्या केंद्रीय प्रशिक्षणावर देखील भर दिला जाणार आहे.

येणाऱ्या डिजिटल युगात कोणतेही मूल मागे राहणार नाही याची खात्री करण्यासाठी एकत्रीकरण आणि कौशल्य विकासासाठी ही कृती महत्त्वाची ठरणार आहे. शिक्षणासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेमध्ये उत्कृष्टता केंद्र ५०० कोटी रुपयांच्या निधीतून या यामध्ये उत्कृष्टता केंद्र स्थापन केले जाईल. यामुळे तंत्रज्ञान आधारित परिवर्तनाचे संकेत निर्माण होतील. यामध्ये एआय वर्ग खोल्या आणि कार्यबळ कौशल्य प्रशिक्षणाचा देखील समावेश आहे. ऑटोमेशन यातून निर्माण होणाऱ्या नोकरीच्या चिंतेचे निराकरण करेल. हे मिशन तंत्रज्ञानातील तरुणांवर लक्ष केंद्रित करून त्यांच्याद्वारे ई-कंटेंट हजारो माध्यमिक शाळा व शेकडो महाविद्यालयांपर्यंत पोहोचेल. एकंदरीत केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये ए आय तंत्रज्ञान वापर आणि डिजिटल तंत्राचा वापर करून शाळा, महाविद्यालयातील वर्गखोल्या डिजिटल करण्यावर भर राहणार आहे. दुरस्थ पद्धतीने शिक्षण घेणे विद्यार्थ्यांना अधिक सोयीचे होणार आहे. मात्र हेच कृत्रिम बुद्धिमत्तेचे वादळ आमच्या पूर्व परंपरागत शिक्षणावर घाला घालणारे ठरू नये. आमच्या गुरुकुल संस्कृतीतील गुरुच, आता आमचा शिक्षक बंधू भगिनी वर्गच या व्यवस्थेतून हद्दपार होऊ नये एवढीच साशंक अपेक्षा व्यक्त करतो.... तूर्तास एवढेच!

चर्चा
डॉ. सौ. प्रतिभा शिरभाते
मो. 9405771808

# माणसापेक्षा जनावरे बरी

संपूर्ण जगात मानव स्वतःला श्रेष्ठ समजत आहे हे जरी सत्य असलं तरी आपल्यापेक्षा प्राणी बुद्धि- मान आहेत,ते आपल्या आजू -बाजूला आहेत फक्त आपण हे मान्य करत नाही. आपल्या नजरेच्या क्षमतेपेक्षा तीक्ष्ण आहे गरुडाची नजर,आपल्या वास घेण्याची क्षमतेपेक्षा कितीतरी हजार पटीने कुत्र्याची क्षमता जास्त आहे, आपण कितीही वेगाने पळत असले तरी आपल्यापेक्षा वेगाने पळणारा चिता तसेच पाखरांचा वेग निःशब्द करणारा आहे. आपल्यापेक्षा जास्त पर्यावरणाची जबाबदारी घेणारे पक्षी व प्राणी आपल्या विष्ठेद्वारे बिजारोपण करतात. मधमाशा व फुलपाखरू हे परागीभवन करतात म्हणजेच अन्न निर्मितीत भले मोठे योगदान त्यांचेच,स्वतःला श्रेष्ठ समजणाऱ्या मानव सुगरणीच्या घरट्या पुढे फेल आहे. तिच्या घरट्यात बेडरूम, बेडरूम मध्ये कापसाची गादी त्यावर तिची मुलं त्या घरट्यात भिजलेला छोटासा मातीचा गोळा व त्या गोळ्यात काजव्याला खोचून ठेवते म्हणजे बेडरूम मध्ये प्रकाश, कितीही पाऊस येओत तिच्या घरट्यात पाणी जात नाही, म्हणजेच किती उपक्रमशील आहे हो ही सुगरण बिना सिमेंट विटांचे पक्के घर दार कशी बांधते घरटे कोणालाच माहिती नाही,साप सुद्धा उंदरांचा नायनाट करून पिकांचे संरक्षण करतो, काही प्राणी पक्षी मेलेल्या जनावरांचे मांस खाऊन पर्यावरण स्वच्छ ठेवतात तर हे जंगलातील प्राण्यांचे अवशेष खाऊन जंगल स्वच्छ ठेवतात. फुलपाखर मधमाशांमुळे फळे व धान्य तयार होण्यात मदत होते, पक्षी फळे खातात त्यांच्या विष्ठेद्वारे वृक्षा- रोपणाचे कार्य कळत नकळत होते. गाय, म्हशी दूध शेणखत तर बैल शेतीसाठी सांगायचे तात्पर्य म्हणजे जंगली प्राण्यांपासून तर पाळीव प्राणी शाकाहारी प्राणी सगळेच पर्यावरणाचा संतुलन राखतात. अहो एवढेच काय पर्यावरणातील वृक्ष महत्त्वाचा घटक तो स्वतःच पर्यावरणातील प्रदूषण दूर करून हवेतील कार्बन डाय-ऑक्साइड गायब करतो. आपल्याला भरभरून प्राणवायू अगदी मोफत देतो, म्हणजे भूतलावर असलेला प्रत्येक जीवजंतू त्यांच्यावर असलेली जबाबदारी उत्तमरीत्या पूर्ण करतात आणि त्या जागी आपण छोट्या छोट्या गोष्टीचे फोटो काढून परेशान होतो, आपण ताकदवार म्हणून एखाद्या पहिलवानाला ताकदवर म्हटलं तर हत्तीला काय म्हणावं ? आपण स्वतःला खूपच माशांपेक्षा उत्तम जलतरणपटू समजतो पण २४ तास ३६५ दिवस आपण पाण्यात पोहू शकतो का ? शासनाने कोट्यवधी वृक्ष लावण्याचा संकल्प मानवाला पूर्ण करण्यास दिला पण कोट्यावधी वृक्ष कुठे आहे त्याचे गणित कुणालाच माहिती नाही . म्हणजेच माणसापेक्षा प्राणी पक्षी बरे जे आपलं काम निष्ठेने आणि निस्वार्थपणे करतात. आपला नालायकपणा बघा आपण वृक्ष संवर्धन करा, वृक्ष तोडू नका, वृक्ष लावा जीवन जगवा, वृक्ष आहे प्राण्यांचा निवारा असे हजारो नारे तोंडावाटे हो फक्त तोंडावाटे बाहेर काढणार आणि ती यात्रा दिंडी संपली की सगळे जागेवर काही गरज नाही आपल्याला आपण तर विकासाच्या नावाखाली रात्रीचे जंगल बुलडोझरने नष्ट करतो, कुंभमेळा आला म्हणून हजारो झाड तोडून तिथे



साधू लोकांची राहण्याची सोय करणार होतो,हे सारे काही कागदांच्या निर्जीव तुकड्यांसाठी, हे तर स्वतःचं जमीर, स्वतःची लाज सुद्धा विकतील.सकाळ झाली की गाईला पोळी दे, मंदिरात जाऊन देवाच्या नावाने घंटा वाजवून घरी ये आणि प्राणी मात्रांवर दयेचा आव आणणे. आणि मंगळवार,रविवार,शुक्रवार आला की, पाहुणे आले पार्टी करायची,सेलिब्रेशन करायचे, खारे जेवण करायचे तर कापा गाय, कोंबडी, बोकुड कापा घोरपड, पकडा ससे, चोरून नारून हरणाचे मांस म्हणजेच आम्हाला खायला कोणताही प्राणी चालतो. साप मारा, गाय मारा त्यांच्या कातड्यापासून विविध वस्तू बनवा, सिल्कची साडी पाहिजे तर असंख्य जिवंत रेशमाचे किडे उकळत्या पाण्यात टाका व सिल्कचा धागा मिळवा **(पान ५ वर)**

कथा
प्रा. मोहन काळे
मो. ७०३८२७६५५८

# सोन्याची पोथ



ट्रिंग... ट्रिंग... ट्रिंग... दारावरच्या बेलचा आवाज आला. अलका कणीक मळत होती. ती कणीकने भरलेले हात घेऊन दार उघडायला गेली. दार उघडल्यावर तिला दाराबाहेर तिचे जेठ गोपाल उभे दिसले. तिनं चेहऱ्यावर हास्य आणत त्यांना म्हटलं, अरे, भावोजी, तुम्ही? या, आत या.'' गोपाल आत येऊन सोफ्यावर बसले. अलकाला ते काहीसे तणावात दिसले. अलकानं स्वयंपाकघरात जाऊन एका ग्लासात पाणी आणलं. तिनं तो ग्लास टीपॉयवर न ठेवता गोपालच्या हातात दिला व म्हणाली,

''हे अंघोळीला गेलेले आहेत. तुम्ही बसा. मी चहा ठेवते.'' असं म्हणून ती चहा ठेवायला परत स्वयंपाकघरात गेली. ती विचार करत होती की गोपालभावोजी आपल्या घरी जास्त वेळा येत नाहीत. आले तर शेतातील काही ना काही वस्तू घेऊनच येतात. पण आजच्या सारखे गोंधळलेले ते या आधी कधीच दिसले नाहीत. नक्कीच ते कोणत्यातरी अडचणीत नाहीतर संकटात असतील. चहा घेतल्यावर आपण त्यांना त्याचं कारण विचारू असा तिनं मनात विचार केला. तिनं ट्रे मध्ये चहाचा कप आणून गोपालसमोर धरला. गोपालनं तो कप घेऊन चहा घ्यायला सुरुवात केली. अलका समोरच्या खुर्चीवर बसून त्यांच्याकडे पाहत बसली. गोपाल आपल्याच विचारांत चहाचा घोट घेता घेता मनाशीच काहीतरी जुळवाजुळव करत होता. तो विचार करत होता की ''भावाशी मी या विषयावर बोलू की नाही? त्याला आवडेल की नाही? विनाकारण आलो मी. भावाचा स्वभाव माहीत असूनही आपण आलो. चुकलंच आपलं. पण मी तरी काय करू? माझी यायची बिलकुल इच्छा नव्हती. तसं मी सविताला खूप समजावूनही सांगितलं पण ती ऐकायलाच तयार नव्हती. तिनं जबरदस्ती पाठवलं मला. ....''

''भावोजी, चहा घ्या आधी. कोणत्या विचारांत बुडालेले आहात तुम्ही? सगळं व्यवस्थित आहे ना? की काही अडचण आहे?'' अलकाच्या आवाजानं गोपाल एकदम भानावर आला. चोरी पकडल्यासारखं त्याचं तोंड झालं. ''काही नाही. असंच.'' त्यानं कसनुशा चेहऱ्यानं म्हटलं. ते काहीतरी लपवत असल्याचं अलकाच्या लक्षात आलं. काहीतरी अडचण नक्कीच आहे. त्यांचा स्वाभिमानी स्वभाव तिला माहीत होता. ''बरं, बरं. चहा घ्या आधी. नाहीतर तो थंड होईल.'' अलकानं अंदाज घेत म्हटलं. तिला थोडा अंदाज आला होता पण ती काहीच बोलली नाही. तिच्या नवऱ्याचा, डिगांबरचा, स्वभाव तिला माहीत होता. डिगांबरचा स्वभाव खूपच तापट आणि चिडचिडा होता. त्याचं मोठ्या भावाशी, गोपालशी, बिलकुलच पटत नव्हतं. हिस्सेवाटणीत तिच्या सासू सासऱ्यांनी एक एकर जमीन गोपालला शिल्लक दिल्यापासून तो गोपालचा राग, तिरस्कार करायचा. मोठा भाऊ घरी आल्याचं त्यांना मुळीच आवडायचं नाही. तेवढ्यात बाथरूमचं दार उघडल्याचा आवाज आला. डिगांबर अंघोळ करून बाथरूमच्या बाहेर आला. त्याची नजर सोफ्यावर बसलेल्या गोपालकडे गेली आणि त्याच्या कपाळावर आठ्या पडल्या. त्याचा चेहरा त्रासिक झाला. तो काही न बोलता तो बेडरूममध्ये गेला आणि केसांना तेल लावून, भांग पाडून, लुंगी घालून बैठकीत न जाता स्वयंपाकघरात गेला. त्यानं चिडलेल्या आवाजात अलकाला म्हटलं,

''कशाला आले ते?''

''अहो, असं काय बोलता? जरा हळू बोला. तुमचेच भाऊ हायेत ना ते? त्यांना ऐकू गेलं तर काय वाटेल त्यांना? काहीतरी महत्त्वाचं व तातडीचं काम असेल.'' अलकानं तोंडावर बोट ठेवत नवऱ्याला हळू आवाजात बोलण्याचा इशारा केला. ''त्यांना ऐकू गेलं तर गेलं. बिना कामाचे येतात काय ते?'' डिगांबर चिडून बोलला. ''ते जाऊ द्या. तुम्ही बैठकीत जा. भावोजींशी बोला. त्यांना ख्यालीखुशाली विचारा. पण एक गोष्ट लक्षात ठेवा. जरा प्रेमानं बोला. गरम नका होऊ एकदम. त्यांचं ऐकून घ्या आधी. त्यांच्या अशा अचानक येण्याचं कारण समजलं की पुढे ठरवू आपण काय करायचं ते.'' अलकानं हात जोडत म्हटलं.

''बरं. पाहतो.'' असं म्हणून डिगांबर बैठकीत आला. भावाशेजारी सोफ्यावर न बसता एका समोरच्या खुर्चीवर बसत कोरड्या आवाजात म्हणाला,

''हं, बोला, काय काम काढलं आज?''

''काही नाही. असाच आलो होतो. सहज. गोपालनं तोंडावर उसनं हसू आणत म्हटलं.

''सरकंसिधं काम सांगा. ताकाला जाऊन भांडं कशाला लपवता? तुम्ही कधीच बिना मतलबानं येत नाही ?'' डिगांबर कोरडेपणानं म्हणाला. ''नाही. काही नाही. बरं, येतो मी.'' असं म्हणत गोपाल उठायला लागला. तेवढ्यात अलका तिथं आली. उठून उभं राहणाऱ्या गोपालकडे पाहून म्हणाली, ''भावोजी, बसा शांततेनं. काय काम आहे, तुम्ही कशाला आले ते मोकळेपनानं व स्पष्टपणे सांगा. तुमचा चेहरा सांगत आहे की तुम्ही कोणत्यातरी अडचणीत आहात म्हणून. आपण कुटुंबातीलच आहोत. काय काम आहे ते आम्हांला सांगा. काय करता येते ते आपण पाहू.''

उठत असलेला गोपाल परत सोफ्यावर बसला. अलकाच्या शब्दांनी त्याला धीर आला होता. तो तिच्याकडे पाहत म्हणाला, काई नाई. वीस पंचवीस हजार रुपये उसने पायजे होते. मांगल्लत्या वर्षी कांदे लावले होते. कांदे लय झाले पन भाव पळल्याच्यानं लय घाटा आला. बँकेचे हप्ते बी भरनं नाई झाले. गावातल्या लोकायजोळून पैसे घेतले होते तेबी द्यायचे रायले. ते लोकं पैसे मांगून नाई रायले पन आता त्यायले आनखी पैसे मांगता येत नाईत. सोयाबीनवर मी भाऊचे पैसे वापस देईन. पाहा, असतील तर द्या. नसतील तर राहू द्या. सविता म्हने की दुसऱ्याच्या पुढे हात पसरवन्यापेक्षा सख्ख्या भावाले मांगा. ते नौकरीवर हायेत तर दोन पैसे गाठीले असतात त्यायच्या. आपल्यासारख्या शेतकऱ्यासारखी परिस्थिती नाई त्यायची. म्हनून आलो.'' ''माझ्याजवळ पैसे बियसे काही नाहीत. असते तर मी देले असते.'' काखा वर करत डिगांबर बोलला. गोपाल शरमिंदा झाला. त्याला मेल्याहून मेल्यासारखं वाटलं. त्याला वाटलं की उगाच आलो आपण. अहो, दोन मिनिटं आत या बरं.'' असं डिगांबरकडे पाहत अलकानं म्हटलं अन् ती बेडरूमकडे गेली. पाठोपाठ डिगांबर तिकडे गेला.

''अहो, असं काय करता? भावोजीला पैशाचं अर्जंट काम दिसते. त्यांची तिकडे गावाकडेच व्यवस्था झाली असती तर ते इथपर्यंत आलेच नसते. त्यांचा अन् सविताताईंचा मानी स्वभाव मला माहीत आहे. पैसे नाही मिळाले तर त्यांची पेरणी एक तर उशीरा होईल नाहीतर होणार नाही. आपण अडचणीच्या प्रसंगी लोकांना मदत करतो. गोपाल भावोजी तर तुमचे सख्खे मोठे भाऊ आहेत.'' तिनं नवऱ्याकडे पाहत म्हटलं.

''मी दुसऱ्यांना हजारो रुपये देईल पन त्यांच्यासाठी माझ्याजवळ एक रुपया सुद्धा नाही. अन् तसंही माझ्याजवळ आठ दहा हजार रुपयेच असतील. त्यांना नाही म्हणून सांगून दे. आता एकदा दिले तर नेहमीच मागतील ते.'' ''अहो, असं कसं बोलता? तुम्हांला काही मन आहे की नाही की दगडाचं ह्यदय आहे तुमचं? पाण्यात काठी मारली तर पाणी अलग होत नसते. तुमचं रक्त एकच आहे. एकाच आईच्या कुशीतून तुम्ही दोघांनीही जन्म घेतलेला आहे. रक्ताचे संबंध शेवटपर्यंत व कायमस्वरूपी टिकवायचे असतात. वावरात कोणतंही पीक झालं की तुमच्या चोरून आणून देतात ते. तुमच्या या तापट स्वभावामुळे तुम्हांला सगळेजण घाबरतात.'' अलका अजीजीनं म्हणाली.

''पण माझ्याजवळ इतके पैसे नाहीत. मग मी कसे देऊ त्यांना?'' डिगांबर म्हणाला. त्याला पैसे कमी असण्याचं कारणच सापडलं होतं पण त्याला अलकाचं म्हणणंही थोडं थोडं पटत चाललं होतं.

''तुमच्याकडे आठ दहा हजार रुपये आहेत ना? वरचे पंधरा हजारांसाठी ही माझी सोन्याची पोथ घ्या. ती गहाण ठेवा. आपण त्याचं व्याज भरू. आपल्याला नोकरी आहे. आपण दुसरीकडून पैशाची व्यवस्था करू शकतो. पण भावोजींचा फक्त वावराच्या भरवशावरच सारा खेळ आहे. तुम्हांला मी आठवण करून देते की तुम्हांला शिकवण्यासाठी त्यांनी त्यांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष केलं. ते स्वतः वावरात खपले व तुम्हांला शिक्षणासाठी पैसे पाठवत गेले. त्यांनी तुमच्यासाठी एवढं सारं केलं अन् तुम्ही त्यांच्यासाठी जे आपल्याला सहज शक्य आहे तेही करायलाच तयार नाही? आपण शहरात राहतो. त्यांनी तुमच्या आईवडिलांचं, माझ्या सासू सासऱ्यांचं सगळं केलं, आलेल्या पाहुण्या-राहुण्यांचं केलं, तुमच्या लहान बहीणीच्या लग्नासाठी सर्व खर्च केला. तुम्हांला नोकरी लागली कारण त्यांनी तुम्हांला शिकवलं म्हणून. तुम्हांला भरपूर पगाराची नोकरी आहे. आपण वावरातलं काही करू शकत नाही. तरी तुमच्या आईबाबांनी तुम्हांला वावराचा अर्धा हिस्सा दिलाच ना? त्यांना एक एकर वावर शिल्लक दिलं तर तुम्ही आईवडिलांवर, सख्ख्या भावावर रुसून बसता, त्यांचा राग करता हे मला मुळीच पटलेलं नाही. माणसाचं मन मोठं असलं पाहिजे. आपल्या माणसांपेक्षा पैसा किंवा भौतिक वस्तू महत्त्वाच्या नसतात हे तुम्ही लक्षात घ्या. शेवटी तुमची मर्जी. असं म्हणून अलका चूप झाली. तिच्या डोळ्यांतून अश्रू वाहायला लागले. तसा डिगांबरही विचारमग्न झाला. त्याच्या चेहऱ्यावर पश्चात्तापाचे भाव दिसायला लागले. तो पटकन म्हणाला,

''थांब. मला विचार करू दे. मी वीस पंचवीस हजार रुपये माझ्या शिक्षक मित्रांना मागतो. अन् भाऊंना देतो. मित्रांकडून उसनी घेतलेली रक्कम मी पगार झाल्यावर परत करील. भाऊंना थोडी शिल्लक रक्कम देतो. असं म्हणून डिगांबरनं मोबाईल काढला अन् एका शिक्षक मित्राला फोन लावून पंचवीस हजार रुपये मागितले. मित्राने ते ताबडतोब फोन पे द्वारे पाठवले. अलकाच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले कारण तिच्या नवऱ्याच्या डोळ्यांत तिला त्यांच्या भावाबद्दलचं प्रेम ओसंडून वाहताना दिसत होतं.

# क्रांतीच्या वाटेवर उभी असलेली शब्दशक्ती- माता रमाई बाबासाहेब आंबेडकर



प्रासंगिक

मनिषा कांबळे,
यवतमाळ

इतिहासाच्या पानावर काही नावे मोठे अक्षरात लिहिली जातात. तर काही नावे काळाच्या कडेला उभी राहून इतिहास घडवत राहतात .त्यांच्या निशब्द अस्तित्वामुळे क्रांतीला दिशा मिळते .अशीच एक निशब्द शक्ती म्हणजे माता रमाई भीमराव आंबेडकर. रमाई म्हणजे केवळ डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्नी नव्हत्या .तर त्या स्वतः एक अखंड संघर्षाची, त्यागाची आणि ध्येयाची जिवंत प्रतिमा होत्या. सामाजिक क्रांतीचे मौन शिल्पकार होत्या. बाबासाहेबांचे सामाजिक, शैक्षणिक, राजकीय कार्य जितके क्रांतिकारी होते. तितकाच रमाईच्या संसारातील संघर्ष ही असामान्य होता. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत रमाईचा संसार सुरू झाला. बाबासाहेब शिक्षणासाठी, चळवळीसाठी घराबाहेर असताना संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी रमाईवर होती.उपासमार ,आजारपण दारिद्र्य या सगळ्यांचा सामना त्यांनी सहन केला. आपल्या मुलांचे एकापाठोपाठ एक मृत्यू पाहूनही त्या खचल्या नाही. त्यांच्या डोळ्यात जरी अश्रू होते. पण मनात बाबासाहेबांच्या ध्येयासाठी अमाप बळ होतं .माता रमाईच त्याग इतका महान होता. की त्यांनी कधीही बाबासाहेबांच्या कार्याला प्रश्नचिन्ह लावले नाही. ''घर कसं चालवणार ''? ''मुलांची काय ''?असे प्रश्न विचारण्या ऐवजी त्यांनी बाबासाहेबांना भक्कम आधार दिला. निशब्द साथ दिली .ही साथ बाबासाहेबांच्या जीवनातील सर्वात मोठी शक्ती ठरली. बाबासाहेब नेहमी म्हणत असत की ''माझ्या आयुष्यातील सर्वात मोठा आधार म्हणजे रमाई'' हे शब्द त्यांच्या कार्यामागील सत्य स्पष्ट करतात. माता रमाई नसत्या तर बाबासाहेबांचा हा संघर्ष तितक्याच ताकदीन उभा राहिला असता का ? हा प्रश्न आजही विचार करायला भाग पाडतो. जरी त्या जास्त शिकल्या नव्हत्या. व्यासपीठावर उभ्या ही राहिले नव्हत्या .पण त्यांनी समाजासाठी एक महान योद्धा घडवला .आज जेव्हा आपण बाबासाहेबांचा कार्याचा गौरव करतो .तेव्हा त्या कार्यामागील निशब्द शक्तीची आठवण ठेवली पाहिजे .कारण क्रांती फक्त घोषणा ,आंदोलन किंवा कायदयातून घडत नाही तर ती त्याग , संयम आणि निस्वार्थ समर्पणातूनही घडते. हेच त्यांच्या आयुष्यातून आपल्याला शिकायला मिळते. न बोलता ही त्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वातून इतिहासाचा आवाज बुलंद केला .स्वतःसाठी नाही तर त्यांनी समाजासाठी आपले सर्वस्व अर्पण केले. त्यांच्या शांत, संयमी सहनशीलते मधून सामाजिक परिवर्तनाची खरी ऊर्जा निर्माण झाली. एक स्त्री म्हणून रमाईचे जीवन हे त्याचे सर्वोच्च उदाहरण आहे .अपत्याचे अकाली मृत्यू होणे. रमाईच्या आयुष्यातील सर्वात मोठे आघात होते. अनेक स्त्रिया अशावेळी दुःखाने खचून गेले असत्या .पण रमाईंनी त्या वेदनांना बाबासाहेबांच्या कार्यावर ओझं होऊ दिले नाही. त्याच्या मनात अशक्तपणा नव्हता. तर अपार ध्येय होते. त्यांनी कधीही बाबासाहेबांना त्याच्या सामाजिक लढ्यापासून रोखले नाही .उलट त्यांच्या कार्यामध्ये न दिसणारा आधारस्तंभ म्हणून आयुष्यभर सावलीप्रमाणे उभ्या राहिल्या. बाबासाहेब आंबेडकर समाजासाठी लढत असताना रमाई घरातल्या संघर्षाशी झुंज देत होत्या .दारिद्र्य ,उपासमार, आजारपण आणि सामाजिक अवहेलना या सगळ्या गोष्टींचा भार त्यांनी कोणतेही तक्रार न करता स्वतः अंगावर झेलत राहिल्या.बाबासाहेबांचे ध्येय इतके मोठे होते. त्या ध्येयाला कधी संसार आड येऊ नये यासाठी रमाईने स्वतःच्या वेदनांना मागे ठेवले .बाबासाहेब एक सामाजिक क्रांतीचे झाड होते .आणि रमाई त्या झाडाला घट्ट धरून ठेवणारी माती होत्या. रमाईच आयुष्य म्हणजे मौनातील महाकाव्य आहे .यात शब्द नाही. तक्रार नाही .अपेक्षा नाही. आहे ते फक्त अपार सहनशीलतिच बळ आज जेव्हा आपण क्रांतीचा जयघोष करतो. त्या क्रांतीच्या जयघोषा मागे रमाईच निशब्द त्यागाची प्रतिनिधी ऐकू येते. म्हणूनच माता रमाई आंबेडकर म्हणजे क्रांतीच्या वाटेवर उभी असलेले निशब्द शक्ती जीने न बोलता , न थांबता सगळं सहन केलं आणि इतिहास घडवून गेली. अशा या महान कार्य कर्तुत्वान त्यागमूर्ती माता रमाईला कोटी कोटी वंदन



# ओळख पक्ष्यांची : होला



चित्रातील पक्षी एक ठिपकेदार होला (स्पिलोपेलिया चिनेन्सिस) आहे. हे एक लहान, लांब शेपटीचे होला आहे जे भारतीय उपखंड आणि आग्नेय आशियामध्ये सामान्य आहे. या पक्ष्याच्या मानेच्या मागच्या आणि बाजूला असलेल्या पांढऱ्या ठिपक्या असलेल्या काळ्या कॉलर पॅचमुळे तो सहज ओळखता येतो. त्याचा पिसारा साधारणपणे तपकिरी आणि गुलाबी छातीचा असतो. हे बहुतेकदा उघड्या जंगलात, शेतात, बागेत आणि शहरी भागात आढळते.

**(छायाचित्र:चंद्रकांत पाटील)**

## राशी-भविष्य

**मेष :** आज नकारात्मक मानसिकता स्वीकारू नका. कुटुंबातील सदस्यांसोबत गैरसमज होणार नाहीत याची काळजी घ्या. तुम्ही नवीन काम करण्यास तयार असाल. तुम्ही स्पर्धकांवर विजय मिळवाल.

**वृषभ:** आज नोकरी आणि व्यवसायात अडथळे येतील. काम करणाऱ्यांना तुमचा हेवा वाटू शकतो. आज तुम्हाला चांगली बातमी मिळेल.

**मिथून :** नातेवाईकांशी वाद होऊ शकतो. दुपारनंतर तुम्हाला शारीरिक आणि मानसिक आनंद आणि आरोग्य मिळू शकेल. धर्मात रस वाढेल.

**कर्क :** आज बोलताना गोंधळून जाऊ नका याची काळजी घ्या. आनंद आणि मनोरंजनावर पैसा खर्च होईल. आदर गमावण्याची शक्यता आहे. प्रेम प्रकरणांमध्ये सुसंगतता असेल.

**सिंह :** आज तुमच्या जोडीदारासाठी वेळ काढा, सतत वाढणारे अंतर देखील नाते बिघडू शकते. तुमच्या जोडीदाराला तुमची गरज वाटेल.

**कन्या :** आज तुम्हाला आनंद आणि शरीरात थकवा दोन्ही अनुभवायला मिळेल. तुमचे काम कोणत्याही अडथळ्याशिवाय पूर्ण होईल. अनावश्यक चिंता टाळा. खर्चाची परिस्थिती उद्भवू शकते.

**तुळ :** आज तुमचे बोलणे आणि वर्तन संयमित ठेवणे तुमच्या हिताचे आहे. तुम्हाला अचानक पैसे मिळू शकतात. तुमच्याकडे अधिक शारीरिक ऊर्जा असेल.

**वृश्चिक :** आज तुमच्या आशा पूर्ण होतील. तुम्हाला जुन्या कर्मांचे चांगले फळ देखील मिळेल. तुम्ही चांगल्या कामांवर लक्ष केंद्रित कराल आणि त्यातून तुम्हाला आनंदही मिळू शकेल.

**धनु :** आज शारीरिक आणि मानसिक आरोग्य चांगले राहील. ऑफिसमध्ये सहकार्याचे वातावरण असेल. मित्रांसोबत पर्यटनस्थळी जाण्याची व्यवस्था होईल.

**मकर :** आजपासून नोकरी मिळण्याची शक्यता आहे. बौद्धिक कामे यशस्वी होतील. व्यवसाय फायदेशीर होईल. अपूर्ण कामे पूर्ण होतील. तुम्ही स्पर्धकांवर विजय मिळवाल.

**कुंभ :** आज तुम्हाला नफ्याच्या संधी मिळतील. गुंतवणूक इत्यादींमुळे फायदा होईल. तुम्हाला रोजगार मिळेल. बौद्धिक कामे यशस्वी होतील. तुम्हाला काही शारीरिक आजार जाणवतील.

**मीन :** आज तुम्हाला चोरी, दुखापत किंवा अपघातामुळे नुकसान होऊ शकते. खर्च वाढेल. जोखीम घेऊ नका. व्यवसाय मंदावेल. विरोध होईल.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

पान 4 वरून...

## संघर्ष, संस्कार आणि...


अनपोच सरपंच म्हणून निवडून आले. त्यांनी शाळेसाठी ग्रामपंचायतीची जागा दिली. स्व. नाना उर्फ पुंडलिकराव जळमकर यांनी ३५०० रुपयांचे दान दिले, तर मारोतीराव तळोकार यांनी कोणताही मोबदला न घेता गायवाडा शाळेसाठी खुला केला. आज विद्यालयाच्या नावावर सात एकर जमीन आहे. ही जमीन शाळेची स्थायी संपत्ती ठरली आहे. काळ बदलला, कालखंड बदलले, कारभारपद्धती आणि वैचारिक-शैक्षणिक प्रवाह बदलले; पण राष्ट्रीय विद्यालयाने संस्कारांचा पाया कधीही ढासळू दिला नाही. शिस्त, प्रामाणिकपणा, सामाजिक जाणीव आणि आत्मविश्वास हीच या विद्यालयाची खरी ओळख ठरली. या शाळेतून डॉक्टर, शिक्षक, अभियंते, प्रशासकीय अधिकारी, पोलीस निरीक्षक, पत्रकार, उद्योजक घडले. माजी मंत्री गुलाबराव गावंडे यांच्यासारखे नेतृत्व याच शाळेने घडवले. आज ५८ वर्षांनंतर राष्ट्रीय विद्यालयाचा प्रगतीचा आलेख केवळ इमारतींनी मोजता येत नाही; तो त्याग, श्रम, विश्वास आणि निःस्वार्थ योगदानाने रेखाटलेला आहे. शाळेसाठी पैशाची गरज भासली तेव्हा भाऊ खोकले यांच्या अर्धांगिनी शैलजा खोकले यांनी नववधू असतानाच अंगावरील सोनं काढून दिलं. हा त्याग केवळ आर्थिक नव्हता; तो शिक्षणावरील श्रद्धेचा होता. आजही शाळेच्या प्राचीरांमध्ये आणि प्रत्येक वर्गखोलीत त्या स्वार्थरहित अंशदानाची ऊब जाणवते. आता नव्या पिढीतील या शाळेचे माजी विद्यार्थी राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक सदानंद जाधव, माजी सरपंच तथा विद्यमान अमरावती जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव, शिक्षक राजेंद्र जळमकर, दिग्दर्शक निलेश जळमकर दत्ता जळमकर, प्रा. देवलाल आठवले,शाळेच्या प्राचार्या वर्षा काळपांडे, राहुल उर्फ भैया जळमकर, श्रीराम जऊळकर,आणि शाळेतील सर्व शिक्षक ही तरुण मंडळी संस्थाचालकांच्या खांद्याला खांदा लाउन राष्ट्रीय विद्यालयाचा वारसा पुढे अविरत चालवत आहेत. विशेष म्हणजे तोंगलाबाद हे गाव व्यसनमुक्त असून गावात कुठलेही राजकारण नसून संपुर्ण गाव शाहू, फुले, आंबेडकर विचारसरणीने वसले आहे. राष्ट्रीय विद्यालय तोंगलाबाद हे केवळ एक विद्यालय नाही; ते संघर्षातून घडलेले संस्कारांचे, मूल्यांचे आणि सातत्याचे जिवंत स्मारक आहे.

## माणसापेक्षा जनावरे बरी....

आणि ते बिचारे मुके प्राणी आपल्या सारख्या नालायक माणसाच्या प्रेमाची आतुरतेने वाट बघतात .आपल्या बोलण्याची,आपला स्पर्शाची वाट बघतात त्यांची इमानदारी प्रत्येक क्षणी आपल्या दृष्टीस पडते आणि आपण त्यांच्या विश्वासाचा फायदा घेऊन कुठल्याही नीच प्रवृत्ती पर्यंत जाऊ शकतो. गाय म्हशीच दूध काढण्यापासून बघा वागवलेला जनावर तुमच्यावर डोळे मिटून विश्वास करते आणि आपण त्यांच्याप्रती संवेदनशील आहोत का हो? लाज वाटते त्यांचे दूध काढण्यासाठी मशीन, दूध वाढावे म्हणून रोज इंजेक्शन त्यांना या दोन्ही गोष्टींचा किती त्रास होत असेल पण आपल्याला त्याचं काही देणंघेणं नाही त्यांचे दुष्परिणाम त्यांच्या शरीरावर तर होतातच पण मनुष्याच्या शरीरावर ही त्याचे दुष्परिणाम होतात यात शंकाच नाही परंतु तरीही मानवाला काहीच फरक पडत नाही. कोंबड्या बकऱ्यांचे उत्पादन वाढवा, आपल्या उपजीविकेसाठी जोडधंदा करा त्यांना विका बकरी कसायाकडे जाताना आरडाओरडा करते, पाय रोवते ती, जात नाही म्हणते आणि आपण ...... कठीण वागणे आहे न आपले ? बॉयलर कोंबड्यांना इंजेक्शन देऊन अगदी काही आठवड्यात तिला मोठी करून कापायला मोकळ होतो, तिचे वजन एवढे झपाट्याने वाढते की या इंजेक्शनमुळे तिला होणारा त्रास तेच सहन करोत,शेवटी कोंबडी म्हणजे अंडे देणारी मशीन, ती कोंबडी ने अंडे देणे बंद केले कि मरणप्राय यातना देण्यासाठी (कापायसाठी) सोडून दिल्या जाते. गाय म्हैस असेल तर डेअरी मध्ये वागवले जाते, नर असेल तर त्याला मरण्यासाठी दूर फेकून दिला जाते ते सुद्धा बिना अन्न पाण्याच,गायी म्हशी त्याच्या पासून सारख दूध मिळावं म्हणून वारंवार प्रेग्नेंट केल्या जात ते सुद्धा कृत्रिम रित्या म्हणजे, त्या मुक्या जनावरां वर सुद्धा आपण बलात्कार करतो एवढे निर्दयी झालो आहेत आपण.मानवाकडे मेंदू आहे त्याचा वापर कधीतरी चांगल्या गोष्टी करण्यासाठी आपली मानसिकता तयार होईल का ? जगातील काहीच मनुष्य असे आहेत की जे खरोखर प्राणीमात्रांची मुक्या जीवांची काळजी स्वतःच्या मुलापेक्षा व स्वतःच्या जीवापेक्षा जास्त घेतात बरोबर ना ? प्राणी मात्र आपल्या बुद्धीचा वापर अन्न मिळवण्यासाठी आणि आवश्यक अशा कार्यासाठी करतात पण मात्र अन्नासाठीच नाही,चिमणी कावळे मुंग्या इतर पक्षी त्यांना अन्न मिळाले की ते लगेच आपल्या सग्या सोयऱ्यांना सांगतात,त्यांना सोबत आणतात.

आणि आपण एखाद्याच्या लग्नात गेलो की प्लेटच्या खाली झाली जाईपर्यंत ताटात वाढून घेऊन येतो कारण पुन्हा बाबा त्या लाईन मध्ये कोण लागेल ? मालकाचं वाटोळं झालं तरी होऊ दे. एक माणूस दोन माणसाचं जेवण एकाच ताटामध्ये आणतो. प्राण्यांचा पक्षांचा मेंदू केवढा पण असला तरी दे उपजत किंवा अनुभवातून शिकतात आपल्याला मात्र विचार करण्याची क्षमता असते,आपण काही बोलायचे असल्यास भाषेचा उपयोग करतो पण ते विशिष्ट हालचालीद्वारे,आवाजा-द्वारेसमजतात,बस ते आपल्याला समजायला हव. पण कोणताही प्राणी असू देत मात्र ते आपला स्पर्श,आपले बोलणे सगळं काही समजू शकतात पण आपण शेवटपर्यंत त्यांची भाषा शिकू शकत नाही. आपण आपल्या गरजेसाठी निसर्गाचे वाटोळे करण्यास मागेपुढे बघत नाही झाड तोडणे,निसर्गाला हानी पोहोचविण्याच्या क्रिया करणे, फ्रिज, वाहने यापासून ध्वनी वायू प्रदूषण करतो. ओझोनचा थर आपल्या आगाऊ पणामुळे कमी होत चालला, पृथ्वीचे तापमान वाढायला लागले तरी पण प्राणी पक्षी आपल्या विष्टेद्वारे बिजारोपण करून वृक्ष लागवडीसाठी निस्वार्थपणे निसर्गाची सेवा करून आभार मानतात.आपण पाण्याचा वाटेल तसा दुरुपयोग करतो, आपल्या स्वार्थासाठी सर्वत्र सिमेंट काँक्रीटचे रस्ते बिल्डिंग बनवू लागलो, जंगलतोड सुरू आहे, आपल्या वाहनांमुळे कितीतरी प्राण्यांचा आपण जीव घेतो ते मात्र भावनिक असतात प्रत्येक प्राणी प्रेमाचा भुकेला असतो ते आपल्या प्रति इमानदार , प्रामाणिक असतात मुंग्या पासून आपण शिस्त पासून रांगेत चालणे,प्राण्यांपासून एकत्र कुटुंब पद्धती चा वापर करणे म्हणजेच कळपाने सोबत राहणे आपल्या कळपातील वयाने मोठा असलेल्या व्यक्तीचे ऐकणे वयोवृद्ध ती किंवा कोणताही प्राणी असो सगळेच त्याच्या निर्णयाला सहमती देतात, प्राणी पक्षी या राज्यातून त्या राज्यात, देशा त जातात ते सुद्धा बिना मॅपचे त्यांना प्रत्येक ऋतूंची चाहूल लागते म्हणजेच ते ऋतुमान सुद्धा समजतात, बिना दिशादर्शक यंत्राचे त्यांना प्रत्येक राज्यांचे रस्ते कुठे जातात, आपण कुठे थांबायचं, कुठं नदी आहे कुठे पाणी आहे हे सर्व माहिती असते तसेच आपल्या कळपातील छोट्या बच्चूचे स्त्रियांचे रक्षण करणे अशी सर्व जबाबदारी तो वयस्कर पुरुष प्राणी निभावत असतो,अरे लाज वाटते त्यांचे संस्कार बघून, त्यांची वागणूक, एकमेकांप्रती प्रेम तसेच त्यांचे काळजी घेणे आणि नेमका याच गोष्टींचा अभाव आपल्यामध्ये आहे.आपण वयात आल्याबरोबर लगेच मायबापाला म्हणतो तुम्हाला काय समजते ? प्राणी कधीच एकमेकांची फसवणूक करीत नाहीत त्यांचे खाण्याचे व दाखवायचे दात वेगळे कधीच नसतात. आपल्या कळपाबरोबर ते बाकीच्या प्राण्यांचा पण विचार करतात त्यांना सहारा देतात ते पण एकमेकांचे निस्वार्थपणे मदत करतात. उदाहरणार्थ माकडांना वाघ, सिंह,चिता असे हिंस्त्र प्राणी दिसतात ते वेगळा आवाज काढून एकमेकांना सावध करतात, धोक्याचा इशारा देतात. एकमेकांचे प्राण वाचवतात आणि आपण जाती जातीच्या नावाखाली, धर्माच्या नावाखाली एकमेकांचा विश्वासघात करतो, पैशासाठी कोणाचाही अहो मायचा बापाचा सुद्धा खून करायला मागे पुढे बघत नाही. माणसाकडे विचार करण्याची शक्ती आहे पण त्याला धोका समजत नाही त्यासाठी त्याला यंत्रावर अवलंबून राहावं लागतं. भूकंप, सुनामी येण्याची चाहूल या प्राण्यांना आधीच लागते,कुत्रे सुद्धा मृत्यू पावत असेल तर तिथे विशिष्टआवाजकरून आपल्याला सावध करतात, म्हणजेच आपल्यापेक्षा खरोखर प्राणी श्रेष्ठच आहेत, प्राणी पक्षी यांच्या गरजा मर्यादित असतात आणि आपण निसर्गाचा ऱ्हास करून आपल्या गरजा पूर्ण करतात. प्राण्यांपासून आपण संयम निसर्गप्रेम जरूर शिकावे पण आपला निचपणा प्राण्यांवर अत्याचार करणे, काल परवा तर मालाड मध्ये अगदी अडीच महिन्याच्या कुत्र्याच्या पिल्लावर लैंगिक अत्याचार करण्यात आले म्हणजे आतालहान मुलींबरोबरच कुत्र्यांचे पिल्लू पण यांना बलात्कारासाठी कमी पडत आहेत. सुप्रीम कोर्टाच्या आदेशामुळे बिचाऱ्या कुत्र्यांवर होणारा अमानुष अत्याचार खूप जास्त तीव्र व्हायला लागला, कुठे त्यांना जहर देऊन मारण्यात येत आहे, तर कुठे त्यांना इंजेक्शन देऊन मारले गेले. अहो ठिकठिकाणी कत्तलखाने उघडले आहेत,आपल्या जिभेच्या चवीसाठी बिचारे मुक्या प्राण्यांना हलाल करण्यात येते हलाल म्हणजे घशाची मुख्य नस अर्धवट कापून त्यांना तडफडायला सोडून देणे, विचार करा ..? आपल्या नातेवाईकांचा आपल्या डोळ्यात देखत खूण बघणे आणिआपल्या मृत्यूची प्रतीक्षा करणे की यानंतर आता माझा नंबर येणारच आहे आणि अशा निर्दयी लोकांसमोर छोटे जीव कितीही ओरडले काय,पाय घासले तरी हे नराधम आहेत जे आपल्यापेक्षा कमजोरंवर त्याच्यावर करायला बसले आहेत. त्यांच्या मनात थोडी सुद्धा दया माया नाही, बिचारे शेवटच्या क्षणापर्यंत तुमच्यावर विश्वास ठेवून तुमच्यात दया माया जागृत करण्यासाठी प्रयत्न करतात आपण मानव मात्र त्यांच्यासाठी काहीच विचार करत नाही.

## आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 302



गणाधीश
घडवंची
चकमक
तारांबळ
नागासाकी
पाखरण
रांधवणा
लवकुश
वरमणे
विवंचना
सर्वनाम
साठविणे

**पाच अक्षरी**
अनावश्यक
अनुवादक
टरकावणे
पारसनीस
पाळणाघर
भौमवासर
वळणदार
वेळापत्रक
शतपावली

**सहा अक्षरी**
वेड्यांचा बाजार
साम दाम दंड
सार्वभौमपद

**अन्य अक्षरी**
अवसान घातकी
गाजर पारखी

(उत्तर पुढील अंकी)

**संकेत शब्दः–** त्रय

**दोन अक्षरी**
अर्थ
कम
काका
कोना
कुंज
कुंभ
खण
खूर
गज
चीर
जाग
जर
तमा
दर
धड
धीमा
नीर
पर
पाक
बाळ
मार
मृग
रक्षा
राखी
रान
लाळ
वय
व्यास
शैव
सदा
सन
सज्जा
साल
साव
हेल

**तीन अक्षरी**
अकरा
अवश्य
कमळ
केशर
कोमट
खडावा
घुबड
घुमट
चरस
चालान
तपास
दशम
पटका
परात
पवन
पूजक
बखर
मजल
मजाल
माकड
मृदंग
रतीब
लगान
वमन
वालुका
वंचना
शरभ
क्षालन
सासर
सांगड


**चार अक्षरी**
आतूरता
काडतूस
कालवड
केकावली
खरपूस

मागील महाशब्दकोडेचे उत्तर



Uday Munde - 8446302691

## महाशब्दकोडे 683



**–: आडवी विधाने :–**
1) आझाद हिंद सेनेची स्थापना करणारे महान व्यक्तिमत्व
8) देवाच्या उत्सवानंतर सर्व भाविकांना देण्यात येणारे भोजन
12) नांगरलेली शेत जमीन साफ करण्याचे शेतकऱ्यांचे एक उपकरण
13) ताडून पाहणे, समक्षता
14) ज्याला लिहिता वाचता येते असा तो
15) स्तुती, प्रशंसा
17) दशमुखी रावण
20) हिंदीत जावई
22) खडक, पाषाण
23) मला
25) सुवर्ण, सोने
26) कर्ण
27) नवरदेवाकडील मंडळींना उतरण्यासाठी दिलेली जागा
28) पैसा जवळ असला की सर्व कामे सहज साध्य होतात या अर्थाचा एक वाक्प्रचार
31) झाडाची फांदी
33) द्रव्य, संपत्ती
34) सोबत
35) मळलेला, घाणेरडा, मलिन
37) महाराष्ट्रात लोकप्रिय असलेला लोकनृत्य प्रकार
39) वर, देणगी
40) पटकीचा ज्वर
41) आवरण, चिलखत, आच्छादन
42) श्रीयुतचे संक्षिप्त रुप
43) अंधार, काळोख
45) जिंकणे, माळ
46) योग्य, पात्र
47) श्रीकृष्णाचे पिता
50) चेहऱ्यावरील हालचाल, शृंगार चेष्टा
51) टिंगल, टवाळी, उपहास
52) निश्चयी, कठोर
55) पुनीत, निर्दोष, स्वच्छ
56) भारतीय सिनेसृष्टीचे पितामह
59) श्रीविष्णुच्या हाती असलेले चक्राकार अस्त्र
61) आवड, द्रव
62) पंडित, ज्ञानी व्यक्ति
63) मृत्यु देवता
65) यंत्राने चालणारा कारखाना
67) दिलेली ठराविक वेळेची कालमर्यादा, कालावधी
70) सूट, सवलत
71) खमंग, तिखट, रुचकर
74) वेणू, अलगुजा
75) खरवडून काढलेला भाग
76) लालची, हावरट, अधिक हाव असलेला
77) वैशेषिक दर्शनच्या प्रणेता ऋषींचे नाव
79) कुटुंब, परिवार
80) दृढ, पक्का, कायम
81) बायकोची लहान बहिण
82) जय, विजयी, जिंकणे
83) वेड, छंद, नाद

**–: उभी विधाने :–**
1) नेमका, बेताचा
2) आयुष्य
3) सौख्य, आनंद
4) चारचौघात उठून दिसणारे व्यक्तिमत्व, वजनदार
5) स्वतः झिजून इतरांना सुगंध देणारे एक काष्ठ
6) जुन्याकाळी प्रचलीत एक लेखणी प्रकार
7) पाण्याने युक्त
8) निवडणूकीत आपल्या आवडीच्या उमेदवाराला मत देणे
9) देवाला अर्पिलेल्या नैवेद्याचे भाविकांना वाटणे
10) साक्षीदाराची जबानी
11) मध्यंतरीच्या काळात, मध्ये
16) भारी, वजनी, प्रतिष्ठित
18) देवी सरस्वती
19) खाल्लेल्या मिठाला न जागणारा (हिंदीतील एक शब्दप्रयोग)
21) वानर, मर्कट
22) सौंदर्य वृद्धीसाठी असलेली साधने
24) कलाबतुचे
25) पंकज, राजीव
26) कलंक, बट्टा
29) विचारविनिमय, चर्चा
30) इच्छा, आकांक्षा
32) हस्तलाघव, चतुराई
36) कावळ्याचे ओरडणे
38) बायकोचा भाऊ, साळा
39) तालुक्याच्या जमाबंदीची वसुली घेणारा, वहिवाट करणारा
44) जगातील सर्वात मोठे वाळवंट
45) सदस्य
48) पौराणिककालीन एक प्रसिद्ध अंध संत कवी
49) नदी पार करण्यासाठी लाकूड एकत्र करुन केलेले एक साधन
52) केव्हा (हिंदी)
53) दोऱ्याची गुंडाळी, दोरा गुंडाळण्याचे साधन
54) नम्रता, लीनता
55) अवकाशातील एक ग्रह
57) गुप्तपणे माहिती काढणे
58) कीव आणणरा, दीनवाणा
59) आरश्यात सुनेचा चेहरा बघण्याचा लग्नातील एक विधी
60) चकाकी, लचक
64) दुर्दशा
66) रत्नचा अपभ्रंश
68) अस्वलांचा खेळ दाखविणारा
69) तुझे
71) चुगली, निंदा
72) स्वर, नाद
73) महाराष्ट्रातील एक विशेष क्षत्रिय जात
74) फुलाचे दळ, लसुणाचा एकेक भाग
78) हिंदीत दहा
79) उंदीर, सर्पाचे निवासस्थान

(उत्तर पुढील अंकी)

मागील महाशब्दकोड्याचे उत्तर



Uday Munde - 8446302691

# ३१ मार्चपर्यंत नक्षलवाद हद्दपार; गडचिरोली पोलीस प्रशासनाचा निर्धार

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

गडचिरोली, दि. ७ : जिल्ह्याच्या सीमेवर नक्षलवाद्यांविरुद्ध केलेल्या कारवाईत सुरक्षा दलांना यश आले असून, 'कंपनी क्रमांक १०' चा म्होरक्या प्रभाकर याच्यासह सात जहाल नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात आला आहे. तीन दिवस आणि तीन रात्री चाललेल्या या थरारक चकमकीनंतर नक्षलवाद्यांचे कंबरडे मोडले असून, ३१ मार्चपर्यंत जिल्ह्याचे नक्षलवादातून समूळ उच्चाटन करण्याचा निर्धार गडचिरोलीचे पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला.



छत्तीसगड आणि भामरागड तालुक्याच्या सीमावर्ती भागात झालेल्या या चकमकीत पोलिसांनी ५ हजार राऊंड फायर करत नक्षल्यांचे गड उद्ध्वस्त केले. नक्षल्यांच्या बाजूनेही १ हजार राऊंड डागण्यात आले. या चकमकीत सी-६० पथकाचे जवान दीपक मडावी यांनी वीरमरण आले. तर अन्य एक जवान जखमी झाला असून त्याची प्रकृती स्थिर आहे. या कारवाईत मारल्या गेलेल्या सात नक्षलवाद्यांची ओळख पटली असून, त्यात अनेक मोठ्या नावांचा समावेश आहे. प्रामुख्याने दंडकारण्य स्पेशल झोनल कमिटीचा सदस्य आणि कंपनी १० चा प्रभारी प्रभाकर (५७) याच्यासह कंपनी ५ चा कमांडर पागू मोडयाम यांचा समावेश आहे.

या सर्व नक्षलवाद्यांवर एकत्रितपणे २०० हून अधिक गंभीर गुन्हे दाखल असून, महाराष्ट्र शासनाने त्यांच्यावर एकूण ७१ लाख रुपयांचे बक्षीस होते. विशेष म्हणजे, तेलंगणचा रहिवासी असलेल्या प्रभाकरला आतापर्यंत १० वेळा आत्मसमर्पणाचे आवाहन करण्यात आले होते, परंतु त्याने हिंसेचा मार्ग सोडला नाही.

### जिल्ह्यात केवळ सात नक्षली शिल्लक

पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी दिलेल्या माहितीनुसार, या कारवाईनंतर आता संपूर्ण जिल्ह्यात केवळ ७ सशस्त्र नक्षली शिल्लक राहिले आहेत. यातील पाच जण छत्तीसगडमधील असून केवळ दोनच गडचिरोलीचे आहेत. त्यांनी आत्मसमर्पण करावे, अन्यथा ३१ मार्चपर्यंत त्यांचाही बीमोड केला जाईल,'' असा स्पष्ट इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे. या यशस्वी मोहिमेमुळे नक्षल्यांच्या पश्चिम सबझोनल ब्युरोला मोठा धक्का बसला आहे. पत्रकार परिषदेला पोलीस उपमहानिरीक्षक अंकित गोयल, सीआरपीएफचे उपमहानिरीक्षक अजयकुमार शर्मा यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित होते. या भागात अद्यापही शोधमोहीम सुरू असून, मृतांचा आकडा वाढण्याची शक्यताही वर्तवण्यात येत आहे.

## महत्त्वाचे

### ताडोबा बफरमध्ये वाघाच्या बछड्याचा मृत्यू

चंद्रपूर : ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर विभागात पुन्हा एकदा वन्यजीवांमधील आंतरसंघर्षाची गंभीर घटना उघडकीस आली आहे. शिवनी वनपरिक्षेत्रात एका अवयस्क वाघाच्या बछड्याचा मृत्यू झाल्याने वनविभागात खळबळ उडाली असून, प्राथमिक तपासात हा मृत्यू दोन वाघांमधील झुंजीत झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. आज, ६ फेब्रुवारी २०२६ रोजी ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर विभागातील शिवनी वनपरिक्षेत्रात कक्ष क्रमांक ८४२ (नियतक्षेत्र शिवनी) येथे अवयस्क वाघाच्या बछड्याचा मृतदेह आढळून आला. ही माहिती मिळताच वनविभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक वनपरिक्षेत्र अधिकारी अरविंद पेंदम यांच्यासह वनकर्मचाऱ्यांनी घटनास्थळी पाहणी केली. तसेच बफर विभागाचे सहाय्यक वनसंरक्षक एस. एस. डुबे, एनटीसीएचे प्रतिनिधी बंडू धोत्रे, तसेच प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांचे प्रतिनिधी मुकेश भांदककर यांनीही घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. वैद्यकीय तपासणीसाठी डॉ. विलास गावखरे (सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन विभाग, मुल), डॉ. बजरंग सवारे (पशुधन विकास अधिकारी, सिंदेवाही) आणि डॉ. कुंदन पोडचेलवार (पशु वैद्यकीय अधिकारी, टीटीसी) उपस्थित होते.

### सावनेर येथील खत निर्मिती प्रकल्पाचा प्रस्ताव केंद्राकडे

नागपूर : आमदार डॉ आशिष देशमुख यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे सावनेर येथे खत प्रकल्पाच्या उभारणीसाठी राज्य शासन व गेल (इंडिया) लिमिटेडने स्वारस्य दाखवले. राज्य शासन आणि गेलमध्ये सामंजस्य करार झाल्यानंतर राज्य शासनाने हा प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी केंद्र सरकारकडे पाठविला. हा महत्त्वाकांक्षी खत प्रकल्प लवकर सुरू झाल्यास शेतकऱ्यांना युरिया आणि इतर खतांची उपलब्धता वाढेल, दर स्थिर राहतील आणि आर्थिक लुबाडणुकीपासून संरक्षण मिळेल तसेच प्रादेशिक उद्योगवाढीला चालना मिळून रोजगाराचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर सोडविता येईल, असे सांगून केंद्रीय मंत्रिमंडळात या प्रकल्पाच्या कामाला लवकर सुरू करण्यासंदर्भात निर्णय घ्यावा, अशी विनंती डॉ. आशिष देशमुख यांनी खत व रसायन मंत्री जेपी नड्डा यांना केली. या प्रकल्प निर्मितीच्या कामाला लवकर सुरुवात करण्यात यावी, या उद्देशाने देशमुख यांनी जेपी नड्डा यांची नवी दिल्ली येथे भेट घेतली. गेलचा खत प्रकल्प हा केवळ उद्योग नसून विदर्भाच्या समृद्धीचा, आत्मनिर्भरतेचा आणि उज्ज्वल भविष्यासाठीचा दृष्टीकोन आहे.

## वनोजा ग्रामपंचायतीत 'ईश्वर चिट्ठी'चा घोळ; शिपाई भरतीवरून उपसरपंच-सचिवाच्या मनमानीने गाव तापले!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

राळेगाव, दि. ७ : तालुक्यातील वनोजा ग्रामपंचायतीचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला आहे. २६ जानेवारीची तहकूब ग्रामसभा ३ फेब्रुवारी रोजी पार पडली असता, विषयपत्रिकेत नसतानाही शिपाई पदाचा विषय रेटून नेल्याने मोठा गदारोळ झाला. उपसरपंच आणि सचिवाच्या मनमानी कारभाराला कंटाळून सरपंचांनी सभेतून थेट काढता पाय घेतला, तर ईश्वर चिठ्ठीतील 'राझ' आणि बोगस भरती प्रक्रियेवरून ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला आहे. २६ जानेवारीला गणसंख्येअभावी रद्द झालेली सभा ३ फेब्रुवारी २०२६ रोजी घेण्यात आली. यावेळी शिपाई पदाचा विषय सूचीत नव्हता. तरीही सचिवाने मनमानी करत जुन्या अर्जांचे वाचन सुरू केले. यावेळी सरपंचावर प्रश्नांचा




भडिमार करून दबाव टाकण्यात आला, ज्यामुळे गोंधळलेल्या सरपंचांनी सभा अर्ध्यावर सोडून घरचा रस्ता धरला. त्यांच्या पश्चात उपसरपंच व सचिवाने मनमानी करत शिपायाला अस्थायी करण्याचा ठराव मंजूर करून घेतला. मुळात ११ ऑक्टोबर २०२४ रोजी झालेली शिपाई भरतीच संशयाच्या भोवऱ्यात आहे. १२ उमेदवारांपैकी इतरांना न कळवता, केवळ एकाला बोलावून ईश्वर चिठ्ठीद्वारे निवड करण्यात आली. विशेष म्हणजे, ज्याचे नाव चिठ्ठीतून निघाले, तोच उमेदवार नेमका त्याच वेळी गेटमधून आत आला. प्रशासनाने व्हायरल केलेल्या अर्ध्या-अधुऱ्या व्हिडिओमध्ये चिठ्ठ्यांवर नावे लिहितानाची प्रक्रियाच गायब आहे. त्यामुळे 'सर्व चिठ्ठ्यांवर एकाचेच नाव होते का?' आणि 'कुठेतरी पाणी मुरतेय', असा संशय ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत. सदर शिपायाचा ११ महिन्यांचा कार्यकाळ संपला असूनही, केवळ ८ दिवसांचा खंड देऊन त्याला पुन्हा रुजू करण्यात आले आहे. यात मोठे 'साटेलोटे' असल्याचा आरोप होत असून, ही बोगस भरती रद्द करून नव्याने पारदर्शक प्रक्रिया राबवावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## भारतात चित्त्यांची तिसरी तुकडी फेब्रुवारीअखेर

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

नागपूर, दि. ७ : चित्ता स्थलांतर प्रकल्पाअंतर्गत दक्षिण आफ्रिकेतील बोत्सवाना येथून पुन्हा एकदा भारतात आठ चित्ते आणले जाणार आहेत. सुरुवातीला हे चित्ते दोन तुकडीत आणण्याचे ठरले होते. मात्र, त्यावर अजून शिक्कामोर्तब झाले नसले तरीही फेब्रुवारीच्या अखेरच्या आठवड्यात मध्यप्रदेशात आठ चित्ते आणले जाणार हे निश्चित आहे.

यापूर्वी मे २०२५ मध्ये चित्त्यांची पहिली तुकडी आणि डिसेंबर अखेरीस चित्त्यांची दुसरी तुकडी येणार होती. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने ही माहिती दिली होती. केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव आणि मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांच्या उपस्थितीत चित्ता प्रकल्पाची आढावा बैठक घेण्यात आली होती. मात्र, आता २०२६ मध्ये फेब्रुवारी अखेरीस चित्ते येणार आहेत.



### बोत्सवाना येथून आठ चित्ते येणार

देशातील चित्ता प्रकल्पावर आतापर्यंत ११२ कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च झाला आहे. त्यापैकी ६७ टक्के खर्च मध्यप्रदेशातील चित्ता पूर्नवसनासाठी गेला आहे. केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव आणि मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांच्यातील उच्चस्तरीय बैठकीत चित्त्यांच्या स्थलांतराचा रोडमॅप अंतिम करण्यात आला.

बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव म्हणाले की, चर्चा चित्त्यांच्या पलीकडे जाऊन राज्याच्या विशाल राखीव वनक्षेत्रावर केंद्रित झाली आहे, जे पर्यटन, जैवविविधता आणि उपजीविकेत महत्त्वाची भूमिका बजावते. मध्यप्रदेशातील राखीव जंगलांच्या मोठ्या क्षेत्राबद्दल आम्ही चर्चा केली, जी आमच्या पर्यटन उद्योगासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. आम्ही इतर राज्यांमधून, विशेषतः आसाममधून रानम्हशी आणण्याबद्दल देखील चर्चा केली आणि प्रक्रियात्मक बाबींमध्ये मदत मागितली. मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव म्हणाले, २८ फेब्रुवारीच्या सुमारास बोत्सवानाहून चित्ते देखील येतील. आम्हाला समाधान आहे की मध्यप्रदेश सरकार, भारत सरकारसोबत जवळून काम करून, आमच्या वन्यजीव संसाधनांना आणखी वाढविण्यासाठी सर्व आवश्यक पावले उचलेल.

अधिकाऱ्यांनी सांगितले की बोत्सवानातून येणारे आगमन प्रकल्प चित्ताच्या गतीवर आधारित आहे, ज्याने भारताला आधीच जागतिक संवर्धन चर्चेच्या केंद्रस्थानी ठेवले आहे. जवळून पाहिलेला संवर्धन प्रयोग म्हणून सुरू झालेला हा प्रयोग आता टप्प्याटप्प्याने विस्तारात रूपांतरित होत आहे. पुढील टप्प्यासाठी गांधी सागर अभयारण्य सज्ज आहे. वन्यजीव तज्ज्ञांचे म्हणणे आहे की मध्यप्रदेश या दृष्टिकोनाच्या केंद्रस्थानी आहे, कुनो राष्ट्रीय उद्यान आधीच वाढत्या चित्त्यांच्या संख्येला आधार देत आहे आणि गांधी सागर वन्यजीव अभयारण्य पुढील टप्प्यासाठी सज्ज आहे.

## तेलंगणात प्रचाराचा उपयोग नाही, फडणवीसांनी महाराष्ट्राकडे लक्ष द्यावे-वडेट्टीवार

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

चंद्रपूर, दि. ७ : तेलंगणामधील महापालिका निवडणुकीसाठी महाराष्ट्रातील नेत्यांनी प्रचाराला जाण्याची आवश्यकता नाही, असा टोला काँग्रेसचे विधीमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लगावला.

तेलंगणातील जनतेने आधीच आपला निर्णय घेतला असून बाहेरून येणाऱ्या नेत्यांच्या प्रचाराचा फारसा परिणाम होणार नाही, असे ते म्हणाले. त्यामुळे मुख्यमंत्री फडणवीस यांनी तेलंगणात वेळ घालवण्यापेक्षा महाराष्ट्रातील प्रश्नांकडे लक्ष द्यावे, असा सल्लाही त्यांनी दिला.

महाराष्ट्रात शेतकरी, बेरोजगारी, महागाई आणि कायदा-सुव्यवस्थेचे प्रश्न गंभीर स्वरूपाचे आहेत. या प्रश्नांवर सरकार अपयशी ठरत असल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला. राज्यातील जनतेला दिलेली आश्वासने अद्याप पूर्ण झालेली नाहीत, तर दुसरीकडे सत्ताधारी नेते बाहेरील राज्यांतील निवडणुकीत व्यस्त असल्याची टीका त्यांनी केली.



मुख्यमंत्री फडणवीस यांनी आधी महाराष्ट्रातील जनतेला न्याय द्यावा, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली.

महाराष्ट्रात तीन लाखांहून अधिक कामांवर परिणाम होणार असून रोजगार हमी योजनेची विश्वासार्हता संपुष्टात आली आहे, अशी तीव्र टीका काँग्रेसचे विधीमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली.१२० दिवसांची कामाची मर्यादा असूनही हाताला काम मिळत नसेल, तर अशा योजनेचा उपयोग काय, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

अटी-शर्तीमुळे अनेक ठिकाणी कामेच सुरू करता येत नसून सुमारे तीन लाख रोजगारांना ब्रेक लागल्याचा दावा त्यांनी केला. पूर्वी १०० दिवसांची रोजगार हमी होती, आता ती योजना बंद करण्याच्या दिशेने पावले टाकली जात असल्याचेही वडेट्टीवार म्हणाले.

यवतमाळ जिल्ह्यात गेल्या एका महिन्यात २२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे निदर्शनास आणून देत त्यांनी शेतकरी कर्जबाजारीपणावरही सरकारवर टीका केली. राज्यातील शेतकऱ्यांवर सुमारे २ लाख ९१ हजार कोटी रुपयांचे कर्ज असूनही कर्जमाफी देण्यात आलेली नाही. राज्य सरकारने केंद्राकडे प्रस्ताव पाठवला असला, तरी 'कर्जमाफी व्यवहार्य नाही,' असे केंद्र सरकारने स्पष्ट केल्याचा आरोप त्यांनी केला.

राज्याची ऐपत नाही आणि केंद्राची दानत नाही, अशा परिस्थितीत शेतकरी पूर्णपणे उद्ध्वस्त होईल, असा इशाराही त्यांनी दिला. यापुढे जाऊन मोदी सरकारने अमेरिकेशी केलेला शेतीविषयक करार अत्यंत धोकादायक असल्याचे वडेट्टीवार यांनी सांगितले. या निर्णयाचे परिणाम तात्काळ दिसणार नसले, तरी पीक बाजारात आल्यानंतर शेतकऱ्यांचे कंबरडे मोडणारे परिणाम दिसून येतील, असे ते म्हणाले. भारताकडून होणाऱ्या निर्यातीवरील शुल्क १८ टक्क्यांपर्यंत मर्यादित ठेवून अमेरिकेतील शेतमालावर शून्य टक्के आयात शुल्क लावण्यात आले आहे. यापूर्वी हे शुल्क ११० ते १२० टक्क्यांपर्यंत होते.

## घाटंजीच्या डॉ. विवेक जगताप यांना दोन नवे पेटंट

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

घाटंजी, दि. ७ : येथील गिलानी महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. विवेक जगताप यांना भारत सरकारकडून दोन नवीन पेटंट मिळाले आहेत. ग्रंथालयशास्त्र आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात केलेल्या संशोधनासाठी त्यांना हा बहुमान प्राप्त झाला असून त्यांच्या नावावर आता एकूण तीन पेटंट जमा झाले आहेत.

एस. पी. एम. विज्ञान व गिलानी कला, वाणिज्य महाविद्यालयात ग्रंथालयशास्त्र आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) विभागात कार्यरत असलेले विवेक जगताप यांनी संशोधन क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. यापूर्वी त्यांच्या नावावर एक पेटंट नोंदणीकृत होते. आता मिळालेल्या दोन नव्या पेटंट्समुळे

### ग्रंथालय आणि एआय क्षेत्रात संशोधन

त्यांच्या नावावर एकूण तीन पेटंट्सची नोंद झाली आहे. त्यांना मिळालेले पहिले पेटंट हे कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित असून, ते ग्रंथालयातील वाचकांना त्यांच्या गरजेनुसार योग्य पुस्तके, संदर्भ साहित्य आणि डिजिटल साधने सुचवते. हे 'स्मार्ट कियोस्क' ग्रंथालय सेवा अधिक प्रभावी आणि वेगवान करते. दुसरे पेटंट हे स्वयंचलित लोकसंख्या मोजणारे यंत्र आहे. इन्फ्रारेड सेन्सरचा वापर करून हे यंत्र खोलीत येणाऱ्या-जाणाऱ्या व्यक्तींची अचूक संख्या मोजते. इंटरनेटशिवाय केवळ स्थानिक वायफाय नेटवर्कवर चालणारे हे उपकरण मोबाईल किंवा संगणकावर थेट माहिती पुरवते. शाळा, महाविद्यालये आणि कार्यालयांमध्ये उपस्थिती मोजण्यासाठी हे यंत्र अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. हे उपकरण विकसित करण्यासाठी विवेक जगताप यांना त्यांचा मुलगा अर्थ जगताप याचेही तांत्रिक सहकार्य लाभले. संशोधन ही सतत चालणारी प्रक्रिया असून समाजोपयोगी तंत्रज्ञान विकसित करणे हेच माझे ध्येय आहे, अशी प्रतिक्रिया विवेक जगताप यांनी व्यक्त केली. या यशाचे श्रेय त्यांनी संस्था अध्यक्ष जे. जे. गिलानी, उपाध्यक्ष अल्ताफ गिलानी, एम. ए. शेहजाद आणि प्राचार्य वाय. एस. माहुरे यांना दिले आहे. त्यांच्या या संशोधनामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

## कामठीत नायलॉन मांजाने एकाच वेळी तिघे जखमी

नागपूर : मकरसंक्रांत आटोपली तरी शहरात नायलॉन मांजाचा हैदोस अद्याप थांबलेला नाही. शुक्रवारी (दि.०६) संध्याकाळी रमा नगर उड्डाण पुलावर पतंगीच्या धारदार नायलॉन मांजामुळे एका युवकाचा गळा खोलवर कापला गेला. या युवकासोबतच अन्य दोन जणही गंभीर जखमी झाले असून या जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मिळालेल्या माहितीनुसार, मुन्नवर खान (४०) हे आपल्या दुचाकीने रामनगर उड्डाण पुलावरून जात असताना अचानक लोंबकळणारा नायलॉन मांजा त्यांच्या गळ्याला अडकला. काही समजण्याच्या आतच या धारदार मांजाने त्यांचा गळा चिरला. या जखमेमुळे त्यांच्या श्वासनलिकेला गंभीर इजा झाली असून मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाला. याच उड्डाणपुलावर अशाच प्रकारे अन्य दोन व्यक्तीही मांजामुळे गंभीर जखमी झाल्या. हे तिघेही आपापल्या वाहनाने या उड्डाण पुलावरून जात होते. तिन्ही जखमींना तातडीने कामठी येथील उपजिल्हा रुग्णालयात आणण्यात आले.

## चंद्रपूर जिल्ह्याच्या विकासासाठी ६५८ कोटींचा 'बूस्टर डोस'

### पालकमंत्र्यांनी अतिरिक्त निधीसाठी घातले साकडे!; नियोजन समितीच्या बैठकीत विकासाचा रोडमॅप तयार

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

चंद्रपूर, दि. ७ : चंद्रपूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा देण्यासाठी गुरुवारी नियोजन भवनात पार पडलेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत सन २०२६-२७ या वर्षासाठी मंजूर मर्यादेपेक्षा ६५८ कोटी रुपयांच्या अतिरिक्त निधीचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत जिल्ह्याच्या विकासाचा महत्वकांक्षी संकल्प सोडण्यात आला. चंद्रपूर जिल्ह्याच्या विकासाचा 'रोडमॅप' ठरविणारी जिल्हा नियोजन समितीची बैठक पालकमंत्री तथा राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन भवन येथे पार पडली. यावेळी जिल्ह्याच्या विकासासाठी निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही, असा विश्वास पालकमंत्र्यांनी व्यक्त केला. बैठकीला प्रमुख अतिथी म्हणून



आमदार सुधीर मुनगंटीवार, आमदार किशोर जोरगेवार, आमदार देवराव भोंगळे, आमदार करण देवतळे यांच्यासह जिल्हाधिकारी विनय गौडा, पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, मुख्य वनसंरक्षक एम.एन. रामानुजन आणि मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह उपस्थित होते. शासनाने आगामी २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेसाठी ३५८ कोटी ८९ लक्ष, अनुसूचित जाती उपायोजनेसाठी ७५ कोटी, तर आदिवासी उपायोजनेसाठी १११ कोटी ४८ लक्ष रुपयांची कमाल वित्तीय मर्यादा मंजूर केली आहे. मात्र, जिल्ह्याचा वाढता विस्तार आणि प्रलंबित विकासकामे पूर्ण करण्यासाठी हा निधी अपुरा असल्याचे स्पष्ट करत, समितीने ६५८ कोटी रुपयांची अतिरिक्त मागणी नोंदविली आहे. यात सर्वसाधारण योजनेसाठी ४५० कोटी, अनुसूचित जाती उपायोजनेसाठी ५८ कोटी आणि आदिवासी उपायोजनेसाठी १५० कोटी रुपयांच्या वाढीव निधीचा समावेश आहे. बैठकीत पालकमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश दिले की, जिल्ह्याच्या सीमेवर आणि महत्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत. प्रत्येक तालुक्यात सुसज्ज विश्रामगृहांची उभारणी करावी. आरोग्य विभागाला निर्देश देताना ते म्हणाले की, सिकलसेल आणि हत्तीरोग निर्मूलनासाठी अधिक प्रभावी मोहीम राबविण्याची गरज आहे. तसेच, अनेक गावांत आजही स्मशानभूमी नसल्याने ग्रामस्थांची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी स्मशानभूमी आणि ग्रामपंचायत भवनांच्या बांधकामाला प्राधान्य द्यावे. वीज बिल थकल्यामुळे कोणत्याही प्रादेशिक पाणीपुरवठा योजना बंद पडू नयेत, याची दक्षता घेण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

### अधिकाऱ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप!

प्रशासकीय काम आणि कायदा सुव्यवस्था राखण्यात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल जिल्हाधिकारी विनय गौडा आणि जिल्हा पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांचे विशेष कौतुक करण्यात आले. जिल्ह्याचा नावलौकिक वाढविल्याबद्दल आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी या दोन्ही वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडला. जिल्हा नियोजन समितीने एकमुखाने या ठरावाला मंजुरी देत, प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली. यामुळे प्रशासनाचे मनोधैर्य उंचावण्यास मदत होणार आहे.

### यंत्रणांची 'हजार' कोटींची मागणी

एकीकडे नियोजन समितीने ६५८ कोटींची अतिरिक्त मागणी केली असली, तरी विविध अंमलबजावणी यंत्रणांनी मात्र तब्बल ११३४ कोटी १५ लक्ष रुपयांच्या अतिरिक्त निधीची मागणी केली आहे. यात सर्वसाधारण योजनेसाठी सर्वाधिक ८२१ कोटींची मागणी आहे. 'लोकप्रतिनिधी विकासासाठी आग्रही असतात, त्यामुळे त्यांच्या मागण्यांकडे सकारात्मक दृष्टीने पाहावे. राज्यस्तरीय बैठकीत आपण जिल्ह्याची बाजू लावून धरू आणि जास्तीत जास्त निधी खेचून आणू,' अशी ग्वाही पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांनी दिली.

## भिवापूर नगरपंचायतीत महापुरुषांचे फोटो हटविल्याचा प्रकार; बसपाचा तीव्र निषेध

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

भिवापूर, दि. ७ : नगर पंचायतीच्या सभागृह व नगराध्यक्ष कक्षातून राष्ट्रपिता महात्मा गांधी, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच इतर महापुरुषांचे फोटो नगराध्यक्षांच्या मौखिक आदेशान्वये हटविण्यात आल्याची घटना घडल्याचा आरोप बहुजन समाज पार्टीने केला असून या प्रकाराचा तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला आहे.

बहुजन समाज पार्टी भिवापूर येथील कार्यकर्त्यांच्या शिष्टमंडळाने नगर पंचायतीच्या प्रभारी मुख्याधिकारी दिपीका गायकवाड यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे ओबीसी, आदिवासी, भटक्या-विमुक्त, दलित व अल्पसंख्याक समाजाची आण-बान-शान आहेत. त्यांच्या विचारांमुळेच आज अनेकांना सन्मानाची पदे मिळाली आहेत, हे विसरता कामा नये.तारीख ४ फेब्रुवारी



२०२६ रोजी नगराध्यक्षांच्या मौखिक आदेशान्वये नगर पंचायत सभागृह व नगराध्यक्ष कक्षातील राष्ट्रपिता महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व इतर महापुरुषांचे फोटो हटविण्यात आल्याची वार्ता पसरताच शहरात तीव्र संतापाची लाट उसळली. कार्यालयीन स्वच्छतेसाठी फोटो तात्पुरते काढणे समजू शकते, मात्र राजकीय दुराग्रहातून महापुरुषांचे फोटो हटविणे गंभीर बाब असल्याचे शिष्टमंडळाने नमूद केले.या घटनेचा भिवापूरचे ज्येष्ठ मार्गदर्शक पुरुषोत्तम भिसीकर यांनी तीव्र निषेध केला असून बसपाचे वरिष्ठ नेते डॉ. वसंत खवास व माजी नगरसेवक संदीप खडसंग यांनीही जहाल प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. सामाजिक न्यायासाठी संघर्ष करणाऱ्या सर्व महापुरुषांचे फोटो एका रांगेत तात्काळ लावावेत, तसेच भविष्यात अशा प्रकारची पुनरावृत्ती होऊ नये, अशी ठाम मागणी शिष्टमंडळाने केली आहे. शिष्टमंडळात डॉ. वसंत खवास, माजी नगरसेवक संदीप खडस

संदीप खडसंग यांनीही जहाल प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. सामाजिक न्यायासाठी संघर्ष करणाऱ्या सर्व महापुरुषांचे फोटो एका रांगेत तात्काळ लावावेत, तसेच भविष्यात अशा प्रकारची पुनरावृत्ती होऊ नये, अशी ठाम मागणी शिष्टमंडळाने केली आहे.

# पहिल्याच सामन्यात पाकिस्तान थोडक्यात बचावला

## टी-२० विश्वचषकात नेदरलँडविरुद्ध निसटता विजय!



**कोलंबो : दि.७ वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या पहिल्याच सामन्यात आज (दि. ७) पाकिस्तान संघ थोडक्यात बचावला. पराभवाचे पराभवाच्या छायेत असलेल्या पाकिस्तानला १९ व्या ओव्हरने सावरले आणि संभाव्य उलटफेर टळला. १४८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानची अवस्था १८ व्या षटकापर्यंत ७ बाद ११९ अशी बिकट झाली होती, मात्र अखेरच्या क्षणी यश मिळाले अन्यथा पहिल्याच सामन्यात संघात पराभवाला सामोर जावे लागले असते.प्रथम फलंदाजी करताना नेदरलँडचा संघ १९.५ षटकांत १४७ धावांत गारद झाला. एकेकाळी त्यांची स्थिती ३ बाद १०५ अशी भक्कम होती, मात्र पुढच्या ४२ धावांत त्यांनी उरलेले ७ गडी गमावले.मॅक्स ओडॉड (५) स्वस्तात बाद झाला.मायकल लेविट (२४) याला बाबर आझम आणि शाहीन आफ्रिदीच्या उत्कृष्ट ताळमेळाने सीमारेषेवर झेलबाद केले.कर्णधार स्कॉट एडवर्ड्सने सर्वाधिक ३७ धावा (२९ चेंडू) केल्या. पाकिस्तानकडून सलमान मिर्झा आणि अबरार अहमद यांनी भेदक गोलंदाजी करत नेदरलँडला मोठी धावसंख्या उभारण्यापासून रोखले. विश्वचषक स्पर्धेच्या पहिल्याच सामन्यात पाकिस्तानची सुरुवातही खराब झाली. सॅम अयुब (२४) आणि कर्णधार सलमान आगा (१२ धावांवर तंबूत परतले. फरहानने ३१ चेंडूत ४ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने ४७ धावांची महत्त्वाची खेळी केली. पाठोपाठ उस्मान खान (०), बाबर आझम (१५), मोहम्मद नवाज (६) आणि शादाब खान (८) बाद झाल्याने पाकिस्तानचा संघ अडचणीत सापडला होता.१८ व्या षटकापर्यंत नेदरलँडचे पारडे जड होते, मात्र फहीम अशरफला मिळालेल्या जीवदानाचा फायदा घेत पाकिस्तानने १९ व्या षटकात सामना खिशात घातला.

### पहिल्याच सामन्यात बाबर-शाहीनने पकडलेला झेल वादाच्या भोवऱ्यात

टी वर्ल्डकप २०२६ स्पर्धेतील पाकिस्तान नेदरलँड सामना चर्चेत राहिला. कारण नेदरलँडविरूद्धचा विजय पाकिस्तानला काही सहज मिळाला नाही. यासाठी शेवटच्या षटकापर्यंत झुंज द्यावी लागली. १९ व्या षटकात फहीमने २४ धावा ठोकल्याने विजयाचा मार्ग सुकर झाला. पण या सामन्यातील नेदरलँडच्या डावात एक झेल पकडला गेला. हा झेल सध्या सोशल मीडियावर चर्चेचा केंद्रबिंदु ठरला आहे. त्याला कारणही तसंच आहे. कारण आयसीसीने जून २०२५ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये रिले झेलबाबत एक नियम जाहीर केला होता. तेव्हापासून रिले झेल घेताना काळजी घ्यावी लागत आहे. पण हा नियम पाकिस्तानला लागू होत नाही का? असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे.पाकिस्तानकडून पाचवं षटक टाकण्यासाठी मोहम्मद नवाज आला होता. त्या षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर मायकल लेविटने उत्तुंग फटका मारला. पण बाबर आझम लाँग ऑफवरून धावत आला आणि त्याने झेल पकडला.

## अनाया बांगर थायलंडमध्ये आणखी एक सर्जरी करून घेणार



**नवी दिल्ली : दि.७ वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचे माजी फलंदाजी प्रशिक्षक संजय बांगर यांची ट्रान्सजेंडर मुलगी अनाया बांगर अखेर ज्या क्षणाची वाट पाहत होती, तो क्षण तिच्या आयुष्यात आला आहे. गेल्या पाच वर्षांपासून तिला जे करायचे होते, त्यासाठी तिला तिच्या वडिलांचा आणि कुटुंबाचा पाठिंबा मिळाला आहे.जन्मतः मुलगा असलेला आर्यन शस्त्रक्रिया करून मुलगी बनली. अनाया बांगर म्हणून ओळख मिळाल्याने गेल्या दोन वर्षांपासून ती चर्चेत आहे. तिच्या आणि संजय बांगर यांच्याबद्दल अनेकदा प्रश्न उपस्थित झाले. पण या काळात वडील गप्प राहिले. आता मात्र ते अनायाला पाठिंबा देताना दिसत आहेत.एका मुलाखतीत अनायाने खुलासा केला की, तिचे वडील संजय बांगर आणि कुटुंबाकडून मिळालेल्या पाठिंब्यामुळे आणि आर्थिक मदतीनंतर तिने एक विशेष शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. या वर्षी मार्चमध्ये अनायाची जेंडर अफर्मेशन सर्जरी होणार आहे.अनाया मार्च २०२६ मध्ये थायलंडमधील एका क्लिनिकमध्ये ही शस्त्रक्रिया करून घेणार आहे. या प्रक्रियेसाठी तिला तिथे सुमारे महिनाभर राहावे लागणार आहे. गेली पाच वर्षे अनाया या शस्त्रक्रियेसाठी घरच्यांच्या पाठिंब्याची वाट पाहत होती. अखेर आता तिला हिरवा कंदील मिळाला आहे.शस्त्रक्रिया प्रामुख्याने जेंडर डिस्फोरिया दूर करण्यासाठी केली जाते. जेव्हा एखाद्या व्यक्तीला त्यांच्या जन्मतः असलेल्या लिंगाऐवजी दुसऱ्या लिंगाची ओळख अधिक जवळची वाटते, तेव्हा होणारा मानसिक ताण कमी करण्यासाठी ही शारीरिक बदल करणारी शस्त्रक्रिया केली जाते.

## महत्त्वाचे

### खेळाडूला हृदयविकाराचा झटका, मैदानावरच मृत्यू

**नवी दिल्ली** :आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आजपासून आयसीसी टी विश्वचषकाला सुरूवात होणार आहे. भारत आणि श्रीलंका या दोन देशांमध्ये या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. हा सामना भारताचा वानखेडे मैदानावर होणार आहे. भारतामध्ये प्रत्येक घरामध्ये एक क्रिकेटर असतो. क्रिकेट हे चाहत्यांसाठी मनोरंजनाचे साधन आहे.

आंतरराष्ट्रीय क्रिकेट व्यतिरिक्त, रस्त्यावरील आणि स्थानिक स्पर्धांमध्ये खेळाडूंना पाहण्यासाठी हजारो चाहते जमतात. अलिकडेच एका स्थानिक स्पर्धेदरम्यान एक दुःखद घटना घडली, ज्यामुळे सर्वांनाच धक्का बसला. महाराष्ट्रातील एका स्थानिक स्पर्धेत लाईव्ह सामन्यादरम्यान, फलंदाजी करताना एका खेळाडूला अचानक हृदयविकाराचा झटका आला. त्याचा जागीच मृत्यू झाला. सामना थेट प्रसारित होत होता आणि आता या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

### मंधानाच्या आईने पलाश मुच्छलबाबत केलेली पोस्ट चर्चेत!

**नवी दिल्ली** :वुमन्स प्रीमियर लीग २०२६ स्पर्धेच्या अंतिम फेरीत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने दिल्ली कॅपिटल्सचा धुव्वा उडवला. कर्णधार स्मृती मंधानाच्या नेतृत्वात आरसीबीने दुसऱ्यांदा जेतेपद मिळवलं. ५ फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडलेल्या अंतिम फेरीत दिल्ली कॅपिटल्सने आरसीबीसमोर विजयासाठी २०४ धावांचं आव्हान ठेवलं होतं. खरं तर हे आव्हान खूपच कठीण होतं. पण कर्णधार स्मृती मंधाने धैर्याने सामना करत विजयश्री खेचून आणला. स्मृतीने या सामन्यात ४१ चेंडूत ८७ धावांची खेळी केली. त्यामुळे या विजयासाठी तिला सामनावीराच्या पुरस्काराने गौरविण्यात आलं. सर्व काही कर्णधार स्मृती आणि आरसीबी संघाच्या मनासारखं झालं. मग कुटुंबिय या विजयाच्या आनंदात मागे कसे राहतील. स्मृती मंधानाच्या आईने एक मीम इंस्टाग्रामवर रिपोस्ट केलं होतं. त्यामुळे स्मृती मंधाना आणि पलाश मुच्छल पुन्हा एकदा चर्चेत आले. त्यानंतर खूपच चर्चा होऊ लागल्याने अखेर स्मृतीच्या आईने पोस्ट डिलिट केली.

## विराट कोहलीच्या आरसीबीची जर्सी बदलली



**नवी दिल्ली : दि.७ वृत्तसंस्था**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू गेल्या वर्षभरापासून मैदानावर दमदार कामगिरी करताना दिसत आहे. गेल्या वर्षी, फ्रँचायझीने पहिल्यांदाच आयपीएलचे विजेतेपद जिंकले. दरम्यान, २०२६ हंगामात, महिला संघ सातत्याने चांगली कामगिरी करत आहे आणि दुसऱ्यांदा अंतिम फेरीत पोहोचला आहे. यामुळे महिला संघाला दुसऱ्यांदा चॅम्पियन बनण्याची संधी मिळाली आहे. तशातच पुरुष संघ २०२६ स्पर्धेसाठी सज्ज होत आहे. जेतेपद आपल्याकडे कायम राखण्याचा त्यांचा प्रयत्न असणार आहे. याचदरम्यान, फ्रँचायझीने नवीन हंगामासाठी नवीन जर्सी लाँच केली आहे, ज्यात एक महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे.२६ मार्चपासून सुरू होणाऱ्या २०२६साठी संघ पहिल्यांदाच गतविजेता संघ म्हणून स्पर्धेत उतरणार आहे. नवीन हंगामासाठी बेंगळुरूच्या संघातील बहुतांश खेळाडू कायम आहेत. पण ते सर्व खेळाडू एका नवीन लूकमध्ये दिसतील. हा नवीन लूक आरसीबीच्या नवीन जर्सीमध्ये दिसून येईल. आरसीबीने सोशल मीडिया व्हिडिओ पोस्टमध्ये त्यांच्या जर्सीचा लूक रिव्हिल केला आहे. आरसीबीचे खेळाडू यंदा त्यांची त्यांची नवी जर्सी परिधान करतील ज्यात छातीजवळ लोगोच्या वरच्या बाजूला एक सोनेरी स्टार मार्क करण्यात आला आहे. या नवीन जर्सीमध्ये आरसीबीच्या लोगोच्या वर असलेला एक स्टार म्हणजे त्यांच्या पहिल्या विजेतेपदाचे प्रतीक आहे. दरम्यान, ने गेल्या वर्षी चे विजेतेपद जिंकल्यानंतर एका विजयी रॅलीचे आयोजन केले होते.

## अंडर-१९ वर्ल्ड कप जिंकणाऱ्या भारतीय संघासाठी बीसीसीआयने जाहीर केले बक्षीस




**नवी दिल्ली : दि.७ वृत्तसंस्था**

बीसीसीआयने अंडर-१९ विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय संघासाठी ७.५ कोटी रुपयांच्या रोख बक्षिसाची घोषणा केली आहे. फायनलमध्ये भारताने इंग्लंडवर १०० धावांनी मात करत सहाव्यांदा हा किताब जिंकला आणि देशभरात आनंदाच वातावरण पाहायला मिळालं. चे सचिव देवजित सैकिया यांनी सांगितलं की, ''इंग्लंडला वैभवच्या या स्फोटक खेळीमुळे भारताला मोठी धावसंख्या उभारता आली. ने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात मुख्य प्रशिक्षक हृषिकेश कानिटकर आणि त्यांच्या सहकारी स्टाफचं विशेष कौतुक करण्यात आलं आहे. तसंच बोर्डाच्या 'सेंटर ऑफ एक्सलन्स'चे क्रिकेट प्रमुख व्हीव्हीएस लक्ष्मणच्या मार्गदर्शनाचाही उल्लेख करण्यात आला आहे. त्यांच्या देखरेखीखाली खेळाडू तयार झाले, असं ने म्हटलं आहे.दरम्यान, अध्यक्ष मिथुन मनहास यांनी संघाचं अभिनंदन करत सांगितलं, ''सहाव्यांदा अंडर-१९ विश्वचषक जिंकणं ही अभिमानाची गोष्ट आहे. संपूर्ण स्पर्धेत संघाने आत्मविश्वास आणि जिद्द दाखवली. पुरुष आणि महिला दोन्ही अंडर-१९ विश्वचषक जिंकणं भारतासाठी मोठं यश आहे.''

### आता विना तारण मिळणार २० लाखांपर्यंत कर्ज

**नवी दिल्ली:** भारतीय रिझर्व्ह बँकेने आपल्या पतधोरण पुनरावलोकनात सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्राला मोठा दिलासा दिला आहे. उद्योजकांसाठी विना-तारण कर्जाची मर्यादा १० लाख रुपयांवरून वाढवून २० लाख रुपये केली जाईल, असे आरबीआय गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी जाहीर केले.लहान व्यवसायांना सुलभ आणि स्वस्त बँकिंग कर्ज उपलब्ध करून देणे हा या निर्णयाचा मुख्य उद्देश आहे. याशिवाय, रिअल इस्टेट क्षेत्रातील वित्तपुरवठ्याला चालना देण्यासाठी बँकांना काही नियमांच्या अधीन राहून ला कर्ज देण्याची परवानगी देण्याचा प्रस्तावही मांडण्यात आला आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने आज (दि. ६) चलनविषयक धोरण जाहीर केले. आरबीआय गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या अध्यक्षतेखालील चलनविषयक धोरण समितीची ४ ते ६ फेब्रुवारी दरम्यान २०२६ या आर्थिक वर्षासाठी शेवटची द्वैमासिक बैठक पार पडली. सध्या विना-तारण कर्जाची मर्यादा १० लाख रुपये आहे. म्हणजेच, बँका सूक्ष्म आणि लघु उद्योगांना कोणतीही हमी न घेता १० लाख रुपयांपर्यंत कर्ज देऊ शकतात. ज्या लहान व्यावसायिकांकडे कर्जासाठी तारण काहीही नसते, त्यांना मदत करणे हा या योजनेचा हेतू आहे. साठी वाढीव कर्ज मर्यादा १ एप्रिल २०२६ रोजी किंवा त्यानंतर मंजूर किंवा नूतनीकरण केलेल्या सर्व लहान कर्जदारांच्या कर्जावर लागू होईल. आपला व्यवसाय वाढवू इच्छिणाऱ्या व्यावसायिकांना याचा मोठा फायदा होणार आहे.

# अमेरिकन बाजारपेठेत भारतीय मालाला सुकाळ!

## औषधे, हिरे आणि कपडे होणार स्वस्त






**नवी दिल्ली : दि.७ वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यातील 'मदर ऑफ ऑल डील्स' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या व्यापार कराराचे तपशील आता समोर आले आहेत. या करारामुळे केवळ व्यापारी संबंधच सुधारले नाहीत, तर अमेरिकन ग्राहकांच्या खिशाला मिळणारा दिलासा आणि भारतीय निर्यातदारांचा नफा यात मोठी वाढ होणार आहे. विशेषतः ज्या वस्तूंवर पूर्वी ५०% पर्यंत कर होता, त्या आता १८% वर आल्या आहेत, तर काही अति-महत्त्वाच्या वस्तूंना चक्क 'शून्य शुल्क' प्रवेश मिळाला आहे.भारतात तयार होणाऱ्या एरोस्पेस आणि विमानांच्या भागांनाही या कराराचा मोठा फायदा झाला आहे. 'नॅशनल सिक्युरिटी'च्या नावाखाली यापूर्वी लादलेले निर्बंध आणि शुल्क आता हटवण्यात आले आहेत. यामुळे बोईंग आणि एअरबस सारख्या कंपन्यांना लागणारे सुटे भाग आता भारतातून स्वस्तात अमेरिकेला पुरवले जातील, ज्यामुळे भारताच्या उत्पादन क्षेत्राला मोठी चालना मिळेल.सुरत आणि मुंबईतील हिरे उद्योगासाठी हा करार म्हणजे लॉटरीच आहे. पॉलिश केलेले हिरे आणि मौल्यवान खड्यांना आता अमेरिकेत शून्य टक्के शुल्काने प्रवेश मिळेल. वस्तूंवर शून्य शुल्क नाही, अशा वस्त्रोद्योग, चामड्याच्या वस्तू आणि प्लास्टिक उत्पादनांवर आता फक्त १८% कर लागेल. विशेष म्हणजे, चीनच्या मालावर अमेरिकेत अजूनही ३० ते ३५% कर आहे. यामुळे भारतीय माल चिनी मालापेक्षाही स्वस्त होणार असून अमेरिकन ग्राहक आता 'मेड इन इंडिया' कडे वळतील, असा विश्वास वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांनी व्यक्त केला आहे.

## महिंद्रा समूहाची महाराष्ट्रात १५ हजार कोटींची गुंतवणूक

**नवी दिल्ली : दि.७ वृत्तसंस्था**




महिंद्रा उद्योग समूहाने पुढील दहा वर्षात महाराष्ट्रात १५,००० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याची घोषणा केली आहे. या गुंतवणुकीतून महिंद्रा समूह नागपूर येथे वाहन आणि ट्रॅक्टर निर्मितीचा मोठा प्रकल्प उभारणार आहे. त्याचबरोबर इगतपुरी- नाशिक येथील प्रकल्पाचे विस्तारीकरण करणार आहेत.महिंद्रा समूहाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, समूह नाशिक -इगतपुरी येथील प्रकल्पासाठी लवकरच जमिनीचे अधिग्रहण करणार आहे. या ठिकाणी वाहनांच्या इंजिनाची मोठ्या प्रमाणात निर्मिती केली जाणार आहे. महाराष्ट्रातील तीन ठिकाणी हा समूह जमिन अधिग्रहण करणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.नागपूर येथील प्रकल्प २०२८ पासून ट्रॅक्टर आणि वाहनांची निर्मिती करेल. हा प्रकल्प महिंद्राचा सर्वात मोठा प्रकल्प असणार आहे. हा प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर वर्षाला येथे पाच लाख वाहनांची आणि एक लाख ट्रॅक्टरची निर्मिती होऊ शकेल असे सांगण्यात आले. महिंद्रा अँड महिंद्रा कंपनीचे कार्यकारी संचालक आणि वाहन व कृषी विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश जेजुरीकर यांनी सांगितले की, नागपूरमधील प्रकल्प एकात्मिक स्वरूपाचा असणार आहे.नवी दिल्ली येथे ॲडव्हेंटेज विदर्भ नावाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. या कार्यक्रमात बोलताना राजेश जेजुरीकर यांनी ही माहिती दिली. महाराष्ट्रातील वातावरण आणि कुशल मनुष्यबळ मोठ्या उद्योगांच्या वाढीसाठी पूरक आहे. त्यामुळेच महिंद्रा कंपनीने आपला सर्वात मोठा प्रकल्प नागपूर येथे सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.त्यामुळे नागपूर आणि परिसरात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल आणि या भागाचा विकास होण्यास मदत होईल असे फडणवीस यांनी सांगितले. या कार्यक्रमात इतरही देशातील आणि परदेशातील कंपन्यांनी सहभाग नोंदविला असून त्यांनीही या भागांमध्ये गुंतवणूक करण्याची घोषणा केली असल्याचे सांगण्यात आले.

## चांदीचे भाव ८ दिवसांत निम्म्यावर; सोन्यातही मोठी घसरण

**नवी दिल्ली : दि.७ वृत्तसंस्था**




गेल्या काही दिवसांत सराफा बाजारात प्रचंड उलथापालथ झाली आहे.२०२५ मध्ये सोनं आणि चांदीने गुंतवणूकदारांना जबरदस्त परतावा दिला होता. सोन्याने सुमारे ७० टक्के, तर चांदीने तब्बल १७० टक्क्यांपर्यंत रिटर्न दिला होता. त्यामुळे अनेकांना वाटत होतं की भाव आणखीन वाढतील. मात्र २०२६च्या सुरुवातीलाच चित्र पूर्ण बदललं.२९ जानेवारी २०२६ रोजी सोनं-चांदी ऐतिहासिक उच्चांकी पातळीवर होतं. वर सोन्याचा भाव जवळपास १.९३ लाख रुपये प्रति १० ग्रॅमपर्यंत पोहोचला होता, तर चांदी थेट ४.२० लाख रुपये प्रतिकिलोवर गेली होती. कॉपरही १४८० रुपयांच्या आसपास ट्रेड करत होता. त्या वेळी अनेक गुंतवणूकदारांना वाटलं होतं की, आता भाव आणखी वाढतील.

पण ३० जानेवारीपासून बाजाराने अचानक यू-टर्न घेतला. सलग तीन दिवस जोरदार घसरण झाली. २ फेब्रुवारीला थोडी वाढ झाली, पण ती फार काळ टिकली नाही. पुन्हा भाव खाली येऊ लागले.फक्त आठ दिवसांत चित्र पूर्ण बदललं. उच्चांकावरून सोनं १.९३ लाखांवरून घसरत साधारण १.४० लाखांच्या आसपास आलं. चांदीची अवस्था तर आणखी वाईट झाली. चांदी ४.२० लाखांवरून थेट २.२५ लाखांपर्यंत घसरली. म्हणजे चांदी जवळपास अर्ध्यावर आली.

शुक्रवारी बाजार बंद होताना सोनं सुमारे १.५५ लाख रुपये आणि चांदी २.४९ लाख रुपये प्रतिकिलो होती. टक्केवारीत पाहिलं तर सोन्यात जवळपास २३ टक्के, तर चांदीत तब्बल ४६ टक्क्यांची घसरण झाली आहे. कॉपरमध्येही सुमारे १८ टक्क्यांची घसरण झाली आहे. ज्यांनी जास्त भाव असताना सोन्या चांदीची खरेदी केली होती, त्यांच्या पोर्टफोलिओला मोठा धक्का बसला आहे.यामागे दोन मोठी कारणं सांगितली जात आहेत. पहिलं म्हणजे नफेखोरी. भाव प्रचंड वाढल्यानंतर जुन्या गुंतवणूकदारांनी मोठ्या प्रमाणावर विक्री सुरू केली. त्यामुळे बाजारावर दबाव आला. दुसरं आणि अधिक महत्त्वाचं कारण म्हणजे आंतरराष्ट्रीय बाजारात अमेरिकन डॉलर मजबूत होणं. डॉलर मजबूत झाला की लोक डॉलरमध्ये गुंतवणूक करतात. त्यामुळे सोन्या चांदीची मागणी कमी होते.याशिवाय मध्ये नव्या प्रमुखाची नियुक्ती, तसेच कडून ट्रेडिंग मार्जिन वाढवण्याचा निर्णय, या सगळ्यांमुळे बाजारात विक्रीचा जोर वाढला.

## थोडक्यात

### मागेल त्याला गटई स्टॉल

**नागपूर :** अनुसूचित जाती प्रवर्गातील चर्मकार समाजातील (चर्मकार, ढोर, होलार, मोची इत्यादी) बांधवांचे जीवनमान उंचावण्यासाठी आणि त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल उपलब्ध करण्याची योजना राबविली जाते. ही योजना आता समाज कल्याण आयुक्तांच्या स्तरावर राबविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. या योजनेच्या निकषांतही बदल करण्यात आले असून, नागपूर जिल्ह्यात 'मागेल त्याला गटई स्टॉल'या तत्त्वावर पात्र अर्जदारांना या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे.
सदर योजनेच्या लाभासाठी सहायक आयुक्त समाज कल्याण विभाग नागपूर येथे संपर्क साधावा, असे आवाहन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

### वृद्धाचे एक लाख पळविले

**नागपूर :** मेडिकल चौकातील स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेत पैसे काढण्यासाठी गेलेल्या ६८ वर्षीय वृद्धाची नजर चुकावून अज्ञात चोरट्याने एक लाख रुपयांची रोकड चोरली ही घटना ६ फेब्रुवारी रोजी घडली आहे. माहितीनुसार,पारस महाजन राम ( बालाजी नगर, अजनी) हे शुक्रवारी सकाळी ११ वाजताच्या सुमारास एस.बी.आय. बँक, मेडिकल चौक येथे गेले होते पारस राम यांनी बँकेतून चेकद्वारे एक लाख रुपये रोख काढले आणि ते आपल्या जवळील पिशवीत ठेवले. त्यानंतर ते पासबुक प्रिंटिंग मशीनजवळ रांगेत उभे राहिले. पासबुक प्रिंट झाल्यावर त्यांना पिशवी खालून फाटलेली दिसली. पिशवीतील एक लाख रुपयांची रोकड गायब झाली होती. गर्दीचा फायदा घेऊन चोरट्याने पिशवी ब्लेडने फाडून ही चोरी केली असावी असा संशय आहे.

### मिनी ट्रॅक्टरसाठी अर्ज आमंत्रित

**नागपूर :** सामाजिक न्याय विभागामार्फत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना ९० टक्के अनुदानावर मिनी ट्रॅक्टर व उपसाधने पुरविण्याची योजना राबविण्यात येत आहे. ९ ते १८ अश्वशक्तीच्या या ट्रॅक्टरसाठी इच्छुक गटांनी १५ फेब्रुवारीपर्यंत अर्ज करणे आवश्यक आहे. अटीनुसार, बचत गटातील किमान ८० टक्के सदस्य अनुसूचित जातीचे व महाराष्ट्राचे रहिवासी असावेत. ५ लाख रुपयांच्या खरेदी मर्यादेत गटाने १० टक्के स्वहिस्सा भरल्यास शासनाकडून कमाल ३.१५ लाख रुपयांपर्यंत अनुदान दिले जाईल. पात्र गटांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन विभागाने केले आहे.

# 'अॅडव्हान्टेज विदर्भ'मध्ये १०,८८० कोटींचे करार

## सहा हजारांपेक्षा जास्त रोजगारनिर्मिती आणि प्रादेशिक विकासाला बळकटी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ७ : केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या 'अॅडव्हान्टेज विदर्भ २०२६ - खासदार औद्योगिक महोत्सवा'च्या दुसऱ्या दिवशी विदर्भाच्या विकासाला नवी गती देणारे तीन महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आले. या ऐतिहासिक टप्प्यामुळे विदर्भ हे गुंतवणुकीचे प्रमुख केंद्र म्हणून जागतिक नकाशावर ठळकपणे समोर आले आहे.**



### गुंतवणुकीचा लेखाजोखा

**या महोत्सवात गॅलेक्सी सोलर एनर्जीच्या १०,०८० कोटींच्या सौर प्रकल्पासह, केअर ग्रुपचे ६०० कोटींचे मल्टी-स्पेशालिटी रुग्णालय आणि जी.आर. इन्फ्राप्रोजेक्ट्सचा २०० कोटींचा टॉवर उत्पादन प्रकल्प विदर्भात साकारणार आहे. या माध्यमातून एकूण ६ हजारांहून अधिक थेट रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून, स्वच्छ ऊर्जा आणि प्रगत आरोग्यसेवेच्या क्षेत्रात विदर्भ आघाडी घेणार आहे.**

या महोत्सवात सौर ऊर्जा, पायाभूत सुविधा आणि आरोग्य क्षेत्रात मोठ्या गुंतवणुकीवर शिक्कामोर्तब झाले. गॅलेक्सी सोलर एनर्जी प्रा. लिमिटेडने नागपूर जिल्ह्यात सौर आणि बॅटरी ऊर्जा साठवणूक प्रणाली प्रकल्प उभारण्यासाठी राज्य सरकारसोबत १०,०८० कोटी रुपयांचा करार केला आहे. तसेच, जी.आर. इन्फ्राप्रोजेक्ट्स लिमिटेड नागपूरमध्ये २०० कोटी रुपये गुंतवून टॉवर उत्पादन प्रकल्प स्थापन करणार आहे. आरोग्य क्षेत्रातही केअर ग्रुपने महा-मेट्रोसोबत कस्तुरचंद पार्क मेट्रो स्टेशनजवळ पीपीपी तत्त्वावर ६०० कोटींहून अधिक गुंतवणूक करून ३५० खाटांचे मल्टी-स्पेशालिटी रुग्णालय उभारण्यासाठी भागीदारी केली आहे. या भागीदारीबद्दल केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उद्योग भागीदारांचे आभार मानले. या प्रकल्पांमुळे प्रादेशिक पुरवठा साखळी मजबूत होईल आणि सुमारे ६ हजारांपेक्षा जास्त रोजगाराच्या संधी निर्माण होतील.

### वाहनाच्या धडकेत इसमाचा मृत्यू

**नागपूर, दि. ७:** गणेशपेठ ठाण्याच्या हद्दीतील बैद्यनाथ चौक ते मध्यवर्ती बसस्थानक रोडवर अज्ञात वाहनाने धडक दिल्यामुळे ३५ वर्षीय इसमाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. माहितीनुसार, बैद्यनाथ चौक ते मध्यवर्ती बसस्थानक रोड ५ फेब्रुवारीच्या सायंकाळी ४.३० वाजताच्या सुमारास रस्ता ओलांडताना किंवा पायी जात असताना अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली. नागरिकांनी त्याला गंभीर जखमी व बेशुद्ध अवस्थेत तातडीने मेडिकल हॉस्पिटलमध्ये नेले डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. मृतकाचे वय अंदाजे ३५ वर्षे असून, मजबूत शरीरयष्टी, रंग सावळा, चेहरा गोल आहे उंची अंदाजे ५ फूट ६ इंच, तर काळे केस, दाढी-मिशा विरळ आहे अंगात काळ्या रंगाचा फुल टी-शर्ट आणि निळ्या रंगाची जीन्स पँट आहे याशिवाय दोन्ही हातांवर 'जितेंद्र' असे नाव गोंदलेले आहे. या वर्णनाचा व्यक्ती कोणाच्या ओळखीचा असल्यास किंवा कोणाचे नातेवाईक असल्यास त्यांनी तातडीने गणेशपेठ ठाणे येथे संपर्क साधावा याप्रकरणाचा तपास पोलिस उपनिरीक्षक विक्रम सोनवणे (९०२२१६८९६३) करत आहे.



# पोलिस मुख्यालयात 'आरओ प्लाट'ची उभारणी

## पोलीस अधीक्षक हर्ष ए. पोद्दार यांच्या हस्ते शुभारंभ

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ७ :** पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांना पिण्याचे स्वच्छ व शुद्ध पाणी मिळावे, या उद्देशाने कामठी रोड येथील नागपूर ग्रामीण पोलीस मुख्यालयात 'आरओ वॉटर प्लांट' उभारण्यात आला आहे. या प्रकल्पाचा शुभारंभ पोलीस अधीक्षक हर्ष ए. पोद्दार यांच्या हस्ते नुकताच करण्यात आला.

या अत्याधुनिक प्रकल्पाची क्षमता प्रतितास एक हजार लिटर पाणी शुद्ध करण्याची आहे. पोलीस दलातील कर्मचारी अनेकदा दीर्घकाळ मैदानी कर्तव्यावर असतात; आता त्यांना मुख्यालयातूनच स्वतःसोबत शुद्ध पाणी नेता येईल, ज्यामुळे त्यांच्या आरोग्याची गुणवत्ता सुधारण्यास मोठी मदत होईल. या उद्घाटन प्रसंगी अपर पोलीस अधीक्षक अनिल म्हस्के, गृह पोलीस उपअधीक्षक यांच्यासह इतर वरिष्ठ पोलीस अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेणारा हा उपक्रम पोलीस दलासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

## उद्योग सोहळा ...




**नागपूर: राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ परिसरात खासदार औद्योगिक महोत्सव आयोजित केला आहे. यात सरकारी आणि खाजगी क्षेत्रातील विविध कंपन्यांनी स्टॉल उभारले आहेत. सोबत विदेशी कंपन्यांनीही यात सहभाग घेतला आहे.**

# कुष्ठरोगाच्या लक्षणांकडे दुर्लक्ष न करता त्वरित उपचार घ्या

## मनपा आरोग्य विभागाद्वारे कुष्ठरोग जनजागृती व शोध अभियान सुरू

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ७ :** शरीरावरील फिकट, पिवळसर किंवा लालसर बधीर चट्टा, अंगावरील गाठी, कानाच्या जाड झालेल्या पाळ्या आणि स्नायूंचा अशक्तपणा यांसारख्या लक्षणांकडे दुर्लक्ष करू नका, कारण ते कुष्ठरोगाचे संकेत असू शकतात. या आजाराचे वेळीच निदान व्हावे यासाठी जवळच्या मनपा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टरांशी संपर्क साधून नि:शुल्क उपचार घ्यावेत, असे आवाहन नागपूर महानगरपालिकेद्वारे करण्यात आले आहे.

सध्या नागपूर महानगरपालिकेद्वारे 'स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान' आणि 'कुसुम' (कुष्ठरुग्ण सुरक्षित महाराष्ट्र) शोध अभियान राबविले जात आहे. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी व अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभाग ही मोहीम राबवत आहे. कुष्ठरोग हा 'एम. लेप्रा' नावाच्या जीवाणूमुळे होतो, जो त्वचा आणि मज्जासंस्थेवर परिणाम करतो. योग्य वेळी उपचार न मिळाल्यास शरीरात विकृती निर्माण होऊ शकते. मात्र, एम.डी.टी.या औषधोपचारामुळे हा आजार पूर्णपणे बरा होतो. मनपाच्या आकडेवारीनुसार, एप्रिल ते डिसेंबर २०२५ या काळात २१२ नवीन कुष्ठरुग्ण आढळले आहेत. यामध्ये ४ लहान मुले आणि ११ विकृती असलेल्या रुग्णांचा समावेश आहे. आरोग्य विभागाचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दिपक सेलोकर यांनी माहिती दिली की, एक चट्टा असल्यास ६ महिने आणि जास्त चट्टे असल्यास १२ महिने नियमित औषधोपचार घ्यावा लागतो. हा संसर्गजन्य आजार असल्याने रुग्णाच्या संपर्कातील व्यक्तींनीही प्रतिबंधात्मक औषधे घेणे आवश्यक आहे. ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत राबविल्या जाणाऱ्या या विशेष मोहिमेद्वारे घरोघरी जाऊन संशयित रुग्णांचा शोध घेतला जात आहे. लवकर निदान झाल्यास संभाव्य अपंगत्व टाळता येते. त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही भीतीपोटी लक्षणे लपवू नयेत, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.




# 'अॅडव्हान्टेज विदर्भ'मध्ये विद्यापीठ स्टॉल्सचे आकर्षण

## कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांच्या हस्ते उद्घाटन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ७ :** असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट (एआयडी) तर्फे आयोजित 'अॅडव्हांटेज विदर्भ-२०२६ खासदार औद्योगिक महोत्सवात' राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा स्टॉल आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. विद्यापीठाच्या महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परिसरातील मैदानावर आयोजित या महोत्सवाचे उद्घाटन माननीय कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांच्या हस्ते शुक्रवारी करण्यात आले.



तीन दिवस चालणाऱ्या या महोत्सवात देश-विदेशातील नामवंत कंपन्या सहभागी झाल्या आहेत. विद्यार्थी आणि नागरिकांना विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांची व नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती मिळावी, हा या स्टॉल्सचा मुख्य उद्देश आहे. यामध्ये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, औषधी निर्माणशास्त्र, भूगर्भशास्त्र, प्राणीशास्त्र, वाणिज्य व व्यवस्थापन, आणि सेंटर फॉर सेरिकल्चर यांसारख्या विविध विभागांनी आपल्या नाविन्यपूर्ण प्रकल्पांचे सादरीकरण केले आहे. या महोत्सवाचे विशेष महत्त्व म्हणजे, आंतरराष्ट्रीय कंपन्यांसोबत कौशल्यपूरक आणि रोजगारक्षम अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत विद्यापीठ चर्चा व सामंजस्य करार करणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांना उद्योगांच्या गरजेनुसार कुशल मनुष्यबळ म्हणून तयार होण्यास मदत होईल. उद्घाटन प्रसंगी कुलसचिव डॉ. राजू हिवसे, वित्त व लेखा अधिकारी श्री. हरीश पालीवाल, अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, डॉ. मेधा कानेटकर, डॉ. उमेश पलीकुंडवार, संचालक डॉ. नंदकिशोर करडे, डॉ. अभय देशमुख, डॉ. समित माहोरे उपस्थित होते. तसेच विभाग प्रमुख डॉ. गणेश केदार, डॉ. कीर्तीकुमार रणदिवे, डॉ. संजय ढोबळे, डॉ. राजेंद्र काकडे, डॉ. नितीन डोंगरदिवे, डॉ. वर्षा धुर्वे, डॉ. राहुल खराबे, आणि डॉ. भूषण महाजन, डॉ. सुरेश रैना यांच्यासह अनेक शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे शैक्षणिक आणि औद्योगिक क्षेत्रातील दरी कमी होऊन विद्यार्थ्यांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# राष्ट्रीय घरगुती उत्पन्न सर्वेक्षणासंदर्भात नागपूर एनएसओतर्फे प्रशिक्षण

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ७ :** आगामी राष्ट्रीय घरगुती उत्पन्न सर्वेक्षणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय (एनएसओ), आंचलिक कार्यालय नागपूरद्वारे एकदिवसीय प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाला नागपूरचे उपमहासंचालक श्रीनिवास उप्पला आणि कोलकाता येथील उपमहासंचालक अमिताभ शाहा प्रामुख्याने उपस्थित होते.




अमिताभ शाहा यांनी नमूद केले की, उत्पन्नासारख्या संवेदनशील विषयावरील सर्वेक्षणात विश्वासार्हता टिकवणे हे क्षेत्रीय अधिकाऱ्यांचे मुख्य काम आहे. प्रतिसादकर्त्यांना गोपनीयतेची हमी देऊन आव्हानांवर मात करणे आवश्यक आहे. एनएसओ दिल्लीच्या अपर महासंचालक सुश्री सुनीता भास्कर यांनी आभासी माध्यमातून मार्गदर्शन करताना सांगितले की, धोरणनिर्मात्यांसाठी या सर्वेक्षणाचे निष्कर्ष अत्यंत महत्त्वाचे आहेत. क्षेत्रीय कामकाजात प्रशिक्षणातील ज्ञानाचा वापर करून स्थानिक प्रशासनाशी समन्वय राखण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. प्रास्ताविकात श्रीनिवास उप्पला यांनी देशाच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी या सर्वेक्षणाची गरज स्पष्ट केली. कार्यक्रमाला संचालक रंगा श्रीनिवासुलु यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन कनिष्ठ सांख्यिकी अधिकारी प्रियांक गौड यांनी केले, तर संचालक एल. एम. जडेजा यांनी आभार मानले. सर्वेक्षणाचे यश क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असल्याचा सूर या प्रशिक्षणातून उमटला.

# मनपा विद्यार्थ्यांचा चिटणवीस सेंटरमध्ये 'कारनामा'

## आकांक्षा फाउंडेशनच्या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांचा जागर; कला आणि विज्ञानाचा अविष्कार

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ७ : नागपूर महानगरपालिकेच्या विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना आणि सृजनशीलतेला व्यासपीठ मिळवून देण्यासाठी, आकांक्षा फाउंडेशनतर्फे सिव्हिल लाईन्स येथील चिटणवीस सेंटर येथे आज (ता.७)'कारनामा २०२६' या विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आले.**




या महोत्सवात विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या कलागुणांचा आविष्कार घडविला. यावेळी मनपाच्या अतिरिक्त आयुक्त श्रीमती वैष्णवी बी. यांनी 'कारनामा २०२६' ला भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी स्वतः काही प्रयोगांची प्रात्यक्षिके करून पाहिली आणि विद्यार्थ्यांच्या कौशल्याचे कौतुक केले. यावेळी आकांक्षा फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी सौरभ तनेजा, संचालक सोमसूर्व चॅटर्जी, 'परसिस्टंट'च्या श्रीमती सुपर्णा देशपांडे, कुमारी अंजू रौतिया, श्रीमती कॅरालाईन नागर, थरमॅक्सच्या श्रीमती सुजाता देशपांडे आणि श्रीमती सुखदा गायकवाड, रेनोव्हेटिओ फाउंडेशनचे श्री. नकुल अग्रवाल, श्रीमती श्रद्धा अग्रवाल, शिक्षक, समुपदेशक आणि सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.
नागपूर महानगरपालिका आणि आकांक्षा फाउंडेशनच्या माध्यमातून शहरात सात इंग्रजी माध्यमाच्या शाळा चालवल्या जातात. चिटणवीस सेंटर येथे 'कारनामा २०२६' या स्पर्धेत ध्येय गाठा, प्रगती करा आणि शिखरावर पोहोचा' या ब्रीदवाक्याला अनुसरून पहिल्यांदाच अशा स्वरूपाचे अनोखे प्रदर्शन भरवण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांच्या तांत्रिक आणि गणितीय कौशल्यांची चाचणी घेण्यासाठी 'टिंगर लॅब मिमोसा' आणि 'रेस-द-मॅथ' या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. वयोगटानुसार अर्जुन (लहान गट), नीम (कनिष्ठ गट) आणि अशोका (वरिष्ठ गट) अशा गटांमध्ये या स्पर्धा पार पडल्या. भाषिक कौशल्यासाठी 'वर्ड-ए-थॉन' आणि 'एक्स्टेंपोर' (उत्स्फूर्त भाषण), तर बुद्धिमत्तेच्या कसौटीसाठी 'ब्रेन फ्रीझ' या स्पर्धांनी सर्वांचे लक्ष वेधले. 'आर्ट-प्ले'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी साकारलेल्या कलाकृतींचे आणि चित्रांचे भव्य प्रदर्शनही यावेळी भरवण्यात आले होते. या उपक्रमात मनपा शाळांसह एमएसबी वर्धमाननगर, मॉडर्न स्कूल, जैन इंटरनॅशनल, एसआय कॉन्व्हेंट, सेंट जोसेफ आणि टॉप टोट्स या शाळांनीही सहभाग घेतला. नागरिकांनी या प्रदर्शनाला मोठी गर्दी केली.

# सावनेर खत निर्मितीचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे

## आमदार डॉ. आशीष देशमुख यांचा जोरदार पाठपुरावा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ७ :** सावनेर येथील खत कारखाना निर्मितीचा प्रस्ताव राज्य शासनाने अंतिम मंजुरीसाठी केंद्र सरकारकडे पाठविला आहे भारतीय जनता पार्टीचे आमदार डॉ. आशीष देशमुख यांनी या प्रकल्पासाठी सातत्याने पाठपुरावा केला असून, केंद्रीय खत व रसायन मंत्री जेपी नड्डा यांची नवी दिल्लीत भेट घेतली आहे

सदर खत निर्मिती प्रकल्पाच्या उभारणीसाठी राज्य शासन व गेल (इंडिया) लिमिटेड सामंजस्य करार झाला आहे या प्रकल्पाला वेगाने सुरुवात व्हावी, यासाठी आमदार डॉ. देशमुख यांनी जोरदार पाठपुरावा सुरू केला होता खत प्रकल्प लवकर सुरू झाल्यास विदर्भात खतांची उपलब्धता वाढेल, आर्थिक लुबाडणुकीपासून संरक्षण मिळेल तसेच प्रादेशिक उद्योगवाढीला चालना मिळून रोजगाराचा प्रश्न सोडविता येईल, असे अशी विनंती डॉ. देशमुख यांनी खत व रसायन मंत्री नड्डा यांना केली. गेलचा खत प्रकल्प हा केवळ उद्योग नसून विदर्भाच्या समृद्धीचा, आत्मनिर्भरता आणि उज्ज्वल भविष्यासाठीचा दृष्टीकोन आहे. दरम्यान, सदर भेटीत केंद्रीय मंत्री नड्डा यांनी सावनेर प्रकल्पास प्राधान्य देऊ, असा सकारात्मक प्रतिसाद दिल्याने विदर्भातील रोजगार, औद्योगिक व कृषी विकासाबाबत मैलाचा दगड ठरणार असल्याचे सांगण्यात येत आहे.


# अजिंक्य भारत

# आपलं अकोला

अकोला, रविवार, दि. ८ फेब्रुवारी २०२६ www.ajinkyabharat.com


## आजपासून क्रीडा-सांस्कृतिक महोत्सव

**अकोला:** जिल्हा परिषद अंतर्गत आयोजित क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सवाला रविवारी सुरुवात होत आहे. या तीन दिवसीय महोत्सवात एकूण ६६ क्रीडा प्रकारांचे आयोजन करण्यात आले असून, त्यासोबत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचीही रंगतदार मेजवानी पाहायला मिळणार आहे. हा महोत्सव वसंत देसाई क्रीडांगण येथे संपन्न होणार आहे. ८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९:०० वाजता होणाऱ्या उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम राहणार असून, उद्घाटन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या हस्ते होणार आहे. प्रमुख अतिथी म्हणून पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दिगंबर लोखंडे, मुख्य वित्त व लेखाधिकारी माया शिर्के, रविकांत पी. पवार आदी उपस्थित राहणार आहेत. स्पर्धांपूर्वी तालुकास्तरावर निवड चाचण्या घेण्यात आल्या असून, त्यातून निवड झालेल्या मुख्यालय अकोला, अकोट, बाळापूर, बार्शीटाकळी, मूर्तिजापूर, पातूर व तेल्हारा अशा आठ संघांचा या स्पर्धांमध्ये सहभाग राहणार आहे.



## शेगावीचा योगी गजानन

असता सदा त्याचे स्मरण
भवसागरी नौका ती तरली
बोला जय गजानन माऊली ।।१।।

उष्ट्या पत्रावरती दिलेस तू दर्शन
बंकट सदनी केलेस विविध प्रयोजन
त्या क्षणी दिसले योगीराज माऊली
त्याच क्षणी शेगाव नगरी धन्य पावली ।।२।।

दावून योग प्रदर्शन
कुस्ती ती जिंकली वेद बोलवून
ब्राह्मणाला सजगता दिली
अश्व असो वा मनुष्य खास
भक्तीची वाट तू दाविली ।।३।।

कृपा तू केलीस त्या गणू जवयावरी
हात देऊनी तव कृपेचा बसविले कडेवरी
हरिनामाचे स्मरण करता
कर ठेवुनी करी दर्शन दिलेस
भक्तांना होऊनी विठू माऊली ।।४।।

अशीच कृपा असावी आम्हावरती
माय लेकरा परी
या देहाची बनवून माला
सद्गुरु चरणी अर्पिली ।।५।।

**कु. निर्जला पां. ढोरे**
**माऊली नगर, खडकी**

## प्रशासनाची अनास्था : लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष

# विदर्भाच्या पंढरीची वाट खडतरच; पालखी मार्गाचे काम रखडलेलेच!

**अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. ७ :** विदर्भाची पंढरी म्हणून ख्याती असलेल्या संत श्री गजानन महाराज यांच्या दर्शनासाठी दररोज हजारो भाविक अकोल्याहून शेगावला जात असतात. मात्र, भाविकांचा हा प्रवास सुखकर करण्यासाठी सुरू करण्यात आलेला अकोला-शेगाव पालखी मार्ग ६ वर्षांनंतरही पूर्णत्वास जाऊ शकलेला नाही. ३७१ कोटींचा मोठा निधी खर्च होऊनही या मार्गाचे काम अद्यापही रेंगाळलेले असल्याने भाविकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, या गंभीर समस्येवर अकोला आणि बाळापूर मतदारसंघातील लोकप्रतिनिधींनी मौन बाळगल्याने संताप अधिकच वाढला आहे.

अकोल्यातील डाबकी रोड रेल्वे गेटपासून ते शेगावपर्यंतच्या या मार्गाचे महत्त्व आध्यात्मिकदृष्ट्या मोठे आहे. आषाढी एकादशीनिमित्त शेगाव येथून निघणारी संत गजानन महाराजांची पालखी याच मार्गाने पंढरपूरकडे



प्रस्थान करते. या मार्गाची झालेली दुरवस्था पाहता, २०१८ मध्ये केंद्र सरकारच्या निधीतून ३७१ कोटी रुपये खर्चून याच्या नूतनीकरणाचे कंत्राट एका खासगी कंपनीला देण्यात आले होते. करारानुसार हे काम दोन वर्षांत पूर्ण होणे अपेक्षित होते. आजच्या स्थितीचा विचार केला तर, मार्गावरील बहुतांश रस्ता तयार झाला असल्याचे दिसून येते, मात्र अनेक ठिकाणी तांत्रिक कारणांमुळे आणि कामाच्या संथ गतीने काम अजूनही अपूर्ण अवस्थेत आहे.

शेगाव, नागझरी, पारस, निमकर्दा, गायगाव, माझोड ते वाडेगाव या टप्प्यातील काही भागांत रस्ता सुस्थितीत झाला असला, तरी काही महत्त्वाचे जोडरस्ते अद्यापही पूर्ण झालेले नाहीत. निधीची उपलब्धता आणि केंद्र सरकारकडून वेळोवेळी मिळालेली मुदतवाढ यांनंतरही खासगी कंपनीला हे काम मार्गी लावता आलेले नाही. तांत्रिक अडचणींचे कारण पुढे करत कामाचे तास वाढवूनही प्रत्यक्ष जमिनीवर चित्र बदललेले नाही.रस्त्याचे काम काही ठिकाणी पूर्ण झाले असले तरी, जिथे काम बाकी आहे तिथे मोठ्या प्रमाणात धुळीचे साम्राज्य आणि खड्ड्यांचा सामना भाविकांना करावा लागत आहे. भाविकांसह स्थानिक नागरिकांचीही मोठी अडचण होत आहे. हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प कधी पूर्ण होणार आणि भाविकांचा वनवास कधी संपणार, असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे.

### कामातील विलंब आणि गैरसोय

या रस्त्यासाठी २४ महिन्यांचा ठेका (कालावधी) देण्यात आला होता. मात्र, ६ वर्षे उलटूनही काम अद्याप अपूर्णच आहे. या रस्त्यापैकी केवळ काही भागाचेच काम पूर्ण झाले असून, अनेक ठिकाणी कल्व्हर्ट (मोऱ्या) बांधणे अद्याप बाकी आहे. सध्या रस्त्याचे काम पूर्णपणे बंद असल्याचे दिसते. रस्ता अर्धवट असल्याने प्रकटदिनाच्या पूर्वसंध्येला भाविकांना दुसऱ्या मार्गाने जावे लागले. आडवळणी रस्ता असल्याने भाविकांना मोठा त्रास सहन करावा लागला.

# आज 'श्रीं'चा प्रगट दिन महोत्सव

## गजाननांच्या जयघोषाने राजेश्वर नगरी दुमदुमणार

**अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. ७ :** संत श्री गजानन महाराज प्रगट दिनानिमित्त भक्तांकडून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मंदिरांचे गाभारे फुलांनी सजले असून रोषणाईने उजळले आहेत. रविवारी महानगरातील प्रमुख मंदिरांमध्ये प्रगट दिनानिमित्त पूजा, अभिषेक आणि दुपारी प्रसादाचे वितरण करण्यात येणार आहे. गजाननाच्या जयघोषाने राजेश्वर नगरी दुमदुमत असून, महाराजांच्या भक्तीमध्ये गजानन भक्त तल्लीन होत आहेत. अकोला-शेगाव वारी मार्गावर शनिवारी सायंकाळपासून वारकऱ्यांची गर्दी बघावयास मिळाली. संतनगरी शेगावच्या ४० किलोमीटर अंतरावरील राजराजेश्वर नगरीतून जय गजानन... श्री गजाननचा जयघोष निनादत होता. सायंकाळपासून भक्तांनी मार्गावरून चालण्यास सुरुवात केली. रात्रभर या मार्गावर भक्तांची वर्दळ असते. ही वर्दळ रविवार पहाटेपर्यंत कायम राहणार आहे.

वैद्यकीय सेवा शिबिर जागर फाउंडेशनकडून वारी मार्गावर निंबा फाटा येथे वैद्यकीय सेवा शिबिर सुरू करण्यात आले. वारीसाठी पायी जाणाऱ्या भक्तांना दुखापत किंवा प्रकृती किरकोळ बरी नसल्यास



उपचार करण्यात आले. गतवर्षीप्रमाणे माझी वारी, स्वच्छ वारी ही मोहीम राबवण्यात आली. वारी मार्गावर स्वच्छतेबाबत मोठ्या प्रमाणात जागृती करण्यात आली. शिबिरात डॉ. इर्शाद हुसेन, इकबाल हुसेन, राम कौसकार, श्रीकांत अढाव, जगदीश भटकर, अशफाक हुसेन, दीपक खारोडे, दिनेश बोंडफळे, महेश जाधव, विशाल बोर्डे, तुषार कोरडे, गणेश जाधव, योगेश गव्हाळे यांनी सेवा प्रदान केल्याचे जागरचे संयोजक नंदकिशोर चिपडे यांनी कळवले. खडकी येथे रुद्राभिषेक खडकी परिसरातील धाबेकर नगरात संत गजानन महाराज प्रगट दिन महोत्सव सुरू आहे. रविवारी सकाळी ६ वाजता श्रींचा रुद्राभिषेक होईल. त्यानंतर ह.भ.प. भागवत महाराज देशमुख यांचे काला कीर्तन व महाआरती, दुपारी १२ वाजता महाप्रसाद व रात्री ७ वाजता दरबार गजानन हे संगीतमय संत गजानन महाराज नाट्याचे सादरीकरण होणार आहे. ३२२ वर्षे पुरातन विठ्ठल मंदिरात पारायण जुने शहरातील ३२२ वर्षे पुरातन असलेल्या विठ्ठल मंदिर संस्थानमध्ये सालाबादप्रमाणे यंदाही श्री गजानन महाराज यांचा प्रगट दिन साजरा होणार आहे. श्री विठ्ठल मंदिर अखंड हरिनाम सप्ताह मंडळातर्फे सकाळी ११ ते सायंकाळी ७ पर्यंत श्री गजानन विजय ग्रंथाचे पारायण होणार आहे. सायंकाळी ७:३० वाजता महाआरती व रात्री ८ वाजता महाप्रसादाचे वितरण होणार आहे. वारकऱ्यांसाठी मोफत आरोग्य सेवा ''वारकरी भक्तांसाठी आरोग्य सेवा आरोग्य यंत्रणा आपल्या दारी'' या विशेष मोहिमेअंतर्गत, श्री सत्यसाईबाबा सेवा संघटना आणि निलेश देव मित्र मंडळाच्या संयुक्त विद्यमाने गजानन महाराज प्रगट दिनानिमित्त वारकरी भक्तांसाठी मोफत आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात आली. या कार्यात डॉ. अशोक ओळंबे, डॉ. प्रमोद हेलगे, डॉ. बाबुराव तोष्णीवाल, डॉ. विवेक गोतमारे, डॉ. सुमित गोतमारे, डॉ. अजय खरात, डॉ. तुषार चरखा, डॉ. सतीश चव्हाण, डॉ. मधुसूदन अपतुलकर, डॉ. प्रकाश मेटांगे, किशोर रत्नपारखी आणि निलेश देव यांनी सहभाग नोंदवला.

## ट्रक पुलाखाली कोसळून अपघात; चालक व क्लीनरचा जागीच मृत्यू



**अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**मूर्तिजापूर, दि. ७ :** नागपूर-मुंबई राष्ट्रीय महामार्गावर शनिवारी रात्री एक हृदयद्रावक घटना घडली. कुरुम शिवारातील तीन पुलाजवळ लोखंडी पाईप वाहून नेणाऱ्या आयशर ट्रकचा भीषण अपघात होऊन चालक आणि क्लीनर या दोघांचाही जागीच मृत्यू झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, आयशर ट्रक नागपूरहून संभाजीनगरच्या दिशेने लोखंडी पाईप घेऊन जात होता. शनिवारी मध्यरात्रीनंतर कुरुम शिवारात चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. अनियंत्रित झालेला ट्रक थेट डिव्हायडर ओलांडून विरुद्ध दिशेला असलेल्या पुलाखालच्या खोल दरीत कोसळला. घटनेची माहिती मिळताच माना पोलीस स्टेशनच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी पंचनामा करून दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवले आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार गणेश नावकार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार दीपक सोळंके करत आहेत. एक दुःखद आठवण जड वस्तूंची वाहतूक करताना केबिन आणि मालामध्ये सुरक्षित अंतर किंवा मजबूत बॅरियर असणे किती गरजेचे आहे, हे या अपघातातून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

### पाईप ठरले काळ

हा अपघात इतका भीषण होता की, ट्रक दरीत कोसळल्यानंतर पाठीमागे असलेले जड लोखंडी पाईप केबिनमध्ये घुसले. हे पाईप थेट चालक आणि क्लीनरच्या अंगावर पडल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.

**मृतांची नावे:** अनिसउद्दीन रफिकउद्दीन काझी चालक, रा. जोहर नगर, बुलढाणा, मोहम्मद रेहान मोहम्मद नाजिम क्लीनर, रा. जोहर नगर, बुलढाणा

## प्रशासकीय राजवटीतील दुसऱ्या अंदाजपत्रकाची तयारी

**अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. ७ :** जिल्हा परिषदेचे सन २०२६-२७ चे प्रशासकीय राजवटीतील दुसरे अंदाजपत्रक तयार करण्याची तयारी सुरू झाली आहे. यंदा निवडणुका झाल्यास नवीन पदाधिकारी व सदस्यांनाही प्रशासकीय काळात मंजूर झालेल्या बजेटनुसारच निर्णय घ्यावे लागणार आहेत. गतवर्षीचे प्रशासकीय राजवटीतील पहिले बजेट ४० कोटी ९८ लाख १७ हजार रुपयांचे होते. आगामी अंदाजपत्रकासाठी तूर्तास आरोग्य व समाज कल्याण विभागाचा मागणीचा प्रस्ताव अर्थ विभागाला प्राप्त झाला आहे. उर्वरित नऊ विभागांची मागणी अद्याप आलेली नाही. मार्चमध्ये अंदाजपत्रक जाहीर



होण्याची शक्यता आहे.

गतवर्षी दिव्यांग व मागासवर्गीय लाभार्थ्यांना लघुउद्योग उभारणीसाठी अर्थपुरवठ्याची तरतूद करण्यात आली होती. त्यामुळे यंदा कोणत्या बाबींचा समावेश बजेटमध्ये राहणार आहे, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. जिल्हा परिषद सदस्यांचा कार्यकाळ संपल्याने १७ जानेवारी २०२५ रोजी मिनी मंत्रालयावर प्रशासकीय राजवट सुरू झाली होती. ऐरवी पदाधिकारी व सदस्यांकडून होणारी मागणी लक्षात घेऊन अंदाजपत्रक तयार करण्यात येते. त्यानुसार सभांमध्ये अनेक मुद्द्यांवर उहापोह होतो. वैयक्तिक व सामूहिक योजनांच्या तरतुदीत बदल करण्यात येतात आणि लाभार्थी संख्याही वाढवण्यात येते. राजकीय सोय लक्षात घेऊन तरतूद केली जाते.

मात्र, सध्या प्रशासक असल्याने सर्व विभागांकडून मागणी मागवण्यात आली आहे. त्यानुसार समाज कल्याण, पाणीपुरवठा, महिला व बाल कल्याण, सामान्य प्रशासन, शिक्षण, कृषी व पशुसंवर्धन, लघुसिंचन-लघु पाटबंधारे, आरोग्य व बांधकाम आदींसह विविध विभागांच्या योजनांसाठी तरतूद करण्यात येणार आहे.

## माता रमाई जयंती




**अकोला: अशोक वाटिका येथे माता रमाई जयंती साजरी करण्यात आली. रमाईंना अभिवादन करण्यासाठी अनुयायींनी गर्दी केली होती.**

**(छाया. संजय ताथुरकर)**

## व्याजासाठी मजुराचे अपहरण : उमरा परिसरातून कारमधून सहा जणांनी उचलले

**अकोला :** चन्नी पोलीस स्टेशन हद्दीतील सावरगाव येथील एका मजुराचे आज सायंकाळी सुमारे ६ वाजण्याच्या सुमारास उमरा परिसरातून पाच ते सहा अज्ञात व्यक्तींनी कारमधून अपहरण केल्याची खळबळजनक घटना घडली आहे. या घटनेमुळे सावरगावसह उमरा परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सदर मजुराला ऊस तोडणीच्या कामासाठी संबंधित व्यक्तींनी एक लाख रुपये आगाऊ दिले होते. ही रक्कम परत करण्यासाठी मजुराने सलग तीन महिने काम केले. मात्र, रक्कम परत करूनही त्याला आणखी एक लाख रुपयांचे कथित व्याज मिळेपर्यंत काम करण्याची धमकी देण्यात आली होती. काम न केल्यास अपहरण करण्याचा इशाराही त्याला देण्यात आल्याचे समजते.

अखेर आज सायंकाळी उमरा परिसरात मजूर असताना पाच ते सहा जणांनी कारमध्ये जबरदस्तीने त्याला बसवून पळ काढल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. घटनेची माहिती मिळताच अपहरण झालेल्या मजुराची पत्नी चन्नी पोलीस स्टेशनकडे रवाना झाली असून, ती तक्रार दाखल करण्याच्या तयारीत आहे.

## महापालिकेत आता विषय समित्यांच्या निवडीचे वेध

**अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. ७ :** महापौर आणि उपमहापौर पदांची निवडणूक प्रक्रिया पार पडल्यानंतर, आता अकोला महापालिकेतील सत्तेचे केंद्र मानल्या जाणाऱ्या विविध विषय समित्यांच्या सभापती निवडीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. भाजपच्या शारदा खेडकर यांची महापौरपदी आणि अमोल गोगे यांची उपमहापौरपदी निवड झाल्यामुळे सत्ताधारी गोटात उत्साहाचे वातावरण असून, आगामी काही दिवसांत विषय समित्यांच्या निवडीची प्रक्रिया सुरू होण्याची दाट शक्यता आहे.

३० जानेवारी रोजी पार पडलेल्या महापौर व उपमहापौर निवडणुकीचा अधिकृत अहवाल नगरसचिवांनी विभागीय आयुक्तांकडे सादर केला आहे. आता पुढील टप्प्यात विभागीय आयुक्तांकडून विविध विषय समित्यांच्या अध्यक्षांच्या निवडीचा स्वतंत्र कार्यक्रम जाहीर केला जाईल. विशेषतः तिजोरीची चावी समजल्या जाणाऱ्या स्थायी समितीच्या अध्यक्षपदासाठी आतापासूनच तीव्र राजकीय हालचाली सुरू झाल्या आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पक्षांतर्गत स्तरावर उमेदवाराचे नाव जवळपास निश्चित झाले असून, केवळ अधिकधिकृत घोषणेची प्रतीक्षा आहे.

या प्रक्रियेसाठी महापौर लवकरच विविध पक्षांच्या गटनेत्यांची बैठक बोलावणार आहेत. या बैठकीत नामनिर्देशित सदस्यांच्या नावावर चर्चा होईल, त्यानंतर गटनेते ही यादी महासभेसमोर सादर करतील आणि महापौर सदस्यांची अंतिम घोषणा करतील. स्थायी समितीसोबतच इतर समित्यांवर कोणाची वर्णी लागते आणि स्वीकृत सदस्य म्हणून कोणत्या नवीन चेहऱ्यांना संधी मिळते, याबद्दल कार्यकर्त्यांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. प्रशासकीय पातळीवरही या बदलांचे संकेत मिळत असून, महापालिकेतील संबंधित दालनांची साफसफाई आणि सजावट सुरू करण्यात आली आहे. येत्या आठवड्यात या सर्व महत्त्वाच्या समित्यांच्या निवडणुकांचे चित्र स्पष्ट होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

**उपक्रम** | जागृती विद्यालयात माता रमाई जयंती साजरी

# बाल हक्क जनजागृती कार्यक्रम उत्साहात

**अजिंक्य भारत । प्रतिनिधी**

**अकोला, दि. ७ : तिक्ष्णगत मल्टिपर्पज वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. सुगत वाघमारे,ॲड. संजय सेंगर व सचिव विष्णूदास मोंडोकार यांच्या सूचनेनुसार आणि जिल्हा समन्वयक सचिन पाटील यांच्या मार्गदर्शनात, स्थानिक जागृती विद्यालय प्राथमिक शाळा येथे माता रमाई आंबेडकर यांची जयंती आणि बाल हक्क जनजागृती कार्यक्रम साजरा करण्यात आला. बाल हक्क जनजागृती कार्यक्रम तिक्ष्णगतच्या वतीने प्रत्येक शनिवारी विविध ठिकाणी केला जात असतो.**





तिक्ष्णगत मल्टिपर्पज वेल्फेअर सोसायटी आणि शाळा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात माता रमाईंच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकण्यासोबतच विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासावर विशेष भर देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक आदित्य शेगोकार होते, तर प्रमुख अतिथी म्हणून तिक्ष्णगत सोसायटीचे जिल्हा समन्वयक सचिन पाटील उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते माता रमाईंच्या प्रतिमेला अभिवादन करून त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यात आला. याप्रसंगी बोलताना मान्यवरांनी माता रमाईंचा त्याग आणि त्यांचे प्रेरणादायी जीवन विद्यार्थ्यांसमोर मांडले.

केवळ पुस्तकी ज्ञान न देता मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी यावेळी बाल हक्क जनजागृती व विद्यार्थी कौशल्य विकास मोहिमेअंतर्गत विविध विशेष उपक्रम राबवण्यात आले. यामध्ये मुलांच्या बौद्धिक विकासासाठी विविध ॲक्टिव्हिटी घेण्यात आल्या, तसेच कला व संस्कृती विभागांतर्गत विद्यार्थ्यांनी प्रेरणादायी गीते, नृत्य आणि भाषणांच्या माध्यमातून आपल्या सुप्त गुणांचे दर्शन घडवले. खेळांच्या माध्यमातून एकाग्रता, एकचित्तता आणि संयम कसा राखायचा, याचे प्रात्यक्षिक प्रशिक्षणही विद्यार्थ्यांना देण्यात आले. या उपक्रमात पालक आणि शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. मुलांच्या हक्कांप्रती समाजात जागरूकता निर्माण व्हावी आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, या उद्देशाने आयोजित हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक वृंद व तिक्ष्णगत सोसायटीच्या सर्व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

## ताजनगर बोर्डाजवळ डीपीला आग

**अकोला:** ताजनगर बोर्डाजवळील खैर मोहम्मद प्लॉट, विभाग (डिव्हिजन) क्रमांक ११ येथे असलेल्या वीज वितरण कंपनीच्या डीपीला अचानक आग लागल्याची घटना घडली. या घटनेची माहिती मिळताच नगरसेवक फजलू पहेलवान यांनी प्रसंगावधान दाखवत तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी संबंधित लाईनमनला बोलावून डीपीचा वीजपुरवठा बंद करून घेतला, त्यामुळे आगीवर वेळीच नियंत्रण मिळवता आले आणि मोठी दुर्घटना टळली.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, सदर डीपी उघड्या अवस्थेत असून ती अत्यंत खाली बसवण्यात आली आहे. त्यामुळे परिसरातून ये-जा करणाऱ्या नागरिकांसह लहान मुलांसाठीही ही डीपी धोकादायक ठरत आहे. आग लागल्याच्या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली होती. वीजपुरवठा तात्काळ खंडित करण्यात आल्याने आग वाढण्यापूर्वीच आटोक्यात आली.

## बनावट इंस्टाग्राम खाते उघडून अश्लील फोटो व्हायरल करणाऱ्यावर गुन्हा दाखल

**अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**मूर्तिजापूर, दि. ७ :** सोशल मीडियाचा गैरवापर करून एका महिलेचे आणि तिच्या मैत्रिणीचे अश्लील फोटो व व्हिडिओ व्हायरल केल्याची धक्कादायक घटना मुर्तीजापुर शहरात उघडकीस आली आहे. या प्रकरणी मूर्तिजापूर शहर पोलिसांनी पुणे येथील एका तरुणाविरुद्ध माहिती तंत्रज्ञान कायद्यासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रविदास नगर मोचीपुरा येथील रहिवासी असलेल्या ३२ वर्षीय फिर्यादी महिलेच्या मैत्रिणीच्या नावाने आरोपी आकाश लक्ष्मण कांबळे वय ३५ वर्ष, रा. पिंपरी चिंचवड, पुणे याने बनावट इंस्टाग्राम अकाउंट तयार केले. या बनावट खात्यावरून आरोपीने फिर्यादीचे आणि तिच्या मैत्रिणीचे अश्लील मजकूर असलेले फोटो व व्हिडिओ समाजमाध्यमावर प्रसारित केले. जेव्हा फिर्यादीने आरोपीला फोन करून विचारणा केली, तेव्हा त्याने पश्चात्ताप व्यक्त करण्याऐवजी उलट फिर्यादीला आणखी फोटो व्हायरल करण्याची धमकी दिली. या मानसिक त्रासाला कंटाळून अखेर पीडितेने मूर्तिजापूर शहर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली.फिर्यादीच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी आकाश कांबळे विरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदवला आहे. १५ जानेवारी २०२५ ते १४ फेब्रुवारी २०२६ दरम्यानतपास अधिकारी मूर्तिजापूर शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार अजीत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली,पोलीस उपनिरीक्षक सूर्यवंशी,महिला पोलीस हवालदार शालिनी सोळंके, शहरातील महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलिसांनी सायबर गुन्हेगारांविरुद्ध कडक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पीएसआय सूर्यवंशी करत आहेत.

# पावसाळ्यापूर्वी शेतरस्ते सुस्थितीत; ४५० मार्गांच्या कामांना तातडीची मंजुरी

## विना-अतिक्रमित शेतरस्त्यांच्या कामांचा नारळ फुटणार

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोट : दि. ७ :** अकोट विधानसभा क्षेत्रातील शेत पाणंद रस्त्यांची दयनीय अवस्था लक्षात घेता, पावसाळ्यापूर्वी हे रस्ते सुस्थितीत आणण्यासाठी हालचालींना वेग आला आहे. गुरुवारी तहसील कार्यालयात आमदार प्रकाश भारसाकळे यांच्या उपस्थितीत झालेल्या आढावा बैठकीत अकोट व तेल्हारा तालुक्यातील विना-अतिक्रमित शेतरस्त्यांची कामे तातडीने सुरू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.



या बैठकीत अकोट तालुक्यात ४०० तर तेल्हारा तालुक्यात ३५० असे एकूण ७५० शेतरस्ते अतिक्रमित असल्याचे समोर आले. मात्र, ज्या रस्त्यांवर कोणतेही अतिक्रमण नाही, अशा अकोटमधील २३५ व तेल्हारा तालुक्यातील २११ (एकूण ४५०) रस्त्यांची कामे पहिल्या टप्प्यात प्राधान्याने हाती घेतली जाणार आहेत. यात ३३ फुटांपेक्षा अधिक रुंदी असलेल्या मोकळ्या शेतरस्त्यांचा समावेश असून २२ फुटांखालील रस्त्यांचा विचार या टप्प्यात केला जाणार नाही.
अतिक्रमित असलेले ७५० शेतरस्ते मोकळे करण्यासाठी संबंधित शेतकऱ्यांच्या बैठका घेतल्या जातील. आवश्यक असल्यास पोलीस बंदोबस्तात अतिक्रमण हटविण्याची कारवाई केली जाईल, असा इशाराही बैठकीत देण्यात आला. मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेअंतर्गत क्लस्टर पद्धतीने निविदा काढून मुरूम रस्ते तयार करण्यात येणार आहेत. जास्तीत जास्त शेतरस्ते मोकळे करणाऱ्या अधिकारी व पटवाऱ्यांचा जाहीर सत्कार करण्यात येईल, असे आमदार भारसाकळे यांनी यावेळी सांगितले.
या बैठकीस उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, मंडळ अधिकारी, पटवारी व प्रगतशील शेतकरी उपस्थित होते.

# शिव भोजन चालकांच्या विविध मागण्यांसाठी अन्नपुरवठा अधिकाऱ्यांना निवेदन




अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला : दि. ७ :** शिव भोजन चालक अकोला जिल्ह्याच्या वतीने अन्नपुरवठा अधिकारी येनेवार यांना चालकांच्या विविध समस्यांबाबत निवेदन देण्यात आले. शिव भोजन चालकांची प्रलंबित बिले तात्काळ मंजूर करून संबंधित अकाउंट विभागाकडे पाठविण्यात यावीत, तसेच याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात याव्यात, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. निवेदनात शिव भोजन चालकांची रखडलेली बिले, कामकाजाशी संबंधित अडचणी तसेच इतर प्रशासकीय प्रश्न मांडण्यात आले. या सर्व बाबींवर तातडीने उपाययोजना करण्यात यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. निवेदन दिल्यानंतर अन्नपुरवठा अधिकाऱ्यांसोबत यासंदर्भात चर्चा करण्यात आली.हे निवेदन शिव भोजन संघटनेचे जिल्हाप्रमुख तथा माजी नगरसेवक संतोष अनासाने यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले. यावेळी संघटनेचे उपाध्यक्ष देविदास बोदडे, सचिव एकनाथ ढोरे, देशमुख, गणेश टाले, मनीष गिरी, बार्शीटाकळी येथील मोहम्मद शोएब तसेच खाडे. उपस्थित होते. शिव भोजन चालकांच्या समस्यांबाबत प्रशासनाकडे निवेदन देऊन लक्ष वेधण्यात आले असून, मागण्यांवर लवकर निर्णय घेण्यात यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

## महत्त्वाचे

### मुंडगाव येथे सुपीनाथ महाराज यात्रा महोत्सव

**मुंडगाव :** अकोट तालुक्यातील मुंडगाव येथे सुपिनाथ महाराज शिव मंदिर संस्थानच्या वतीने ९ ते १६ फेब्रुवारी दरम्यान यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या कालावधीत शिव महापुराण कथा व अखंड हरिनाम सप्ताह होणार आहे.
शिव महापुराण कथेचे कथावाचन ह.भ.प. गजानन महाराज हिरुळकर (अकोला) करणार असून, सप्ताहाचे मार्गदर्शन ह.भ.प. सुदर्शन महाराज खडसने करणार आहेत. सप्ताहात दररोज रात्री ८.३० ते १०.३० या वेळेत कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे.९ फेब्रुवारीला ह.भ.प. सुदर्शन महाराज खडसने, १० फेब्रुवारीला ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज भालतिलक, ११ फेब्रुवारीला ह.भ.प. त्र्यंबक महाराज अवारे, १२ फेब्रुवारीला ह.भ.प. वैभव महाराज तराळ, १३ फेब्रुवारीला ह.भ.प. राम महाराज गवारे, १४ फेब्रुवारीला ह.भ.प. शुकदास महाराज गाडेकर व १५ फेब्रुवारीला ह.भ.प. हरीष महाराज पाटील यांचे कीर्तन होणार आहे.१६ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत ह.भ.प. गजानन महाराज हिरुळकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने महोत्सवाची सांगता होईल.
या महोत्सवासाठी गजानन वारकरी, उमेश दोरकर, बाळूभाऊ काठोके, राधाबाई येवतकार, रामरतन पाथ्रीकर, गजानन थारकर (स्मृतिप्रीत्यर्थ), दिगंबर कुटे, मनोहर ठाकरे, महादेव आखरे, अंकुश गोमासे, विजय आखरे, विलास ठाकरे, साहेबराव लोखंडे, पुरुषोत्तम दहिभात व अंकुश ढोकणे यांचे सहकार्य लाभत आहे.
काल्याच्या दिवशी श्रीकृष्ण अवलिया भजन मंडळाच्या हस्ते गोपाळकाला होणार असून, संत राजुनाथ महाराज, संत संकेत महाराज व संत गाठोडे महाराज यांचे आगमन होणार आहे.
भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थानचे अध्यक्ष गजानन वारकरी, विश्वस्त मंडळ, उत्सव समिती व मुंडगाव ग्रामस्थांनी केले आहे.

### डाटा संघटनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**अकोला:** डॉ. बाबासाहेब आंबेडकर टिचर्स असोसिएशन (डाटा) तर्फे नाशिक येथे प्रजासत्ताक दिनी घडलेल्या घटनेचा तीव्र निषेध नोंदविण्यात आला. महिला वन कर्मचारी माधवी जाधव यांना न्याय मिळावा, या मागणीसाठी राज्यपाल व मुख्यमंत्र्यांच्या नावे जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन देण्यात आले.यावेळी विभागीय सचिव डॉ. एम. आर. इंगळे यांनी सांगितले की, प्रजासत्ताक दिनी पालकमंत्री गिरीश महाजन यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव न घेणे हा संविधान व महापुरुषांचा अवमान आहे. याविरोधात आवाज उठविणाऱ्या माधवी जाधव यांच्यावर कोणतीही अन्यायकारक कारवाई करू नये, तसेच प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार राष्ट्रनिर्मितीचा पाया- प्रा. राहुल माहुरे

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला : दि. ७ :** स्थानिक एल. आर. टी. वाणिज्य महाविद्यालय, अकोला येथे सुरू असलेल्या राष्ट्रीय सेवा योजना (रा. से. यो.) शिबिरात प्रमुख वक्ते म्हणून बोलताना वाणिज्य विभागप्रमुख प्रा. राहुल माहुरे यांनी, ''डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार हे राष्ट्रनिर्मितीचा पाया आहेत,'' असे प्रतिपादन केले.




या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. नागनाथ गुट्टे होते. यावेळी महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. मोनिका साबू, प्रा. प्रकाश गवई तसेच प्रा. उज्ज्वला डांगे मॅडम व्यासपीठावर उपस्थित होत्या.
कार्यक्रमाच्या सुरुवातीस मान्यवरांच्या हस्ते संत गाडगेबाबा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन व हारार्पण करण्यात आले. प्रा. प्रकाश गवई यांनी प्रास्ताविक सादर करून प्रमुख वक्त्यांचा परिचय करून दिला.
मार्गदर्शन करताना प्रा. राहुल माहुरे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय योगदान आजही देशाला प्रगतीच्या दिशेने नेण्यासाठी मार्गदर्शक ठरत असल्याचे सांगितले. बाबासाहेबांचा संघर्ष, त्यांनी दिलेला शिक्षणाचा मूलमंत्र तसेच भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीतील त्यांचे योगदान यावर त्यांनी विविध उदाहरणे व संदर्भांच्या आधारे सविस्तर मांडणी केली.''शिका, संघर्ष करा आणि संघटित व्हा,'' हा संदेश केवळ घोषवाक्य नसून तो जीवनाचा मार्ग असल्याचे त्यांनी नमूद केले.
कार्यक्रमाचे संचालन कु. पलक उज्जेनकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन कु. हर्षा घोगरे यांनी केले. या प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# न्याय न मिळाल्यास शेतकरी रोखणार समृद्धी महामार्ग!

## जमीन नोंदीत घोटाळा झाल्याचा आरोप

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मंगरुळपीर : दि. ७ :** शेतातून बेकायदेशीररित्या समृद्धी महामार्गाचे काम केले असून, वारंवार विनंती करूनही जमिनीचा मोबदला आणि हक्काच्या नोंदी मिळाल्या नाहीत. प्रशासनाच्या या उदासीनतेमुळे संतप्त झालेल्या पीडित शेतकऱ्याने येत्या १६ फेब्रुवारी रोजी समृद्धी महामार्गावरील वाहतूक रोखण्याचा इशारा लेखी निवेदनातून दिला आहे.



मंगरुळपीर तालुक्यातील भुर येथील पीडित शेतकरी गजानन राऊत यांनी प्रशासनाला दिलेल्या निवेदनानुसार, तहसीलदार मंगरुळपीर यांनी ३० जुलै रोजी जमिनीच्या नोंदींबाबत आदेश पारित केले होते. या आदेशाचे पालन करण्यास तलाठी आणि मंडळ अधिकारी टाळाटाळ करत असल्याचा आरोप राऊत यांनी केला आहे. आदेशानुसार ९ हेक्टर ३४ आर जमिनीचा ७/१२ आणि फेरफार घेणे आवश्यक असताना, केवळ ७ हेक्टर ६५ आर जमिनीच्या नोंदी करण्यात आल्या. उर्वरित १ हेक्टर ६९ आर जमिनीच्या नोंदीमध्ये अधिकाऱ्यांनी पदाचा गैरवापर करून घोळ घातल्याचे शेतकऱ्याचे म्हणणे आहे.या संदर्भात अनेकदा तक्रारी करूनही संबंधित अधिकारी व तलाठी यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.
न्याय मिळत नसल्याने अखेर गजानन राऊत यांनी १६ फेब्रुवारीपासून आपल्या शेताच्या हद्दीतून गेलेला समृद्धी महामार्ग कायमस्वरूपी बंद करण्याचा पवित्रा घेतला आहे.
या इशाऱ्यामुळे प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली असून, आता प्रशासन यावर काय तोडगा काढणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मूर्तिजापुरात भाजपमध्ये बड्या पदाधिकाऱ्यांचा प्रवेश

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मूर्तिजापूर, दि. ७ :** तालुक्यातील राजकारणात शुक्रवारी मोठी घडामोड घडली असून, विविध पक्षांतील प्रभावी पदाधिकाऱ्यांनी आमदार हरीश पिंपळे यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. या पक्षप्रवेशामुळे आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील राजकीय समीकरणे बदलण्याची चिन्हे आहेत.



भाजपमध्ये प्रवेश करणाऱ्यांमध्ये संदीप जळमकर (युवक राष्ट्रवादी - शरद पवार गट, प्रदेश उपाध्यक्ष), तुषार भुयार (शिवसेना - शिंदे गट), रवी माडकर (शहर उपाध्यक्ष, राष्ट्रवादी - शरद पवार गट) आणि विष्णू लोडम (जिल्हा कार्याध्यक्ष, ओबीसी सेल, राष्ट्रवादी - शरद पवार गट) यांचा समावेश आहे. विविध पक्षांतील संघटनात्मक कामात सक्रिय असलेल्या या पदाधिकाऱ्यांच्या प्रवेशामुळे राष्ट्रवादी व शिवसेना (शिंदे गट) छावणीत खळबळ उडाली आहे.याप्रसंगी नगराध्यक्ष हर्षल साबळे, उपनगराध्यक्ष रोहित अवल्वार, नगरसेवक भारत जेठवानी, राम जोशी, लखन मिलांदे, गटनेते गजानन नाकट, नजाकत खान, अमोल राऊत आणि अमोल प्रजापती यांच्यासह भाजपचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी आमदार हरीश पिंपळे यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे स्वागत करून, भविष्यात आणखी काही मोठे प्रवेश होतील, असा विश्वास व्यक्त केला. विशेषतः युवक आणि ओबीसी घटकांशी संबंधित पदाधिकाऱ्यांचा हा प्रवेश भाजपसाठी संघटनात्मकदृष्ट्या महत्त्वाचा मानला जात आहे.

# दहीहंडा येथे संत श्री रूपनाथ महाराज यात्रा महोत्सवास उत्साहात प्रारंभ

## १७ फेब्रुवारीला होणार सांगता; धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**दहीहंडा, दि. ७ :** येथील तीर्थक्षेत्र संत श्री रूपनाथ महाराज यांच्या पुण्यस्मरणार्थ भव्य यात्रा महोत्सवाला गुरुवार, ५ फेब्रुवारीपासून भक्तिभावात सुरुवात झाली. मुख्य मंदिरात विधिवत तीर्थस्थापना करून महोत्सवाचा शुभारंभ करण्यात आला असून, आठवडाभर विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



या महोत्सवानिमित्त दररोज सकाळी काकडा आरती व पूजाअर्चा होत असून, सायंकाळी विविध भक्तिमय कार्यक्रम रंगत आहेत. ७ फेब्रुवारी रोजी ह.भ.प. ढवळी महाराज हिंगणी यांचे कीर्तन, तर ८ फेब्रुवारीला अक्षय पाल महाराज यांचे राष्ट्रीय कीर्तन होईल. ९ फेब्रुवारी रोजी प्रसिद्ध गायक प्रवीण आंबुस्कर व सहकाऱ्यांची संगीत रजनी रंगणार आहे. मंगळवार, १० फेब्रुवारीपासून ह.भ.प. गणेश महाराज शेटे (जळगाव) यांच्या मधुर वाणीतून श्री शिवमहापुराण कथेला प्रारंभ होईल. ११ फेब्रुवारी रोजी ह.भ.प. अविनाश बुवा परळीकर यांचे नारदीय कीर्तन, तर १२ फेब्रुवारीला सुभाष भांडे, अमोल हंतोडे व सुधाकर पवार यांचा भावगीत व भक्तिगीतांचा कार्यक्रम होईल. १३ फेब्रुवारीला ह.भ.प. श्रीकृष्ण महाराज सावळे यांचे कीर्तन होणार आहे. शनिवार, १४ फेब्रुवारी रोजी किशोर बळी यांचा सारं गाव मामाचं हा विनोदी कार्यक्रम होईल.
१५ फेब्रुवारीला महाशिवरात्रीनिमित्त रुद्राभिषेक व विशेष पूजा होईल, तसेच रात्री हास्ययात्रा हा कार्यक्रम रंगणार आहे. १६ फेब्रुवारीला शिवमहापुराण कथेची सांगता होऊन रात्री भक्तिसंगीत रजनीचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार, १७ फेब्रुवारी रोजी पहाटे संतांच्या पालखीची भव्य मिरवणूक काढण्यात येईल. गाव प्रदक्षिणेनंतर दुपारी पारंपरिक दहीहंडीचा कार्यक्रम होईल. याच दिवशी भावगीतांची मैफिल रंगणार असून, सायंकाळी ४ वाजता महाप्रसादाने महोत्सवाची सांगता होईल.

# अकोलखेड येथे प्रगट दिनानिमित्त गजानन महाराज पारायण उत्साहात



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोलखेड : दि. ७ :** येथील विठ्ठल मंदिरामध्ये संत गजानन महाराज प्रगट दिनानिमित्त सालाबादप्रमाणे याही वर्षी श्री गजानन विजय ग्रंथाच्या पारायणाचे आयोजन करण्यात आले होते. अतिशय भक्तीमय वातावरणात पार पडलेल्या या एकदिवसीय पारायण सोहळ्याने परिसर गण गण गणात बोतेच्या गजराने दुमदुमून गेला होता.प्रगट दिनानिमित्त सकाळी विधिवत पूजनाने पारायणास सुरुवात झाली. या सोहळ्याचे आयोजन पुष्पा वानखडे व अधिराज वानखडे यांच्या वतीने करण्यात आले होते. पारायणाची सांगता झाल्यानंतर आयोजकांकडून उपस्थित भाविकांसाठी अल्पोपहाराचे नियोजन करण्यात आले होते. या धार्मिक कार्यक्रमाला अकोलखेड परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पाहणी

## पाटसूल रेल्वे परिसरात सातदिवसीय विशेष शिबिरास प्रारंभ

# श्री शिवाजी महाविद्यालयाच्या रासेयो शिबिराचे उद्घाटन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोट : दि. ७:** श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोट येथील राष्ट्रीय सेवा योजना (रासेयो) विभागाच्या वतीने सातदिवसीय विशेष शिबिराचे उद्घाटन गुरुवार, ६ फेब्रुवारी रोजी पाटसूल रेल्वे परिसरात उत्साहात पार पडले.



शिबिराचे उद्घाटन श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीचे कार्यकारिणी सदस्य सुरेश खोटरे यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील पांडे होते.
या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून गुरुदेव सेवाश्रम, पाटसूल रेल्वेचे संचालक शुकदास गाडेकर महाराज, पोलीस पाटील मधुकरराव सपकाळ, सरपंच प्रितीताई निहाटकर, उपसरपंच मंगला वाघमारे, तंटामुक्ती समिती अध्यक्ष देवराव सपकाळ व देवराव काळे उपस्थित होते.
प्रास्ताविकात रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. भरत नागरे यांनी शिबिराचे उद्दिष्ट व सात दिवसांत राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. उद्घाटनपर भाषणात सुरेश खोटरे यांनी शिक्षणासोबतच संस्कारांची जोड आवश्यक असल्याचे सांगून, रासेयोच्या माध्यमातून विद्यार्थी समाजाभिमुख व जबाबदार नागरिक घडतात, असे मत व्यक्त केले. शुकदास गाडेकर महाराज यांनी राष्ट्रसेवा व सामाजिक बांधिलकी यावर मार्गदर्शन केले, तर प्राचार्य डॉ. सुनील पांडे यांनी सेवा हाच रासेयोचा केंद्रबिंदू असल्याचे नमूद केले.
कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनुज सिरस्कार यांनी केले, तर आभार प्रा. डॉ. एम. के. नन्नावरे यांनी मानले. कार्यक्रमास प्रा. डॉ. प्रतिभा पवित्रकार, प्रा. अर्चना कुचे यांच्यासह स्वयंसेवक, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दिग्रस बुद्रुक येथे श्री सोपीनाथ महाराज यात्रा उत्साहात



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**दिग्रस बु., दि. ७ :** पातूर तालुक्यातील श्री क्षेत्र दिग्रस बुद्रुक येथे संत शिरोमणी श्री सोपीनाथ महाराज यात्रोत्सवानिमित्त भाविकांची मोठी गर्दी उसळली आहे. यात्रेनिमित्त करण्यात आलेल्या आकर्षक विद्युत रोषणाईमुळे रात्रीच्या वेळी संपूर्ण मंदिर परिसर उजळून निघाला असून, हे भाविकांसाठी मुख्य आकर्षणाचे केंद्र ठरत आहे.
यात्रोत्सवानिमित्त परिसरात विविध प्रकारची खेळणी, आकाशपाळणे आणि खाद्यपदार्थांचे स्टॉल्स मोठ्या प्रमाणात लागले आहेत. भक्तिमय वातावरणात भाविक मोठ्या संख्येने सहभागी होत असून, जय सोपीनाथ महाराजांच्या जयघोषाने परिसर गजबजून गेला आहे. स्थानिक प्रशासनाकडून भाविकांच्या सुविधेसाठी चोख व्यवस्था ठेवण्यात आली आहे.

## घटना-घडामोडी



### वणीच्या रुचिता जुनेजा यांना 'श्लोकरत्न' पुरस्कार

**वणी :** मुंबईत देववाणी ओलंपियाडतर्फे आयोजित संस्कृत श्लोक ओलंपियाड स्पर्धेत वणी येथील रुचिता जुनेजा यांनी 'श्लोकरत्न' पुरस्कार पटकावला. १५ स्तरांमध्ये १५५ श्लोकांचे सादरीकरण असलेल्या या स्पर्धेत त्यांनी आणि त्यांच्या विद्यार्थ्यांनी बाजी मारली. संस्कृत भाषेचा प्रचार आणि प्रसार करण्याच्या उद्देशाने आयोजित या स्पर्धेत देशभरातील स्पर्धक सहभागी झाले होते. रुचिता जुनेजा यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनीही उल्लेखनीय यश मिळवले. यात स्वरा लोणारे हिने 'श्लोकरत्न' पुरस्कार मिळवला. तसेच ओजस्वी देठे, जैनम समदरीया, रिद्धी खाबिया, कायरा काठेड, रेयांश बोथरा, निम्रत सलुजा, आनंदी देठे, रित्वी लोया, शरयू देठे, उर्वी देठे, दिशी अग्रवाल, ईश्वरी सुत्रावे, जैनेश जुनेजा आणि स्वाती बत्रा यांना 'श्लोकाचार्य' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या उपक्रमासाठी नवकार इंग्लिश स्कूल आणि लायन्स इंग्लिश मिडियम स्कूलचे सहकार्य लाभले. 'संस्कृत से संस्कार' हे ब्रीद घेऊन हा उपक्रम राबवला जात असून वणीतून विजेत्यांचे कौतुक होत आहे.



### टाकळीत राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर

**उमरखेड :** राष्ट्रीय सेवा योजना ही युवकांना घडवणारी कार्यशाळा असून राष्ट्राच्या उभारणीत युवकांचे योगदान महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन डॉ. अनिल काळबांडे यांनी केले. टाकळी (न.) येथे गोपीकाबाई सीताराम गावंडे महाविद्यालयाच्या वतीने आयोजित शिबिरात ते बोलत होते. येथील राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या बौद्धिक सत्रात 'राष्ट्रनिर्मितीत युवकांची भूमिका' या विषयावर मिलिंद महाविद्यालय, मुळावाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. अनिल काळबांडे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला कवी नितीन शिंदे, डॉ. संदीप चेडे आणि पोलिस पाटील शंकर हापसे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. डॉ. चेडे यांनी सिकलसेल आजारावर मार्गदर्शन केले, तर नितीन शिंदे यांनी कवितेतून शेतकऱ्यांची व्यथा मांडली. डॉ. काळबांडे यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार युवकांसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. शिबिराचे आयोजन प्राचार्य डॉ. माधवराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अधिकारी डॉ. त्रिरत्न भगत, डॉ. विठ्ठल जिवतोडे आणि डॉ. सरला निंभोरकर यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुहासिनी राऊत, सूत्रसंचालन तन्वी शिंदे व प्रीती कदम यांनी केले, तर आभार प्रीती चंदनवार हिने मानले.



### पुसदच्या सर्वेश्वर महादेव मंदिरात शिवमहिम्न पठण सप्ताह

**पुसद :** येथील शंकरनगरस्थित श्री सर्वेश्वर महादेव मंदिरात माघ महिन्यानिमित्त आयोजित सात दिवसीय शिवमहिम्न स्तोत्र पठण सप्ताहाची सांगता उत्साहात झाली. सुनीता तगलपल्लेवर यांच्या मार्गदर्शनाखाली महिलांनी भगवान शंकराची आराधना केली. माघ मासाच्या पावन पर्वावर शंकरनगरातील महिलांनी या सप्ताहात सहभाग घेतला. सुनीता तगलपल्लेवर यांच्या नेतृत्वात सात दिवस नियमित स्तोत्र पठण करण्यात आले. सप्ताहाच्या समारोपाला शिवमहिम्न स्तोत्राच्या घोषात महादेवाला दुग्धाभिषेक करण्यात आला. त्यानंतर उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. या धार्मिक उपक्रमामुळे संपूर्ण नगरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. अनेक भाविकांनी या सोहळ्याला हजेरी लावून दर्शन घेतले. मंदिराचे मुख्य विश्वस्त शाम जोशी यांनी सांगितले की, माघ महिन्यात मंदिरात सातत्याने धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. तसेच आगामी महाशिवरात्रीचा उत्सवही मोठ्या उत्साहात आणि भव्य स्वरूपात साजरा केला जाणार आहे.




### संत नामदेव महाराज मूर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिन उत्साहात

**यवतमाळ :** जांब मार्गावरील मंदिरात संत नामदेव महाराज समाज उन्नती मंडळाच्या वतीने आयोजित मूर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिन सोहळा विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम आणि गुणवंत विद्यार्थी सत्काराने उत्साहात पार पडला. सप्ताहाची सांगता राजू साखरकर यांच्या कीर्तनाने झाली. सुभाष ढोणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाला बाळासाहेब मांगुळकर, भास्कर टोम्पे, बिपीन चौधरी, भगवान कापसे, नितीन तिजारे, विजय देशकर, जितेंद्र फुसे, गजानन तिजारे उपस्थित होते. यावेळी अधिकारी शुभम तिजारे यांचा सत्कार छाया व काशिनाथ तिजारे यांच्यासह झाला. सांस्कृतिक कार्यक्रमात मनीषा ढोणे, बेबी दांडेकर, राखी देशकर, अर्चना चिंचोळकर, ममता गोहणे सहभागी होत्या. कार्यक्रमासाठी विनेश वंदेकर, राहुल ढोणे, नितीन कापसे, सुनील डवले, अजय दीडमुठे, अजय गोहणे, योगेश चिंचोळकर, मनोहर कापसे, श्रीकांत बोबडे, सुनील कापसे, संगीता दांडेकर, नरेंद्र फुसे, विशाल चवलढाल, कल्पना फुसे, कल्याणी तिजारे यांनी परिश्रम घेतले.

# यवतमाळात स्वच्छतेचा बोजवारा

## नगरसेवक डॉ. नीरज वाघमारे यांनीच हातात घेतले घंटागाडीचे स्टिअरिंग!

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. ७ :** यवतमाळच्या प्रभाग क्रमांक १० मध्ये शनिवारी (दि. ७) प्रशासनाला चपराक लगावणारे एक अनोखे दृश्य पाहायला मिळाले. कचरा संकलन करणारे ई-रिक्षा चालक आणि सफाई कामगार गैरहजर असल्याने संतापलेले नगरसेवक डॉ. नीरज वाघमारे यांनी स्वतःच्या हातात स्टिअरिंग घेत चक्क ई-रिक्षा चालवित कचरा संकलन केले. सत्ताधारी भाजपच्या काळातही शहराची स्वच्छता 'रामभरोसे' असल्याचे या घटनेने पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे.




यवतमाळ नगरपालिकेतून प्रशासक राजवट संपुष्टात आली आणि भारतीय जनता पार्टीची सत्ता स्थापन झाली. 'नवे पर्व, नवी आशा' फोल ठरली असून, शहराची अवस्था 'जैसे थे' नव्हे तर अधिकच बिकट झाली आहे. शनिवारी सकाळी प्रभाग क्रमांक १० मधील नागरिक कचरा गाडीची वाट पाहत होते, पण कंत्राटी कर्मचारी गायब होते. अखेर गटनेते डॉ. नीरज वाघमारे यांनी स्वतः ई-रिक्षाचा ताबा घेतला आणि घरोघरी जाऊन कचरा गोळा केला. हे दृश्य पाहून प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. शहरात कचरा संकलनाचा मक्ता खासगी ठेकेदाराला देण्यात आला आहे. मात्र, या ठेकेदारावर नगरपालिकेचा कोणताही वचक राहिलेला नाही, असा आरोप होत आहे. कामगार वेळेवर येत नाहीत, ई-रिक्षांचे फेरे अनियमित आहेत आणि मनमानी कारभार सुरू आहे. डॉ. वाघमारे यांनी थेट मैदानात उतरून या भोंगळ कारभाराचे वाभाडे काढले. 'सत्ताधारी आणि प्रशासन केवळ बघ्याची भूमिका घेत आहेत. जर लोकप्रतिनिधीलाच कचरा गोळा करावा लागत असेल, तर यापेक्षा मोठे प्रशासकीय अपयश ते काय?' असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला. केवळ प्रतिकात्मक आंदोलन न करता त्यांनी प्रत्यक्ष कचरा उचलून नागरिकांच्या तक्रारीही जाणून घेतल्या. ठेकेदार, आरोग्य निरीक्षक आणि संबंधित अधिकाऱ्यांची साखळीच या गैरव्यवस्थेला जबाबदार असल्याचा आरोप होत आहे. 'जबाबदारी झटकून चालणार नाही. कामचोर ठेकेदार आणि दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई झाली नाही, तर यापेक्षा तीव्र आंदोलन छेडले जाईल,' असा इशारा वाघमारे यांनी दिला आहे. ही घटना केवळ एका प्रभागापुरती नसून संपूर्ण शहराची हीच 'कचरा कथा' झाल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे.

### कायद्यालाच फासला हरताळ

स्वच्छ भारत अभियान आणि 'कचरा व्यवस्थापन नियम २०१६' नुसार शहरात कचरा संकलनाचे काटेकोर नियम आहेत. यात ओला आणि सुका कचरा वेगळा गोळा करणे, नियमित डंपिंग ग्राउंडवर नेणे आणि शहराचे आरोग्य अबाधित राखणे हे पालिकेचे बंधनकारक कर्तव्य आहे. मात्र, यवतमाळमध्ये या सर्व नियमांना ठेकेदाराने केराची टोपली दाखवली आहे. नियम कागदावरच राहिले असून, प्रत्यक्षात शहराचे 'उकिरडा' झाले आहे. प्रशासनाच्या नाकाखाली नियमांची पायमल्ली होत असताना अधिकारी मूग गिळून गप्प का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### कामगारांची सुरक्षा वाऱ्यावर?

कचरा संकलन करणाऱ्या कामगारांना किमान सुरक्षा साधने मिळणे आवश्यक आहे. मात्र, ठेकेदाराकडून कामगारांना ना गणवेश दिला जातो, ना ओळखपत्र. ई-रिक्षांचे रोजचे फेरे निश्चित नाहीत आणि कामगारांची हजेरीही बायोमेट्रिक पद्धतीने होत नसल्याने मोठा भ्रष्टाचार होत असल्याचा संशय आहे. कामगारांच्या जीवाशी खेळ आणि पालिकेच्या तिजोरीची लूट, असा दुहेरी प्रकार सुरू असताना सत्ताधाऱ्यांचे याकडे सोयीस्कर दुर्लक्ष होत आहे.

# माळेगावात हरभरा पिकाची शेतीशाळा

## नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचा उपक्रम

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**सावळी सदोबा, दि. ७ :** आर्णी तालुक्यातील माळेगाव येथे नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत हरभरा पिकाची शेतीशाळा आयोजित करण्यात आली होती. यावेळी शेतकऱ्यांना हरभरा पिकावरील रोगराई नियंत्रण आणि उत्पादन वाढीबाबत मंडळ कृषी अधिकारी वर्षा भोसले यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.



सावळी सदोबा परिसरातील मौजे माळेगाव येथे हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला. या शेतीशाळेत वर्षा भोसले यांनी हरभरा पिकावर येणाऱ्या विविध किडी आणि रोगांची ओळख पटवून देत त्यांच्या प्रतिबंध व नियंत्रणाबाबत तांत्रिक माहिती दिली. तसेच, कृषी विभागाने विकसित केलेल्या 'महाविस्तार ॲप'चा शेतकऱ्यांना कसा फायदा होऊ शकतो, हे समजावून सांगितले. या ॲपद्वारे पीक सल्ला, हवामान माहिती, कीड-रोग निदान आणि शासकीय योजनांची माहिती कशी मिळवावी, याचे प्रात्यक्षिक देण्यात आले. कृषी सहाय्यक एम. एन. बळवंते यांनीही यावेळी हरभरा पिकाच्या सुधारित लागवड पद्धती आणि उत्पादन वाढीसाठी आवश्यक उपाययोजनांवर मार्गदर्शन केले. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती फायदेशीर करण्यावर भर देण्यात आला. या कार्यक्रमाला परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# परमडोह येथून सोमवारी 'वारी प्रबोधनाची'चा दुसरा टप्पा

## किशोर गज्जलवार यांच्याहस्ते होणार उद्घाटन

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**वणी, दि. ७ :** तालुक्यातील परमडोह येथे ग्रामसमृद्धी आणि सामाजिक प्रबोधनाच्या उद्देशाने आयोजित 'वारी प्रबोधनाची' उपक्रमाच्या दुसऱ्या टप्प्याचा शुभारंभ सोमवारी (दि. ९) होणार आहे. नारायण बाबा देवस्थानात किशोर गज्जलवार यांच्या हस्ते आणि मधुकर वाभिटकर यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा पार पडणार आहे.

सकाळी १० वाजता परमडोह येथील श्री नारायण बाबा देवस्थानात विधिवत पूजेने वारीला सुरुवात होईल. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मधुकर वाभिटकर, तर स्वागताध्यक्ष रुपलता निखाडे असतील. उद्घाटक म्हणून गटविकास अधिकारी किशोर गज्जलवार आणि प्रमुख उपस्थितीत मुख्याधिकारी सचिन



गाडे पाटील असतील. यावेळी मार्गदर्शक म्हणून भाऊसाहेब थुटे, रवी मानव, ज्ञानेश्वर रक्षक, दिलीप भोयर, राज घुमणार, उदार उपस्थित राहणार आहेत. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून संजय निखाडे, विठ्ठल डाखरे, नेताजी पारखी, संतोष वऱ्हाटे, कवडू वडस्कर आणि संकेत गज्जलवार यांची उपस्थिती असेल. 'वारी प्रबोधनाची' अंतर्गत गावोगावी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांचा जागर, स्वच्छता, व्यसनमुक्ती आणि ग्रामविकासावर जनजागृती केली जाणार आहे. यासाठी भजन, कीर्तन आणि भारुडाचा वापर होईल. वारीच्या स्वागतासाठी गावे सज्ज झाली असून रांगोळ्या आणि तोरणांनी परिसर सजला आहे. गावकरी आणि श्रीगुरुदेव भजन मंडळ या उपक्रमासाठी परिश्रम घेत आहेत.

### CAPTION हर हर महादेव...



**म्हसोला (का.) : येत्या १५ फेब्रुवारीला होणाऱ्या महाशिवरात्रीच्या पर्वावर शिवालयांकडे ओढ लागलेले भाविक... 'हर हर महादेव' आणि 'बम बम भोले'च्या जयघोषात आणि भक्तिमय वातावरणात महादेवाच्या दर्शनासाठी निघालेले म्हसोला परिसरातील ग्रामीण शिवभक्त. हातामध्ये पताका, मुखात शिवनामाचा जप आणि मनात अपार श्रद्धा घेऊन मजल-दरमजल करत मार्गक्रमण करणारी ही दिंडी. (छायाचित्र : बंडू हलबी, म्हसोला)**

# दोन कोटींची मंजूर कामे त्वरित सुरू करा

## जुनेद शेख यांची मागणी : अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**आर्णी, दि. ७ :** नगरपरिषदेच्या पहिल्या सर्वसाधारण सभेत एकमताने मंजूर झालेली आणि आमदारांच्या निधीतून होणारी २ कोटी रुपयांची विकासकामे त्वरित सुरू करा, अन्यथा शहरवासीयांना सोबत घेऊन तीव्र 'अन्नत्याग आंदोलन' करण्यात येईल, असा सडेतोड इशारा सामाजिक कार्यकर्ते जुनेद शेख यांनी दिला आहे. काही विघ्नसंतोषी लोकांकडून निराधार तक्रारी करून शहराच्या विकासात अडथळे आणले जात असल्याचा आरोप करीत शेख यांनी मुख्याधिकाऱ्यांना थेट अल्टीमेटम दिला आहे.




आर्णी नगरपरिषदेच्या निवडणुका तब्बल ४-५ वर्षांच्या विलंबाने पार पडल्या. तत्पूर्वी, मुख्याधिकारी रवींद्र राऊत यांनी प्रशासक म्हणून शहराचा कारभार अत्यंत नियमबद्ध आणि लोकहिताला प्राधान्य देत हाकला. दरम्यान, २०२५-२६ च्या निवडणुकीनंतर पार पडलेल्या पहिल्याच सर्वसाधारण सभेत आमदारांनी शहरासाठी मंजूर केलेल्या २ कोटींच्या निधीचा विषय मांडण्यात आला. तांत्रिक कारणास्तव प्रलंबित असलेला हा निधी आणि त्याअंतर्गत होणारी विकासकामे सर्व सदस्यांच्या एकमताने मंजूर करण्यात आली. जुनेद शेख यांनी स्पष्ट केले की, ही संपूर्ण निविदा प्रक्रिया शासनाच्या नियमांचे पालन करून, पूर्णतः पारदर्शक आणि स्पर्धात्मक पद्धतीने राबविण्यात आली आहे. यामध्ये कोणताही गैरव्यवहार झालेला नाही. तरीही काही स्वार्थी घटकांकडून केवळ राजकीय हेतूने किंवा वैयक्तिक स्वार्थासाठी या विकासकामांमध्ये जाणीवपूर्वक अडथळे आणले जात आहेत. विकासाला खीळ घालणाऱ्या अशा प्रवृत्तींमुळे शहराचे नुकसान होत आहे. त्यामुळे मुख्याधिकाऱ्यांनी अशा निराधार तक्रारींकडे पूर्णतः दुर्लक्ष करून जनहिताची ही कामे तात्काळ सुरू करावीत. लोकप्रतिनिधींनीही राजकारण बाजूला ठेवून शहराच्या प्रगतीसाठी काम करावे. प्रशासनाने वेळीच दखल न घेतल्यास विकासाची आस धरणारे नागरिक एकत्र येऊन उपोषण करतील, असे जुनेद शेख यांनी स्पष्ट केले आहे.


# आठ वर्षांतच दिग्रस-आर्णी महामार्गाला पडल्या भेगा

## प्रवाशांचा जीव धोक्यात, प्रशासन गप्प का?, राष्ट्रीय महामार्ग बोजवारा, कंत्राटदाराची उघड लूट

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**दिग्रस, दि. ६ :** दिग्रस-आर्णी राष्ट्रीय महामार्गावर (एनएच१६१-अ) अवघ्या आठ वर्षांतच कोट्यवधी रुपयांचा 'चुराडा' झाला आहे. विकासाचे स्वप्न दाखवून बनवलेला हा चकाचक रस्ता आता निकृष्ट कामामुळे अक्षरशः 'मृत्यूचा सापळा' बनला आहे. जागोजागी पडलेल्या भेगा, वाढलेली झाडेझुडपे आणि जीवघेण्या प्रवासाने नागरिक त्रस्त असताना, कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांच्या सोयीस्कर दुर्लक्षामुळे संताप व्यक्त होत आहे.






परिसरातील दळणवळणाचा कणा मानल्या जाणाऱ्या दिग्रस-आर्णी राष्ट्रीय महामार्गाची अवस्था सध्या 'असून अडचण, नसून खोळंबा' अशी झाली आहे. अवघ्या आठ वर्षांपूर्वी जनतेच्या करातून कोट्यवधी रुपये खर्च करून हा महामार्ग तयार करण्यात आला. मात्र, आज या रस्त्यावर पडलेल्या भेगा पाहता, कामात मोठ्या प्रमाणात 'पाणी मुरल्याचे' स्पष्ट होत आहे. रस्ता तयार होऊन दशकही पूर्ण झाले नसताना त्याची अशी चाळण होणे, हे संबंधित ठेकेदार आणि देखरेख करणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे. महामार्गाच्या दोन्ही बाजूंना वाढलेल्या झाडाझुडपांनी दिशादर्शक फलक, गावांचे नावफलक आणि अंतर दर्शविणारे दगड पूर्णपणे झाकले गेले आहेत. त्यामुळे वाहनचालकांना रस्ता आणि वळणांचा अंदाज येत नसून, ते देवाच्या भरवश्यावर वाहने चालवत आहेत. विशेषतः रात्रीच्या वेळी हा प्रवास अधिकच धोकादायक ठरत आहे. प्रशासनाकडून या मार्गाची साधी साफसफाई किंवा देखभालही केली जात नसल्याने संताप व्यक्त होत आहे. तूपटाकळी गावाजवळ तर परिस्थिती आणखी विदारक आहे. मुख्य रस्त्यालगतच शेणखताचे उकिरडे आणि कचऱ्याचे ढिग साचले आहेत, ज्यामुळे महामार्गाची रुंदी निम्म्यावर आली आहे. अशा ठिकाणी अपघाताची टांगती तलवार असतानाही, अतिक्रमण हटविण्याची जबाबदारी असलेली यंत्रणा 'गांधारीची भूमिका' का घेत आहे? असा सवाल उपस्थित होत आहे. अनेक ठिकाणी रेडियम पट्ट्या नसल्याने रात्री वाहने चालवणे जिकिरीचे झाले आहे. काही हॉटेल व्यावसायिकांनी तर दिशादर्शक फलकांवर स्वतःच्या जाहिराती लावून शासकीय मालमत्तेचा गैरवापर सुरू केला आहे, तरीही प्रशासन कारवाई करण्यास धजावत नाही, हे दुर्दैव आहे.

### प्रवासी निवाऱ्यांचा झाला 'सांगाडा'

महामार्गावरील प्रवासी निवाऱ्यांची अवस्था अत्यंत भयावह झाली आहे. लाख-रायाजी फाट्यावरील निवारा पूर्णपणे झाडांनी वेढला गेला आहे, तर कलगाव फाट्यावरील निवारा काही महिन्यांपूर्वी वाहनाच्या धडकेने तुटला असून तो तसाच उभा आहे. खांब मोडलेले, छप्पर लटकलेले आणि नावफलक गायब अशा स्थितीत जीव मुठीत धरून प्रवासी वाहनांची वाट पाहत आहेत. वाईमेंढी आणि कलगाव फाट्यावर नियमानुसार दोन्ही बाजूंना निवारे आवश्यक असताना, केवळ एकाच बाजूला ते उभारून ठेकेदाराने हात वर केले आहेत. मृद व जलसंधारण मंत्री ना. संजय राठोड यांच्या प्रयत्नातून उभारलेल्या काही निवाऱ्यांचीही पडझड झाली असून देखभाल शून्य आहे.

## महत्त्वाचे

### मनब्दा येथे जिल्हा मेळाव्याचा शुभारंभ



**अकोट:** स्काऊट-गाईड चळवळ ही शिस्त, देशभक्ती आणि समाजभान जपणारे सुजाण नागरिक घडविण्याचे कार्य करते, असे प्रतिपादन आमदार प्रकाश भारसाकळे यांनी केले. गुलालशेष महाराज संस्थान, मनब्दा (ता. तेल्हारा) येथे आयोजित भारत स्काऊट-गाईड अकोला जिल्ह्याच्या ३६ व्या तीनदिवसीय जिल्हा मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.मेळाव्याचे उद्घाटन विधान परिषद सदस्य आ. किरण सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा मुख्य आयुक्त तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) रतनसिंग पवार, गटविकास अधिकारी अशोक बांबर, सहायक गटविकास अधिकारी शहीद अख्तर, सरपंच सीमा पार्थीकर, उपसरपंच शेषराव पोहरकर, गटशिक्षणाधिकारी सुनीता तळोकार, संस्थानचे अध्यक्ष विजय पार्थीकर, उपाध्यक्ष सुभाष शिखरे, मुख्याध्यापक संघ अध्यक्ष विलास खुमकर, माजी राज्य आयुक्त डॉ. वसंतराव काळे, बजरंग पार्थीकर व विश्वासराव पार्थीकर यांची प्रमुख उपस्थिती होती.याप्रसंगी स्काऊट-गाईड चळवळीतील विशेष योगदानाबद्दल डॉ. वसंतराव काळे यांना पी.टी. बाळापुरे स्काऊट-गाईड जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. प्रास्ताविक रतनसिंग पवार यांनी केले. सूत्रसंचालन श्रीकृष्ण डांबलकर यांनी, तर आभार

# हिरपूर येथे पॉवरग्रिडच्या प्रसारण लाईन कामावर शेतकऱ्यांचे प्रश्नचिन्ह

## मोबदल्याचा खुलासा करण्याची मागणी; अन्यथा काम रोखण्याचा इशारा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी





**हिरपूर : दि. ७ :** पॉवरग्रिड वेस्ट सेंट्रल ट्रान्समिशन लिमिटेड या कंपनीकडून उभारण्यात येणाऱ्या ८०० केव्ही एचव्हीडीसी बायपोल प्रसारण लाईन प्रकल्पाच्या कामावरून हिरपूर व परिसरातील शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. शेतजमिनीत टॉवर व लाईन जात असताना मोबदल्याबाबत कंपनीकडून स्पष्टता मिळत नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला असून, आधी खुलासा करा, अन्यथा काम रोखू, असा इशारा देण्यात आला आहे.कंपनीच्या सूचनेनुसार, 'राईट ऑफ वे' क्षेत्रातील पिके व झाडांच्या नुकसानीचे मूल्यांकन जिल्हा महसूल प्रशासनामार्फत करून भरपाई दिली जाईल. यासाठी शेतकऱ्यांनी कागदपत्रे सादर करण्याचे आवाहन कंपनीने केले आहे. मात्र, प्रत्यक्षात काम सुरू झाले असतानाही मोबदल्याची निश्चित रक्कम आणि ती मिळण्याचा कालावधी याबाबत ठोस माहिती दिली जात नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.या पार्श्वभूमीवर ऋषिकेश हागे, अविनाश मेहरे, केशव चारथळ, मयूर तिहिले, किरण ठाकरे, सचिन मेहरे, शिवचरण मेहरे, राजू वानखडे, राजू घोडकी, समाधान इंगळे, प्रमोद गावंडे, निलेश गावंडे आदी शेतकऱ्यांनी पारदर्शक माहिती देण्याची मागणी केली आहे. कंपनीने तातडीने बैठक घेऊन शंकांचे निरसन करावे, अशी मागणी हिरपूर परिसरातून होत आहे.

> माझ्या शेतातून लाईन गेली असून, मोबदला कशाच्या आधारे ठरणार याची स्पष्ट माहिती मिळालेली नाही. आधी खुलासा व्हावा, हीच आमची मागणी आहे.
>
> **ऋषिकेश हागे, शेतकरी**

> शेतात हरभरा, गहू व कापूस पिके उभी आहेत. कामामुळे होणाऱ्या नुकसानीचा विचार करून कंपनीने तातडीने मोबदला निश्चित करावा.
>
> **अविनाश मेहरे, शेतकरी**

> मोबदल्याबाबत स्पष्टता नसल्याने संभ्रम आहे. कंपनीने वस्तुस्थिती समोर मांडल्यास काम सुरळीत होण्यास मदत होईल.''
>
> **किरण ठाकरे, शेतकरी**

# महाप्रसादाने विवरा येथे सोपीनाथ महाराज यात्रा संपन्न

## हजारो भाविकांनी घेतला लाभ

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**विवरा : दि. ७ :** पातूर तालुक्यातील विवरा येथे ग्रामदैवत सोपीनाथ महाराजांचा विवाह सोहळा व यात्रा महोत्सव पारंपरिक उत्साहात पार पडला. या महोत्सवानिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता गुरुवारी भव्य महाप्रसादाने करण्यात आली. यावेळी तब्बल १४ क्विंटल ज्वारीची भाकरी आणि ६ क्विंटल डाळीचा महाप्रसाद भाविकांना वितरित करण्यात आला.

सोमवारी सायंकाळी ढोल-ताशांच्या गजरात आणि भक्तिमय वातावरणात सोपीनाथ महाराजांचा विवाह सोहळा संपन्न झाला. सप्ताहादरम्यान दररोज विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यात्रेच्या सांगता दिनी आयोजित महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी विवरा येथे गर्दी केली होती.

विवरा गावासह परिसरातील नागरिक दरवर्षी या यात्रेला कुटुंबासह उपस्थित राहून दर्शन घेतात. या संपूर्ण महोत्सवाच्या यशस्वी नियोजनासाठी विवरा येथील ग्रामस्थांसह तरुणांनी विशेष परिश्रम घेतले, अशी माहिती ग्रामस्थ शे. मुनाफ यांनी दिली.

# जुना अंदुरा दलित वस्तीतील रस्ता, नाली कामांची विभागीय चौकशी करा

## कामांचा दर्जा निकृष्ट असल्याचा ग्रामस्थांचा आरोप; उपोषणाचा इशारा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**जुना अंदुरा: दि. ७ :** बाळापूर तालुक्यातील निंबा अंदुरा सर्कल अंतर्गत येणाऱ्या जुना अंदुरा येथील दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या रस्ता व नालीच्या कामांचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या कामांची तत्काळ विभागीय चौकशी करून कथित दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.दलित वस्ती योजनेतून मंजूर करण्यात आलेली विकासकामे निकषांनुसार झाली नसल्याचा संशय ग्रामस्थांनी तक्रारीत व्यक्त केला आहे. या कामांमध्ये कंत्राटदार आणि संबंधित यंत्रणेची चौकशी व्हावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या कामांची प्रत्यक्ष तांत्रिक पाहणी करून अहवाल सादर करावा, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणात प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन चौकशी न केल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे. या तक्रारीचे निवेदन बाळापूरचे गटविकास अधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार तसेच जुना अंदुरा ग्रामपंचायतीच्या ग्रामविकास अधिकाऱ्यांना सादर करण्यात आले आहे.

> दलित वस्ती योजनेअंतर्गत झालेल्या रस्ता व नाली कामांची सखोल चौकशी करून प्रशासनाने वस्तुस्थिती समोर आणावी आणि निकृष्ट काम असल्यास दोषींवर कारवाई करावी.
>
> **- उत्तम रामचंद्र तायडे** (तक्रारकर्ते ग्रामस्थ, जुना अंदुरा)

# धर्मरक्षण व राष्ट्रभावना जागृतीसाठी हिंदू समाज संघटित व्हावा - प.पू. कनकेश्वरी देवी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अकोट: दि. ७ :** हिंदू समाज संघटित झाला तरच देश बलशाली होऊ शकतो. धर्मरक्षणासाठी आणि राष्ट्रभावना जागृत करण्यासाठी समाजाने एकत्र येणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन प.पू. कनकेश्वरी देवी यांनी केले. गुरुवार, ५ फेब्रुवारी रोजी श्री संत नरसिंग महाराज मंदिर पटांगणात आयोजित विराट हिंदू संमेलनात त्या बोलत होत्या. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी प.पू. कनकेश्वरी देवी होत्या. प्रमुख वक्ते म्हणून प्रा. विवेक बिडवई, तर प्रमुख अतिथी म्हणून अकोला जिल्हा संघचालक ॲड. मोहनराव आसरकर, डॉ. सुहास कुलट, ह.भ.प. अशोक महाराज जायले व चरणसिंग ठाकूर उपस्थित होते. प्रारंभी श्रीराम व भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले.कनकेश्वरी देवी पुढे म्हणाल्या की, घराघरांत संस्कारांची जोपासना होणे आवश्यक असून संत-परंपरेची मूल्ये जपली तरच भारतीय संस्कृती टिकेल. प्रा. विवेक बिडवई यांनी समाज परिवर्तनासाठी सामूहिक इच्छाशक्तीची गरज असल्याचे सांगत, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पंच परिवर्तन (कुटुंब प्रबोधन, पर्यावरण, स्वावलंबन, नागरिक कर्तव्य व सामाजिक समरसता) संकल्पनेवर प्रकाश टाकला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. हरीश ढवळे यांनी केले, तर दीपक तळोकार यांनी वैयक्तिक गीत सादर केले. संमेलनास आकोट शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आरती व प्रसाद वितरणाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# निवडणूक आटोपली; आता आमच्या समस्या कधी सुटणार?

## बार्शीटाकळी शहरातील नागरिकांचा थेट सवाल; नागरी सुविधांचा बोजवारा




अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**बार्शीटाकळी: दि. ७ :** नगर पंचायत निवडणूक पार पडली, नवे नगरसेवक व पदाधिकारी सत्तास्थानी आले; मात्र शहरातील नागरिकांचे मूलभूत प्रश्न अद्याप जैसे थेच आहेत. निवडणुकीपूर्वी रस्ते, पाणी, स्वच्छता आणि रोजगाराबाबत दिलेली मोठमोठी आश्वासने आता प्रत्यक्ष कामातून दिसणार की कागदावरच राहणार, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

शहरात सध्या अस्वच्छतेचे साम्राज्य असून कचराकुंड्यांचा अभाव आणि नाल्यांच्या साफसफाईअभावी सांडपाणी रस्त्यावर साचत आहे. यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यातच भटके कुत्रे व मोकाट जनावरांचा उपद्रव वाढल्याने अपघातांची भीती निर्माण झाली आहे. सार्वजनिक स्वच्छतागृहांची दयनीय अवस्था आणि अपुरी संख्या ही महिलांसाठी मोठी अडचण ठरत आहे.

नगर पंचायत अस्तित्वात येऊनही शहरात अनियमित व अशुद्ध पाणीपुरवठा होत असल्याची ओरड आहे. बाजारपेठेतील रस्त्यांची दुरवस्था आणि वाढती वाहतूक कोंडी यामुळे पादचारी त्रस्त आहेत.

दरम्यान, शहरातील बोगस दवाखान्यांचा विषयही ऐरणीवर आला असून, आरोग्य विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

> ''नगराध्यक्षा म्हणून नुकताच कार्यभार स्वीकारला आहे. शहरातील शेवटच्या घटकापर्यंत नागरी सुविधा पोहोचवणे हे माझे ध्येय आहे. उपलब्ध निधीनुसार समस्यांना प्राधान्य देऊन रखडलेले प्रश्न मार्गी लावले जातील.''
>
> **अख्तर खातून अलिमोद्दीन, नगराध्यक्षा, बार्शीटाकळी**

> पदभार स्वीकारल्यानंतरची प्राथमिक प्रक्रिया पूर्ण झाली आहे. पहिल्या सर्वसाधारण सभेत शहराचे सर्व महत्त्वाचे विषय ठरावात घेतले जातील. आमचा पहिला संकल्प पाणी प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्याचा असून, २०२७ पूर्वी प्रत्येक नागरिकाला हक्काचे पाणी देण्याचा आमचा प्रयत्न राहील
>
> **सैय्यद अबरार सैय्यद मीर, उपाध्यक्ष, बार्शीटाकळी**

# संत सहवासाने मानवी जीवनात सुखाचा वर्षाव

## ह.भ.प. महेबूब शेख महाराज यांचे निरूपण; प्रतिक नगरमध्ये प्रगट दिन सोहळ्याचा उत्साह

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मूर्तिजापूर : दि. ७ :** ''माणूस आयुष्यभर ज्या सुखाच्या शोधात वणवण भटकतो, ते सुख बाहेर कुठेही नसून संतांच्या चरणापाशी आहे. संतांची कृपादृष्टी आणि सहवास लाभल्यास प्रतिकूल परिस्थितीतही मानवी जीवन आनंदाने न्हाऊन निघते,असे प्रतिपादन प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. महेबूब शेख महाराज यांनी केले.

येथील प्रतिक नगरमध्ये आयोजित श्री गजानन महाराज प्रगट दिन व अखंड हरिनाम सप्ताहाच्या सहाव्या दिवशीच्या कीर्तनसेवेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या अवघाची संसार सुखाचा करीन, आनंदे भरीन तीन्ही लोकी या अभंगावर रसाळ निरूपण केले.

महाराजांनी आपल्या विवेचनात सांगितले की, संसारातील दु:खाचा परिहार करण्याची शक्ती केवळ संतांच्या विचारात आहे. संत केवळ उपदेश करत नाहीत, तर ते आपल्या जीवनातील अंधकार दूर करून आनंदाच्या वाटेवर चालण्यास प्रवृत्त करतात. विविध पौराणिक आणि व्यावहारिक दाखल्यांतून त्यांनी सुखाचे गुपित उलगडले. संतांच्या विचाराने अहंकार नष्ट झाला की सुख आपोआप प्राप्त होते, हा विचार त्यांनी मांडला. त्यांच्या अमृतवाणीने उपस्थित भाविक भक्तिरसात चिंब झाले होते.

प्रगट दिनानिमित्त आयोजित या सप्ताहामुळे संपूर्ण परिसरात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे. कीर्तनाला पंचक्रोशीतील भाविकांनी मोठी गर्दी केली होती. टाळ-मृदंगाचा गजर आणि गण गण गणात बोतेच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता.संसार सोडणे म्हणजे संन्यास नव्हे, तर संसारात राहूनही संतांच्या विचाराने आनंदी राहणे हाच खरा परमार्थ आहे,असेही शेख महाराज यांनी नमूद केले.

सप्ताहाची सांगता व प्रगट दिनाचा मुख्य सोहळा रविवारी सकाळी ११ वाजता पार पडणार आहे. या निमित्ताने आयोजित महाप्रसादाचा लाभ सर्व भाविकांनी घ्यावा, असे आवाहन श्री गजानन महाराज मंदिर समिती व प्रतिक नगरवासीयांच्या वतीने करण्यात आले आहे.

**व्यासपीठ** | गणित आणि इंग्रजी विषयाची गोडी वाढविणारा उपक्रम

# बोर्डीच्या शाळेत 'अलेक्सा' देणार विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना उत्तरे

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अकोट: दि. ७ :** बदलत्या काळानुसार ग्रामीण भागातील शिक्षणही आता कात टाकत आहे. अकोट तालुक्यातील पीएम श्री जिल्हा परिषद शाळा, बोर्डी येथे विद्यार्थ्यांच्या जिज्ञासेला मोकळे व्यासपीठ देणारा 'अलेक्सा ॲट युवर सर्विस' हा नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाविषयी प्रचंड उत्सुकता निर्माण झाली असून, त्यांचा आत्मविश्वास वाढण्यास मोठी मदत होत आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये अनेकदा प्रश्न विचारताना संकोच किंवा भीती असते. हीच भीती दूर करण्यासाठी मुख्याध्यापक व शिक्षकांनी अलेक्सा उपकरणाचा कल्पक वापर सुरू केला आहे. इयत्ता पहिली ते आठवीचे विद्यार्थी आता इंग्रजी व हिंदी भाषेतून अलेक्साला थेट प्रश्न विचारत आहेत. सुरुवातीला संकोच करणारे विद्यार्थी आता न अडखळता संवाद साधू लागले आहेत.

विद्यार्थी याद्वो केवळ अभ्यासाचेच नव्हे, तर अन्नपदार्थांची कृती, आजचे तापमान, दिनविशेष, संगीत, विनोद आणि गणितीय कोडी यांची माहिती मिळवत आहेत.

विशेषतः बेरीज, वजाबाकी, गुणाकार आणि भागाकार यांसह क्लिष्ट उदाहरणांची उत्तरे विद्यार्थ्यांना काही सेकंदात मिळत आहेत. या तत्काळ प्रतिसादामुळे मुलांमध्ये अभ्यासाची गोडी निर्माण झाली आहे.

विशेष म्हणजे, या डिजिटल उपक्रमाचा लाभ गावातील माजी विद्यार्थी आणि इतर तरुणही घेत आहेत. अलेक्साच्या आगमनामुळे शाळा परिसरात एक चैतन्यमय वातावरण तयार झाले असून, सरकारी शाळेतील शिक्षण अधिक प्रभावी होत असल्याचे आदर्श चित्र बोर्डी येथे पाहायला मिळत आहे.

> **ज्ञानकक्षा रुंदावण्यास मदत :**
>
> या उपक्रमाबाबत माहिती देताना मुख्याध्यापक उमेश चोरे यांनी सांगितले की, ''आजच्या युगात इंग्रजी ही महत्त्वाची ज्ञानभाषा आहे. अलेक्सासोबतच्या संवादामुळे विद्यार्थ्यांचा शब्दसंग्रह वाढत असून आकलनशक्ती तीव्र होत आहे. या प्रक्रियेतून मुलांची प्रश्ननिर्मितीची क्षमता विकसित होत असून त्यांच्या ज्ञानकक्षा विस्तारत आहेत.

# अकोलखेड येथे नगरसेवक पालेकर यांचा जाहीर सत्कार



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोलखेड : दि. ७ :** अकोट तालुक्यातील अकोलखेड येथे अकोट नगरपालिकेचे नगरसेवक तथा पाणीपुरवठा सभापती अमोल (पिंटू) पालेकर यांचा कलाल समाजाच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला. गुरुवार, ६ फब्रुवारी रोजी सायंकाळी आयोजित या कार्यक्रमात राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जगन्नाथ जांभळे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून भाजपचे अकोला जिल्हा सरचिटणीस राजू नागमते व तालुकाध्यक्ष गोपाल मोहोळ उपस्थित होते. यावेळी अमोल पालेकर यांना शाल व श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले.याच सोहळ्यात अकोलखेडचे सरपंच दिगांबर संपत पिंप्राळे यांना महाराष्ट्र रत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने त्यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास सूर्यकांत पिंप्राळे, घनश्याम बिजने, देविदास शेवळे, हिरामण शेंडे, सुभाष बिजने, गोपाल कावरे, सुरज गणभोज, पुरुषोत्तम जांभळे, पत्रकार श्रीकृष्ण जांभळे व भगवान चवरे उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रमोद पिंप्राळे यांनी केले, तर आभार गोपाल कावरे यांनी मानले.

अजिंक्य भारत
# आपलं बुलडाणा
बुलडाणा,रविवार, दि.८,फेब्रुवारी २०२६



## महत्वाचे

### महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**खामगाव :** स्व. विद्याताई विलासराच मिरगे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ खामगाव येथे महिलांसाठी विशेष मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर दि. ८, ९ व १० फेब्रुवारी २०२६ (रविवार ते मंगळवार) दरम्यान आयोजित करण्यात आले असून महिलांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविला जात आहे. महिलांच्या दैनंदिन धावपळीच्या जीवनात आरोग्याकडे होणारे दुर्लक्ष लक्षात घेऊन एम. डी. डॉ. नेहा शंतनु बोबडे व तज्ज्ञ डॉक्टरांच्या म ार्गदर्शनाखाली ही तपासणी करण्यात येणार आहे. शिबिराची वेळ दुपारी १२ ते ४ वाजेपर्यंत असून स्थळ चव्हाण हॉस्पिटल, मेडिकल स्केअर, जलंब रोड, खामगाव असे आहे. या शिबिरात महिलांच्या विविध आजारांची तव्या डॉक्टरांकडून मोफत तपासणी, आरोग्यविषयक मार्गदर्शन तसेच गरजू महिलांना पुढील उपचारांसाठी योग्य सल्ला देण्यात येणार आहे. खामगाव शहर व परिसरातील जास्तीत जास्त महिलांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन शिव विद्या मॅटर्निटी व चुमन केअर हॉस्पिटल, खामगाव व मिरगे परिवारातर्फे करण्यात आले आहे.

### १८ वर्षीय तरुणी बेपत्ता

**खामगाव :** खामगाव तालुक्यातील शहापूर येथील एक १८ वर्षीय तरुणी घरून निघून गेली. याप्रकरणी खामगाव ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये हरविल्याची तक्रार दाखल करण्यात आली. फिर्यादीनुसार, कुटुंबीय ५ फेब्रुवारी २०२६ रोजी पातूर तालुक्यातील डीग्रस येथे यात्रेसाठी गेले होते. त्यानंतर ६ फेब्रुवारी रोजी पहाटे सुमारे ४ वाजता घरी फोन केल्यानंतर मुलगी घरात नसल्याचे निदर्शनास आले. रात्री साडेदहा वाजता सर्वजण जेवण करून झोपले असताना बेपत्ता मुलगी घरीच होती; मात्र त्यानंतर ती कोणालाही काहीही न सांगता घरातून निघून गेल्याचे स्पष्ट झाले. नातेवाईक व संभाव्य विकाणी शोध घेऊनही बेपत्ता मुलीचा अद्याप पत्ता लागलेला नाही. या प्रकरणाचा तपास पोहेकों बाळकृष्ण फुंडकर करीत आहेत. नागरिकांनी संबंधित माहिती असल्यास खामगाव ग्रामीण पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### 'स्वयं सुरक्षा' या विषयावर कार्यशाळा

**शेगाव:** येथील स्थानिक माऊली अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये ४ फेब्रुवारी रोजी महिला सक्षमीकरण समिती अंतर्गत 'स्वयं सुरक्षा' या विषयावर विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सी. एम. जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कार्यशाळा घेण्यात आली होती. या कार्यशाळेला बी जे शिबरे, अनंता तिबडे, डॉ. मुकेश खेडकर आणि डॉ. संतोष म्हस्के हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाच्या महिला सक्षमीकरण समितीच्या सदस्या प्रा. क्रांति भोयर यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर केले, बावेळी लाठी बालवणे, लॉक चेन चालवणे बासोबतच संकटाच्या काळात आपण कुठल्या डावपेचांचा बापर करून स्वतःची सुरक्षा करू शकतो याचे सर्वांना जाहीर प्रात्याक्षिक करून दाखवण्यात आले. आभार प्रदर्शन धनश्री एड़ांगे हिने केले.

### कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | १९५० - २०२५ |
| गहू | २२०० - २४०० |
| तुर | ५१०० - ७७०० |
| हरभरा | ३८०० - ५३०० |
| सोयाबीन | ४८०० - ६१५० |
| उडीद | ४००० - ६३५० |
| मुग | ५५०० - ५५०० |
| मका | १६०० - १६०० |

# आज शेगावात महाराजांचा १४८ वा प्रगटदिन सोहळा

## दिंड्यांच्या आगमनाने शेगाव नगरी गजबजली, लाखो भाविकांची अलोट गर्दी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**शेगाव दि.७ :** राणा संत श्री गजानन महाराज यांच्या आज १७८ व्या प्रगटदिनानिमित्त शेगाव नगरीत भक्तीमय वातावरण निर्माण झाले असून विदर्भाच्या पंढरीत लाखो भाविकांचा मेळा भरला आहे. प्रगटदिन सोहळ्यासाठी राज्याच्या विविध भागांतून तसेच विदर्भातील अनेक जिल्ह्यांतून पायदळ दिंड्या, टाळ-मृदंगाच्या गजरात शेगावमध्ये दाखल झाल्या आहेत. ''गण गण गणात बोते''च्या जयघोषाने संपूर्ण शेगाव नगरी दुमदुमून गेली आहे.

प्रगटदिनानिमित्त दिंडी मार्ग पूर्णपणे फुलून गेला असून मंदिर मार्गावर पायदळ वारकऱ्यांची मांदियाळी पाहायला मिळत आहे. रस्त्यांच्या दुतर्फा भाविकांसाठी ठिकठिकाणी पाणीछत्रे, अल्पोपहार केंद्रे व विश्रांती व्यवस्था उभारण्यात आली आहे. दिंड्यांचे स्वागत करण्यासाठी नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग घेतला असून सेवाभावाचे दर्शन घडत आहे. भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेता श्री गजानन महाराज संस्थानतर्फे दर्शन व्यवस्थेसाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे. श्रींचे मंदिर ७ व ८ तारखेला दर्शनासाठी रात्रभर खुले ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे भाविकांना सुलभ व सुरळीत दर्शनाचा लाभ मिळणार आहे. गाभा मंदिर परिसरातही विशेष व्यवस्था करण्यात आली असून रांगा शिस्तबद्ध ठेवण्यासाठी सेवाधारी तैनात करण्यात आले आहेत. प्रगटदिन सोहळ्यानिमित्त भक्तांच्या सेवेसाठी विविध सेवाभावी संस्थांनी पुढाकार घेतला आहे. अन्नदान, पाणीपुरवठा, निवास व्यवस्था, स्वच्छता तसेच वैद्यकीय सेवा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. डाबकी रोड रेल्वे गेटपासून ते मंदिर परिसरापर्यंत भाविकांसाठी आरोग्य शिबिरे उभारण्यात आली असून डॉक्टर व आरोग्य कर्मचारी सज्ज ठेवण्यात आले आहेत. भाविकांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून शेगाव शहरात व परिसरात प्रचंड गर्दी उसळली आहे. शहरातील प्रमुख रस्ते, चौक व मंदिर परिसर भाविकांनी फुलून गेला आहे. वाहतूक सुरळीत राहावी यासाठी पोलीस प्रशासन व स्वयंसेवकांची विशेष पथके कार्यरत आहेत. आजचा दिवस संत दर्शनाचा असून ''धन्य आज दिन संत दर्शनाचा'' अशी भावना प्रत्येक भाविकाच्या मुखातून व्यक्त होत आहे. संत गजानन महाराजांच्या प्रगटदिनानिमित्त शेगाव नगरी पुन्हा एकदा भक्ती, सेवा व श्रद्धेच्या महासागरात न्हाऊन निघाली आहे.

**प्रकटदिनानिमित्त मंदिर रात्रभर श्री दर्शनासाठी खुले**

श्री संत गजानन महाराज संस्थान शेगावच्या वतीने श्रींच्या १४८व्या प्रगटदिन उत्सवाकरिता श्रींचे मंदिर दर्शनासाठी दोन दिवस खुले राहणार आहे. यामुळे भाविक भक्तांची मोठी अडचण दूर झाली असून श्रींच्या समाधी मंदिराचे दर्शन घेता येणार आहे. श्रींच्या प्रगटदिन महोत्सवानिमित्त गेल्या सात दिवसापासून मंदिरामध्ये विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

# श्री.नरहरी महाराज सोनार यांचा पुण्यतिथी महोत्सव उत्साहात

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**लोणार दि.७ :** सोनार समाजाचे आराध्य दैवत संत शिरोमणी श्री.नरहरी महाराज सोनार यांच्या ७४० वा पुण्यतिथी महोत्सव सोहळा श्री मंगल कार्यालय लोणार येथे संपन्न झाला. या कार्यक्रमाचे दीप प्रज्वलन प्रकाश मापारी (सचिव श्री.शिवाजी शिक्षण संस्था लोणार)यांच्या हस्ते झाले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून लोणार पोलीस स्टेशनचे ठाणेदार सदगिर, इंगळे, घोगरे , बळीभाऊ मापारी (बुलढाणा जिल्हा प्रमुख शिवसेना शिंदे गट), भूषणभाऊ मापारी (नगराध्यक्षपती तथा नवनिर्वाचित सदस्य न.पा. लोणार), संतोष मापारी (मा.सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती लोणार), अनिकेत मापारी (नवनिर्वाचित न.पा. सदस्य लोणार), मयूर गोलेच्छा(नवनिर्वाचित न.पा. सदस्य लोणार) लाभले, कार्यक्रमाची प्रस्तावना डॉ.प्रदिप इवरकर यांनी केली,प्रथम बळीराम मापारी यांनी आपल्या भाषणात या समाजाला संघटित होण्यासाठी आव्हान केले तसेच संतोष मापारी यांनी या समाजाच्या व्यथा व मागण्या प्रगट केल्या, सुवर्णकार समाज आपापल्या व्यवसायामध्ये व्यस्त असल्यामुळे संघटित होण्यासाठी दुर्लक्ष करतो, यामुळे बरेच ठिकाणी त्यांच्यावर दबाव तंत्र वापरल्या जाते असे परखड मत संतोषभाऊ मापारी यांनी केले, या करिता संघटित होण्यावर भर देणे आवश्यक आहे असे प्रतिपादन केले, या समाजासाठी हक्काचे श्री नरहरी महाराज यांचे समाजमंदिर व सभागृह उपलब्ध करून द्यावे ही सोनार समाजाची मागणी लावून धरली, अध्यक्षीय भाषणात नगराध्यक्षा सौ.म ीरा मापारी यांनी सोनार समाजासाठी हक्काची जागा मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचा शब्द दिला, मंचकावर सन्माननीय जेष्ठ सुवर्णकार मंडळी उपस्थित होते, यानंतर श्रींची विधिवत पूजा झाली, ह.भ.प.श्री.हाडे गुरुजी महाराज यांचे श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांच्या जीवनावर प्रवचन झाले. पटेल नगर महिला भजनी मंडळ यांनी उत्कृष्ट भजने सादर केली व या कार्यक्रमाला विशेष रंगत आणली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.प्रदिप इवरकर यांनी केले, या सोहळ्याचे संपूर्ण नियोजन किशोर उंबरकर, व सर्व सहकारी परमेश्वर बोकन, बप्पी दोलाई, गोविंद शहाणे, अमोल वाकोडे, रवि खंदारकर, संतोष शेडुते यांनी केले, या कार्यक्रमासाठी रंगनाथ खंदारकर, केशवराव ठोसर, बबनराव महामुने, अशोक डहाळे, संतोष वाकोडे,गजानन चौरसकर, राजुभाऊ उदावंत, विठ्ठलराव उडाणशिव. सचिन चौरसकर भाष्कर उंबरकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# जुगार अड्ड्यावर कारवाई; गुन्हा दाखल

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.७ :** शेगाव तालुक्यातील डोलारखेड गाव परिसरात सुरू असलेल्या अवैध जुगार अनुधावर जलेब पोलिसांनी धडक कारवाई करत बरली मटका खेळविणाऱ्या एका इसमाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई गुप्त माहितीच्या आधारे करण्यात आली असून, आरोपीकडून रोख रक्कम व जुगाराचे साहित्य जप्त करण्यात आले आहे. या प्रकरणी महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२ (अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स. पो. कॉ. रविंद्र रामेश्वर गायकवाड (पोलीस स्टेशन जलंब) यांनी माबाचत फिर्याद दिली असून आरोपी गजानन यशवंत जुमडे (४०) रा. डोलारखेड, ता. शेगाव, जि. बुलढाणा याच्याविरुद्ध ही कारवाई करण्यात आली. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी २.१५ वाजताच्या सुमारास डोलारखेड येथील अतिक्रमित जागेवर सार्वजनिक ठिकाणी आरोपी लोकांकडून पैसे स्वीकारून त्यांना वरली मटका अंक व आकडे लिहिलेल्या चिकूचा देऊन जुगार खेळत व खेळवित असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पंचासमक्ष पोलीस पथकाने घटनास्थळी छापा टाकला. छाप्यादरम्यान आरोपीकडून रोख रकम ४,९२० रुपये, व वरली मटका अंक लिहिलेली चिठ्ठी असा एकूण ४,९२५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीस नोटीस देऊन सोडण्यात आले आहे.

# रमाई जयंतीनिमीत्य सामान्य ज्ञान स्पर्धेचे बक्षिस वितरण

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**साखरखेर्डा ७:** स्थानिक एस. ई. एस हायस्कूल तथा जुनिअर कॉलेज येथे आज दि.७/०२/२०२६ ला जिल्हास्तरीय सामान्य ज्ञान परीक्षेचे बक्षीस वितरण करण्यात आले.

प्रथमतः मा जिजाऊ, सावित्रीबाई फुले, माता रमाई, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. नंतर शिवदास रिंढे यांनी आपल्या भाषणातून रमाईचे योगदान विशद केले. खुल्या गटामधून प्रथम बक्षीस दहा हजार रुपये स्मृतीचिन्ह प्रमाणपत्रासहित रमेश लक्ष्मण मोरे या स्पर्धकाला देण्यात आले. द्वितीय अंकित दीपक इंगोले सात हजार रुपये बक्षीस या स्पर्धकाला देण्यात आले. तृतीय दिपाली पांडुरंग टाले पाच हजार रुपयांचे बक्षीस या स्पर्धकाला देण्यात आले. चतुर्थ बक्षीस विशाल आराख या स्पर्धकाला देण्यात आले. पाचव बक्षीस स्वरा गौतम जाधव एक हजार रुपये या स्पर्धकाला देण्यात आले. प्राथमिक गटामधून अनुक्रमे प्रथमेश धोंडीबा गायकी, प्रतीक दीपक गव्हाड, आदिती मनोज पऱ्हाड या स्पर्धकांना बक्षीस देण्यात आले. यावेळी शिवदास रिंढे तालुका अध्यक्ष काँग्रेस कमिटी तथा सरपंच मोहाडी, राजूभाऊ ठोके माजी सभापती पंचायत समिती सिंदखेडराजा व्ही .एम. ठाकूर प्राचार्य एस.ई. एस हायस्कूल तथा ज्युनिअर कॉलेज साखरखेर्डा, दर्शनकुमार गवई माजी उपसरपंच साखरखेर्डा, सुमेध गवई उपसरपंच वरोडी, सुभाष गवई मुख्याध्यापक गुंज, दिलीप इंगळे सामाजिक कार्यकर्ते साखरखेर्डा, देवानंद खंडागळे ग्रामपंचायत सदस्य साखरखेर्डा हे मान्यवर उपस्थित होते. यावेळी संदीप इंगळे पँथर नेते, प्रवीण गवई, महिंद्र भालके अमर इंगळे, सुनील भुसारी , सावन सरकटे, सुरज खिल्लारे, यांनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले.

# मजबूती का नाम महात्मा गांधी या विषयावर चंद्रकांत झटाले यांचे व्याख्यान

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा ७ :** महाराष्ट्र गांधी स्मारक निधी पुणे संचालित गांधी घर, पाडळी व जिजामाता महाविद्यालय बुलडाणा यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दि. १० फेब्रुवारी रोजी दु. ३.३० वाजता अकोला येथील प्रसिद्ध गांधी अभ्यासक चंद्रकांत झटाले यांचे मजबूती का नाम महात्मा गांधी या विषयावर व्याख्यानाचे आयोजन स्थानिक जिजामाता महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून जिजामाता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन चांगोले राहणार असून जिल्ह्यातील अभ्यासक, विचारवंत, साहित्यिक , पत्रकार आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या व्याख्यानासाठी नागरिकांनी व युवक व विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजन समितीचे सदस्य प्रा.डॉ. संतोष आंबेकर, प्रा. डॉ. कि. वा. वाघ, ॲड. जयसिंग देशमुख, प्रा .रविंद्र साळवे, चंद्रशेखर केने, सुरेश साबळे, पंजाबराव गायकवाड, शाहिना पठाण, डॉ. विजयाताई काकडे, अस्मिता ठोंबरे, डॉ. अस्मिता ठोंबरे, ज्योती पाटील, प्रा . शिल्पा ठाकरे, प्रा.सुरेखा इंगळे., प्रा सुनील सपकाळ, प्रा डॉ. कैलास पवार , प्रा . डॉ. जे. जे. जाधव, प्रा डॉ सुबोध चिंचोले, प्रा . महेंद्र सौभागे यांनी केले आहे.

# जिल्हा परिषद क्रीडा स्पर्धांचे बक्षीस वितरण जल्लोषात

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि.७ :** स्थानीय जिल्हा क्रीडा संकुल येथे आयोजित जिल्हा परिषद अधिकारी व कर्मचारी यांच्या क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमातील विजेत्याा खेळाडू व कलावंतांचा बक्षीस वितरण समारंभ जल्लोषात पार पडला. सांघिक व वैयक्तिक विविध क्रीडा प्रकारात मिळविलेल्या उल्लेखनीय यशाच्या पार्श्वभूमीवर मोताळा पंचायत समितीने सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. तर चिखली पंचायत समिती या स्पर्धांमध्ये उपविजेता ठरले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांच्या हस्ते हा बक्षीस वितरण समारंभ पार पडला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सुविद्य पती रिपिका खरात,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक पांडुरंग कोल्हे, क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा आयोजन समितीचे सदस्य सचिव तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी आशिष पवार, माध्यमिक शिक्षणाधिकारी अनिल अकाळ,रणजीत सिंह राजपूत, अन्य खातेप्रमुख व गटविकास अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. या बक्षीस वितरण समारंभात विविध क्रीडा प्रकारात तसेच सांस्कृतिक प्रकारामध्ये वैयक्तिक व सांघिक अशा दोन्ही गटात प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावणाऱ्या खेळाडूंचा तसेच संघांचा स्मृतिचिन्हे व प्रमाणपत्र देऊन मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.त्याचप्रमाणे या औचित्याावर बुलढाणा तालुक्यातील जिल्हा परिषद

# टाकरखेड वायाळ येथे महिला शेतीशाळेचा चौथा वर्ग संपन्न

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**सिंदेखडराजा दि.७ :** तालुक्यातील टाकरखेड वायाळ येथे नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोखरा) अंतर्गत महिला शेतीशाळा वर्ग क्र. ४ आणि विविध कृषी योजनांच्या माहितीचा कार्यक्रम नुकताच उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून गावातील महिला व पुरुष शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान आणि शासकीय योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली. तज्ज्ञांकडून तांत्रिक मार्गदर्शन यावेळी हरभरा पिकावरील घाटे अळीचे व्यवस्थापन कसे करावे, यावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. हरभरा पीक वाढीच्या अवस्था आणि योग्य वेळी करावयाची कीड नियंत्रण यावर तज्ज्ञांनी प्रकाश टाकला. तसेच, शेतीमध्ये तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी महाविस्तार या प्रणालीबाबत उपस्थित शेतकऱ्यांना अवगत करण्यात आले, ज्यामुळे शेती अधिक सोपी व फायदेशीर होऊ शकते. या कार्यक्रमाला देऊळगाव राजाचे तालुका कृषी अधिकारी भगवान कछवे, मंडळ कृषी अधिकारी अनंता अंभोरे, सहाय्यक कृषी अधिकारी प्रणव वाघ आणि समूह सहाय्यक सागर सौदर यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित अधिकाऱ्यांनी पोखरा योजनेअंतर्गत मिळणारे अनुदान, विविध लाभ आणि प्रक्रियेबाबत ग्रामस्थांशी संवाद साधला. लोकसहभाग आणि नियोजन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावच्या सरपंच सौ. संगीता गजानन वायाळ होत्या. यावेळी उपसरपंच खरात, ग्रामपंचायत सदस्य, ग्राम कृषी समितीचे सदस्य तसेच मोठ्या संख्येने महिला व पुरुष शेतकरी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे नेटके नियोजन कृषी विभागाचे सहाय्यक कृषी अधिकारी प्रणव वाघ यांनी केले होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कृषी ताई मंगला वायाळ आणि समूह सहाय्यक सागर सौदर यांनी विशेष परिश्रम घेतले. या उपक्रमामुळे टाकरखेड वायाळ परिसरातील महिला शेतकऱ्यांमध्ये शेती तंत्रज्ञानाविषयी नवा उत्साह पाहायला मिळत आहे.

**प्रकाशन** प्रा.डी एस लहाने लिखित 'माझे बाबा माझी प्रेरणा' पुस्तकाचे प्रकाशन

# वाचकाला प्रत्ययानुभूती येणे हा साहित्य निर्मितीचा गुणधर्म असतो- प्रा. देशमुख

अंजिक्य भारत / प्रतिनिधी



**बुलडाणा दि.७ :** पुस्तक वाचत असताना वाचकाला उत्कष्ट अनुभूती आली पाहिजे. वाचकाला प्रत्ययानुभूती येणे हा साहित्य निर्मितीचा महत्वाचा गुणधर्म असल्याचे बारोमासकार प्रा. सदानंद देशमुख म्हणाले. प्रा. डी एस लहाने लिखित माझे बाबा, माझी प्रेरणा पुस्तकाचे प्रकाशन प्रसंगी ते बोलत होते.

सहकार व सामाजिक क्षेत्रात कार्यरत प्रा. डी एस लहाने यांनी वडिलांकडून मिळालेली वैचारिक शिदोरी माझे बाबा माझी प्रेरणा या पुस्तकात शब्दबद्ध केली आहे. या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ ५ फेब्रुवारी रोजी शिवसाई कॉम्प्लेक्स, जुना अजिसपूर रोड येथे मान्यवरांच्या हस्ते पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी डॉक्टर वसंतराव चिंचोले होते. तर ग्रामीण कवी तुळशीराम मापारी, डॉ. कि वा वाघ, प्रा.डी एम कानडजे, पि डी सपकाळ, सौ दिपाली पाटील, साहित्यिक वैशाली तायडे, पत्रकार राजेंद्र काळे, पत्रकार गणेश निकम, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष नरेश शेळके, प्राचार्य शाहिनाताई पठाण, पत्रकार सुरेखा सावळे, प्रतिभा भुतेकर, अनिता कापरे, प्रा. रवींद्र साळवे, प्रा. पारवे, प्रा. ज्योती पाटील, सौ.मीनाताई लहाने, ॲड. संदीप जाधव, किरण पाटील, दिनकर पांडे आदींची उपस्थिती लाभली. प्रास्ताविक डी एस लहाने यांनी केले. बाबांच आचरण हाच आपल्यासाठी महत्वाचा संदेश होता असे ते म्हणाले. साधे सरळ जीवन जगण्याची शिकवण बाबानी दिली. त्यांनी दिलेले विचारधन शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न केला असल्याचे पुस्तकाचे लेखक प्रा.डी एस लहाने यांनी सांगून पुस्तक निर्मितीची प्रक्रिया उलगडली. तर होत्याचं नव्हतं झाल्यावरही जो डगमगत नाही तो ''बाप'' अशा शब्दात ग्रामीण कवि तुळशीराम मापारी यांनी भावना व्यक्त केल्या. प्रा. डी एस लहाणे यांनी वडिलांच्या आठवणी पुस्तक रूपाने मांडल्यात, हे पुस्तक पुढच्या पिढीला प्रेरणा देणारे ठरेल असे साहित्यिक वैशाली तायडे म्हणाल्या.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.वसंतराव चिंचोले, नरेश शेळके, कि.वा.वाघ, शेळके गुरुजी, पि.डी.सपकाळ, प्रा.कानडजे यांनी विचार व्यक्त केले. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते पुस्तक लेखन सहाय्य केल्याबद्दल सौ.दिपाली पाटील इंगळे यांचा कौटुंबिक विशेष सत्कार करण्यात आला. संचलन रवींद्र साळवे तर आभार प्रदर्शन पत्रकार गणेश निकम यांनी मानले. शिवसाई परिवार व मानस फाउंडेशनने कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# नेत्रदान चळवळीचे प्रणेते जगदीश बाहेकरांचा आदर्श

## आईला निरोप देतानाही जपले रुग्णसेवेचे व्रत

अंजिक्य भारत / प्रतिनिधी



**चिखली दि.७ :** आईच्या निधनाचे अतीव दुःख उराशी असतानाही, रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा हे ब्रीद जपत बाहेकर कुटुंबीयांनी एक हृदयस्पर्शी आदर्श समाजासमोर ठेवला आहे. तालुक्यातील किन्होळा येथील रहिवासी मनकर्णाबाई शेषराव बाहेकर (वय ८४) यांचे ६ फेब्रुवारी रोजी पहाटे वृद्धापकाळाने निधन झाले. या दुःखद प्रसंगी त्यांचे पुत्र जगदीश आणि भास्कर बाहेकर यांनी मातोश्रींचे नेत्रदान करून दोन अंधांच्या जीवनात प्रकाशाची नवी पहाट आणण्याचा महान निर्णय घेतला.

विशेष म्हणजे, जगदीश बाहेकर यांनी आपल्या सेवाकाळात वाशिम जिल्ह्यात नेत्रदान चळवळ उभी करून राज्याच्या पटलावर कौतुकास्पद कामगिरी बजावली होती. त्यांच्याच प्रयत्नांमुळे एकेकाळी वाशिम जिल्हा सामान्य रुग्णालयाची ख्याती दृष्टी देणारे रुग्णालय म्हणून संपूर्ण पूर्व विदर्भात निर्माण झाली होती. सेवानिवृत्त नेत्र चिकित्सा अधिकारी असलेल्या बाहेकर यांनी आपली ही जनसेवेची कामगिरी निवृत्तीनंतरही अविरत सुरू ठेवली असून, आज स्वतःच्या आईच्या निधनानंतरही त्यांनी हे व्रत तितक्याच निष्ठेने जपले. मनकर्णाबाई बाहेकर यांच्या निधनानंतर अंत्यसंस्कार करण्यापूर्वी बाहेकर बंधूंनी नेत्रदानाचा संकल्प केला. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. बिराजदार आणि जिल्हा अंधत्व निवारण कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. रवी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. यावेळी नेत्र शल्य चिकित्सक डॉ. अमोल उगले, नेत्र चिकित्सा अधिकारी राजेंद्र देवकर, प्रवीण सोलंकी आणि समुपदेशक योगेश सिरसाठ यांनी तातडीने कार्यवाही केली.

मृत्यूनंतरही आपल्या मातोश्रींचे डोळे या जगाकडे पाहत राहतील, या भावनेने बाहेकर कुटुंबीयांनी घेतलेल्या या धाडसी निर्णयाचे किन्होळा परिसरात आणि आरोग्य क्षेत्रातून मोठे कौतुक होत आहे. एका सेवाभावी अधिकाऱ्याने स्वतःच्या दुःखावर मात करून समाजाला दिलेला हा संदेश खऱ्या अर्थाने माणुसकीची ज्योत प्रज्वलित करणारा ठरला आहे.

## महत्त्वाचे

### तरूणी बेपत्ता

**शहापूर :** तालुक्यातील शहापूर येथील रहिवासी ऋतुजा रामेश्वर कळंब (१८) ही तरूणी ५ फेब्रुवारी २६ रोजी रात्री सर्वांसोबत जेवण करून झोपायला गेली. झोपल्यानंतर रात्री १०.३० ते ६ फेब्रुवारी रोजी पहाटे ४ वाजेदरम्यान कोणाला काही न सांगता घरून निघून गेली होती. यानंतर तिचा सर्वत्र शोध घेतला असता मिळून शाहीत नयायानी खामगाव ग्रामीण पोस्टेला दिलेल्या फिर्यादीवरून बेपत्ताची नोंद घेण्यात आली आहे. पुढील तपास पोहेकों, बाळकृष्ण फुंडकर करीत आहे.

### गाजी फाउंडेशनचे रक्तदान शिबीर संपन्न

**खामगाव :** स्थानिक गाजी फाउंडेशनच्या वतीने थैलीसिमीया आजाराने ग्रस्त ओवेस नामक रूग्णासाठी रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. शिबीरात साई जीवन ब्लड बँकेच्या सहकार्याने ५१ युनिट रक्त संकलन करण्यात आले. यावेळी गाजी फाउंडेशनचे अध्यक्ष जव्वाद अफजल खान, सचिव दादु बेग, उपाध्यक्ष बबलु कादरी, इमरान खान, जफर खान, मो. मेमन, अबु तालीब, हाफीज अबाज व सदस्यांच्या सहकार्याने रक्तदान शिबीर यशस्वीपणे पार पडले. यावेळी जव्वाद अफजल खान यांनी साई जीवन ब्लड बँकेचे आभार व्यक्त केले. तसेच गरजु रुग्णांना रक्तदान करण्याचे आवाहन केले.

### टेंभुर्णा शिवारात वन्यप्राण्यांचा धुमाकुळ

**खामगाव :** तालुक्यातील टेंभुर्णा शिवारात मागील काही दिवसांपासून रानडुक्कर व निलगायींच्या कळपांनी धुमाकुळ घातला आहे. रात्रीच्या वेळी वन्य प्राणी शेतामध्ये शिरून गहू, हरभरा, कांदा, मका आदी रब्बी पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान करीत आहे. तर काही शेतामधील पिके पुर्ण जमिनदोस्त केली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. उभ्या पिकांची नासाडी होत असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. वन विभागाने त्वरीत लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे.

### पथदिवे लावण्याची नागरिकांची मागणी मान्य

**खामगाव :** जलंब रस्त्यावरील अमृत नगर व वाडी परिसरात पथदिव्यांमुळे अंधुक प्रकाश पडत होता. त्यामुळे परिसरातील नागरिकांना रात्रीच्या वेळी अंधुक प्रकाशातून रहदारी करावी लागत होती. प्रशासकाचे राज्य संपले व भाजपचे राज्य न.प. मध्ये आल्यानंतर त्या भागातील नगराध्यक्षा महिलांनी सौ. अपर्णा फुंडकर यांच्याकडे ४ फेब्रुवारी २६ रोजी निवेदन दिले होते. त्यामध्ये पथदिवे अंधुक प्रकाश देत असल्यामुळे मोठे पथदिवे लावण्यात यावे, अशी मागणी केली होती. महिलांच्या या मागणीची नगराध्यक्षा सौ. अपर्णा फुंडकर यांनी त्वरीत देखल घेतली व त्वरीत ५ फेब्रुवारी २६ पासून मोठे पथदिवे बसविण्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

### वारकऱ्याचा अपघातात मृत्यू

**खामगाव :** बुलढाणा तालुक्यातील सावळा येथील रहिवासी जनार्दन दगडु गाडेकर (६५) यांना आज ७ फेब्रुवारी २६ रोजी सकाळी ६ वाजताच्या सुमारास सामान्य रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले असता वैद्यकीय अधिकारी यांनी तपासणी करून मृत घोषीत केलें. जनार्दन गाडेकर हे दिंडीसोबत जात असतांना त्यांचा लासुरा फाट्याजवळ अपघात झाल्याचे समजते. याप्रकरणी सामान्य रुग्णालयाचे डॉ. धोटे यांच्यातर्फे कक्षसेवक विलास वडोदे यांनी दिलेल्या मेमोवरून शहर पोस्टे येथे कलम १९४ भान्यासुसं नुसार मर्ग दाखल केला आहे.

# राष्ट्रीय आयुष आरोग्य मेळावा

## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू करणार उद्घाटन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**शेगाव दि.७ :** भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या वतीने संत गजानन महाराजांच्या पावन नगरी शेगाव येथे २५ ते २८ फेब्रुवारी दरम्यान ''राष्ट्रीय आयुष आरोग्य मेळावा २०२६'' चे आयोजन करण्यात आले आहे. या भव्य आरोग्य मेळाव्याचे उद्घाटन भारताच्या महामहीम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती केंद्रीय आयुषमंत्री प्रताप जाधव यांनी शेगाव येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली. केंद्रीय मंत्री प्रताप जाधव यांनी सांगितले की, आयुष विभागाच्या माध्यमातून देशभरात पारंपरिक उपचार पद्धतींचा प्रचार व प्रसार करण्यासाठी हा मेळावा आयोजित करण्यात येत आहे.

उद्घाटन सोहळ्याला महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंदआबा पाटील, सहपालकमंत्री संजय सावकारे, कामगारमंत्री आकाश फुंडकर, आमदार डॉ. संजय कुटे तसेच अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलन ट्रस्टचे अध्यक्ष पद्मश्री पद्मविभूषण वैद्य देवेंद्र त्रिगुणा आणि आयुर्वेद महासंमेलनाचे अध्यक्ष वैद्य प्रा. राकेश शर्मा यांना निमंत्रित करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे आयोजन करण्याची जबाबदारी अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलनावर सोपविण्यात आली असून, आयोजन समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. आशुतोष गुप्ता यांची नियुक्ती करण्यात आली आहे. १९०७ साली स्थापन झालेली ही संस्था आयुर्वेद क्षेत्रातील देशातील सर्वात जुनी व मोठी संघटना असून यापूर्वी अनेक राज्यस्तरीय व राष्ट्रीय आरोग्य मेळावे त्यांनी यशस्वीरीत्या आयोजित केले आहेत. चार दिवस चालणाऱ्या या आरोग्य मेळाव्यात नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करून त्यांना आयुष उपचार पद्धतीनुसार औषधोपचार उपलब्ध करून दिले जाणार आहेत. आयुर्वेद, युनानी, सिद्धा, सोवा-रिग्पा, होमिओपॅथी, निसर्गोपचार आणि योग या उपचार पद्धतींबाबत तज्ज्ञांच्या व्याख्यानांद्वारे मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच या मेळाव्याचा फायदा बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांनाही होणार असून वनऔषधी लागवड व त्याचे आर्थिक महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. देशभरातील विविध आयुष औषध निर्माता कंपन्यांचा या मेळाव्यात सहभाग असणार आहे. या कंपन्यांकडून गुड मॅन्युफॅक्चरिंग प्रॅक्टिसेसचा अवलंब कसा केला जातो, तसेच आयुर्वेद क्षेत्रातील नवीन संशोधन व औषधनिर्मिती तंत्रज्ञानाची माहिती नागरिकांना दिली जाणार आहे. औषध उत्पादकांसाठी विशेष कार्यशाळांचे आयोजनही करण्यात येणार आहे. याशिवाय वनऔषधी प्रदर्शनाच्या माध्यमातून परिसरात उपलब्ध असलेल्या औषधी वनस्पतींचा उपयोग करून कमी खर्चात उपचार कसे करता येतील याबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. आपण आयुष मंत्री म्हणून कार्यभार स्वीकारल्यानंतर आयुष क्षेत्राला बळकटी देण्यासाठी अनेक अभिनव उपक्रम राबविण्यात येत असल्याचे प्रताप जाधव यांनी सांगितले. देश का प्रकृती परीक्षण अभियानांतर्गत १.३९ कोटी नागरिकांनी सहभाग घेतला असून या अभियानाने पाच गिनीज विश्वविक्रम नोंदविले आहेत. तसेच जागतिक आरोग्य संघटनेच्या सहकार्याने पारंपरिक औषधोपचारांवरील जागतिक परिषद दिल्ली येथे यशस्वीरीत्या पार पडल्याचे त्यांनी सांगितले.

# आ.श्वेता महाले पाटील यांच्या पाठपुराव्याने दोन महत्वाचे ग्रामीण रस्ते खुले

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**चिखली दि.७ :** चिखली विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागातील वाहतूक सुलभ करण्याच्या दृष्टीने आमदार सौ. श्वेता महाले पाटील यांच्या सातत्यपूर्ण प्रयतांतून दोन महत्वाच्या रस्त्यांवरील अडथळे दूर करण्यात येऊन संबंधित कामांना प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली आहे. या प्रक्रियेत चिखली तहसीलचे नायब तहसीलदार मुरलीधर गायकवाड यांनी प्रशासनाच्या वतीने समन्वय साधून महत्त्वाची भूमिका बजावली.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत ३० ऑक्टोबर २०२५ रोजी मंजूर झालेला सवना येथील गजानन इंगळे यांचे शेत ते शेलुद हा तीन किलोमीटर लांबीचा शेतरस्ता काही कारणांमुळे अनेक दिवस बंद होता. प्रशासन व स्थानिक शेतकऱ्यांशी चर्चा करून हा रस्ता तीस फूट रुंदीने पूर्णपणे खुला करण्यात आला असून रस्त्याच्या कामालाही सुरुवात करण्यात आली आहे. तसेच पीएमजेएसवाय (प्रधानमंत्री ग्राम सडक योजना) अंतर्गत मंजूर झालेला हराळखेड ते डूमा हा साडेतीन किलोमीटर लांबीचा रस्ताही गेल्या दीड वर्षांपासून प्रलंबित होता. या रस्त्यापैकी जवळपास दोन किलोमीटर भागाची आखणी करून तो मोकळा करण्यात आला असून चार जेसीबी मशिनच्या सहाय्याने आजच सुमारे चाळीस फूट रुंदीचा रस्ता तयार करण्यात आला. यानंतर ठेकेदारामार्फत पुढील बांधकाम कामालाही सुरुवात करण्यात आली आहे. दोन्ही रस्ते खुले झाल्यामुळे संबंधित गावांतील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून शेतीमाल वाहतूक, दळणवळण आणि ग्रामीण विकासाला चालना मिळणार असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# सांस्कृतिक महोत्सवाच्यानिमित्ताने तबला वादन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**मंगरूळ नवघरे दि.७ :** एरव्ही जिल्हा परिषदेच्या कागद आणि फाईलीच्या प्रचंड व्यापात सतत व्यस्त असणारी बोटं सांस्कृतिक महोत्सवाच्या निमित्ताने तबल्यावर थिरकली.

जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांनी गुरुवारी रात्री सांस्कृतिक महोत्सवात तबला वादन केले. बँजोच्या साथीने त्याांनी त्रिताल व केरवातील सुंदर बोलांनी नटरंगमधील धुनवर जुगलबंदी रंगवली. त्यांच्या या वादन कौशल्याला उपस्थित रसिकांनी भरभरून दाद दिली. जुगलबंदीत तन्मयतेने तबला वादनात रममाण झालेल्या गुलाब खरात यांच्या विविध भावमुद्रा मुक्त छायाचित्रकार रविकिरण टाकळकर यांनी आपल्या कॅमेऱ्यात क्षणबध्द केले.

# स्वसंरक्षण प्रशिक्षण वर्गाचा समारोपीय कार्यक्रम

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी




**खामगाव दि.७ :** गो. से. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालयामध्ये ३ जानेवारी ते १२ जानेवारी २०२६ रोजी सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त ''जागर स्त्री पुरुष समानतेचा'' हा सप्ताह साजरा करण्यात आला होता. या सप्ताहांतर्गत महिला सक्षमीकरण व उद्योजकता विकास समिती आणि इनर व्हील क्लब खामगाव यांच्या संयुक्त विद्यमाने ०६ जानेवारी ते २६ जानेवारी २०२६ स्वसंरक्षण प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते.

हा प्रशिक्षण वर्ग खामगाव शहरातील सर्व मुले, मुली व महिला आणि पुरुष या सर्वांसाठी खुला होता. या प्रशिक्षण वर्गामध्ये कुडो, तलवार आणि लाठीकाठी याचे प्रशिक्षण देण्यात आले. हा प्रशिक्षण वर्ग एकूण २० दिवसांसाठी होता. यामध्ये एकूण ७५ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला व व्यवस्थितरित्या प्रशिक्षण वर्ग पूर्ण केला. दिनांक ०४ फेब्रुवारी २०२६ रोजी स्वसंरक्षण प्रशिक्षण वर्गाचा समारोपीय कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एस. तळवणकर होते तर प्रमुख उपस्थिती म्हणून अजिंक्य बोबडे, होते तसेच कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून सौ. स्वाती अग्रवाल, तसेच सौ. नेहा गणात्रा, उपस्थित होते. प्रा. खांडे मॅडम, अलका अग्रवाल, अंजू अग्रवाल, डॉ. बोचे तसेच डॉ. रेश्मा मारवाडी समन्वयक प्रशिक्षक कुणाल सोनले यांनी व्यासपीठावर आपले स्थान भूषवले. सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सन्माननीय व्यासपीठाकडून प्रमाणपत्र देण्यात आले.

# रासेयोच्या विशेष श्रम संस्कार शिबिराचे उद्घाटन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**साखरखेर्डा दि.७ :** येथील स्व. भास्करराव शिंगणे कला, प्रा. नारायणराव गावंडे विज्ञान व आशालता गावंडे वाणिज्य महाविद्यालयाच्या येथील स्व. भास्करराव शिंगणे कला, प्रा. नारायणराव गावंडे विज्ञान व आशालता गावंडे वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रम संस्कार शिबिराचे उद्घाटन दि.२ फेब्रुवारी रोजी ग्राम रताळी येथे संपन्न झाले.

अध्यक्षस्थानी नेहरू युवा क्रीडा व सांस्कृतिक मंडळाच्या अध्यक्षा प्रा. डॉ. सौ. मिनल गावंडे हे होत्या. तर कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून रताळी येथील सरपंच श्रीमती उषाताई पाटील उपस्थित होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस पाटील श्रीमती मंदाताई जाधव, तसेच रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. राजू पोपळघट, सहायक कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेश किटके, महिला कार्यक्रम अधिकारी कु. रागिणी तापडिया उपस्थित होत्या. दत्तक ग्राम रताळी येथे दि. १/२/२०२६ ते ८/२/२०२६ दरम्यान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना प्रा. डॉ. सौ. मिनल गावंडे यांनी श्रमप्रतिष्ठा स्वच्छता आणि मानवाचा संपूर्ण विकास करण्यासाठी विद्यार्थी जीवनात रासयोची भूमिका महत्वाची असल्याचे मत व्यक्त केले. महाविद्यालयातील रासेयो पथकाच्या माध्यमातून कार्यक्षम स्वयंसेवक घडविण्याच्या सातत्याने प्रयत्ना असतो असे म्हणून त्यांनी जीवनात श्रममूल्याचे महत्व स्पष्ट केले.

# जिल्हा परिषद क्रीडा स्पर्धांचे बक्षीस वितरण

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि.७:** स्थानीय जिल्हा क्रीडा संकुल येथे आयोजित जिल्हा परिषद अधिकारी व कर्मचारी यांच्या क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमातील विजेत्या खेळाडू व कलावंतांचा बक्षीस वितरण समारंभ जल्लोषात पार पडला. सांघिक व वैयक्तिक विविध क्रीडा प्रकारात मिळविलेल्या उल्लेखनीय यशाच्या पार्श्वभूमीवर मोताळा पंचायत समितीने सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. तर चिखली पंचायत समिती या स्पर्धांमध्ये उपविजेता ठरले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांच्या हस्ते हा बक्षीस वितरण समारंभ पार पडला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सुविद्य पत्नी रिपिका खरात, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक पांडुरंग कोल्हे, क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा आयोजन समितीचे सदस्य सचिव तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी आशिष पवार, माध्यमिक शिक्षणाधिकारी अनिल अकाळ, रणजीत सिंह राजपूत, अन्य खातेप्रमुख व गटविकास अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. या बक्षीस वितरण समारंभात विविध क्रीडा प्रकारात तसेच सांस्कृतिक प्रकारामध्ये वैयक्तिक व सांघिक अशा दोन्ही गटात प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावणाऱ्या खेळाडूंचा तसेच संघांचा स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

# शिवसेनेची आढावा बैठक उत्साहात

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**शेगाव दि.७:** येथील विश्राम भवनमध्ये येऊ घातलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेना पदाधिकारी व शाखाप्रमुखांची महत्त्वपूर्ण आढावा बैठक उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. संघटनात्मक बांधणी अधिक भक्कम करण्याच्या आणि आगामी निवडणुकांमध्ये प्रभावी कामगिरी करण्याच्या दृष्टीने ही बैठक निर्णायक ठरली.

बैठकीस जिल्हाप्रमुख संतोष पाटील डिवरे, चेतन पाटील घिवे (युवा सेना लोकसभा अध्यक्ष), शेगाव तालुका प्रमुख रामा पाटील थारकर, शेगाव शहर प्रमुख संतोष लिप्ते, युवा सेनेचे तालुकाप्रमुख, युवा सेनेचे उपजिल्हाप्रमुख, किसान सेनेचे उपजिल्हाप्रमुख, महिला आघाडीचे उपजिल्हाप्रमुख, शिवसेनेचे उपतालुकाप्रमुख, विभाग प्रमुख, शाखाप्रमुख तसेच मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते. बैठकीच्या प्रारंभी महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते स्वर्गीय अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यांच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करत दोन मिनिटे मौन पाळण्यात आले. यानंतर आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक तयारीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. बूथस्तरावरील यंत्रणा सक्षम करणे, मतदारांशी प्रत्यक्ष संवाद वाढवणे, स्थानिक प्रश्नांवर प्रभावी भूमिका मांडणे तसेच पक्षाची धोरणे तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी कार्यकर्त्यांना दिशा देण्यात आली. जिल्हाप्रमुख संतोष पाटील डिवरे यांनी एकजूट आणि शिस्तबद्ध कार्यावर भर देत सर्व पदाधिकाऱ्यांना सक्रियतेचे आवाहन केले. बैठकीत सर्वांनी एकदिलाने काम करण्याचा निर्धार व्यक्त करत आगामी निवडणुकांमध्ये पक्षाचा विजय निश्चित करण्याचा संकल्प केला. सकारात्मक आणि प्रेरणादायी वातावरणात बैठक संपन्न झाली.

**मागणी** रुग्णवाहिकांच्या वाहन चालकांचा आत्मदहनाचा इशारा

# कंत्राटी रुग्णवाहिकांच्या वाहन चालकांचे २१ महिन्यापासून वेतन नाही

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी




**लाखनवाडा दि. ७:** राज्याच्या आरोग्य सेवेतील बुलढाणा जिल्ह्यातील १०२ च्या रुग्णवाहिकांचे १७ कंत्राटी चालकांना गेल्या २१ महिन्यापासून वेतन न मिळाल्याने या कामगारांवर उपासमारीची वेळ येत आहे. त्यामुळे या सर्व आरोग्य सेवेतील कंत्राटी रुग्णवाहिकांच्या चालकांनी याबाबत आत्मदहनाचा इशारा दिला असून, त्यांच्या मागण्यांची निवेदन त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे , उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह बुलढाणा जिल्हाधिकारी व जिल्हा शल्यचिकित्सक बुलढाणा यांना निवेदन दिले असून त्यांनी निवेदनाद्वारे आत्मदहनाचा इशारा दिला आहे.

त्या नमूद प्रमाणे बुलढाणा जिल्ह्यामध्ये रुग्णालयाच्या १०२ च्या रुग्णवाहिकांचे १८ वाहनचालकांचे २१ महिन्यापासून थकीत वेतन मिळालेले नाही तसेच कामावरून कमी केलेल्या सर्व कंत्राटी वाहन चालकांना पुनर्नियुक्ती देण्यात यावी. त्यासोबतच वेतन दर महिन्याचे पाच तारखेच्या आत करण्यात यावे, अशा मागण्या यामध्ये नमूद आहेत. वेतन मिळाल्याबाबत अकरा सात २०२५ रोजी निवेदन सादर करण्यात आले होते, परंतु सदर अर्जावर माज जिल्हा शल्य चिकित्सक बुलढाणा उपसंचालक आरोग्य सेवा अकोला मंडळ यांना दिलेल्या निवेदनावर कोणतीच कार्यवाही न केल्यामुळे आम्हाला नाईलाज असतो. जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा यांच्या कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषणास बसावे लागले होते परंतु, जिल्हा शल्य चिकित्सक बुलढाणा यांनी तोंडी आश्वान दिल्याने उपोषण सोडविण्यात आले होते. त्यावेळी त्यांनी पंधरा दिवसाचे आत सर्व कंत्राटी वाहन चालकांची १८ महिन्यांचे वेतन देण्यात येईल असे सांगितले होते. मात्र त्यावर कोणत्याच प्रकारची कारवाई झालेली दिसत नाही. दिवाळी सारखा मोठा सण असूनही सुद्धा सर्व कंत्राटी वाहन चालकांचे थकीत वेतनामुळे सर्व कंत्राटी वाहन चालकांना कुटुंबावर आर्थिक संकट येऊन पडले असून आहे. दिवाळी सारखा सण सुद्धा त्यांना वेतन मिळाल्यामुळे लागला ही फार गंभीरतेची बाब आहे. येणाऱ्या १० फेब्रुवारी २०२६पर्यंत आरोग्य सेवेतील रुग्णालयाच्या कंत्राटी वाहन चालकांच्या मागण्या मान्य न झाल्यास सामूहिक आत्म दहन करू असा इशारा या रुग्णालयाच्या वाहन चालकांनी दिला आहे. या निवेदनावर सय्यद वहीत सय्यद हमीद, संतोष यादव काकड, सुरेंद्र फकीरचंद चव्हाण यांच्या सह अनेक कंत्राटी वाहनचालकांच्या सह्या आहेत.

# समृद्धी महामार्गावर नो पार्किंगवरच वाहनांची पार्किंग

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**डोणगाव दि.७ :** समृद्धी महामार्ग हा डोणगाव येथून जातो, मात्र मागील काही महिन्यापासून येथील चॅनल क्रमांक २६८ व २६७ च्या मधात नेहमीच अपघात घडतात, ज्याला अपघाताचे कारण ठरते इमर्जन्सी लेंवर उभे राहणारी वाहने. मात्र या वाहनावर कोणतीही कारवाई होत नाही ज्याला पाहता ही वाहने नेहमीच उभी राहतात व इमर्जन्सी लेनवर जाता येता येत नसल्याने अपघात घडतात.

मुंबई ते नागपूर हा प्रवास जलद गतीने व्हावा त्यासोबतच मालवाहू वाहनांना लवकरात लवकर पोहोचता यावे यासाठी समृद्धी महामार्गाचा वापर वाढला मात्र याच समृद्धी महामार्गावर मानवी चुकामुळे अनेक अपघात घडत आहेत. ज्याला पाहता प्रशासन अपघाताचे विश्लेषण सुद्धा करते ज्यात समृद्धी महामार्गावर इमर्जन्सी लेंनवर वाहने उभे करू नये असे सांगण्यात येते. मात्र समृद्धी महामार्गावर नागपूर कॉरिडॉर व मुंबई कॉरिडॉर या दोन्ही बाजूने चॅनल नंबर २६७ व २६८ च्या मधात इमर्जन्सी लेंनवर वाहने उभी राहतात. समृद्धी महामार्ग सुरक्षेसाठी स्थानिक पोलीस सोबतच महामार्ग पोलीस दिलेली आहे. ज्यांचे काम आहे की समृद्धी महामार्गावर होणाऱ्या अपघात व समृद्धी महामार्गाची सुरक्षा पाहणे, मात्र याच समृद्धी महामार्गावर इमर्जन्सी लेनवर दररोज शेकडो वाहने उभी राहतात, यावर कोणतीच कारवाई होत नाही. समृद्धी प्रशासनाने या ठिकाणी कॅमेरे लावून याची पाहणी करणे, गरजेचे आहे. तर पेट्रोल पंपाच्या बाजूला रेस्ट पॉईंट वर जी वाहने लावली जातात त्यांच्याकडून होणारी वसुली सुद्धा थांबण्यात यावी. जेणेकरून वाहनधारक नो पार्किंग मध्ये वाहन न लावता रेस्ट पॉईंट वर वाहने लावतील.

अजिंक्य भारत •

# आपलं जालना

जालना, रविवार, दि. ८ फेब्रुवारी २०२६ www.ajinkyabharat.com




## महत्त्वाचे

### विज्ञान प्रदर्शनात आदर्श मगरेचा गौरव

**अंबड :** नागपूर येथील राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात मत्स्योदरी विद्यालयाचा इयत्ता आठवीतील बालवैज्ञानिक आदर्श सुभाष मगरे याने बहुउपयोगी रोबोट हा नावीन्यपूर्ण अभिनव प्रयोग सादर केला. याबद्दल उपस्थित मान्यवरांच्या हस्ते आदर्श मगरे व विज्ञान विषयांचे मार्गदर्शक शिक्षक अनिल गायकवाड यांना सहभागी झाल्याबद्दल प्रशस्तिपत्र व गौरव चिन्ह देवून सत्कार करण्यात आला, याबद्दल आदर्श मगरे याचे संस्थेचे अध्यक्ष राजेश टोपे, सचिव मनीषा टोपे, प्रशासकीय अधिकारी डॉ. बाबासाहेब गायकवाड, राहुल भालेकर, सुनील अंभोरे, रमेश पवार, नारायण खरात, नितीन खरात, संतोष पाटील, किसन केसकर, शरद जाधव, ज्ञानेश्वर अवढळ, सोमनाथ बोचरे आदींनी कौतुक केले आहे.

### होळीचे नैसर्गिक रंग तयार करण्यासाठी प्रशिक्षण

**जालना :** खरपुडी येथील कृषी विज्ञान केंद्राअंतर्गत गृहविज्ञान विभागामार्फत ग्रामीण महिला व युवतींसाठी होळीचे नैसर्गिक रंग तयार करणे या विषयावरील चारदिवसीय कालावधीचा प्रशिक्षण कार्यक्रम १० ते १३ फेब्रुवारीदरम्यान खरपुडी येथील कृषी विज्ञान केंद्रात आयोजित करण्यात आला आहे. यात महिलांना होळीसाठी लागणाऱ्या रंगाची निर्मिती प्रत्यक्षिकाद्वारे दाखवण्यात येणार आहे. यात कडूलिंब, पालक, बिटरूट, हळद, नीळ, वावडींग पळस फूल इत्यादी नैसर्गिक स्रोतापासून विविध प्रकारची रंगनिर्मिती तसेच रंगाचे पॅकिंग, लेबलिंग व मार्केटिंग आदी विविध विषयांवर माहिती देण्यात येणार आहे. तसेच प्रशिक्षणात तज्ज्ञ व्यक्तीकडून मार्गदर्शन करण्यात येणार आहे. इच्छुकांनी प्रशिक्षणासाठी शास्त्रज्ञ डॉ. संगीता कन्हाळे यांच्याकडे ९ फेब्रुवारीपर्यंत नोंदणी करावी, असे आवाहन केले आहे.

### स्त्री जातीचे अर्भक आढळले

**परतूर :** वाटूर येथील मुख्य चौकात शुक्रवारी पहाटेच्या सुमारास एक नवजात स्त्री जातीचे अर्भक बेवारस आढळले.

अज्ञात व्यक्तीने सदर अर्भक कागदात गुंडाळून बेकरीच्या पायरीवर ठेवले होते. सकाळी साडेअकराच्या सुमारास ग्रामस्थांच्या निदर्शनास हा प्रकार आला. नागरिकांनी वाटूर पोलिस चौकीला ही माहिती दिली. पोलिसांनी अर्भकाला ताब्यात घेऊन पुढील उपचारासाठी आणि तपासणीसाठी तातडीने वाटूर प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. जालन्याच्या जिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले.

# सर्वसामान्यांच्या विकासाला दिशा देणारा अर्थसंकल्प-भास्कर दानवे

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. ७ :** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी १ फेब्रुवारी २०२६ रोजी केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ संसदेत सादर केला, या संदर्भात केंद्र सरकारच्या धोरणांची, विकासात्मक दृष्टीकोनाची व सर्वसामान्य जनतेसाठी असलेल्या तरतुदींची माहिती देण्यासाठी भारतीय जनता पार्टीच्या वतीने आयोजित करण्यात आलेला प्रचार-प्रसार व जनजागृती कार्यक्रम आज वाघ्रूळ ता.जालना येथे संपन्न झाला. यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांची प्रमुख उपस्थिती होती.



या कार्यक्रमाला जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभले. मार्गदर्शन भाषणात ते म्हणाले की, ''केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ हा देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठीचा विकासाचा स्पष्ट आराखडा आहे. शेतकरी, कष्टकरी, मध्यमवर्ग, महिला आणि युवक यांना केंद्रस्थानी ठेवून हा अर्थसंकल्प सादर करण्यात आला आहे. ''शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, थेट लाभ हस्तांतरण यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. पायाभूत सुविधा, रस्ते, रेल्वे, आरोग्य व शिक्षण क्षेत्रात केलेल्या तरतुदी देशाच्या सर्वांगीण विकासाला गती देतील. देशाला आर्थिक, सामाजिक आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम बनवणे हेच सरकारचे ध्येय आहे असेही त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमास जिल्हा सरचिटणीस वसंतराव शिंदे, तालुकाध्यक्ष संजय डोंगरे, प.स. सदस्य गजानन खरात, सरपंच सुधाकर खरात, सरपंच विलास खरात, उपसरपंच गोविंद खरात, विष्णू डोंगरे, विठ्ठल इंदलकर, करण निकाळजे, नागेश अंभोरे, सतीश जारे, शाम खरात, शिवा पाटील खरात, विलासराव खरात, शेवाळे सर, रामजी खरात, शरद खरात, कैलास खरात, राधेश्याम खरात, गणेश शेवाळे, तुळशीदास शेवाळे, शिवाजी गायकवाड, अविनाश मोहिते, गणेश तिडके, संजय वैद्य, अमोल खांडेभराड, जगदीश खरात, विठ्ठल इंदलकर, दत्ता तिडके, संजय खरात, लक्ष्मण खरात, जगन खरात, सुशील बोर्डे, प्रदीप खांडेभराड, करण निकाळजे आदींसह शेतकरी, युवक, महिला व सर्वसामान्य नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# नैसर्गिक अनुदान घोटाळ्याप्रकरणी तहसिलदारांच्या चौकशीचे निर्देश

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. ७ :** जिल्ह्यातील अंबड व घनसावंगी तालुक्यात झालेल्या अतिवृष्टी अनुदान घोटाळ्यात तत्कालिन तहसिलदारांचीसुद्धा चौकशी करावी अशा आशयाचे पत्र जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी आर्थिक गुन्हे शाखेला पाठविले असल्याचे समोर आले आहे. अंबड व घनसावंगी तालुक्यात २०२२ ते २०२४ या काळात सुमारे २४ कोटी ९० लाखांचा अतिवृष्टी अनुदान घोटाळा झाला होता. या दोन्ही ही तालुक्यातील २४० गावांमध्ये सुमारे २४ कोटी ९० लाख ७७ हजार ८११ रुपयांचा अतिवृष्टी अनुदान घोटाळा झाल्याचे उघडकीस आले होते.

**जिल्हाधिकाऱ्यांचे आर्थिक गुन्हे शाखेला पत्र**

या प्रकरणी चौकशी समितीने विविधांगी चौकशी करुन महसूल विभागाच्या २८ अधिकाऱ्यांविरुद्ध अंबड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणात आतापर्यंत आर्थिक गुन्हे शाखेने गुन्हा दाखल असलेले २५ संशयित, गुन्ह्यात निष्पन्न झालेले एजंट असे एकूण ३५ आरोपी अटक केले आहेत.

गुन्हा दाखल असलेले तलाठी आज शनिवार रोजी अटक केले असून त्यापूर्वी जिल्हाधिकाऱ्यांनी तहसिलदारांच्या चौकशी करण्याच्या निर्देशामुळे महसूल विभागात एकच खळबळ उडाली आहे. दरम्यान तत्कालीन तहसिलदारांची चौकशी सुरू झाल्यास या घोटाळ्यातील संशयित आरोपींची संख्या अजूनही वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी काढलेल्या पत्रामध्ये तत्कालीन तहसिलदारांची चौकशी करण्याचे निर्देश दिले गेले असले तरी या पत्रावर संबंधित तहसिलदारांची नावे किंवा त्यांचा कार्यकाळ नमूद केलेला नाही हे विशेष.

या संदर्भात आर्थिक गुन्हे शाखेकडे जिल्हाधिकाऱ्यांनी काढलेले तत्कालीन तहसिलदारांच्या चौकशीचे पत्र केंव्हा पोहोचतील त्यावर सर्व पुढील कार्यवाही अवलंबून राहणार असल्याने या घोटाळ्यातील आरोपींच्या संख्येत नेमकी किती वाढ होते हे पहावे लागेल.

# शेत-पाणंद रस्त्यांची कामे मजबूत व दर्जेदार करा-आ.हिकमत उढाण

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**घनसावंगी, दि. ७ :** मतदार संघातील अनेक गावांत शेतापर्यंत जाण्यासाठी मातीचे व पावसाळ्यात निसरडे होणारे रस्ते आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागतो. बियाणे, खत व पिकांची ने-आण करताना वेळ आणि पैसा अधिक खर्च होतो. ही परिस्थिती पाहून शेत-पाणंद रस्त्यांची कामे मजबूत व दर्जेदार पद्धतीने करावीत, असे निर्दे श आमदार हिकमत उढाण यांनी अधिकाऱ्यांना दिले.



शेतकऱ्यांच्या सोयीसाठी अत्यंत महत्त्वाची असलेली मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजना ग्रामीण भागात प्रभावीपणे राबवण्यासाठी अंबड तहसील कार्यालयात दोन्ही तालुक्यांच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आढावा बैठक पार पडली. आमदार हिकमत उढाण यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत अंबड आणि घनसावंगी तालुक्यातील सुरू असलेल्या व प्रस्तावित कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या आढावा बैठकीमुळे शेत-पाणंद रस्त्यांच्या कामांना गती मिळणार असून शेतकऱ्यांचा मार्ग सुखकर होणार आहे.

ही योजना शेतकऱ्यांच्या जीवनाशी निगडित असून कामात हलगर्जीपणा किंवा दर्जाबाबत तडजोड खपवून घेतली जाणार नाही, असेही त्यांनी ठामपणे सांगितले. पावसाळ्यापूर्वी जास्तीत जास्त रस्त्यांची कामे पूर्ण करावीत, जेणेकरून शेतकऱ्यांची अडचण होणार नाही, प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करून नवीन प्रस्तावांची कार्यवाही वेळेत करण्याचे आदेश दिले.

या बैठकीस उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी, अंबडचे तहसीलदार विजय चव्हाण, घनसावंगीचे तहसीलदार रमेश पागोटे यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# ओजस कॉलेजमध्ये कर्करोग जागरूकता कार्यक्रम

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. ७ :** श्री साई जनविकास प्रतिष्ठान, आंबेवाडी जालना संचालित, ओजस कॉलेज ऑफ फिजिओथेरपी महाविद्यालयामध्ये जागतिक कर्करोग दिनानिमित्त, ४ फेब्रुवारी रोजी कर्करोग जागरूकता कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये कर्करोग, त्याचे प्रतिबंध आणि कर्करोगाच्या उपचारांमध्ये फिजिओथेरपीची महत्त्वाची भूमिका याबद्दल जागरूकता निर्माण करणे हा होता.

या वेळी विद्यार्थ्यांसाठी रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेचा विषय होता ''कर्करोगाच्या उपचारांमध्ये फिजिओथेरपीची भूमिका - युनायटेड बाय युनिक. या कार्यक्रमात संबोधित करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कृष्ण कुमार सिंग यांनी कर्करोग पुनर्वसनातील फिजिओथेरपी चे महत्व यावर सविस्तर मार्गदर्शन केले. फिजिओथेरपीमुळे कर्करोग रुग्णांचे जीवनमान सुधारते, शारीरिक अडचणी कमी होतात व दैनंदिन कार्यक्षमता वाढते, असे त्यांनी सांगितले.

रांगोळी स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. त्यांच्या रांगोळ्यांमधून कर्करोगाविषयी जनजागृती, आशा, धैर्य व सकारात्मकतेचा संदेश देण्यात आला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवर्गाचे मोलाचे सहकार्य लाभले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कृष्ण कुमार सिंग, डॉ. निधी शर्मा, डॉ. राम अवतार, डॉ. अमर डामले, डॉ. किरण कुमार, डॉ. शाम वायाळ, डॉ. गौरी सॉर्टी, डॉ. शुभांगी मुकुंद, डॉ. डीसूझा बेनेडीन व डॉ. गायत्री कलंत्री, शिक्षकेतर कर्मचारी तसेच महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

# शिवजयंती उत्सव समितीची कार्यकारिणी जाहीर





**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**भोकरदन, दि. ७ :** भोकरदन शहरातील सार्वजनिक शिवजयंती उत्सव २०२६ च्या अनुषंगाने लोकमान्य वाचनालय येथे बैठक पार पडली.या बैठकीची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व जिजाऊ वंदनेने करण्यात आली.

या बैठकीत सर्वानुमते नूतन कार्यकारणीची निवड करण्यात आली. कार्यकारिणीत अध्यक्ष विजय जंजाळ, सचिव रमेश सोनवणे, कार्याध्यक्ष अमोल शिंदे, उपाध्यक्ष मजदत खान, कोषाध्यक्ष कदीर बापू तर प्रसिद्धीप्रमुख म्हणून आप्पासाहेब जाधव आदींचा समावेश आहे.

# पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. ७ :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च जिल्हा परिषदेतील बांधकाम विभागात सहाय्यक लेखाधिकारी यांच्या कॅबिनमध्ये बसलेले पत्रकार भरत मानकर यांना एका शासकीय गुत्तेदाराचा भाऊ बांगड याने अर्वाच्च्य भाषेत शिवीगाळ केली, धक्काबुक्की करुन जीवे मारण्याची धमकी दिली.



या प्रकरणी तात्काळ पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालनाच्यावतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात पोलीस अधिक्षकांना निवेदन देण्यात आले असून येत्या आठ दिवसांत कारवाई न झाल्यास १६ फेब्रुवारीपासून लक्षवेधी आंदोलन करण्याचा ईशाराही देण्यात आला आहे.

या निवेदनावर प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्रचे जालना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके, भरत मानकर, लियाकत अली खान यासीर, सदानंद देशमुख, आमेर खान, अच्युत मोरे, संतोष भुतेकर, शेख सलीम, राहुल मुळे, संदीप भाकरे, काकासाहेब कासार, सचिन सर्वे, आरेफ सय्यद, शेख शकील, योगेश काकफळे, संतोष जाधव आदी पत्रकारांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# बसच्या चाकाखाली आल्याने महिला जागीच ठार

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**घनसावंगी, दि. ७ :** गुंजकडून कुंभार पिंपळगावकडे दुचाकीवरून येणाऱ्या महिलेचा तोल गेल्याने बसच्या चाकाखाली सापडून जागीच मृत्यू झाला. ही घटना शुक्रवारी सकाळी ९ वाजेच्या दरम्यान घडली.



रांजणीवाडी (ता. घनसावंगी) येथील मीराबाई देवराव गोरे (वय ५५) नातवासोबत गुंजवरून कुंभार पिंपळगावकडे येत होत्या, दरम्यान कुंभार पिंपळगावकडून गुंजकडे बस जात होती, रस्त्यावर डाव्या कालव्याजवळ बस जाईपर्यंत नातवाने दुचाकी रस्त्याच्या कडेला थांबवली. मात्र, मागे बसलेल्या मीराबाईचा बस जवळ येताच दुचाकीवरून तोल गेल्याने त्या बसच्या टायरखाली पडल्याने त्यांच्या डोक्यावरून बसचे चाक गेले. त्या जागीच गतप्राण झाल्या.

# कॅन्सर तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. ७ :** जालना तेरापंथ महिला मंडळाच्यावतीने 'आरोग्यम' उपक्रमांतर्गत वर्ल्ड कॅन्सर डे निमित्त दि. ४ फेब्रुवारी रोजी आयोजित मोफत सर्वाइकल कॅन्सर संदर्भातील पॅप स्मिअर तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. आरती मंत्री यांनी ३० महिलांची पॅप स्मिअर चाचणी करून आरोग्याबाबत जागरूकतेचा संदेश दिला.

पवन सेठिया यांच्या नवकार मंत्राने शिबिराचा प्रारंभ करण्यात आला. अध्यक्षस्थानी कंचनदेवी ह्या बोथरा होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून महासभा कार्यकारिणी सदस्य सचिन पीपाडा, अनिल संचेती यांची उपस्थिती होती. प्रारंभी महिला मंडळाच्या अध्यक्षा ज्योतीबाला सेठिया यांनी शिबिराचा उद्देश विशद केला. साधना सेठिया यांनी सर्वाइकल कॅन्सरची कारणे, वाढता प्रसार आणि प्रतिबंधासाठी आवश्यक काळजी याविषयी मार्गदर्शन केले. कॅन्सर या आजाराचे नाव ऐकून अनेकदा भीती निर्माण होते; मात्र महिलांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. आरोग्याबाबत जागरूकता आणि विश्वास दाखवत त्यांनी स्वतःच्या आरोग्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल उचलले, असे त्या म्हणाल्या.

अनिल संचेती यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. डॉ. राजेश सेठिया, डॉ. आरती मंत्री व त्यांच्या वैद्यकीय पथकाने केलेल्या सहकार्याबद्दल महिला मंडळाच्यावतीने कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंडळाच्या मंत्री नेहा बोथरा यांनी केले तर उपाध्यक्ष सीमा सेठिया यांनी आभार प्रदर्शन केले.

**चाचणी** शालांत परीक्षा शिस्तबद्ध पार पाडण्याबाबत कडक निर्बंध

# कॉपीमुक्त परीक्षा हीच गुणवत्तेची खरी ओळख : जिल्हाधिकारी

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. ७ :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या इयत्ता १० वी ची परीक्षा एकुण १०२ परीक्षा उपकेंद्रावर व इयत्ता १२ वीची परीक्षा एकुण ७९ परीक्षा उपकेंद्रावर दि. १० फ ब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीत जालना जिल्ह्यात पार पडणार आहेत. या परीक्षा पूर्णतः कॉपीमुक्त, पारदर्शक व शांततेच्या वातावरणात पार पडाव्यात, यासाठी शासन व प्रशासनामार्फत कडक प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात येत आहेत.त्या अनुषंगाने, परीक्षा कालावधीत भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३लागू करण्यात आले असून,



परीक्षा केंद्रांच्या परिसरात जमावबंदी, अनधिकृत प्रवेश, गैरवर्तन तसेच शांतता भंग करणाऱ्या कोणत्याही प्रकारास सक्त मनाई करण्यात आली आहे.

परीक्षा प्रक्रियेत कोणताही परीक्षार्थी, पालक, बाह्य व्यक्ती, खाजगी एजंट किंवा केंद्राशी संबंधित कर्मचारी जर कॉपी, नकल, मोबाईल फोनचा वापर, बनावट ओळखपत्र, प्रश्नपत्रिका फोडणे किंवा अन्य कोणत्याही प्रकारच्या गैरप्रकारात सहभागी आढळून आल्यास, त्यांच्यावर गैरप्रकार करणाऱ्या व्यक्तींविरोधात भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १२६ तसेच महाराष्ट्र सार्वजनिक परीक्षा (गैरप्रकार प्रतिबंध) अधिनियम, १९८२ चे कलम ७ अन्वये थेट गुन्हे दाखल करुन कठोर कारवाई करण्याचे आदेश संबंधित यंत्रणांना देण्यात आलेले आहेत. परीक्षा काळात जालना जिल्ह्यातील सर्व परीक्षा केंद्रांवर अत्याधुनिक सी.सी.टी.व्ही. कॅमेरे कार्यान्वित करण्यात आले असून, परिक्षा केंद्रातील प्रत्येक हॉल मध्ये सी.सी.टी. व्ही बसविण्यात आलेले आहे. प्रत्येक परीक्षा केंद्र परीसरामध्ये ड्रोनद्वारे टेहाळणी देखील करण्यात येणार आहे. प्रशासनामार्फत सर्व परीक्षा उपकेंद्रावर बैठे पथक व भरारी पथक नेमण्यात आलेले आहे. तसेच पोलीस यंत्रणा, शिक्षण विभाग यांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, डिजिटल पाळत, अचानक तपासणी व तक्रार निवारण यंत्रणा कार्यान्वित ठेवण्यात येणार आहेत.

विद्यार्थ्यांनी कोणत्याही अफवा, आमिष किंवा दबावाला बळी न पडता प्रामाणिकपणे परीक्षा द्यावी, तसेच पालक व नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हा दक्षता समीती अध्यक्ष आशिमा मित्तल यांनी केले आहे.

# अंध दिव्यांगांना मिळणार आधुनिक उपकरणे

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. ७ :** दिव्यांग सक्षमीकरण अभियानांतर्गत जिल्ह्यात प्रायोगिक तत्त्वावर १०० अंध दिव्यांगांना नेव्हीनॉट ही आधुनिक साहाय्यक नेव्हिगेशन उपकरणे दिली जाणार आहेत. प्रातिनिधिक स्वरूपात ७ दृष्टिहीन दिव्यांगांना १५ दिवसांपूर्वीच याचे वाटप करण्यात आले. आता पुढच्या टप्प्यात उपकरण वापराबाबत मार्गदर्शन करण्यासाठी कार्यशाळा आयोजित केली जाणार आहे. त्यानंतर उर्वरित लाभार्थींना वाटप केले जाणार आहे.



शंभर टक्के अंध दिव्यांगांना आत्मनिर्भर करण्याच्या दिशेने जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी पुढाकार घेतला आहे. याअंतर्गत तेलंगणा येथील एलिएन इनोव्हेशन्स या संस्थेद्वारे विकसित नेव्हीनॉट ही आधुनिक साहाय्यक नेव्हिगेशन उपकरणे आहेत. प्रतिनिधिक स्वरूपात २६ जानेवारी रोजी ७ दृष्टिहीन दिव्यांगांना पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते याचे वितरण करण्यात आले. या उपक्रमात एकूण १०० दिव्यांगांना या संस्थेमार्फत किट वितरित करण्यात येणार आहे. हा पायलट प्रकल्प म्हणून राबवण्यात येत आहे.

अजिंक्य भारत
# आपलं अमरावती
अमरावती, रविवार, ८ फेब्रुवारी २०२६

# वृध्द कलावंतांचे योजना प्रस्ताव धूळखात

## एक वर्षापासून शासन दरबारी प्रस्ताव प्रलंबित | जिल्हा समितीत ठोस निर्णय नाही

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. ७ :** जगाला आपल्या कलेने व साहित्याने समृद्ध करणाऱ्या वृद्ध साहित्यिक आणि कलाकारांची संध्याकाळ सध्या अंधकारमय बनली आहे. राजर्षी शाहू महाराज वृद्ध साहित्यिक व कलाकार मानधन योजनेअंतर्गत मिळणाऱ्या तुटपुंज्या मानधनासाठीही या कलावंतांना सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. अमरावती जिल्ह्यात मागील वर्षभरापासून अनेक प्रस्ताव प्रलंबित असून, निवड समिती व छाननी प्रक्रियेतील विलंबामुळे हे कलाकार अक्षरशः ना मान, ना धन अशा अवस्थेत जीवन कंठत आहेत. अमरावती जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर साहित्यिक व विविध कलाप्रकारांतील कलाकार कार्यरत आहेत.

आयुष्यभर कला-साहित्याची सेवा केल्यानंतर उतारवयात या योजनेचा आधार मिळावा, या अपेक्षेने अनेक वृद्ध कलावंतांनी अर्ज सादर केले आहेत. सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत राबविण्यात



येणारी राजर्षी शाहू महाराज वृद्ध साहित्यिक व कलाकार मानधन योजना ही ६० वर्षांवरील गरजू व योगदान दिलेल्या कलावंतांसाठी महत्त्वाची आधारयोजना मानली जाते. या योजनेंतर्गत पात्र ठरलेल्या अ, ब व क प्रवर्गातील कलावंतांना दरमहा ५ हजार रुपये मानधन दिले जाते. वाढत्या महागाईच्या काळात ही रक्कम अत्यंत अपुरी असली, तरी औषधोपचार, दैनंदिन गरजा व उदरनिर्वाहासाठी अनेक वृद्ध साहित्यिक व कलाकार याच मानधनावर अवलंबून आहेत. मात्र जिल्हाभरातून आलेले शेकडो अर्ज अद्याप संबंधित विभागाकडे प्रलंबित आहेत. अनेकांनी आवश्यक कागदपत्रांसह प्रस्ताव सादर करूनही जिल्हा समिती किंवा शासनस्तरावर कोणताही ठोस निर्णय झालेला नाही. प्रस्तावांचाढिगारा वाढत असताना, निर्णयाची प्रतीक्षा मात्र संपत नसल्याची खंत कलावंत व्यक्त करत आहेत.

मागील वर्षभरापासून नवीन लाभार्थी निवडीची प्रक्रिया जवळपास थंडावली असून, त्यामुळे अनेक वृद्ध साहित्यिक-कलावंतांचे हाल होत आहेत. शासनाने तातडीने प्रलंबित प्रस्तावांवर निर्णय घ्यावा, निवड प्रक्रिया गतीने पूर्ण करावी आणि वृद्ध कलावंतांना वेळेवर मानधन उपलब्ध करून द्यावे, अशी जोरदार मागणी कलावंत व सांस्कृतिक क्षेत्रातून होत आहे.लाभार्थी निवडीसाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली निवड समिती असणे आवश्यक असते. मात्र, समितीच्या बैठका नियमित न होणे, प्रस्तावांची तांत्रिक छाननी करण्यास होणारा विलंब आणि प्रशासकीय उदासीनता यामुळे ही योजना कागदावरच अडकून पडली आहे.जिल्ह्यात सध्या काही पात्र लाभार्थी या योजनेचा लाभ घेत आहेत. मात्र, दुर्दैवाची बाब म्हणजे या नियमित लाभार्थींनाही गेल्या अनेक महिन्यांपासून वेळेवर मानधन मिळालेले नाही. हक्काचे पैसे वेळेवर मिळत नसल्याने या वृद्ध कलावंतांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

### ३१ मार्चपूर्वी निर्णय घ्यावा लागणार

राज्याच्या सांस्कृतिक विभागाने आता ३१ मार्चपूर्वी प्रलंबित प्रस्तावातून पात्र लाभार्थींची निवड करण्याचे निर्देश दिले आहेत. आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी ही प्रक्रिया पूर्ण झाली नाही, तर यावर्षीचा निधी परत जाण्याची भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे प्रशासनाला आता युद्धपातळीवर काम करावे लागणार आहे.

# आज श्री गजानन महाराज प्रगटदिन

## दोन दिवस दर्शनासाठी भक्तांची गर्दी



अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.७ :** धन्य आज दिन संत दर्शनाचा.. श्री संत गजानन महाराज संस्थान शेगांवच्या वतीने श्रींच्या १४८ प्रगटदिन उत्सवा करिता श्री चे मंदिर दर्शनसाठी दोन दिवस खुले राहणार आहे. यामुळे भाविक भक्तांची मोठी अडचण दूर झाली असून श्रींच्या समाधी मंदिराचे दर्शन घेता येणार आहे.

श्रींच्या प्रगटदिन महोत्सवानिमित्त गेल्या सात दिवसापासून मंदिरामध्ये विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले. या सप्ताहामध्ये राज्यातील भजनी दिंड्या शेगाव येथे दाखल होत आहे. भजनी दिंड्यांमधील वारकरी भाविकांनी श्रीच्या समाधी मंदिराचे दर्शनासाठी ७ व ८ फेब्रुवारी रोजी श्रींच्या दर्शनासाठी मंदिर रात्रभर खुले राहिलं.

श्रींच्या दर्शनासाठी होणारी संभाव्य गर्दी लक्षात घेवून शेगावच्या संत गजानन महाराज संस्थानच्या वतीने ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे रात्री येणाऱ्या भाविकांना पहाटे श्रींचे दर्शन, महाप्रसाद घेऊन आपल्या गावी परत जाणार आहे. उद्या ८ फेब्रुवारी रोजी गजानन महाराज प्रकट दिन साजरा करण्यात येत आहे. यानिमित्त राज्य भरातील भजनी दिंड्या, शेगाव नगरीत दाखल होण्यास सुरुवात झाली आहे. दिंड्या सोबत येणाऱ्या हजारो वारकरी, भाविकांची निवास, भोजन व्यवस्था संस्थान कडून करण्यात आली आहे.

तसेच प्रकट दिनानिमित्त राज्यातून येणाऱ्या हजारो भाविकासाठी विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहे. संस्थान चे सेवेकरी मोठ्या संख्येने नियुक्त करण्यात आले असून भाविकांच्या सेवेसाठी तत्पर आहे. होणारी मोठी गर्दी लक्षात घेता पोलीस विभागातर्फे कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. संत नगरीत आबालवृद्ध भाविकांची मोठी गर्दी उसळली असून उद्या रविवारी हा आकडा लाखावार जाईल असा अंदाज आहे.

## थोडक्यात

### महिलेची हत्या झाल्याचा संशय

मोर्शी : शिरखेड पोलिसस्टेशन अंतर्गत येणाऱ्या शिरसगाव (भीकमराय) येथील एका ७८ वर्षीय वृद्ध महिला शेतकऱ्याची निघृण हत्या करण्यात आल्याचा संशय नातेवाईकांनी व्यक्त केला आहे. सदर महिला ही शेतात मरणासन्न अवस्थेत आढळून आली; मात्र अमरावती येथे जिल्हा सामान्य रुग्णालयात नेतेवेळी तिचे वाटेतच निधन झाल्याची घटना ५ फेब्रुवारी रोजी घडली. सुभद्रा श्रीराम मानेकर (७८) रा. शिरजगाव (भिकमराय) असे मृतक महिलेचे नाव आहे. सुभद्रा मानेकर ही वृद्ध महिला शेतकरी ५ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ वाजताच्या सुमारास आपल्या स्वत:च्या शिरसगाव (भिकमराय) शेतशिवारातील शेतात गेली होती; मात्र ती घरी परतली नसल्याचे पाहून या वृद्ध महिलेच्या नातेवाईकांनी शेताकडे धाव घेतली असता सदर महिलेच्या डोक्याच्या मागच्या बाजूला वार असल्याचे दिसून ती महिला मरणासन्न अवस्थेत आढळून आली. लगेच तिला अमरावती येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात भरती करण्यासाठी नेत असताना वाटेतच तिचे निधन झाले. घटनेची माहिती शिरखेड पोलिसांना देण्यात आली.

### चाकूसह संशयित युवक ताब्यात

अमरावती: फ्रेजरपुरा पोलिसांनी एका संशयित इसमाला पकडून त्याच्याजवळून दोन चाकू जप्त केले. शेख सरदार शेख नाजीद (१८) रा. यास्मीननगर अमरावती असे आरोपीचे नाव आहे. तो शासकीय विश्रामगृहाच्या बाजूला संशयास्पद स्थितीत उभा असताना पोलिसांना दिसून आला. पोलिस दिसताच त्याने पळून जाण्याचा प्रयत्न केला; परंतु पोलिसांनी त्याला घेराव टाकून जागीच पकडले. त्याच्याकडून दोन चाकू जप्त केले.

### शेतकऱ्याची विष घेऊन आत्महत्या

**मोर्शी:** माळीपुरा स्थित एका २४ वर्षीय युवा शेतकऱ्याने कर्जबाजारीपणाला कंटाळून स्वत:च्या घरी विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना ५ फेब्रुवारी रोजी उघडकीस आली. अश्विन दिलीपराव मेंढे (२४) रा. माळीपुरा मोर्शी असे मृतक युवकाचे नाव आहे.

मोर्शी येथील अश्विन दिलीपराव मेंढे यांच्याकडे मोर्शी शेतशिवारात दीड एकर शेती असून त्यांनी सोसायटीचे व खाजगी कर्ज घेऊन आपल्या स्वत:च्या शेतात कपाशी व तुरीचीपेरणी केली; मात्र दरवर्षीच्या तुलनेत यावर्षी अतिवृष्टी होऊन मोठ्या प्रमाणात पाऊस कोसळल्यामुळे कपाशीला बोंडे फुटली नाही.

# चालत्या कारला अचानक आग

## इर्विन चौक-राजापेठ उड्डाणपुलावर थरार



अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती,दि.७ :** शहरातील वाहतुकीसाठी अत्यंत वर्दळीच्या असलेल्या इर्विन चौक ते राजापेठ उड्डाणपुलावर शुक्रवारी रात्री चालत्या कारला अचानक आग लागल्याची - धक्कादायक घटना घडली. या घटनेमुळे काही काळ परिसरात खळबळ उडाली असून, उड्डाणपुलावरील वाहतूक = विस्कळीत झाली होती. सुदैवाने - प्रसंगावधान राखल्यामुळे कोणतीही - जीवितहानी टळली. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, - इर्विन चौका कडून राजापेठच्या दिशेने जाणारी एक स्पिट कार रात्री उशिरा - उड्डाणपुलावरून मार्गक्रमण करत होती. - कार चालू असतानाच अचानक इंजिनच्या भागातून धूर निघू लागल्याचे चालकाच्या लक्षात आले. संभाव्य धोका ओळखत चालकाने तत्काळ वाहन रस्त्याच्या कडेला थांबवले आणि वेळ न दवडता खाली - उतरला. काही क्षणातच कारच्या इंजिन भागाने - पेट घेतला आणि आगीचा भडका उडाला. आग - वाढताच परिसरात घबराटीचे वातावरण निर्माण झाले. उड्डाणपुलावरून जाणाऱ्या

वाहनचालकांनी आपली वाहने थांबवून सुरक्षित अंतर राखले. आगीची माहिती मिळताच महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाचे वाहनतत्काळ घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन कर्मचाऱ्यांनी शर्थीचे प्रयत्न करत काही वेळातच आगीवर नियंत्रण मिळवले. आग आटोक्यात आणण्यात यश आले असले, तरी तोपर्यंत कारचा समोरील भाग पूर्णपणे जळून खाक झाला होता.या घटनेत कारचे मोठे नुकसान झाले असून, सुदैवाने चालक वेळेत बाहेर पडल्यामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही. आगीच्या तीव्रतेमुळे काही काळ उड्डाणपुलावर दाट धूर पसरला होता. त्यामुळे वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आणि वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. घटनेची माहिती मिळताच कोतवाली पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात घेत वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रयत्न सुरू केले.

# पाटीपुऱ्यात एमडी ड्रग्ससह आरोपी ताब्यात

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.७ :** शहरात सुरू असलेल्या अमली पदार्थ विरोधी मोहिमेत गुन्हे शाखेला मोठे यश मिळाले असून पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील पथकाने पाटीपुरा परिसरात धडक कारवाई करत एमडी ड्रग्स विक्री करणाऱ्या आरोपीला रंगेहात अटक केली.

गोपनीय माहितीच्या आधारे गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचून अचानक छापा टाकला. यावेळी संशयित आरोपीकडे एमडी ड्रग्स आढळून आल्याने त्याला ताब्यात घेण्यात आले. अचानक झालेल्या या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली असून अमली पदार्थ तस्करांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.या प्रकरणात एमडी ड्रग्स जप्त करण्यात आले असून पुढील तपास गुन्हे शाखेकडून सुरू आहे. शहरात ड्रग्स विरोधात सुरू असलेली कारवाई पुढेही सुरू राहणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

# बँकेच्या जप्ती कारवाईला थेट आव्हान!

## सील तोडून घरात घुसखोरी; कोर्ट कमिशनरच्या कामात अडथळा

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती , दि.७ :** न्यायालयाच्या आदेशानुसार बँकेच्या थकीत कर्जप्रकरणी मालमत्तेचा ताबा घेण्यासाठी सुरू असलेल्या अधिकृत कारवाईत अडथळा आणणे आणि प्रशासनाने लावलेले सील तोडून घरात अवैधरित्या प्रवेश करणे, हा कायद्याचा थेट अपमान ठरणारा प्रकार अमरावतीत उघडकीस आला आहे. या गंभीर प्रकरणी नागपुरी गेट पोलिसांनी कर्जदारासह चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करून कारवाईचा इशारा दिला आहे.

रतनगंज येथील रहिवासी विशाल चंदनपात्रे यांनी २०१९ मध्ये व्यवसायासाठी एका राष्ट्रीयकृत बँकेकडून २१ लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. या कर्जासाठी त्यांनी तारखेडा येथील स्वत:ची मालमत्ता गहाण ठेवली होती. मात्र, दीर्घकाळ कर्जाचे हप्ते न भरल्याने खाते थकीत झाले. बँकेने वारंवार नोटिसा पाठवूनही प्रतिसाद न मिळाल्याने अखेर कायदेशीर मार्ग अवलंबत न्यायालयीन आदेश मिळवला.

कोर्ट कमिशनरच्या कारवाईत अडथळा अतिरिक्त जिल्हा दंडाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार ३ फेब्रुवारी रोजी कोर्ट कमिशनर, बँक अधिकारी आणि पोलीस बंदोबस्तासह संबंधित मालमत्तेचा ताबा घेण्यासाठी पथक घटनास्थळी पोहोचले. मात्र,



आरोपींनी याकारवाईला तीव्र विरोध करत अडथळा निर्माण केला. घरात वृद्ध महिला आजारी असल्याचे कारण पुढे करत कायदेशीर ताबा देण्यास नकार देण्यात आला. तरीही सर्व प्रक्रिया पूर्ण करत बँकेने मालमत्तेवर सील लावून दोन सुरक्षा रक्षक तैनात केले.

बँकेच्या तक्रारीनुसार, यापूर्वी ३० सप्टेंबर २०२५ रोजी आणि त्यानंतरही न्यायालयाच्या आदेशानुसार लावलेले सीलआरोपींनी बेकायदेशीरपणे तोडले आणि घरात प्रवेश केला. हा प्रकार म्हणजे सरकारी आदेशाचा उघडपणे अवमान असून, न्यायालयीन प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित करणारा आहे

या गंभीर प्रकरणी नागपुरी गेट पोलिसांनी विशाल श्यामलाल चंदनपात्रे, श्यामलाल चंदनपात्रे, नरेश वर्मा, मनोज बारस्कर या आरोपींविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदवला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रशांत पारधी करत असून, न्यायालयीन आदेशांचे उल्लंघन आणि अडथळा सरकारी कामात आणणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा पोलिसांनी दिला आहे. बँक जप्तीप्रकरणात कायद्याला हात घालण्याचे धाडस करणाऱ्यांना आता न्यायालय आणि पोलिसांच्या कठोर कारवाईला सामोरे जावे लागणार, हे मात्र निश्चित आहे.नागपुरी गेट पोलिसांकडून चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

# नागरिकांसाठी थेट तक्रार निवारण सुविधा

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.७ :** अमरावती शहरातील नागरिकांच्या तक्रारींना थेट आणि तात्काळ न्याय देण्यासाठी पोलीस आयुक्तालयाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. शनिवार, ७ फेब्रुवारी २०२६ पासून दर आठवड्याच्या प्रत्येक शनिवारी सायंकाळी ४ ते ६ वाजेदरम्यान नागरिकांसाठी थेट तक्रार निवारण सुविधा सुरू करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत मा. पोलीस आयुक्त श्री. राकेश ओला हे पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती (तळमजला) येथे स्वत: उपस्थित राहून नागरिकांच्या समस्या, तक्रारी व अडचणी ऐकून त्यावर योग्य तो निर्णय घेणार आहेत. पोलिसिंग अधिक पारदर्शक, लोकाभिमुख आणि विश्वासार्ह व्हावे, या उद्देशाने ही सुविधा सुरू करण्यात आली आहे. घरगुती वाद, जमीन-विवाद, सायबर फसवणूक, पोलीस ठाण्यातील तक्रारींचा विलंब, महिला व ज्येष्ठ नागरिकांचे प्रश्न, तसेच अन्य कायदा-सुव्यवस्थेशी संबंधित बाबींवर नागरिक थेटआपली बाजू मांडू शकणार आहेत.

त्यामुळे नागरिकांना वरिष्ठ पातळीवर थेट संवादाची संधी -मिळणार आहे. पोलीस आयुक्तालयाने शहरातील -सर्व नागरिकांना आवाहन केले आहे की, ज्या नागरिकांना त्यांच्या तक्रारींचे निवारण करून घ्यायचे आहे, त्यांनी वरील नमूद वेळेत पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती येथे प्रत्यक्ष उपस्थित राहावे. या सुविधेमुळे नागरिकांचा पोलीस प्रशासनावरचा विश्वास अधिक दृढ होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## जीवनदान

### आईने वाचविले मुलाचे प्राण

# सुपर स्पेशालिटीत ६६ वी किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वी

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.७ :** किडनी (मूत्रपिंड) प्रत्यारोपणासाठी कुणीतरी दाता लागतो. शक्यतो तो कुटुंबातीलच असावा, म्हणजे ती किडनी जास्तीत जास्त दिवस चालण्याची शक्यता असते. आज कुटुंब छोटे होत आहेत. मानवी संबंध कोरडे होत चालले आहेत. अकृत्रिम स्नेहाच्या अभावामुळे कुटुंबातून किडनीसाठी दाता मिळणे तसे अवघड झाले आहे.

मात्र, अमरावतीच्या विभागीय संदर्भसेवा रुग्णालयात (सुपर स्पेशालिटी) आतापर्यंत ६६ किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आल्या आहेत. यात बहुतांश प्रकरणांमध्ये नात्यातीलच लोक धावून आले आहेत.

एका आईने स्वत:ची किडनी देऊन मुलाला जीवदान मिळवून दिले. २७ वर्षीय मोहम्मद सज्जाद मोहम्मद इब्राहिम हा गेल्या




तीन वर्षांपासून किडनीच्या आजाराने त्रस्त होता. त्याच्यावर विविध ठिकाणी उपचार सुरू होते, डायलिसिस देखील सुरू होते. तेव्हा डॉक्टरांनी मोहम्मद सज्जाद आणि त्याच्या कुटुंबीयांना किडनी प्रत्यारोपणाविषयी माहिती दिली.

अमरावतीच्या विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या माध्यमातून होत असलेल्या यशस्वी व विनामूल्य शस्त्रक्रिया यासाठी रुग्ण विविध जिल्ह्यांमधून नव्हे तर इतर राज्यामधून सुद्धा येत असतात याविषयी महिती दिली.

मोहम्मद सज्जाद अकोला जिल्ह्यातील येथील रहिवासी आहेत.डायलिसिस दीर्घकाळ उपाय नसून किडनी प्रत्यारोपण हा यावरील योग्य उपाय आहे, असे जेव्हा डॉक्टरांनी सांगितले, त्यावेळी मुलाच्या पुढील भविष्याचा विचार करून आई नाझपरवीन मोहम्मद इब्राहिम (४९ वर्ष ) यांनी आपली एक किडनी मुलगा सज्जाद ला देण्याचा निर्णय घेतला, व आपली एक किडनी सज्जाद ला देऊन त्याला नवीन जीवन दिले. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत शस्त्रक्रिया विनामूल्य करण्यात आली.

### डॉक्टरांच्या चमूचे योगदान

सुपर स्पेशालिटीचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे व विशेष कार्य अधिकारी डॉ. मंगेश मेंढे यांच्या मार्गदर्शनाखाली नेफरोलॉजिस्ट डॉ. प्रणित काकडे, डॉ. नयन काकडे ,युरो सर्जन डॉ. राहुल पोटोडे, डॉ. विक्रम देशमुख, डॉ. राहुल घुले, डॉ. प्रतीक चिरडे, डॉ. विशाल बाहेकर, बधिरिकरण तज्ज्ञ डॉ. रोहित हातगावकर, डॉ. बाळकृष्ण बागवाले, डॉ. दीपाली देशमुख, डॉ अंजु दामोदर, डॉ. परिणिती, डॉ. विक्रांत कुळमेथे, डॉ. माधव ढोपरे, डॉ. जयश्री पुसदेकर, डॉ.नाहीद, डॉ. रमणीय, डॉ. उज्वल अभ्यंकर, डॉ. प्रियंका कांबळे, डॉ. श्रद्धा जाधव, समाजसेवा अधीक्षक शीतल बोंडे, ऋषिकेश धस, डॉ.सोनाली चौधरी इत्यादींचे किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रियेमध्ये विशेष सहकार्य लाभले.


# अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

## गोराळा ते सावरखेड मार्गावरील घटना




अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**शिरखेड, दि.७ :** शिरखेड पोलीस स्टेशनच्या हद्दीतुन नांदगाव पेठ ते पांढूर्णा राष्ट्रीय महामार्ग जात असून गोराळा ते सावरखेड दरम्यान वनविभागाच्या रस्त्यावर अज्ञात वाहनाच्या धडकेत अमरावती हबीब नगर येथील दुचाकीस्वार सर्फराज खा हमीद खा घटनास्थळी ठार झाल्याची घटना गुरुवारी रात्री आठ वाजताच्या सुमारास घडली होती. सरफराज खा समद खा वय ३२ वर्ष ही आपली दुचाकी मोटरसायकल घेऊन शिरखेड येथे पत्नीच्या घरी येत असताना अज्ञात चार चाकी गाडीने मोटर सायकल क्रमांक एम एस २७ ए बी ९७६९ ला जबर धडक दिल्याने सदरच्या धडकेत



सरफराज खान हा घटनास्थळी ठार झाला होता. याबाबतची माहिती शिरखेड पोलिसांना मिळताच पोलिसांनी घटना स्थळावर जाऊन घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह मोर्शी येथील उपजिल्हा रुग्णालयात गुरुवारी रात्रीच पाठविण्यात आला होता. मृतक सरफराज खा समद खा वय ३२ वर्ष यांच्यावर शुक्रवारी सकाळी शवविच्छेदन मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला होता. पुढील तपास शिरखेड पोलीस करीत आहे.

## थोडक्यात

### तीन अपघातात एकाचा मृत्यू

अमरावती : चांदूर रेल्वे व वरुड पोलीस ठाण्यांतर्गत झालेल्या तीन वेगवेगळ्या अपघातात एकाचा मृत्यू झाला, ता दोघे जखमी झाले. त्यात एकाच्या वाहनाचे नुकसानदेखील झाले. या प्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यात अपघातासाठी दोषी असणाऱ्यांवर गुन्हा नोंदवण्यात आला. त्यापैकी एक अपघात चांदूर रेल्वे पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या चांदूरवाडी, तर दोन अपघात वरुड पोलीस ठाण्यांतर्गत घडलेत.

### दारूच्या नशेत पत्नीला मारहाण

अचलपूर : दारूच्या नशेत पतीने पत्नीला मारहाण केली. मुलीच्या बचावासाठी धावलेल्या आईलाही त्याने मारहाण करीत जखमी केले. ही घटना कालू वाडीत घडली. पत्नीच्या तक्रारीवरून परतवाडा पोलिसांनी पती दिनू बसंत नागले (३५, रा. केरपाणी, ता. भैसदेही) याच्याविरुद्ध दुखापतीचा गुन्हा दाखल केला.

### क्षुल्लक कारणावरून इसमाला मारहाण

धामणगाव रेल्वे : भिकाजी महाराज मंदिर परिसरात जेवण करणाऱ्या रामभाऊ मनोहरराव वैद्य (४५, रा, भिल्ली) यांना तिघांनी कारण नसताना मारहाण केली. या प्रकरणी मंगरूळ दस्तगीर पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### घर फोडून सोन्याचे दागिने लंपास

चांदूर बाजार : घरी कुणी नसल्याचे पाहून अज्ञाताने कुलूप तोडून कपाटातील सोन्या व चांदीचा अंदाजे १० हजारांचा ऐवज चोरून नेला. ही घटना करजगाव येथे घडली. महिलेच्या तक्रारीवरून शिरजगाव कसबा पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल केला. पुढील तपास चांदूर बाजार पोलीस करीत आहे.

### फळ विक्रीच्या दुकानातून साहित्याची चोरी

मोर्शी : शहादत खाँ गफार खाँ (४१, रा. मोर्शी) यांचे शहरातील जयस्तंभ चौकात फळाचे दुकान आहे. अज्ञात चोरट्याने त्यातील एकूण साडे आठ हजारांची फळे चोरून नेली. त्यांच्या तक्रारीवरून मोर्शी पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### हिस्से वाटणीवरून पित्याला मारहाण

शिरखेड : शेतीच्या हिस्से वाटणीच्या जुन्या वादातून मुलाने वृद्ध वडिलांना मारहाण करीत जखमी केले. ही घटना विचोरी येथे घडली. वृद्ध वडील धनराज सखाराम कांबळे (६०) यांच्या तक्रारीवरून शिरखेड पोलिसांनी चेतन धनराज कांबळे (३५) याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### खल्लार विद्युत उपकेंद्रात चोरी

खल्लार : येथील विद्युत उपकेंद्रातून अज्ञात चोरट्याने १ लाख ४० हजार रुपयांचे विद्युत साहित्य चोरून नेल्याची घटना २८ जानेवारीच्या रात्री घडली. चोरट्याने ११ केव्ही आयसोलेटरचे फिक्स कॉन्टक्टचे २८ नग, १४ कनेक्टींग रॉड असे एकूण १ लाख ४० हजार ५०० रुपयांचे साहित्य चोरून नेले. कॉन्ट्रॅक्टर निखिल बाळकृष्ण डवरे (३३) रा. आसेगाव पूर्णा यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

### भांडण सोडविणाऱ्यास मारहाण

चांदुरबाजार : पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या वडुरा येथील गजानन महादेवराव दाणे (४०) हे त्यांचा मित्र सचिन व आरोपी नीलेश प्रकाशराव वाघमारे (४१) यांचे भांडण सोडविण्यासाठी गेले असता आरोपी नीलेशने त्यांना शिवीगाळ करून मारहाण केली. नीलेशच्या बोटातील अंगठी गजाननच्या डोळ्यावर लागून ते जखमी झाले. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

# महिला सरपंच सत्तेत की केवळ शिक्कामोर्तब ?

**शिराळा ग्रामसभा प्रकरणाने प्रशासनाची कसोटी | मुलगी सरपंच, वडील कारभारी असल्याचा आरोप**

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**शिराळा, दि.७ :** भारतीय राज्यघटनेने अनुसूचित जातींच्या महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सन्मानपूर्वक प्रतिनिधित्व मिळावे, निर्णयप्रक्रियेत प्रत्यक्ष सहभाग असावा आणि पारंपरिक सत्ताकेंद्रांना छेद मिळावा या उद्देशाने आरक्षणाची तरतूद केली आहे. मात्र शिराळा ग्रामपंचायतीत नुकत्याच पार पडलेल्या ग्रामसभेत घडलेल्या प्रकारामुळे या घटनात्मक उद्देशावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

प्रजासत्ताक दिनानिमित्त २६ जानेवारी रोजी आयोजित ग्रामसभा कोरमअभावी तहकूब झाल्यानंतर ५ फेब्रुवारी रोजी पुन: ग्रामसभा घेण्यात आली. मात्र या ग्रामसभेत विकासकामांचा लेखाजोखा मांडला जाण्याऐवजी गोंधळ, टाळाटाळ आणि जबाबदारीपासून पळ काढण्याचा प्रकार घडल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. ग्रामसभा ही लोकशाही चर्चेचे व्यासपीठ न राहता सत्ताधाऱ्यांना अडचणींपासून वाचवण्याचे साधन बनल्याची भावना व्यक्त होत आहे.ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, ग्रामपंचायतीतील महिला सरपंच अंकिता मिलिंद तायडे प्रत्यक्ष निर्णयप्रक्रियेत दिसून येत नाहीत. ग्रामसभा, दैनंदिन व्यवहार आणि कारभारावर नियंत्रण हे त्यांचे वडील मिलिंद तायडे जे स्वत: ग्रामपंचायत सदस्य आहेत यांच्या हातात असल्याचे चित्र ग्रामसभेत स्पष्ट झाले. हा प्रकार केवळ प्रशासकीय अनियमिततेपुरता मर्यादित नसून, महिलेला केवळ नावापुरती सरपंच ठेवून प्रत्यक्ष सत्ता इतरांच्या हातात देण्याचा प्रकार तर नाही ना? असा थेट सवाल ग्रामस्थांमधून उपस्थित होत आहे.

**नागरिकांनी ग्रामसभा उधळली**



ग्रामसभेत रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता तसेच इतर विकासकामांबाबत प्रश्न विचारले असता त्यांना स्पष्ट उत्तरे देण्यात आली नाहीत. उलट काही व्यक्तींनी दारूच्या नशेत गोंधळ घालून मुद्दाम वातावरण तणावपूर्ण केल्याचा आरोप ग्रामस्थ करत आहेत. या गोंधळाचा फायदा घेत उपसरपंच व ग्रामसचिव यांनी सभास्थळावरून निघून जाणे पसंत केल्याचेही सांगण्यात येते. परिणामी, ग्रामसभेतील महत्त्वाचे प्रश्न अनुत्तरितच राहिले.या पार्श्वभूमीवर पंचायत प्रशासनाची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. महिला सरपंच स्वायत्तपणे कारभार करतात का, त्यांच्यावर कोणताही दबाव किंवा अप्रत्यक्ष नियंत्रण आहे का, याची तपासणी करणे ही प्रशासनाची जबाबदारी नाही काय? जर महिला सरपंचाला 'डमी' बनवले जात असेल, तर तो पंचायतराज व्यवस्थेचा आणि सामाजिक न्यायाच्या तत्त्वांचा उघड भंग ठरत नाही काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे. ग्रामसभा ही गावच्या कारभाराची सर्वोच्च लोकशाही संस्था आहे. ती जाणीवपूर्वक उधळली जात असेल, प्रश्न विचारणाऱ्यांना गोंधळात गाडले जात असेल आणि दोषींवर कोणतीही कारवाई होत नसेल, तर प्रशासनाच्या मौनावर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहते. हे मौन निष्काळजीपणाचे आहे की मौन संमतीचे, याची चौकशी होणे आवश्यक असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.या संपूर्ण प्रकरणाची तातडीने स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करावी, महिला सरपंच स्वायत्तपणे निर्णय घेत आहेत का याची खातरजमा करावी, ग्रामसभा उधळणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी आणि पुढील ग्रामसभा प्रशासकीय उपस्थितीत, शिस्तबद्ध व पारदर्शक पद्धतीने घ्यावी, अशी ठाम मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

> ग्रामपंचायत कार्यभार पूर्ण सरपंचाचे वडील जे सदस्य असुन सुद्धा स्वत:ला सरपंच असल्याचे सांगत सर्व भोंगड मनमानी काम करतात आणि सरपंच मात्र ग्रामपंचायत ला गैरहजर राहते.
>
> **– बालासाहेब आमले, ग्रामस्थ शिराला**

# ग्रामपंचायतमध्ये स्वीकृत सदस्य निवडण्याची मागणी

**वरूड नायब तहसीलदारांना निवेदन**




अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**बेनोडा ( शहीद ), दि.७ :** सध्या राज्यात महायुवती सरकार च्या काळात महाराष्ट्रामध्ये नगर पलीका ,नगर परिषद ,महानगर पालिका आणि जिल्हा परिषद ,पंचायत समिती तसेच कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये स्वीकृत सदस्य म्हणून निवड केली जाते.तसेच ग्रामीण भागातील ग्रामपंचायत व गट ग्रामपंचायत मध्ये येणाऱ्या निवडणुका मार्च ते एप्रिल मध्ये होणार असून स्वीकृत सदस्याची निवड करावी अशी मागणी ग्रामीण भागातून जोर धरत आहे.तरी ग्रामीण भागात राजकीय पदाधिकारी ,सामाजिक कार्यकर्ता तसेच आजी माजी सरपंच ,उपसरपंच तसेच सदस्य आणि नागरिक यांच्यामध्ये नाराजगीचा सूर दिसून येतो.कि ग्रामीण भागातील नागरिकावर अन्याय होतो आहे .हा न्याय भरून काढण्यासाठी दहा ग्रामपंचाय सदस्यामागे दोन स्वीकृत सदस्य देण्यात यावे .गावागावातील डॉक्टर ,वकील ,पत्रकार ,सामाजिक काम करणाऱ्या नागरिकांची निवड करावी जेणेकरून ग्रामपंचायतच्या विकासकामात भर पडेल व ग्रामपंचायतीला मार्गदर्शन करता येईल.

# वंडली ग्रामवासीयांच्या वतीने शिक्षकांचा सन्मान

**कु.दिपाली भारती, शितल लहाने यांचा सत्कार**

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**भातकुली, दि.७ :** भातकुली दि.५ व ५ फेब्रुवारी २०२६ ला भातकुली तालुक्यामधील वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांचा वारसा जपणाऱ्या आदर्श गाव वंडली या गावी वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ५७ व्या पुण्यतिथी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.



या पुण्यतिथी महोत्सवाच्या निमित्ताने ग्राम वंडली या गावी दोन दिवस अनेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते व या महोत्सवात संपूर्ण गावकरी उत्साहाने सहभागी झाले होते.

या वर्षी या कार्यक्रमामध्ये या वर्षात या गावातील शाळेमध्ये नव्याने रुजू झालेल्या कु.दीपिका भारती मॅडम व कु.शीतल लहाने मॅडम यांचा संपूर्ण गावकरी व प्रमुख पाहुणे व मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून सन्मान व सत्कार करण्यात आला. कु.दिपीका भारती मॅडम व कु.शीतल लहाने मॅडम या नव्यानेच काही महिन्याआधी या शाळेमध्ये रुजू झाल्या, त्यांनी गेल्या सहा सात महिन्यात अतिशय मेहनत घेत विविध उपक्रमाच्या माध्यमातून शाळेची गुणवत्ता वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न केले,या प्रयत्नांची फलश्रुती अशी की,यामुळे शाळेची गुणवत्ता तर वाढलीच, त्याचबरोबर पटसंख्या वाढण्यास सुध्दा मदत झाली.

# रमाई आंबेडकर जयंती निमित्त एकपात्री नाटकाचे आयोजन

**सार्वजनिक कपिल मंडळ बडनेरा, सोशल वेल्फर चॅरिटेबल ट्रस्टचा उपक्रम**

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**बडनेरा, दि.७ :** बडनेरा येथील नई वस्ती परिसराततील अशोक नगर परिसर येथील सार्वजनिक कपिल मंडळ बडनेरा तर्फे माता रमाई जयंती साजरी करण्यात आली असून काल संध्याकाळी नागपूर येथील सादर करते एकपात्री नाटिका मी रमाई बोलते याचे आयोजन करण्यात आले होते.

सुप्रियाताई मनोहर वानखडे यांनी रमाई बोलते चांगल्या प्रकारे रमाईच्या जीवनावरील एकपात्री



नाटक सादर केले आहे. मोठ्या प्रमाणातील नागरिकांनी यामध्ये सहभाग घेतला होता रमाई च्या जीवनावर आधारित असलेले एकपात्री नाटकात सादर करण्यात बाबासाहेबांच्या जीवनात रमाई चे महत्व पटवून सांगितले संध्याकाळी मोठ्या प्रमाणात भव्य मिरवणूक काढण्यात आली असून यामध्ये समाजातील अनेक मान्यवर तसेच महिला मंडळींनी यामध्ये भाग घेतला होता.

# तिवसा येथे दोन दिवस रमाई जयंती महोत्सव

**तिवसा, दि.७ :** माता रमाई जयंती उत्सव समिती तिवसाच्या वतीने ता. ८ व ९ फेब्रुवारी रोजी दोन दिवस जयंती उत्सव साजरा करण्यात येणार आहे. माता जिजाऊ, अहिल्यादेवी होळकर, माता सावित्रीबाई फुले, माता रमाबाई आंबेडकर व फातिमा शेख यांच्या संयुक्त जयंतीच्या अनुषंगाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. आज शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात सकाळी ११ वाजता वेशभूषा स्पर्धा तसेच दुपारी एक वाजता वक्तृत्व स्पर्धा होणार आहे. ता. ८ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे सायंकाळी ६ वाजता जाहीर व्याख्यानचे आयोजन करण्यात आले आहे.या व्याख्यानाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.स्मिता आर देशमुख आदी उपस्थित राहणार.

# सेंट्रल बँक ऑफ इंडिया तर्फे एम.एस.एम. ई क्रेडिट आऊटरिच कार्यक्रम

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि.७ :** आज सेंट्रल बँक ऑफ इंडिया च्या क्षेत्रीय कार्यालय अमरावती तर्फे कमल प्लाझा येथे एम एस एम ई-क्रेडिट आऊटरिच कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमा करिता अध्यक्ष म्हणून श्री किरण पातूरकर (अध्यक्ष एम.आय.डी.सी. असोसिएशन, अमरावती) हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री हेमंत शर्मा (उप महाप्रबंधक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, केंद्रीय कार्यालय अमरावती) श्री शिवाजी देठे (एम डी आणि सी ई ओ, अभिनंदन बँक) हे होते तर प्रमुख



वक्ते म्हणून श्री पंकज अग्रवाल (सी ए आणि एम एस एम ई सबसिडी विशेषज्ञ) हे होते. इतर प्रमुख पाहुणे म्हणून श्री नेत्रदीप चौधरी (प्रकल्प संचालक एम सी ई डी अमरावती) श्री सुरेशजी जैन (संचालक सुरेश जैन इंडस्ट्रीज) आणि श्री किरण हातगावकर (संचालक आरोग्यम् हॉस्पिटल) हे होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक हे श्री सुनील पांडेय (क्षेत्रीय प्रमुख, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, अमरावती) यांनी केले ज्यात त्यांनी बँकेच्या सुविधा तसेच सायबर गुन्ह्या पासून वाचण्या साठी घेण्यात येणाऱ्या सावधानी वर मार्गदर्शन केले. श्री हेमंत शर्मा यांनी सेंट्रल बँक आपल्या ग्राहकासाठी सदैव केंद्रित आणि तत्पर आहे असे प्रतिपादन केले. श्री शिवाजी देठे यांनी सेंट्रल बँक ऑफ इंडियाची स्तुति करताना बँक एम एस एम ई क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत आहे असे सांगितले.

श्री किरण पातूरकर यांनी अमरावती खुप वेगाने प्रगती करत असलेलं शहर असून भविष्यात अमरावती मध्ये येणारे विविध उद्योग या बद्दल सविस्तर माहिती दिली आणि सेंट्रल बैंक आपल्या दारी आली असून त्यांच्या सुविधांचा लाभ घ्यावा असे आवाहन केले.श्री पंकज अग्रवाल यांनी आपल्या मार्गदर्शनात राज्य सरकार आणि केंद्र सरकार द्वारे चालविण्यात येणाऱ्या विविध व्यवसाय योजना आणि त्यात मिळणारे अनुदान या वार सविस्तर चर्चा करून आलेल्या पाहुण्याच्या प्रश्नाची उत्तरे दिली.कार्यक्रमात सेंट्रल बँक ऑफ इंडिया आणि एम आय डी सी असोसिएशन अमरावती यांचे दरम्यान सामंजस्य करार करण्यात आला. पुढे सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या विविध शाखांच्या ग्राहकांना स्वीकृती पत्र आणि चेक चे वितरण करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्र संचालन श्री निलेश मुंदेकर यांनी केले तर आभार प्रदर्शन एल डी एम अमरावती श्री नरेश हेडाऊ यांनी केले.

**आध्यात्मिक** | **५६ वर्षांपासून अखंड हरिनाम सप्ताहाची परंपरा**

# खोलापूर येथे संत ज्ञानेश्वर महाराज जीवन चरित्र कथा

अजिंक्य भारत | कैलास बांगर

**खोलापुर, दि.७ :** भातकुली तालुका मधील धार्मिक कार्याला प्रसिद्ध असलेले गाव खोलापुर अंतर्गत श्री.ह.भ.प. भागवताचार्य रविंद्र महाराज पाटील खालखोनीकर यांच्या व्यासपिठ नेतृत्वाखाली संत ज्ञानेश्वर महाराज जिवण चरित्र कथा संगित व दृष्यासह तथा ज्ञानेश्वरी पायायण सप्ताह संपन्न होत आहे. नमो ज्ञानेश्वरा नमो ज्ञानेश्वरा/ निवृत्ती उदारा सोपान देवा// या संत वचणानुसार श्री. हनुमान मंदिर खोलापुर कोळीपुरा या ठिकाणी गेल्या ५६ वर्षांपासून अखंड हरिनाम सप्ताहाची परंपरा चालु आहे. संत ज्ञानेश्वर महाराज जिवण चरित्र कथे करिता महिला व पुरुष मंडळी बहु संखेने उपस्थित असतात. दि. १ फेब्रुवारी ते ८ फेब्रुवारी पर्यंत ज्ञानेश्वरी पारायण सप्ताह व महाराष्ट्रातील नामवंत किर्तनकार मंडळीचे किर्तने आयोजित केले आहे. या वर्षाला भव्य दिव्य स्वरुपात बालविजय गणेशोत्सव मंडळ व गावकरी मंडळी खोलापुर (कोळीपुरा) यांच्या व्दारे



आयोजन करण्यात आले आहे. दैनंदिन कार्यक्रम म्हणून सकाळी काकडा आरती, हनुमान चालीसा, ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी संत ज्ञानेश्वर महाराज जिवण चरित्र कथा संगित व दृष्यासह सायंकाळी हरिपाठ, व रात्रीला हरि किर्तन आयोजित करण्यात आले आहे. १ फेब्रुवारीला ह.भ.प. विणोदाचार्य ओम महाराज पाथरे रा जळका शहापूर, २ फेब्रुवारीला ह.भ.प. मंगेश महाराज शास्त्री आळंदीकर रा हिंगणी, ३ फेब्रुवारीला ह.भ.प. विणोदाचार्य श्रीनिवास महाराज अडगोकर रा रासेगाव, ४ फेब्रुवारीला ला ह.भ.प. दासगिरी महाराज (कृष्णाई गोरक्षण संस्था अंबोडा जी अकोट), ५ फेब्रुवारीला ह.भ.प. सोपान महाराज काळपांडे रा. आळंदिकर, ६ फेब्रुवारीला श्री.ह.भ.प. संतोष महाराज निंबाळकर आळंदिकर, ७ फेब्रुवारीला दुपारला ४ वाजता गावातुन भव्य दिव्य पालखी सोहळ्याची मिरवणूक काढण्यात येईल. या सोहळ्यामध्ये पंचक्रोशीतील हजारो महिला व पुरुष मंडळी उपस्थित असतात. त्यानंतर रात्री विणोदाचार्य विशाल महाराज वाकोडे रा. आपातापाजी अकोला याचे किर्तन होईल व ८ फेब्रुवारीला सकाळी १० ते १२ श्री.ह.भ.प. भागवताचार्य रविंद्र महाराज पाटील खालखोनीकर यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. . नंतर दान दात्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. नंतर महाप्रसादाचे वितरण करण्यात येणार आहे.या कार्यक्रमाला संच मंडळी म्हणून विणेकरी ह.भ.प. तन्मय महाराज झासकर रा खोलापुर तबलावादक ह.भ.प. सार्थक महाराज गाळे रा खालखोनी , आर्गणवादक ह.भ.प. नरेशभाऊ गोलाईत रा भातकुली, एक्टोपॅट ह.भ.प. रितेशभाऊ इंगोले रा वाठोडा. मृदंग सम्राट श्री.ह.भ.प. बालाजी महाराज जाधव रा.आळंदिकर , गायणाचार्य .ह.भ.प. शुभम महाराज रावणकर रा हरताळा, उपस्थित राहणार आहे.

# धामंत्री येथे उद्यापासून शिवमहापूराण व कलश यात्रा

**प्राचीन नागेश्वर ज्योतीर्लींग महादेव संस्थाकडून आयोजन**

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**तिवसा, दि.७ :** तालुक्यातील श्रीक्षेत्र धामंत्री येथील प्राचीन नागेश्वर ज्योतीर्लींग महादेव मंदिर संस्थाच्या वतीने ता.९ फेब्रुवारी ते १६ फेब्रुवारी पर्यंत महाशिवरात्री निमित्त शिवमहापूराण कथाचे आयोजन करण्यात आले आहे. दररोज १ ते ५ वाजेपर्यंत कथा असणार असून कथावाचक अविनाश महाराज कडू यांच्या वाणीतून होणार आहे. या महाशिवरात्री उत्सवानिमित्त आयोजित शिवमहापूराण व विविध कार्यक्रमात सर्व भाविक भक्तांनी सहभागी होण्याचे आवाहन मंदिराचे अध्यक्ष कैलाशकुमार पनपालीया यांनी केले आहे.



या कथेच्या प्रारंभादरम्यान ता. ९ फेब्रुवारी रोजी सकाळी वरदायिनी वर्धा नदीचे तीरावरून धामंत्री येथुन ते नागेश्वर महादेव संस्थान धामंत्री नगरीत कलश पूजन व पालखी पूजन करून विदर्भाची गंगा वर्धा नदीतून जल भरून शंभू महादेवाच्या भव्य शिवलींगावर जल अर्पण केले जाणार आहे. तसेच ता. १५ रोजी महाशिवरात्रीला दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा उत्कृष्ट प्रसाद व्यवस्था आणि भक्तांचीं गैरसोय होऊ नये यासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. ता. १६ रोजी काल्याचे कीर्तन व महाप्रसादाने कार्यक्रमाचीं सांगता होणार आहे.महाशिवरात्री निमित्त होणाऱ्या या शिवमहापूराण व कलश यात्रेच्या आयोजन व नियोजनासाठी नागेश्वर ज्योतीर्लींग महादेव मंदिर संस्थाचे विश्वस्त विजय करडे, मोहन इंगळे, रवींद्र भोयर, धीरज चांडक, सुनिल मारबदे, रमेश राउत तसेच सहकारी मनोहर कसर, जानरावजी भारस्कर, रामुकाका बावने आदी परिश्रम घेत आहे.

## घटना - घडामोडी



### वणीच्या रुचिता जुनेजा यांना 'श्लोकरत्न' पुरस्कार

**वणी :** मुंबईत देववाणी ओलंपियाडतर्फे आयोजित संस्कृत श्लोक ओलंपियाड स्पर्धेत वणी येथील रुचिता जुनेजा यांनी 'श्लोकरत्न' पुरस्कार पटकावला. १५ स्तरांमध्ये १५५ श्लोकांचे सादरीकरण असलेल्या या स्पर्धेत त्यांनी आणि त्यांच्या विद्यार्थ्यांनी बाजी मारली. संस्कृत भाषेचा प्रचार आणि प्रसार करण्याच्या उद्देशाने आयोजित या स्पर्धेत देशभरातील स्पर्धक सहभागी झाले होते. रुचिता जुनेजा यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनीही उल्लेखनीय यश मिळवले. यात स्वरा लोणारे हिने 'श्लोकरत्न' पुरस्कार मिळवला. तसेच ओजस्वी देठे, जैनम समदरीया, रिद्धी खाबिया, कायरा काठेड, रेयांश बोथरा, निम्रत सलुजा, आनंदी देठे, रित्वी लोया, शरयू देठे, उर्वी देठे, दिशी अग्रवाल, ईश्वरी सुत्रावे, जैनेश जुनेजा आणि स्वाती बत्रा यांना 'श्लोकाचार्य' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या उपक्रमासाठी नवकार इंग्लिश स्कूल आणि लायन्स इंग्लिश मिडियम स्कूलचे सहकार्य लाभले. 'संस्कृत से संस्कार' हे ब्रीद घेऊन हा उपक्रम राबवला जात असून वणीतून विजेत्यांचे कौतुक होत आहे.




### टाकळीत राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर

**उमरखेड :** राष्ट्रीय सेवा योजना ही युवकांना घडवणारी कार्यशाळा असून राष्ट्राच्या उभारणीत युवकांचे योगदान महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन डॉ. अनिल काळबांडे यांनी केले. टाकळी (न.) येथे गोपीकाबाई सीताराम गावंडे महाविद्यालयाच्या वतीने आयोजित शिबिरात ते बोलत होते. येथील राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या बौद्धिक सत्रात 'राष्ट्रनिर्मितीत युवकांची भूमिका' या विषयावर मिलिंद महाविद्यालय, मुळावाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. अनिल काळबांडे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला कवी नितीन शिंदे, डॉ. संदीप चेडे आणि पोलिस पाटील शंकर हापसे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. डॉ. चेडे यांनी सिकलसेल आजारावर मार्गदर्शन केले, तर नितीन शिंदे यांनी कवितेतून शेतकऱ्यांची व्यथा मांडली. डॉ. काळबांडे यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार युवकांसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. शिबिराचे आयोजन प्राचार्य डॉ. माधवराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अधिकारी डॉ. त्रिरत्न भगत, डॉ. विठ्ठल जिवतोडे आणि डॉ. सरला निंभोरकर यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुहासिनी राऊत, सूत्रसंचालन तन्वी शिंदे व प्रीती कदम यांनी केले, तर आभार प्रीती चंदनवार हिने मानले.



### पुसदच्या सर्वेश्वर महादेव मंदिरात शिवमहिम्न पठण सप्ताह

**पुसद :** येथील शंकरनगरस्थित श्री सर्वेश्वर महादेव मंदिरात माघ महिन्यानिमित्त आयोजित सात दिवसीय शिवमहिम्न स्तोत्र पठण सप्ताहाची सांगता उत्साहात झाली. सुनीता तगलपल्लेवर यांच्या मार्गदर्शनाखाली महिलांनी भगवान शंकराची आराधना केली. माघ मासाच्या पावन पर्वावर शंकरनगरातील महिलांनी या सप्ताहात सहभाग घेतला. सुनीता तगलपल्लेवर यांच्या नेतृत्वात सात दिवस नियमित स्तोत्र पठण करण्यात आले. सप्ताहाच्या समारोपाला शिवमहिम्न स्तोत्राच्या घोषात महादेवाला दुग्धाभिषेक करण्यात आला. त्यानंतर उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. या धार्मिक उपक्रमामुळे संपूर्ण नगरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. अनेक भाविकांनी या सोहळ्याला हजेरी लावून दर्शन घेतले. मंदिराचे मुख्य विश्वस्त शाम जोशी यांनी सांगितले की, माघ महिन्यात मंदिरात सातत्याने धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. तसेच आगामी महाशिवरात्रीचा उत्सवही मोठ्या उत्साहात आणि भव्य स्वरूपात साजरा केला जाणार आहे.



### संत नामदेव महाराज मूर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिन उत्साहात

**यवतमाळ :** जांब मार्गावरील मंदिरात संत नामदेव महाराज समाज उन्नती मंडळाच्या वतीने आयोजित मूर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिन सोहळा विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम आणि गुणवंत विद्यार्थी सत्काराने उत्साहात पार पडला. सप्ताहाची सांगता राजू साखरकर यांच्या कीर्तनाने झाली. सुभाष ढोणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाला बाळासाहेब मांगुळकर, भास्कर टोम्पे, बिपीन चौधरी, भगवान कापसे, नितीन तिजारे, विजय देशकर, जितेंद्र फुसे, गजानन तिजारे उपस्थित होते. यावेळी अधिकारी शुभम तिजारे यांचा सत्कार छाया व काशिनाथ तिजारे यांच्यासह झाला. सांस्कृतिक कार्यक्रमात मनीषा ढोणे, बेबी दांडेकर, राखी देशकर, अर्चना चिंचोळकर, ममता गोहणे सहभागी होत्या. कार्यक्रमासाठी विनेश वंदेकर, राहुल ढोणे, नितीन कापसे, सुनील डवले, अजय दीडमुठे, अजय गोहणे, योगेश चिंचोळकर, मनोहर कापसे, श्रीकांत बोबडे, सुनील कापसे, संगीता दांडेकर, नरेंद्र फुसे, विशाल चवलढाल, कल्पना फुसे, कल्याणी तिजारे यांनी परिश्रम घेतले.

# यवतमाळात स्वच्छतेचा बोजवारा

## नगरसेवक डॉ. नीरज वाघमारे यांनीच हातात घेतले घंटागाडीचे स्टिअरिंग!

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. ७ :** यवतमाळच्या प्रभाग क्रमांक १० मध्ये शनिवारी (दि. ७) प्रशासनाला चपराक लगावणारे एक अनोखे दृश्य पाहायला मिळाले. कचरा संकलन करणारे ई-रिक्षा चालक आणि सफाई कामगार गैरहजर असल्याने संतापलेले नगरसेवक डॉ. नीरज वाघमारे यांनी स्वतःच्या हातात स्टिअरिंग घेत चक्क ई-रिक्षा चालवित कचरा संकलन केले. सत्ताधारी भाजपच्या काळातही शहराची स्वच्छता 'रामभरोसे' असल्याचे या घटनेने पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे.



यवतमाळ नगरपालिकेतून प्रशासक राजवट संपुष्टात आली आणि भारतीय जनता पार्टीची सत्ता स्थापन झाली. 'नवे पर्व, नवी आशा' फोल ठरली असून, शहराची अवस्था 'जैसे थे' नव्हे तर अधिकच बिकट झाली आहे. शनिवारी सकाळी प्रभाग क्रमांक १० मधील नागरिक कचरा गाडीची वाट पाहत होते, पण कंत्राटी कर्मचारी गायब होते. अखेर गटनेते डॉ. नीरज वाघमारे यांनी स्वतः ई-रिक्षाचा ताबा घेतला आणि घरोघरी जाऊन कचरा गोळा केला. हे दृश्य पाहून प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. शहरात कचरा संकलनाचा मक्ता खासगी ठेकेदाराला देण्यात आला आहे. मात्र, या ठेकेदारावर नगरपालिकेचा कोणताही वचक राहिलेला नाही, असा आरोप होत आहे. कामगार वेळेवर येत नाहीत, ई-रिक्षांचे फेरे अनियमित आहेत आणि मनमानी कारभार सुरू आहे. डॉ. वाघमारे यांनी थेट मैदानात उतरून या भोंगळ कारभाराचे वाभाडे काढले. 'सत्ताधारी आणि प्रशासन केवळ बघ्याची भूमिका घेत आहेत. जर लोकप्रतिनिधीलाच कचरा गोळा करावा लागत असेल, तर यापेक्षा मोठे प्रशासकीय अपयश ते काय?' असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला. केवळ प्रतिकात्मक आंदोलन न करता त्यांनी प्रत्यक्ष कचरा उचलून नागरिकांच्या तक्रारीही जाणून घेतल्या. ठेकेदार, आरोग्य निरीक्षक आणि संबंधित अधिकाऱ्यांची साखळीच या गैरव्यवस्थेला जबाबदार असल्याचा आरोप होत आहे. 'जबाबदारी झटकून चालणार नाही. कामचोर ठेकेदार आणि दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई झाली नाही, तर यापेक्षा तीव्र आंदोलन छेडले जाईल,' असा इशारा वाघमारे यांनी दिला आहे. ही घटना केवळ एका प्रभागापुरती नसून संपूर्ण शहराची हीच 'कचरा कथा' झाल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे.

### कायद्यालाच फासला हरताळ

स्वच्छ भारत अभियान आणि 'कचरा व्यवस्थापन नियम २०१६' नुसार शहरात कचरा संकलनाचे काटेकोर नियम आहेत. यात ओला आणि सुका कचरा वेगळा गोळा करणे, नियमित डंपिंग ग्राउंडवर नेणे आणि शहराचे आरोग्य अबाधित राखणे हे पालिकेचे बंधनकारक कर्तव्य आहे. मात्र, यवतमाळमध्ये या सर्व नियमांना ठेकेदाराने केराची टोपली दाखवली आहे. नियम कागदावरच राहिले असून, प्रत्यक्षात शहराचे 'उकिरडा' झाले आहे. प्रशासनाच्या नाकाखाली नियमांची पायमल्ली होत असताना अधिकारी मूग गिळून गप्प का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### कामगारांची सुरक्षा वाऱ्यावर?

कचरा संकलन करणाऱ्या कामगारांना किमान सुरक्षा साधने मिळणे आवश्यक आहे. मात्र, ठेकेदाराकडून कामगारांना ना गणवेश दिला जातो, ना ओळखपत्र. ई-रिक्षांचे रोजचे फेरे निश्चित नाहीत आणि कामगारांची हजेरीही बायोमेट्रिक पद्धतीने होत नसल्याने मोठा भ्रष्टाचार होत असल्याचा संशय आहे. कामगारांच्या जीवाशी खेळ आणि पालिकेच्या तिजोरीची लूट, असा दुहेरी प्रकार सुरू असताना सत्ताधाऱ्यांचे याकडे सोयीस्कर दुर्लक्ष होत आहे.

## माळेगावात हरभरा पिकाची शेतीशाळा

### नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचा उपक्रम

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**सावळी सदोबा, दि. ७ :** आर्णी तालुक्यातील माळेगाव येथे नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत हरभरा पिकाची शेतीशाळा आयोजित करण्यात आली होती. यावेळी शेतकऱ्यांना हरभरा पिकावरील रोगराई नियंत्रण आणि उत्पादन वाढीबाबत मंडळ कृषी अधिकारी वर्षा भोसले यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.



सावळी सदोबा परिसरातील मौजे माळेगाव येथे हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला. या शेतीशाळेत वर्षा भोसले यांनी हरभरा पिकावर येणाऱ्या विविध किडी आणि रोगांची ओळख पटवून देत त्यांच्या प्रतिबंध व नियंत्रणाबाबत तांत्रिक माहिती दिली. तसेच, कृषी विभागाने विकसित केलेल्या 'महाविस्तार ॲप'चा शेतकऱ्यांना कसा फायदा होऊ शकतो, हे समजावून सांगितले. या ॲपद्वारे पीक सल्ला, हवामान माहिती, कीड-रोग निदान आणि शासकीय योजनांची माहिती कशी मिळवावी, याचे प्रात्यक्षिक देण्यात आले. कृषी सहाय्यक एम. एन. बळवंते यांनीही यावेळी हरभरा पिकाच्या सुधारित लागवड पद्धती आणि उत्पादन वाढीसाठी आवश्यक उपाययोजनांवर मार्गदर्शन केले. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती फायदेशीर करण्यावर भर देण्यात आला. या कार्यक्रमाला परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## परमडोह येथून सोमवारी 'वारी प्रबोधनाची'चा दुसरा टप्पा

### किशोर गज्जलवार यांच्याहस्ते होणार उद्घाटन

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**वणी, दि. ७ :** तालुक्यातील परमडोह येथे ग्रामसमृद्धी आणि सामाजिक प्रबोधनाच्या उद्देशाने आयोजित 'वारी प्रबोधनाची' उपक्रमाच्या दुसऱ्या टप्प्याचा शुभारंभ सोमवारी (दि. ९) होणार आहे. नारायण बाबा देवस्थानात किशोर गज्जलवार यांच्या हस्ते आणि मधुकर वाभिटकर यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा पार पडणार आहे.

सकाळी १० वाजता परमडोह येथील श्री नारायण बाबा देवस्थानात विधिवत पूजेने वारीला सुरुवात होईल. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मधुकर वाभिटकर, तर स्वागताध्यक्ष रुपलता निखाडे असतील. उद्घाटक म्हणून गटविकास अधिकारी किशोर गज्जलवार आणि प्रमुख उपस्थितीत मुख्याधिकारी सचिन



गाडे पाटील असतील. यावेळी मार्गदर्शक म्हणून भाऊसाहेब थुटे, रवी मानव, ज्ञानेश्वर रक्षक, दिलीप भोयर, राज घुमणार, उदार उपस्थित राहणार आहेत. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून संजय निखाडे, विठ्ठल डाखरे, नेताजी पारखी, संतोष वऱ्हाटे, कवडू वडस्कर आणि संकेत गज्जलवार यांची उपस्थिती असेल. 'वारी प्रबोधनाची' अंतर्गत गावोगावी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांचा जागर, स्वच्छता, व्यसनमुक्ती आणि ग्रामविकासावर जनजागृती केली जाणार आहे. यासाठी भजन, कीर्तन आणि भारुडाचा वापर होईल. वारीच्या स्वागतासाठी गावे सज्ज झाली असून रांगोळ्या आणि तोरणांनी परिसर सजला आहे. गावकरी आणि श्रीगुरुदेव भजन मंडळ या उपक्रमासाठी परिश्रम घेत आहेत.

**CAPTION** हर हर महादेव...



**म्हसोला (का.) :** येत्या १५ फेब्रुवारीला होणाऱ्या महाशिवरात्रीच्या पर्वावर शिवालयांकडे ओढ लागलेले भाविक... 'हर हर महादेव' आणि 'बम बम भोले'च्या जयघोषात आणि भक्तिमय वातावरणात महादेवाच्या दर्शनासाठी निघालेले म्हसोला परिसरातील ग्रामीण शिवभक्त. हातामध्ये पताका, मुखात शिवनामाचा जप आणि मनात अपार श्रद्धा घेऊन मजल-दरमजल करत मार्गक्रमण करणारी ही दिंडी. (छायाचित्र : बंडू हलबी, म्हसोला)

## दोन कोटींची मंजूर कामे त्वरित सुरू करा

### जुनेद शेख यांची मागणी : अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**आर्णी, दि. ७ :** नगरपरिषदेच्या पहिल्या सर्वसाधारण सभेत एकमताने मंजूर झालेली आणि आमदारांच्या निधीतून होणारी २ कोटी रुपयांची विकासकामे त्वरित सुरू करा, अन्यथा शहरवासीयांना सोबत घेऊन तीव्र 'अन्नत्याग आंदोलन' करण्यात येईल, असा सडेतोड इशारा सामाजिक कार्यकर्ते जुनेद शेख यांनी दिला आहे. काही विघ्नसंतोषी लोकांकडून निराधार तक्रारी करून शहराच्या विकासात अडथळे आणले जात असल्याचा आरोप करीत शेख यांनी मुख्याधिकाऱ्यांना थेट अल्टीमेटम दिला आहे.





आर्णी नगरपरिषदेच्या निवडणुका तब्बल ४-५ वर्षांच्या विलंबाने पार पडल्या. तत्पूर्वी, मुख्याधिकारी रवींद्र राऊत यांनी प्रशासक म्हणून शहराचा कारभार अत्यंत नियमबद्ध आणि लोकहिताला प्राधान्य देत हाकला. दरम्यान, २०२५-२६ च्या निवडणुकीनंतर पार पडलेल्या पहिल्याच सर्वसाधारण सभेत आमदारांनी शहरासाठी मंजूर केलेल्या २ कोटींच्या निधीचा विषय मांडण्यात आला. तांत्रिक कारणास्तव प्रलंबित असलेला हा निधी आणि त्याअंतर्गत होणारी विकासकामे सर्व सदस्यांच्या एकमताने मंजूर करण्यात आली. जुनेद शेख यांनी स्पष्ट केले की, ही संपूर्ण निविदा प्रक्रिया शासनाच्या नियमांचे पालन करून, पूर्णतः पारदर्शक आणि स्पर्धात्मक पद्धतीने राबविण्यात आली आहे. यामध्ये कोणताही गैरव्यवहार झालेला नाही. तरीही काही स्वार्थी घटकांकडून केवळ राजकीय हेतूने किंवा वैयक्तिक स्वार्थासाठी या विकासकामांमध्ये जाणीवपूर्वक अडथळे आणले जात आहेत. विकासाला खीळ घालणाऱ्या अशा प्रवृत्तींमुळे शहराचे नुकसान होत आहे. त्यामुळे मुख्याधिकाऱ्यांनी अशा निराधार तक्रारींकडे पूर्णतः दुर्लक्ष करून जनहिताची ही कामे तात्काळ सुरू करावीत. लोकप्रतिनिधींनीही राजकारण बाजूला ठेवून शहराच्या प्रगतीसाठी काम करावे. प्रशासनाने वेळीच दखल न घेतल्यास विकासाची आस धरणारे नागरिक एकत्र येऊन उपोषण करतील, असे जुनेद शेख यांनी स्पष्ट केले आहे.


## आठ वर्षांतच दिग्रस-आर्णी महामार्गाला पडल्या भेगा

### प्रवाशांचा जीव धोक्यात, प्रशासन गप्प का?, राष्ट्रीय महामार्ग बोजवारा, कंत्राटदाराची उघड लूट

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**दिग्रस, दि. ६ :** दिग्रस-आर्णी राष्ट्रीय महामार्गावर (एनएच१६१-अ) अवघ्या आठ वर्षांतच कोट्यवधी रुपयांचा 'चुराडा' झाला आहे. विकासाचे स्वप्न दाखवून बनवलेला हा चकाचक रस्ता आता निकृष्ट कामामुळे अक्षरशः 'मृत्यूचा सापळा' बनला आहे. जागोजागी पडलेल्या भेगा, वाढलेली झाडेझुडपे आणि जीवघेण्या प्रवासाने नागरिक त्रस्त असताना, कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांच्या सोयीस्कर दुर्लक्षामुळे संताप व्यक्त होत आहे.





परिसरातील दळणवळणाचा कणा मानल्या जाणाऱ्या दिग्रस-आर्णी राष्ट्रीय महामार्गाची अवस्था सध्या 'असून अडचण, नसून खोळंबा' अशी झाली आहे. अवघ्या आठ वर्षांपूर्वी जनतेच्या करातून कोट्यवधी रुपये खर्च करून हा महामार्ग तयार करण्यात आला. मात्र, आज या रस्त्यावर पडलेल्या भेगा पाहता, कामात मोठ्या प्रमाणात 'पाणी मुरल्याचे' स्पष्ट होत आहे. रस्ता तयार होऊन दशकही पूर्ण झाले नसताना त्याची अशी चाळण होणे, हे संबंधित ठेकेदार आणि देखरेख करणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे. महामार्गाच्या दोन्ही बाजूंना वाढलेल्या झाडाझुडपांनी दिशादर्शक फलक, गावांचे नावफलक आणि अंतर दर्शविणारे दगड पूर्णपणे झाकले गेले आहेत. त्यामुळे वाहनचालकांना रस्ता आणि वळणांचा अंदाज येत नसून, ते देवाच्या भरवश्यावर वाहने चालवत आहेत. विशेषतः रात्रीच्या वेळी हा प्रवास अधिकच धोकादायक ठरत आहे. प्रशासनाकडून या मार्गाची साधी साफसफाई किंवा देखभालही केली जात नसल्याने संताप व्यक्त होत आहे. तूपटाकळी गावाजवळ तर परिस्थिती आणखी विदारक आहे. मुख्य रस्त्यालगतच शेणखताचे उकिरडे आणि कचऱ्याचे ढिग साचले आहेत, ज्यामुळे महामार्गाची रुंदी निम्म्यावर आली आहे. अशा ठिकाणी अपघाताची टांगती तलवार असतानाही, अतिक्रमण हटविण्याची जबाबदारी असलेली यंत्रणा 'गांधारीची भूमिका' का घेत आहे? असा सवाल उपस्थित होत आहे. अनेक ठिकाणी रेडियम पट्ट्या नसल्याने रात्री वाहने चालवणे जिकिरीचे झाले आहे. काही हॉटेल व्यावसायिकांनी तर दिशादर्शक फलकांवर स्वतःच्या जाहिराती लावून शासकीय मालमत्तेचा गैरवापर सुरू केला आहे, तरीही प्रशासन कारवाई करण्यास धजावत नाही, हे दुर्दैव आहे.

### प्रवासी निवाऱ्यांचा झाला 'सांगाडा'

महामार्गावरील प्रवासी निवाऱ्यांची अवस्था अत्यंत भयावह झाली आहे. लाख-रायाजी फाट्यावरील निवारा पूर्णपणे झाडांनी वेढला गेला आहे, तर कलगाव फाट्यावरील निवारा काही महिन्यांपूर्वी वाहनाच्या धडकेने तुटला असून तो तसाच उभा आहे. खांब मोडलेले, छप्पर लटकलेले आणि नावफलक गायब अशा स्थितीत जीव मुठीत धरून प्रवासी वाहनांची वाट पाहत आहेत. वाईमेंढी आणि कलगाव फाट्यावर नियमानुसार दोन्ही बाजूंना निवारे आवश्यक असताना, केवळ एकाच बाजूला ते उभारून ठेकेदाराने हात वर केले आहेत. मृद व जलसंधारण मंत्री ना. संजय राठोड यांच्या प्रयत्नातून उभारलेल्या काही निवाऱ्यांचीही पडझड झाली असून देखभाल शून्य आहे.

# हायप्रोफाईल कुंटणखान्यांवर पोलिसांची धाड

## यवतमाळातील वाघापूर नाका आणि लोहारा परिसरातील दोन अपार्टमेंटमध्ये देहविक्रीचा 'बाजार'

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि.७ :** यवतमाळ शहराच्या शांततेला गालबोट लावणाऱ्या आणि उच्चभ्रू वस्तीत छुप्या पद्धतीने सुरू असलेल्या देहविक्री व्यवसायावर पोलिसांनी जोरदार प्रहार केला आहे. पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांच्या मार्गदर्शनात शहर आणि लोहारा पोलिसांनी शुक्रवारी रात्री आणि शनिवारी दुपारी केलेल्या दोन वेगवेगळ्या कारवाईत हायप्रोफाईल कुंटणखान्यांचा पर्दाफाश करण्यात आला. वाघापूर नाका आणि लोहारा परिसरातील अपार्टमेंटमध्ये सुरू असलेल्या या अनैतिक धंद्यावर धाड टाकत पोलिसांनी पीडित तरुणींची सुटका केली असून, कुंटणखाना चालवणाऱ्या दलालांच्या मुसक्या आवळल्या आहेत.



समर्पण अपार्टमेंटमध्ये रचला सापळा शहरातील अत्यंत वर्दळीच्या आणि उच्चभ्रू समजल्या जाणाऱ्या वाघापूर नाका ते पिंपळगाव रोडवरील 'समर्पण अपार्टमेंट'मधील फ्लॅट क्रमांक ०२ मध्ये गेल्या काही दिवसांपासून देहविक्रीचा व्यवसाय सुरू असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे शहर पोलिस ठाण्याच्या डी.बी. पथकाने शुक्रवारी रात्री अत्यंत नियोजनबद्ध सापळा रचला. पोलिसांनी एका बनावट ग्राहकाला (पंटर) पाठवून खात्री करताच फ्लॅटवर अचानक धाड टाकली. यावेळी कुंटणखाना चालवणारी मुख्य महिला सूत्रधार आणि तिचा साथीदार अंकुश रामभाऊ कडू (वय ४०, रा. भेंडाळा, ता. गंगापूर, जि. संभाजीनगर) याला रंगेहात पकडण्यात आले. या ठिकाणाहून पोलिसांनी एका पीडित तरुणीची सुटका करून तिला सुरक्षितरीत्या सुधारगृहात रवाना केले.

### वैभव नगरमध्ये दुसरी धडक कारवाई

**पहिल्या कारवाईची चर्चा सुरू असतानाच शनिवारी दुपारी लोहारा पोलिसांनी दुसरी मोठी कारवाई केली. लोहारा हद्दीतील वैभव नगर परिसरात एका राहत्या घराचा वापर अनैतिक कामांसाठी केला जात होता. भरवस्तीत सुरू असलेल्या या प्रकारामुळेनागरिक त्रस्त होते. लोहारा पोलिसांनी या घरावर छापा टाकत कुंटणखाना चालवणाऱ्या एका महिलेसह पुरुष आरोपीला ताब्यात घेतले. या कारवाईतही एका पीडित तरुणीची सुटका करण्यात आली आहे. दोन्ही प्रकरणात लोहारा आणि शहर पोलिस ठाण्यात अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. उच्चभ्रू सोसायट्यांमध्ये कुटुंबीयांसह राहणाऱ्या नागरिकांना या प्रकारांचा मोठा मानसिक त्रास सहन करावा लागत होता. पोलिसांच्या या धडक कारवाईमुळेपरिसरातील रहिवाशांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार रामकृष्ण जाधव, रोहित चौधरी आणि पीएसआय गणेश सपकाळ यांच्या पथकाने केली.**

### अवैध धंदेवाल्यांना कडक इशारा

**'शहरातील लॉज, अपार्टमेंट किंवा राहत्या घरात असे अवैध प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत. तरुण पिढीला वाममार्गाला लावणाऱ्या अशा अनैतिक धंद्यांवर यापुढेही कठोर कारवाई सुरूच राहील. घरमालकांनी आपली वास्तू भाड्याने देताना खबरदारी घ्यावी, अन्यथा त्यांच्यावरही कारवाई होऊ शकते.'**

**-पोलिस प्रशासन, यवतमाळ.**

### महत्वाचे


## रेतीचा ट्रॅक्टर पकडताच चालकाचे पलायन

**यवतमाळ :** अवैध रेती वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरला थांबवण्याचा प्रयत्न केला असता, चालकाने रेतीसह ट्रॅक्टर पळवून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. ही घटना ३० जानेवारी रोजी दुपारी १ वाजताच्या सुमारास अकोला बाजार येथील नाल्यावरील पुलाजवळ (यवतमाळ रोड) घडली. याप्रकरणी ६ फेब्रुवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी आकाश प्रमोदराव जगताप (३२, रा. अकोला बाजार) यांना एक निळ्या रंगाचा सोनालिका कंपनीचा ट्रॅक्टर (विना नंबर) आणि हिरव्या रंगाची ट्रॉली रेतीची वाहतूक करताना दिसली. त्यांनी ट्रॅक्टरचा पाठलाग करून तो थांबवला. मात्र, ट्रॅक्टर चालक गोपाल मारोती शेंद्रे (३०, रा. अकोला बाजार) याने फिर्यादीला सहकार्य न करता, घटनास्थळावरून रेती भरलेला ट्रॅक्टर घेऊन पळ काढला. याप्रकरणी वडगाव जंगल पोलीस ठाण्यात गोपाल शेंद्रे आणि अज्ञात ट्रॅक्टर मालकाविरुद्ध बीएनएस कलम ३०३(२) आणि पर्यावरण संरक्षण कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## तरुणाची दुचाकी चोरीला

**आर्णी :** बाबा कम्बलकोष यात्रेसाठी आलेल्या एका तरुणाची दुचाकी अज्ञात चोरट्याने पळवून नेल्याची घटना घडली. ही घटना ६ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री १०.३० वाजताच्या सुमारास माहूर रोडवरील यात्रा परिसरात घडली. फिर्यादी वैभव वाघुजी इंगळे (२२, रा. दहीसावळी) हे उरुस पाहण्यासाठी आले होते. त्यांनी आपली हिरो स्प्लेंडर प्लस मोटारसायकल (क्रमांक एमएच २९ बी डब्ल्यू ३२०६) यात्रा परिसरात उभी केली होती. मात्र, अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेत त्यांची २२ हजार रुपये किमतीची दुचाकी चोरून नेली. यात्रेवरून परतल्यावर दुचाकी जागेवर नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. याप्रकरणी वैभव यांनी दिलेल्या तक्रारीवरून आर्णी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध बीएनएस कलम ३०३ (२) अन्वये चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करत आहेत. आर्णी तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून दुचाकी चोरट्यांनी चांगलाच धुमाकूळ घातल्याचे चित्र दिसून येत आहे.

### CAPTION सुस्वागतम्...!



**यवतमाळ: येथील शिंदे प्लॉट परिसरातील 'नलिनी क्रिष्णा रिनॉयन्सा'या इमारतीतील रहिवासी व लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ. सरिता देशमुख यांच्या निवासस्थानी उद्या (रविवारी) श्री संत गजानन महाराज प्रगटदिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या मंगल प्रसंगी घरी येणाऱ्या पाहुण्यांच्या आणि भाविकांच्या स्वागतासाठी प्रवेशद्वारावर 'सुस्वागतम्...!'ही नयनरम्य रांगोळी साकारण्यात आली आहे. प्रा. कु. पूजा पठाडे आणि त्यांची विद्यार्थिनी कु. रागिणी भीतकर यांनी ही सुबक आणि लक्षवेधी रांगोळी रेखाटली असून, ती उपस्थितांचे लक्ष वेधून घेत आहे.**

## सीआरपीएफ जवान विनोद पुसनाके यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**





**पांढरकवडा, दि. ७ :** मध्यप्रदेशातील निमच येथे अपघातात निधन झालेले सीआरपीएफ जवान विनोद पुसनाके यांच्यावर शनिवारी (दि. ७) पांढरकवडा तालुक्यातील बोथ येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. मेंदूला जबर दुखापत झाल्याने उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला होता. यावेळी हजारो नागरिक उपस्थित होते.

केळापूर तालुक्यातील बोथ येथील ४५ वर्षीय विनोद पुसनाके हे मध्यप्रदेशातील निमच येथे तैनात होते. ६ फेब्रुवारी रोजी अपघातात त्यांच्या मेंदूला गंभीर दुखापत झाली आणि उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. शनिवारी (दि. ७) त्यांचे पार्थिव बोथं येथे आणण्यात आले. 'विनोद पुसनाके अमर रहे' आणि 'भारत माता की जय'च्या घोषणेत अंत्ययात्रा निघाली. बोथ रोडलगतच्या शेतात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या तुकडीने बंदुकीच्या फैरी झाडून मानवंदना दिली. सीआरपीएफचे डी.सी. बनवारीलाल मीना, पोलिस निरीक्षक लहू तावरे, एपीआय सागर पेंढारकर, सीआरपीएफ नागपूरचे निरीक्षक ईश्वर शेठी यांनी पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. तसेच पांढरकवडा आणि वणी येथील माजी सैनिक संघटनांनीही श्रद्धांजली दिली. विनोद पुसनाके यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, तीन मुली आणि दोन भाऊ असा परिवार आहे. त्यांच्या निधनामुळे बोथ बाजारपेठ कडकडीत बंद ठेवण्यात आली होती. पार्थिव घरी पोहोचताच कुटुंबीयांनी केलेला आक्रोश पाहून उपस्थितांचे डोळे पाणावले.

## यवतमाळात जैन बिझनेस कार्निवलचे उद्‌घाटन



**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. ७ :** येथील समता मैदानावर जोश फाउंडेशनतर्फे आयोजित जैन बिझनेस कार्निवलचे उद्घाटन नगराध्यक्षा प्रियदर्शनी उईके यांच्या हस्ते उत्साहात करण्यात आले. उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी ६ ते ९ फेब्रुवारी दरम्यान या चार दिवसीय महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून सकल जैन समाजाचे संयोजक किशोर दर्डा, तहसीलदार योगेश देशमुख, महिला समितीच्या अध्यक्षा चंदा कोटेचा, जैन सेवा समितीचे अध्यक्ष महावीर भन्साली आणि जोश फाउंडेशनचे अध्यक्ष गौरव खिवसरा आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्निवलमध्ये विविध उद्योग क्षेत्रांतील स्टॉल्स, तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल आहे. व्यवसायाच्या नव्या संधी उपलब्ध करून देणे हा यामागील मुख्य उद्देश आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वर्षा तातेड यांनी केले, तर आभार प्रजोत कांकरिया यांनी मानले.

## 'बंद दाराआड' घडलेली घटना अ‍ॅट्रॉसिटीच्या कक्षेत नाही!

### नागपूर खंडपीठाचा महत्त्वपूर्ण निर्वाळा; आर्णीतील प्रकरण

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**आर्णी, दि.७ :** आर्णी येथील तहसील कार्यालयात घडलेल्या आणि संपूर्ण तालुक्यात गाजलेल्या प्रकरणात उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने अत्यंत महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. 'सदर घटना ही तहसील कार्यालयाच्या बंद भागात घडल्याने ती सार्वजनिक ठिकाणी किंवा लोकांच्या दृष्टीस पडेल अशी नाही,' असे स्पष्ट निरीक्षण नोंदवत न्यायालयाने सुभाष चव्हाण यांच्यावर दाखल झालेला अ‍ॅट्रॉसिटीचा गुन्हा आणि एफआयआर रद्द करण्याचे आदेश दिले आहेत.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, आर्णी तहसील कार्यालयात काही दिवसांपूर्वी घडलेल्या एका घटनेने राजकीय आणि सामाजिक वर्तुळात खळबळ उडवून दिली होती. या प्रकरणी सुभाष चव्हाण यांच्या विरोधात अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये (अ‍ॅट्रॉसिटी) गुन्हा दाखल करण्यात आला होता. या कारवाईला आव्हान देत आणि तो रद्द करण्यात यावा, या मागणीसाठी चव्हाण यांनी प्रसिद्ध विधिज्ज्ञ अ‍ॅड. ए. व्ही. चिरडे यांच्या मार्फत उच्च न्यायालयात धाव घेतली होती. या याचिकेवर सुनावणी दरम्यान अ‍ॅड. चिरडे यांनी केलेला युक्तिवाद अत्यंत कळीचा ठरला. त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की, 'संबंधित घटना ही तहसील कार्यालयाच्या अशा भागात घडली आहे, जो त्यावेही बंद होता आणि तिथे सर्वसामान्यांचा वावर नव्हता. अ‍ॅट्रॉसिटी कायदा लागू होण्यासाठी ती घटना 'सार्वजनिक ठिकाणी' किंवा 'सार्वजनिक दृष्टीक्षेपात'घडणे अनिवार्य असते. या प्रकरणात ही कायदेशीर अट पूर्ण होत नाही.' न्यायालयाने हा युक्तिवाद ग्राह्य धरत घटनेचे स्वरूप आणि ठिकाण विचारात घेऊन हा एफआयआर रद्दबातल ठरवला. या निकालामुळे सुभाष चव्हाण यांना मोठा दिलासा मिळाला आहे. तर दुसरीकडे, भविष्यात अशा प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये अ‍ॅट्रॉसिटी कलम लावताना नेमका अर्थबोध कसा घ्यावा, याबाबत स्पष्ट दिशा मिळाल्याचे मत कायदेतज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. आर्णी परिसरात या निकालाची जोरदार चर्चा सुरू आहे.

## समता पर्वच्या मुख्य संयोजकपदी नारायण थूल

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि. ७ :** येथील शासकीय विश्रामगृहात समता पर्व प्रतिष्ठानच्यावतीने आयोजित बैठकीत समता पर्व २०२६ च्या नियोजनासाठी नारायण थूल यांची मुख्य संयोजक म्हणून निवड करण्यात आली. लीला भेले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत सुमेध देवतळे आणि उमेश मेश्राम यांच्यावरही महत्वाच्या जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या.

महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त गेल्या २१ वर्षांपासून यवतमाळमध्ये समता पर्व सातत्याने साजरे केले जाते. यंदा ७ ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत हा उपक्रम पार पडणार आहे. या पर्वाच्या यशस्वी नियोजनासाठी शासकीय विश्रामभवनात लीला भेले यांच्या अध्यक्षतेखाली सहविचार सभा पार पडली. या सभेत नारायण थूल यांची मुख्य संयोजकपदी, तर सुमेध देवतळे यांची कार्यकारी समन्वयक आणि उमेश मेश्राम यांची प्रवक्ते म्हणून एकमताने निवड करण्यात आली. तसेच 'यवतमाळ आयडल' या उपक्रमाची जबाबदारी धर्मपाल भितकर यांच्याकडे सोपविण्यात आली. या निवडीचे उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात स्वागत केले. यंदाचे पर्व अधिक व्यापक आणि प्रभावी स्वरूपात साजरे करण्याचा विश्वास मान्यवरांनी यावेळी व्यक्त केला.

## धामणगाव 'देव'मध्ये मुंगसाजी महाराजांचा यात्रोत्सव

### ५०हजार भाविकांची मांदियाळी; पालकमंत्र्यांचे प्रशासनाला 'सूक्ष्म' नियोजनाचे निर्देश

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि.७ :** विदर्भाच्या संत परंपरेत अग्रगण्य स्थान असलेल्या दारव्हा तालुक्यातील श्री क्षेत्र धामणगाव (देव) येथे भगवान मुंगसाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त भव्य यात्रोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या २३ व २४ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या या सोहळ्यासाठी ५० हजारांवर भाविक येण्याचा अंदाज आहे. या पार्श्वभूमीवर पालकमंत्री ना. संजय राठोड यांनी जिल्हा प्रशासनाला 'डोळ्यात तेल घालून'तयारी करण्याचे निर्देश दिले आहेत.



मुंगसाजी महाराजांच्या चरणी लीन होण्यासाठी बुलडाणा, वाशीम, अकोला आणि अमरावतीसह कानाकोपऱ्यातून भक्तगणांची रीघ लागते. या गर्दीचे नियोजन आणि भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून पालकमंत्री संजय राठोड यांनी शनिवारी जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक घेतली. प्रशासनाने यात्रोत्सवाचे 'सूक्ष्म नियोजन'करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या. बैठकीला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, अतिरिक्त जिल्हाधिकारी अनिल खंडागळे, दारव्ह्याचे उपविभागीय अधिकारी विजय सूर्यवंशी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोज ढगे यांच्यासह संस्थानचे पदाधिकारी गजानन आंबोरे, राजू देशमुख व सरपंच उपस्थित होते. तहानलेल्यांसाठी टँकर आणि आजारी लोकांसाठी डॉक्टरांचे पथक, उन्हाची चाहूल लागल्याने पिण्याच्या पाण्याची चणचण भासू नये, यासाठी शुद्ध पाणी आणि टँकरची व्यवस्था सज्ज ठेवण्यास सांगण्यात आले आहे. तसेच अखंडित वीजपुरवठा, जादा एसटी बसेस, आरोग्य पथक, अग्निशमन दल आणि सीसीटीव्ही यंत्रणा तैनात करण्याच्या सूचना देण्यात आल्या. यात्रेत गर्दीच्या वेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये, म्हणून पोलिस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवावा. तसेच मंदिर परिसरात स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि आपत्ती व्यवस्थापनावर भर देण्याचे आदेशही पालकमंत्र्यांनी दिले.

**'धामणगाव (देव) हे महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. यात्रेत येणाऱ्या वारकऱ्यांना आणि भक्तांना कोणताही त्रास होऊ नये, ही प्रशासनाची जबाबदारी आहे. पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि वाहतूक या त्रिसूत्रीवर भर देऊन काटेकोर नियोजन करावे. भक्तांच्या सुरक्षेसाठी कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही.'**

**-ना. संजय राठोड, पालकमंत्री, यवतमाळ.**

## सायली मगर (रणनवरे) यांना कृषी जैवतंत्रज्ञानात 'पीएच.डी.

### विदर्भातील सोयाबीन पिकावर येणाऱ्या 'चारकोल रॉट'रोगावर महत्त्वपूर्ण संशोधन

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि.७ :** येथील निरोही नगरमधील रहिवासी सायली गणेश मगर (रणनवरे) यांनी अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातून कृषी जैवतंत्रज्ञान या विषयात आचार्य (पी.एचडी.) पदवी यशस्वीरित्या संपादित केली आहे.



सायली यांनी विदर्भातील शेतकऱ्यांसाठी चिंतेचा विषय ठरणाऱ्या सोयाबीन पिकावरील 'चारकोल रॉट'या गंभीर बुरशीजन्य रोगावर संशोधन केले आहे. हे संशोधन शेतकऱ्यांसाठी भविष्यात फायदेशीर ठरणार आहे. त्यांना डॉ. ई. आर. वैद्य यांचे मुख्य मार्गदर्शन लाभले. तसेच, संपूर्ण संशोधन प्रवासात डॉ. वंदन मोहोड यांनी त्यांना मोलाचे सहकार्य व प्रोत्साहन दिले. सायली या कृषी विभागातील कर्मचारी गणेश मगर यांच्या कन्या आहेत. त्यांच्या या यशाबद्दल शैक्षणिक व सामाजिक स्तरातून अभिनंदन होत आहे.